CMYK

सोलापूर
# तरुण भारत
SOLAPUR TARUN BHARAT
न मे कर्मफले स्पृहा
सोलापूर, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित

सोलापूर | गुरुवार, १९ डिसेंबर २०२४ | युगाब्द ५१२५ | वर्ष ४१ वे अंक ४३ | पाने १२ | किंमत रु. ६/-
| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |
ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

## महत्त्वाचे

### शेअर बाजारांत पुन्हा घसरण

**मुंबई** : अमेरिकेच्या फेडरल रिझर्व्हच्या व्याजदर निर्णयापूर्वी मुंबई शेअर बाजाराच्या निर्देशांकात आणि राष्ट्रीय शेअर बाजाराच्या निफ्टीत बुधवारी सलग तिसऱ्या सत्रात घसरले. निर्देशांक ५०२ अंकांनी घसरून ८०,१८२ वर बंद झाला. निफ्टी १३७ अंकांच्या घसरणीसह २४,१९८ वर स्थिरावला. आज एचडीएफसी बँक आणि आयसीआयसीआय बँक या हेवीवेट शेअर्समध्ये विक्री दिसून आली. गुंतवणूकदारांनी मंगळवारी ६,४०९.८६ कोटी रुपयांच्या शेअर्सची विक्री केली. सोमवारी त्यांनी २७८.७० कोटींच्या शेअर्सची विक्री केली. मागील तीन सत्रांत बाजारात घसरण झाली आहे. यामुळे गुंतवणूकदारांचे सुमारे सहा लाख कोटींचे नुकसान झाले आहे. बीएसई सूचीबद्ध कंपन्यांचे बाजार भांडवल शुक्रवारच्या ४५९ लाख कोटी रुपयांवरून बुधवारी ४५३ लाख कोटी रुपयांपर्यंत खाली आले आहे.

### आर. अश्विन आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्त

**ब्रिस्बेन** : बॉर्डर-गावस्कर चषक पाच सामन्यांची कसोटी मालिका अर्ध्या टप्प्यावर असताना भारताचा स्टार ऑफस्पिनर



रविचंद्रन् अश्विन याने अचानक निवृत्तीची घोषणा करून क्रिकेट जगताला आश्चर्यचकित केले. अश्विनने १०६ सामन्यांमध्ये ५३७ बळींसह कसोटीत भारतासाठी दुसरा सर्वाधिक बळी टिपणारा गोलंदाज म्हणून निवृत्ती घेतली. ३८ वर्षीय अश्विनने ॲडिलेडमध्ये दिवस-रात्र कसोटी खेळली व एक गडी बाद केला.

### ऐतिहासिक वास्तूंचे पावित्र्यभंग करणाऱ्यांवर कठोर शिक्षेची तरतूद करावी : अंबादास दानवे

**नागपूर** : राज्यातील ऐतिहासिक व सांस्कृतिक गडकिल्ल्यांचे व पुरातत्व स्थळांच्या पावित्र्य भंगाच्या घटना समोर येतात . या ऐतिहासिक वास्तूंचे संरक्षण करण्यासाठी मुबलक प्रमाणात कर्मचारी व पावित्र्यभंग करणाऱ्यांवर कठोर शिक्षेची तरतूद करण्यात यावी, अशी मागणी आज विधानपरिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी महाराष्ट्र प्राचीन स्मारके व पुरातत्व शास्त्र विषयक स्थळे व अवशेष (सुधारणा) विधेयकावरील चर्चेदरम्यान सरकारकडे केली. महाराष्ट्र प्राचीन स्मारके व पुरातत्व शास्त्र विषयक स्थळे व अवशेष (सुधारणा) विधेयक २०२४ आणून शासनाने अत्यंत स्तुत्य काम केले आहे. विधेयक अत्यंत चांगले असले तरीही शिवकालीन व यादवकालीन अनेक गड किल्ल्यांवर मद्य सेवन व जुगार खेळले जातात, अशी खंत व्यक्त केली.



भाजपाचे नेते राम शिंदे यांनी बुधवारी विधान परिषदेच्या सभापतिपदासाठी आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, चंद्रकांत पाटील आणि मंत्री चंद्रशेखर बावनकुळे प्रामुख्याने उपस्थित होते

# राम शिंदेंची सभापतिपदी बिनविरोध निवड

◆ **नागपूर, १८ डिसेंबर**

राज्यात महायुतीचे सरकार स्थापन झाल्यानंतर पहिले अधिवेशन नागपूरमध्ये पार पडत आहे. या अधिवेशनात विधान परिषद सभापतिपदासाठी भाजपाचे प्रा. राम शिंदे यांचा एकमेव अर्ज आला आहे. त्यामुळे गुरुवारी प्रा. शिंदे यांची सभापतिपदी बिनविरोध निवड होणार असल्याचे नक्की झाले आहे. प्रा. राम शिंदे यांची सभापतिपदी निवड होणार असल्याचे तरुण भारतच्या १३ डिसेंबरच्या अंकात प्रकाशित वृत्त खरे ठरले आहे.




रामराजे नाईक निंबाळकर यांच्या विधान परिषदेच्या सदस्यत्वाची मुदत ७ जुलै २०२२ रोजी संपुष्टात आल्यानंतर हे पद रिक्त आहे. रामराजे निंबाळकर यांच्या विधान परिषद सभापतिपदाच्या कार्यकाळानंतर उपसभापतिपदी विराजमान असलेल्या डॉ. नीलम गोऱ्हे गेल्या दोन वर्षांपासून सभापतिपदाची जबाबदारी सांभाळत आहेत.

राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन् यांनी १६ डिसेंबर रोजी या पदाची निवडणूक घेण्यासंदर्भात आदेश दिल्यानंतर निवडणूक जाहीर करण्यात आली.

उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांना सभापतिपद मिळावे यासाठी प्रयत्न झाल्याचे सांगण्यात येते. परंतु पक्षीय बलाबल लक्षात घेता, हे पद भाजपाकडेच राहणार, हे स्पष्ट झाले. प्रा. राम शिंदे यांच्याबरोबर भाजपाचे ज्येष्ठ नेते प्रवीण दरेकर यांच्या नावाची चर्चा होती. अखेर प्रा. राम शिंदे यांच्या नावावर शिक्कामोर्तब झाले.

**संधीचे सोने करीन : राम शिंदे**

मी विधानसभेची निवडणूक हरल्यानंतरही माझे नाव मंत्री, प्रदेशाध्यक्षपदासाठी चर्चेत होते. माझ्यावर विश्वास असल्यामुळे पक्षाने मला योग्य सन्मान मिळवून दिला आहे. पक्षाने दिलेल्या या संधीचे मी नक्कीच सोने करीन, अशी भावना प्रा. राम शिंदे यांनी बुधवारी विधानभवन परिसरात प्रसारमाध्यमांशी बोलताना व्यक्त केली. ◄(तभा वृत्तसेवा)

# डॉ. आंबेडकरांचा अपमान स्वप्नातही करू शकत नाही

### माझ्या विधानाचा काँग्रेसने विपर्यास केला

### गृहमंत्री अमित शाह यांचा आरोप

◆ **नवी दिल्ली, १८ डिसेंबर**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांबाबतच्या राज्यसभेतील माझ्या विधानाचा विपर्यास करीत काँग्रेसने देशातील जनतेची दिशाभूल करण्याचा प्रयत्न केला. काँग्रेस हा नेहमीच संविधानविरोधी आणि आरक्षणविरोधी असल्याचा आरोप केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी आज केला. आंबेडकरांचा अपमान मी आणि माझा पक्ष स्वप्नातही करू शकत नाही, असे अमित शाह यांनी ठामपणे सांगितले.

अमित शाह यांच्या डॉ. आंबेडकरांबाबतच्या कथित विधानावरून संसदेच्या दोन्ही सभागृहात गदारोळ झाला. यानंतर भाजपा मुख्यालयात आयोजित पत्रपरिषदेत आपली बाजू स्पष्ट करताना शाह यांनी काँग्रेसचा खरपूस समाचार घेतला. यावेळी भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डा आणि माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव उपस्थित होते.

काँग्रेसने माझे विधान मोडतोड करून दाखवले. काँग्रेसची ही जुनी सवय आहे, याआधीही काँग्रेसने विधानसभा निवडणुकीच्या प्रचारात माझी काही विधाने एआयचा वापर करीत मोडतोड करून दाखवली. त्यांच्या अशा कुत्सित प्रयत्नांचा मी निषेध करतो. माझे पूर्ण भाषण तुम्ही जनतेपर्यंत पोहोचवा, असे अमित शाह यांनी सांगितले.




### आणखी १५ वर्षे तुम्हाला तिथेच बसायचे आहे

मल्लिकार्जुन खडगे यांनी केलेल्या राजीनाम्याच्या मागणीचा उल्लेख करीत शाह म्हणाले की, माझ्या राजीनाम्यामुळे खडगे यांना आनंद होत असेल, तर मी राजीनामा द्यायला तयार आहे, पण त्याचा खडगे यांना काही फायदा होणार नाही. खडगेसाहेब आज तुम्ही जिथे बसला आहात, तिथे तुम्हाला आणखी १५ वर्षे बसायचे आहे. तुमच्यासारख्या नेत्याकडून माझी ही अपेक्षा नव्हती, पण तुम्हीही राहुल गांधी यांच्या दबावात या षडयंत्रात सामील झाला.

भाजपा नेत्यांच्या भाषणानंतर संसदेत काँग्रेसचा आंबेडकरविरोधी चेहरा समोर आला आणि काँग्रेसने खोट्या गोष्टींचा आधार घेत माझ्याविरुद्ध अपप्रचार सुरू केला. काँग्रेसच दलितविरोधी, संविधानविरोधी तसेच आरक्षणविरोधी तसेच सावरकरविरोधी आहे, असा आरोप अमित शाह यांनी केला.

**मृत्यूनंतरही आंबेडकरांना न्याय दिला नाही**

काँग्रेसने जिवंतपणी सोडाच, मृत्यूनंतरही डॉ. आंबेडकर यांना न्याय दिला नाही, त्यांचा सन्मान केला नाही. जवाहरलाल नेहरूंनी स्वत: भारतरत्न घेतला, गांधी घराण्यातील अन्य नेत्यांनाही भारतरत्न मिळाला. पण, काँग्रेसने सावरकरांना भारतरत्न मिळू दिला नाही. १९९० मध्ये आमचा पाठिंबा असलेले सरकार केंद्रात सत्तेवर आले, तेव्हा कुठे डॉ. आंबेडकरांना भारतरत्न मिळाला. काँग्रेसच्या अशा अपप्रचाराला देशातील जनता बळी पडणार नाही; कारण देशातील जनता काँग्रेसच्या नेत्यांना आणि त्यांच्या खोटारडेपणाला ओळखून आहे, असे अमित शाह म्हणाले. ◄(तभा वृत्तसेवा)


# शहरी नक्षल्यांचे अड्डे नष्ट करण्यासाठी स्वतंत्र कायदा

### विशेष जनसुरक्षा विधेयक सादर

**नागपूर, १८ डिसेंबर-**

शहरी नक्षलवाद केवळ दुर्गम भागापुरता मर्यादित नाही. देशाची यंत्रणा पोखरण्यासाठी शहरी नक्षलवाद्यांनी एक 'इकोसिस्टिम' सिद्ध केली आहे. भारताच्या राज्यघटनेवरील विश्वास उडावा, यासाठी शहरी नक्षलवादी कार्यरत आहेत. अशा शहरी नक्षलवाद्यांचे अड्डे नष्ट करण्याचा सरकारचा मानस आहे. त्यासाठी हा स्वतंत्र कायदा आणल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सभागृहात सांगितले.

अधिवेशनाच्या तिसऱ्या दिवशी महाराष्ट्र विशेष जनसुरक्षा विधेयक २०२४ मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सादर केले. यावेळी नक्षलवाद्यांना अटक केल्यास त्यांना सोडवण्यासाठी ही इकोसिस्टिम काम करते. अशा प्रकारच्या शहरी नक्षलवाद्यांच्या विरोधात कारवाई करण्यासाठी स्वतंत्र कायदा नाही.



नक्षलवाद्यांच्या विरोधात भारतीय दंड विधान आणि आतंकवादविरोधी कायदा यांद्वारे कारवाई करावी लागते, परंतु सर्वोच्च न्यायालयात या कायद्यातील कलमे टिकत नाहीत. शहरी नक्षलवादाच्या विरोधात कडक कारवाई करता यावी, यासाठी छत्तीसगड, तेलंगणा, आंध्रप्रदेश आणि ओडिशा या राज्यांप्रमाणे महाराष्ट्रात स्वतंत्र कायदा करण्याचा निर्णय महाराष्ट्र शासनाने घेतला आहे. 'महाराष्ट्र विशेष जनसुरक्षा अधिनियम' या नावाने आणण्यात येत असलेला हा कायदा सभागृहात सादर करत असलो तरी, सर्वंकष चर्चा करून, सामाजिक संस्था आणि अन्य मार्गाने आलेल्या चांगल्या सूचनांचा अंतर्भाव करून, एक सक्षम कायदा आणण्याचा सरकारचा मानस आहे. त्यामुळे विरोधी पक्षाकडून मागणी केली नसतानाही योग्य प्रकारे चर्चा व्हावी, यासाठी हे विधेयक संयुक्त समितीकडे पाठण्याचा निर्णय मी स्वतः घेतला असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत सांगितले.

### विशेष कायद्याची आवश्यकता काय?

दुर्गम भागात हत्या करणाऱ्या नक्षलवाद्यांविषयी सहानुभूती निर्माण करणे, त्यांना अटक झाल्यावर त्यांचे समर्थन करणारे विचार मांडणे आदी द्वारे शहरी नक्षलवादी अप्रत्यक्ष आणि प्रत्यक्षपणे नक्षलवादाच्या समर्थनाचे काम करतात. सध्या अस्तित्वात असलेल्या कायद्यान्वये कारवाई करण्यास मर्यादा येतात. सध्या अस्तित्वात असलेल्या आयपीसीनुसार आपण कारवाई करतो किंवा मग यूएपीए ॲक्ट लावावा लागतो. मात्र, हा कायदा दहशतवाद विरोधी कायदा आहे. त्यामुळे दहशतवाद आणि नक्षलवाद दोघांमध्ये तफावत असल्याने, या त्रुटींचा गैरफायदा घेत न्यायालयातून सुटका करून घेण्यात अनेकांना यश मिळाल्याची उदाहरणे अनेक आहेत. आणि हे सगळं स्वतंत्र कायदा नसल्यामुळे शक्य होत असल्याने हा कायदा करण्याची गरज भासल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी यावेळी सभागृहात सांगितले.

# जिल्ह्यातील १२८ वाड्यांवर जलजीवन मिशन राबविणार : कोहिणकर

### नव्या कामांचे सुधारित अंदाजपत्रक शासनाकडे सादर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१८ डिसेंबर**

सोलापूर जिल्ह्यातील जलजीवन मिशनच्या १२८ कामांचे सुधारित अंदाजपत्रक शासनाकडे सादर करण्यात आले आहे. अशी माहिती जिल्हा परिषदेचे प्रभारी मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहिणकर यांनी दिली.

दरम्यान, जलजीवन मिशनच्या मंजूर झालेल्या कामात काही गावातील वाडयावस्त्यांचा समावेश झाला नव्हता. सुधारित अंदाजपत्रकात त्या वाडयावस्त्यांचा समावेश करून शासन आदेशानुसार जिल्हा परिषदेच्या वतीने १२८ कामांचे सुधारित अंदाजपत्रक शासनाकडे सादर करण्यात आले आहे. शासनाकडून मान्यता प्राप्त झाल्यानंतर ती १२८ सुधारित कामे लवकरच सुरू करण्यात येणार असल्याचे कोहिणकर यांनी सांगितले.




### जल जीवनची थकीत बिले अधिवेशनानंतर

जिल्ह्यातील जल जीवन मिशन अंतर्गत पूर्ण झालेल्या कामांची सुमारे ५२ ते ५५ कोटीची बिले थकीत आहेत. या संदर्भात शासन पातळीवर प्रयत्न सुरू आहेत. नागपूर येथील हिवाळी अधिवेशन संपल्यानंतर जल जीवन मिशन अंतर्गत कामाची थकीत असणारी ठेकेदारांची बिले अदा करण्यात येणार आहे.

**-संजय धनशेट्टी,**
**कार्यकारी अभियंता**
**ग्रामीण पाणीपुरवठा**
**विभाग जि.प**

# नेव्हीच्या स्पीड बोटच्या धडकेमुळे समुद्रात बुडून १३ जणांचा मृत्यू



### तीन नेव्ही जवानांचा समावेश

**तभा वृत्तसेवा | जमीर काझी**
**मुंबई, दि.१८ डिसेबर-**

नौदलाकडून समुद्रात ग्रस्त घालत असलेल्या स्पीड बोटने नीलकमळ नावाच्या प्रवासी बोटेला दिलेल्या धडकेत बुडून झालेल्या दुर्घटनेत नौदलाच्या तीन जवानांसह एकूण १३ जणांचा मृत्यू झाला. सुमारे सात ते आठ जण अत्यवस्था असून त्यांच्यावर मुंबईतील विविध रुग्णालयात उपचार सुरू आहेत त्यामुळे मृतांचा आकडा वाढण्याची शक्यता आहे. .तर ९० प्रवाशांना सुखरूपपणे बाहेर काढण्यात बचाव पथकाला यश आले आहे. उरण कारंजजवळील समुद्राच्या परिसरात आज दुपारी चारच्या सुमारास ही घटना घडली. या भीषण दुर्घटनेमुळे प्रवाशांमध्ये मोठी भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. नौदल पोलीस तटरक्षक , मच्छीमाराच्याकडून संयुक्तपणे बचाव कार्य करीत प्रवाशांना बाहेर काढण्यात यश आले.

त्यासाठी नौदलाच्या हेलिकॉप्टरचा वापर करण्यात आला. प्रवाशांना नेव्हीसह मुंबईतील विविध रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. नीलकमळ बोटीमध्ये सर्व आवश्यक सुविधा उपलब्ध होत्या मात्र नेव्हीच्या बोटीने दिलेल्या धडकेने त्याचे दोन तुकडे होऊन ही दुर्घटना घडली आहे असा दावा बोटचे मालक राजेंद्र पडसे यांनी केला आहे. नौदलाच्या सूत्राकडून मिळालेल्या माहितीनुसार गेटवे ऑफ इंडिया कडून एलिफंटाकडे जात असलेल्या नीलकमल बोटीची प्रवासी क्षमता८६ जणांची असून त्यामध्ये ५ कर्मचाऱ्यासह एकुण ११० जणहोते. नेहमीप्रमाणे ती प्रवाशांना घेऊन निघाली होती. दुपारी ४ वाजण्याच्या सुमारास उरण कारण जवळ ग्रस्त घालणाऱ्या नेव्ही च्या स्पीड बोट ने या बोटीला वळसा घातला. पुन्हा ती नागमोडी वळण घेत वेगाने नीलकमलच्या दिशेने येऊन त्याला धडक दिली . प्रचंड वेग असल्याने जवानाला त्याला त्यावर नियंत्रण ठेवता आले नाही. धडकेमुळे बोट तुटून पाण्यात बुडू लागली . त्यामुळे प्रवाशांच्यात एकच खळबळ उडाली. सर्वांनी लाईफ जॅकेट घातले असलेतरी तरी भीतीमुळे त्यांची गाळण उडाली. आरडाओरड करीत त्यांनी मदतीसाठी अन्य बोटिंग चे लक्ष वेधले .ते पाहून किमार बोटीने त्याकडे बोट वळवली व या दुर्घटनेबाबत नेव्ही व तटरक्षका दलाच्या नियंत्रण कक्षाला कळवले. त्यानंतर कडेने घटनास्थळी नेव्ही,कोस्टल गार्ड व पोलीस दलाकडून पथके रवाना झाली. युद्ध स्तरावर बचाव कार्य सुरू करण्यात आले घटनेचे गांभीर्य समजून हेलिकॉप्टर ही घटनास्थळी पाठवण्यात आले त्यांनी तातडीने बोटीतील प्रवाशांना बाहेर काढत अन्य बोट व हेलिकॉप्टर मधून समुद्रकिनाऱ्यावर आणले. नाकातोंडात पाणी गेल्यामुळे अनेकजण बेशुद्ध झाले. सर्वांनाच रुग्णालयात दाखल करण्यात आले. या ठिकाणी उपचार करत असताना तिघांचा मृत्यू झाल्याची माहिती आहे. तर काहीजणांची प्रकृती गंभीर आहे. या दुर्घटनेची माहिती काही सणातच सर्वत्र पसरली त्यामुळे त्याबाबत उलट सुलट अंदाज व्यक्त करण्यात येऊ लागला होता त्याचे बोटीचे मालक राजेंद्र पडसे यांना एका प्रवाशाने देवीच्या स्पीड बोट ने धडक देत असलेल्या व्हिडिओ पाठवला त्यांनी तो पत्रकारांना दाखवत या दुर्घटनेला नेहमीची स्पीडबोट जबाबदार असल्याचा दावा केला आहे. शेकापक्षाचे जेष्ठ नेते जयंत पाटील यांनी घटनास्थळी अन्य बोटीतून जाऊन पाहणी केली.

दरम्यान , नागपुरात सुरू असलेल्या हिवाळी अधिवेशनात ही या घटनेचे प्रतिक्रिया उमटल्या. विधानसभेत आदित्य ठाकरे यांनी याबाबत प्रश्न उपस्थित करत मुख्यमंत्र्यांनी माहिती देण्याची मागणी केली. त्यानुसार फडणवीस यांनी बचावकार्याची माहिती देऊन सात ते आठ प्रवासी बेपत्ता असल्याचे सांगितले.तर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मुंबई शहर, रायगड जिल्हाधिकाऱ्यांकडून बचाव कार्याची माहिती घेतली. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनीही मुंबई शहर, रायगड जिल्हाधिकाऱ्यांकडून बचाव कार्याची माहिती घेतली. नौदल, जेएनपीटी, तटरक्षक दल आणि स्थानिक मच्छीमार बोटींच्या सहाय्याने बचाव कार्याला वेग देण्याचे निर्देश देत सगळ्यांना सुरक्षित बाहेर काढा, असे त्यांनी सांगितले.



सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## महत्त्वाचे

### होंडा आणि निसान मोटर्सचे विलीनीकरण?

**नवी दिल्ली :** होंडा मोटर कंपनी आणि निसान मोटर कंपनीचे विलीनीकरण होऊ शकते. टोयोटा मोटर कॉर्पोरेशनसोबत जागतिक बाजारपेठेत स्पर्धा करण्यासाठी दोन्ही कार निर्माते एकत्र येण्याचा विचार करत आहेत. होंडाचे कार्यकारी उपाध्यक्ष शिंजी ओयामा म्हणाले की, विलीनीकरणाव्यतिरिक्त, होंडा आणि निसान या दोन्ही कंपन्या भांडवल बांधणी आणि होल्डिंग कंपनी स्थापनेसह इतर अनेक पर्यायांवर चर्चा करत आहेत. मित्सुबिशी मोटर्स कॉर्प देखील या डीलमध्ये सामील होऊ शकते, कारण त्याचे निसानशी भांडवल संबंध आहेत.

### महाकुंभ मेळ्यासाठी मोफत प्रवासाची तरतूद नाही

**नवी दिल्ली :** महाकुंभाच्या काळात प्रवाशांना मोफत प्रवास करण्याची परवानगी दिली जाईल, अशी कोणतीही तरतूद नसल्याचे रेल्वे मंत्रालयाने सांगितले. कुंभमेळादरम्यान मोफत प्रवासाची परवानगी असल्याचा दावा करणारे वृत्त काही माध्यमे प्रसारित करीत असल्याचे रेल्वेच्या लक्षात आल्यानंतर, हे वृत्त पूर्णपणे निराधार आणि दिशाभूल करणारे असल्याचे रेल्वेने स्पष्ट केले. महाकुंभाच्या काळात प्रवाशांसाठी अखंड प्रवास सुनिश्चित करण्यासाठी भारतीय रेल्वे कटिबद्ध आहे, असे रेल्वेने नमूद केले.

### मध्यप्रदेशातील बँकांच्या वेळा बदलणार

**भोपाळ :** बँकिंग सेवा सुधारण्यासाठी मध्यप्रदेश सरकारने एक महत्वाचे पाऊल उचलले आहे. आता राज्यातील सर्व राष्ट्रीयीकृत बँका उघडण्याची आणि बंद होण्याची वेळ सारखीच असेल. येत्या १ जानेवारीपासून सर्व बँका सकाळी १० वाजता उघडतील आणि दुपारी चार वाजता बंद होतील. राज्यस्तरीय बँकर्स समितीच्या बैठकीत या निर्णयाला मान्यता देण्यात आली आहे. या निर्णयामुळे बँकिंग सेवा सुव्यवस्थित होण्यास मदत होईल, असा विश्वास व्यक्त केला आहे.

### उत्तर कोरियामध्ये भारतीय दूतावास पुन्हा सुरू होणार

**प्योंगयोंग :** २०२१ पासून बंद असलेला उत्तर कोरियातील आपला दूतावास पुन्हा सुरू करण्याचा निर्णय भारताने घेतला आहे. एक तांत्रिक आणि राजनयिक पथक उत्तर कोरियाला रवाना झाले आहे. काही कर्मचारी आधीच उत्तर कोरियाची राजधानी प्योंगयांग येथे पोहोचले आहेत. उत्तर कोरियामध्ये हेरगिरीच्या कारवायांची नेहमीच भीती असते. हे पाहता साडेतीन वर्षांपासून बंद असलेल्या भारतीय दूतावासाची आधी कसून चौकशी केली जाईल. भारताने जुलै २०२१ मध्ये प्योंगयांगमधील दूतावास बंद केला आणि राजदूत अतुल मल्हारी गोतसुर्वे संपूर्ण कर्मचाऱ्यांसह नवी दिल्लीला परतले.

### शेअर बाजार

| | |
|---|---|
| सेन्सेक्स | ८०,१८२.२० (-५०२.२५) |
| निफ्टी | २४,१९८.८५ (-१३७.१५) |

### सराफा

| | |
|---|---|
| सोने (स्टॅण्डर्ड/१० ग्रॅम) | ७७,८४० रु. |
| चांदी (प्रतिकिलो) | ९२,५०० रु. |

### तापमान

| | कमाल | किमान |
|---|---|---|
| सोलापूर | ३३.0 | १२.४ |
| अमरावती | ३२.० | ११.५ |
| भंडारा | २७.४ | १२.० |
| बुलडाणा | ३१.० | १२.५ |
| चंद्रपूर | २८.४ | -.- |
| गडचिरोली | २९.४ | १०.६ |
| गोंदिया | २८.२ | ८.८ |
| नागपूर | २९.१ | ९.४ |
| वर्धा | २९.५ | १०.५ |
| वाशीम | ३१.६ | -.- |
| यवतमाळ | २९.५ | -.- |

# संघ घोषाचा समग्र इतिहास नव्या पिढीसमोर येईल

## सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत यांचा विश्वास



घोष अभिलेखागाराच्या उद्घाटनप्रसंगी दीपप्रज्वलन करताना सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत

**पुणे, १८ डिसेंबर**

योग्य गोष्टी समाजापुढे मांडल्या गेल्या नाहीत, तर अयोग्य गोष्टी समाजापुढे येतात. या पृष्ठभूमीवर संघाच्या घोषाचा इतिहास एकाच ठिकाणी उपलब्ध करून देणाऱ्या घोष अभिलेखागाराचे महत्त्व खूप मोठे आहे. अभिलेखागारामुळे घोषाचा योग्य इतिहास नव्या पिढीसमोर येईल, असा विश्वास राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत यांनी व्यक्त केला.


राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या अखिल भारतीय घोष संग्रहालयाचे उद्घाटन सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत यांच्या हस्ते करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते. संघाच्या पुण्यातील मोतीबाग कार्यालयात घोष संग्रहालय आणि अभिलेखागार (अर्काईव) हा प्रकल्प साकारला असून, संघाच्या घोषासंबंधीची विस्तृत माहिती आणि वाद्ये येथे संग्रहित करण्यात आली आहेत. घोषासंबंधीचे ग्रंथ, पुस्तके, लेख आणि विविध प्रकारची सामग्री येथे मांडण्यात आली आहे. घोष विषयाच्या अभ्यासकांना तसेच या विषयातील तज्ज्ञांना येथे संशोधन तसेच अध्ययनही करता येणार आहे.

संघाच्या घोष विभागाचा इतिहास नव्या पिढीला माहिती होणे आवश्यक आहे. पूर्वीच्या काळात घोष विभाग कसा होता आणि तो कसा विकसित होत गेला, याची माहिती एकाच ठिकाणी संग्रहित असणे आवश्यक होते. हे काम येथील अभिलेखागारामुळे झाले आहे, असे सरसंघचालक म्हणाले.

आवश्यक गोष्टी या अभिलेखागारात संग्रहित झाल्या आहेत. सर्व प्रकारची अचूक, सार्वत्रिक आणि अधिकृत अशी माहिती इथे सर्वप्रकारे उपलब्ध होईल, असे हे अभिलेखागार व्हावे, असे प्रतिपादनही त्यांनी केले.

प्रांगणीय संगीताची परंपरा भारतातून लुप्त झाली होती. हे प्रांगणीय संगीत भारतीय संगीताच्या दालनात पुन्हा संघामुळेच आले. प्रांगणीय किंवा मैदानी संगीताचे पुनरुज्जीवन ही संघाच्या घोषाची विशेषता आहे, असेही डॉ. मोहनजी भागवत यांनी सांगितले.

अभिलेखागार प्रमुख मोरेश्वर गद्रे यांनी प्रकल्पाची माहिती दिली. संघाच्या पश्चिम क्षेत्राचे शारीरिक शिक्षण प्रमुख सुनील देसाई यांची यावेळी प्रमुख उपस्थिती होती. सूत्रसंचालन सुहास धारणे यांनी केले. ◀(तभा वृत्तसेवा)




# ‘पुष्पा २’ चेंगराचेंगरीतील गंभीर जखमी मुलाचा ‘ब्रेन डेड’

## ९ वर्षांचा श्री तेज व्हेंटिलेटरवर, प्रकृती गंभीर

**हैदराबाद, १८ डिसेंबर**

हैदराबादच्या संध्या थिएटरमध्ये अल्लू अर्जुन स्टारर ‘पुष्पा २’ चित्रपटाच्या स्पेशल स्क्रिनिंगवेळी ४ डिसेंबर रोजी चेंगराचेंगरी झाली होती. यात एम. रेवती या महिलेचा मृत्यू झाला. तर तिचा श्री तेज नावाचा नऊ वर्षांचा मुलगा गंभीर जखमी झाला होता. त्याची प्रकृती गंभीर असल्याची माहिती समोर आली आहे. या मुलाचा ब्रेन डेड झाला असून, सध्या त्याला व्हेंटिलेटरवर ठेवण्यात आले आहे.

त्याच्यावर उपचार करणाऱ्या हॉस्पिटलने मंगळवारी जारी केलेल्या माहितीत म्हटले आहे की, श्री तेज या मुलावर लहान मुलांच्या अतिदक्षता विभागात उपचार सुरू आहेत. त्याला ऑक्सिजन सपोर्ट द्यावा लागत आहे. त्याचा ताप कमी होत आहे. त्याचे महत्त्वाचे पॅरामीटर्स स्थिर आहेत. तो उपचारांना प्रतिसाद देत आहेत. त्याची स्थिर न्यूरोलॉजिकल स्थिती लक्षात घेता, व्हेंटिलेटर काढून ट्रेकिओस्टॉमी वैद्यकीय प्रक्रिया केली जाणार आहे.

**मुलाच्या मेंदूला गंभीर दुखापत**

संध्या थिएटरमधील चेंगराचेंगरीत जखमी झालेल्या तेजला सरकार आवश्यक ती वैद्यकीय मदत देईल, असे हैदराबादचे पोलिस आयुक्त सीव्ही आनंद यांनी सांगितले. ◀(वृत्तसंस्था)

# महाराष्ट्र जीएसटी सुधारणा विधेयक विधानसभेत मंजूर

## २०१७ ते २०२० या तीन आर्थिक वर्षातील व्याज, दंड दोन्ही माफ होणार

### अभय योजना लागू, ३० मार्च अंतिम मुदत

**नागपूर, १८ डिसेंबर**

सन २०१७ ते २०२० या मागील तीन आर्थिक वर्षातील थकबाकीदारांचे व्याज किंवा दंड किंवा दोन्ही माफ करणारी अभय योजना लागू करण्यासंदर्भातला निर्णय आधीच घेण्यात आला होता. त्यानुषंगाने अध्यादेश लागू होताच, मात्र, त्याचे कायद्यात रूपांतर करण्यासाठी उपमुख्यमंत्री अजित पवार यांची महाराष्ट्र वस्तू व सेवा कर (जीएसटी) सुधारणा विधेयक २०२४ विधानसभेत सादर केले. ते बहुमताने मंजूर करण्यात आले.

महाराष्ट्र वस्तू व सेवा कर अधिनियम, २०१७ विधेयकातील कलम ७३ अंतर्गत वर्ष २०१७-१८, २०१८-१९ आणि २०१९-२० च्या करमागण्यांशी संबंधित व्याज किंवा दंड किंवा दोन्ही माफ करण्याची अभय योजना राज्यात १ नोव्हेंबर २०२४ पासून लागू करण्यात आली असून, ३१ मार्च २०२५ ही देय कर रकमेचा भरणा करण्याची अंतिम तारीख आहे. त्यापूर्वी देय रकमेचा भरणा केल्यास त्यावरील सर्व व्याज व दंड माफ होणार असल्याने संबंधित व्यापाऱ्यांनी या अभय योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आज विधानसभेत केले.

या अभय योजनेसंदर्भात अधिक माहिती देताना उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले की, राज्य प्राधिकरणाच्या अखत्यारीतील करदात्यांकडून साधारण एक लाख चौदा हजार अर्ज अपेक्षित आहेत. विवादित रक्कम ५४ हजार कोटी रुपयांची आहे. त्यापैकी विवादित कर २७ हजार कोटी रुपयांचा दंड व शास्तीची रक्कम २७ हजार कोटी रुपयांची आहे. यापूर्वीचा अनुभव विचारात घेता विवादित कराच्या सुमारे २० टक्के रक्कम या योजनेमध्ये जमा होते. त्यानुसार या योजनेमध्ये सुमारे ५ हजार ५०० कोटी ते ६ हजार कोटी रुपये विवादित कर रक्कम जमा होणे अपेक्षित आहे. यापैकी अर्धी रक्कम म्हणजे २ हजार ७०० कोटी ते ३ हजार कोटी रुपये राज्य शासनास मिळतील व उर्वरित रक्कम केंद्र शासनाकडे जमा होईल. या योजनेमुळे व्यापाऱ्यांना सुमारे ५ हजार ५०० ते ६ हजार कोटी रुपयांच्या व्याज व दंडातून दिलासा मिळेल. या अभय योजनेची माहिती करदात्यांना, वकिलांना, चार्टर्ड अकाऊंटंट, नागरिकांना होण्यासाठी व्यापक प्रसिद्धी करण्यात येत असल्याचेही उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सभागृहात सांगितले. ◀(तभा वृत्तसेवा)

# संसदभवन परिसरात विरोधकांची निदर्शने



अमित शाह यांच्या कथित विधानाचा निषेध करण्यासाठी संसदभवन परिसरात आंदोलन करताना राहुल गांधी, प्रियांका वढेरा व विरोधी पक्षनेते

**नवी दिल्ली, १८ डिसेंबर**

गृहमंत्री अमित शाह यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याविरोधात केलेल्या कथित विधानाचे तीव्र पडसाद आज संसदभवन परिसरात उमटले. विरोधी सदस्यांनी संसदभवन परिसरात निदर्शने केली.

डॉ. आंबेडकरांचा अपमान विरोधी पक्ष खपवून घेणार नाही, अमित शाह यांनी माफी मागावी, या मागणीसाठी विरोधी पक्षांनी संसदभवन परिसरात हातात डॉ. आंबेडकरांचे छायाचित्र घेऊन निदर्शने केली. विरोधी पक्षांचे सदस्य डॉ. आंबेडकरांचा जयजयकार करताना मोदी सरकारविरोधी घोषणा देत होते. निदर्शनात राज्यसभेतील विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खडगे, लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी, प्रियांका वढेरा आणि विरोधी पक्षांचे नेते उपस्थित होते.

**पंतप्रधानाच्या दालनात बैठक**

गृहमंत्री अमित शाह यांच्या कथित विधानावरून संसदेच्या दोन्ही सभागृहात गदारोळ झाल्यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या दालनात दुपारी एक बैठक झाली. या बैठकीला पंतप्रधान मोदी, लोकसभेचे सक्षाफनी ओम बिर्ला, राज्यसभेचे उपा□□ध्यक्ष हरिवंश, गृहमंत्री अमित शाह, राज्यसभेतील विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खडगे, लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी आणि अन्य नेते उपस्थित होते. या बैठकीत काय चर्चा झाली, ते मात्र समजू शकले नाही. ◀(तभा वृत्तसेवा)

# वाळू माफियांची तलाठ्याला गजांनी मारहाण

### वाढोणाबाजार येथील प्रकार

**राळेगाव, १८ डिसेंबर**


वाढोणा बाजार येथे १७ डिसेंबरला वाळू तस्करांनी तलाठी मिलिंद नामदेव लोहत (४३, रा. नागपूर) यांना घेरत लोखंडी गजांनी डोक्यावर मारहाण करून गंभीर जखमी केले. या घटनेमुळे परिसरात कायदा व सुव्यवस्थेचा पुरता बोजवारा उडाल्याचे स्पष्ट झाले आहे.

राळेगाव तालुक्यातून वर्धा नदी वाहते. नदीतून मोठ्या प्रमाणात अवैध वाळू उपसा सुरू आहे. महसूलमधील शुक्राचार्यांमुळे ट्रॅक्टर व टिप्परच्या मदतीने राजरोस वाळूची चोरी होत आहे. यात काहींवर कारवाई केली जाते तर काहींना सोडले जाते. मंगळवारी तलाठी मिलिंद हे गस्तीसाठी वाढोणा बाजार येथे आले. काम आटोपून तलाठी कार्यालयात असताना रात्री १०.३० वाजता प्रतीक वाढोणकर याच्यासह दोघांनी कार्यालयात घुसून तलाठी यांना ‘तू आमच्या वाळूच्या गाड्या का चालू देत नाही’ असे म्हणत घेरले. यानंतर मारहाण करीत तिघांनी शिवीगाळ केली व गजाने डोके व हातापायांवर मारहाण करून ठार मारण्याची धमकी दिली.

डोक्याला गंभीर मार लागल्याने त्यांना तत्काळ सेवाग्राम रुग्णालयात दाखल केले. वाळू माफियांनी ठार मारण्याची धमकी व मारहाण करून शासकीय कामात अडथळा केल्याची तक्रार तलाठी मिलिंद यांनी बुधवार, १८ डिसेंबरला वडकी पोलिस ठाण्यात दिली. तक्रारीवरून पोलिसांनी प्रतीक वाढोणकर व इतर दोघांविरुद्ध विविध कलमान्वये गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास ठाणेदार सुखदेव भोरकडे यांच्या मार्गदर्शनात उपनिरीक्षक प्रशांत जाधव करीत आहे.

**चोरट्या वाळूची वाहतूक सुरूच**

तालुक्यातील काही वाळू तस्करांनी तहसील व पोलिस अधिकाऱ्यांना हाताशी धरून अवैध वाळू तस्करीचा धंदा सुरू केला आहे. मारेगाव तालुक्यातून रोज रात्री वाळू आणली जाते. त्यामुळे पर्यावरणाची हानी व शासनाचे नुकसान होत आहे. अवैध वाळू तस्करीवर जिल्हाधिकाऱ्यांनी लक्ष घालून आळा घालण्याची अपेक्षा आहे. ◀(तभा वृत्तसेवा)



भारतीय तटरक्षक दलाच्या जवानांनी मालदीवला सदिच्छा भेट दिली. या काळात ‘वैभव’ आणि ‘अभिराज’ या नौकांवरून डायव्हिंग करून दोन्ही देशांच्या जवानांनी खोल पाण्यात आपल्या देशांचे झेंडे फडकवले

# ‘जीएसटी’ परिषदेत अदिती तटकरे करणार राज्याचे प्रतिनिधित्व

**नागपूर, १८ डिसेंबर**

राजस्थानमधील जैसलमेर येथे होणाऱ्या डिसेंबर २०२४ च्या जीएसटी परिषदेमध्ये मंत्री अदिती तटकरे या राज्याचे प्रतिनिधित्व करणार आहेत. या परिषदेच्या पृष्ठभूमीवर मंत्री तटकरे यांनी विधानभवन येथे झालेल्या बैठकीमध्ये अधिकाऱ्यांकडून जीएसटीबाबत सविस्तर आढावा घेतला.

यावेळी आदिती तटकरे यांनी यापूर्वी झालेल्या ‘जीएसटी’ परिषदेमध्ये महाराष्ट्र राज्याने सुचविलेल्या सुधारणा, नव्याने सुचवावयाच्या सुधारणा, करांमध्ये विविध उद्योग, घटक यांना द्यावयाची सूट तसेच कररचनेमध्ये सुलभता आणि करदात्यांच्या व्याख्या सुस्पष्ट असण्याबाबतची माहिती घेतली. इलेक्ट्रिक वाहने, विमा हप्ते, कृषी उत्पादने यासारख्या क्षेत्रांना करांमध्ये सूट देण्याबाबत बैठकीमध्ये चर्चा करण्यात आली. तसेच काही क्षेत्रांमध्ये करावयाची करकपात आणि करवाढ, त्यामुळे महसुलामध्ये येणारा फरक याची माहितीही मंत्री तटकरे यांनी यावेळी घेतली. ◀(तभा वृत्तसेवा)

# निवडणुका संपलेल्या नाहीत, मी राज्यभर जाणार

### भुजबळांचा इशारा

**नाशिक, १८ डिसेंबर**

मंत्रिमंडळातून डावलल्यानंतर उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते आणि आमदार छगन भुजबळ आक्रमक झाले असून, समर्थकांच्या मेळाव्यात भुजबळ यांनी महायुतीला घरचा आहेर दिला. विधानसभा निवडणुकीत लाडक्या बहिणींसोबत ओबीसी समाजानेही भरभरून मतदान दिल्यामुळे हे सरकार आले. मात्र, आता आपल्याबाबत वेगळा विचार केला जात आहे. अजून निवडणुका संपलेल्या नाहीत. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका होणार आहेत, असे म्हणत छगन भुजबळ यांनी महायुतीला सूचक इशारा दिला.

मंत्रिपदापेक्षा जी अवहेलना झाली, ती जास्त मनाला डाचत आहे. मला राज्यभरातून फोन येत आहेत. मी सगळीकडे जाणार आहे आणि पुन्हा एकदा ओबीसींचा एल्गार आपण तयार करणार, असे म्हणत भुजबळांनी दंड थोपटले.

**रस्ता तो मेरा हैं...**


छगन भुजबळ म्हणाले, मी मंत्रिपदावर नसलो तरी तुमच्यासोबत आहे. रक्ताचा शेवटचा थेंब असेपर्यंत मी तुमच्यासाठी संघर्ष करेल. हा संघर्ष करतानाच मी शेवटचा श्वास घेईल. त्यात मी कोणत्याही दबावाला बळी पडणार नाही. जिथे आपले प्रश्न असतील, तिथे एकजुटीने राहू. मी कायम तुमच्यासोबत असेल, हिंमत ठेवा. पुढे आणखी एखादे मोठे संकट येण्याची शक्यता नाकारता येत नाही. ◀(वृत्तसंस्था)

# सराफ, गुप्ते अभिनित नवा चित्रपट भेटीला

**सोलापूर, दि. १८ डिसेंबर-**

‘राजकमल एंटरटेनमेंट’ या पूर्णतः नवीन प्रॉडक्शन हाऊसच्यामार्फत प्रेक्षकांना एक नवा चित्रपट लवकरच मोठ्या पडद्यवार अनुभवायला मिळणार आहे. विशेष म्हणजे राजकमल एंटरटेनमेंट ही नवीन कंपनी सुरू करणारे मालक म्हणजेच राहुल शांताराम, हे चित्रपती व्ही. शांताराम, ज्यांनी मराठी सोबतच संपूर्ण भारतीय सिनेसृष्टीत मोलाचे योगदान दिले, त्यांचे नातू आणि किरण व्ही. शांताराम यांचे चिरंजीव आहेत. आपल्या आजोबांकडून प्रेरणा घेत, राहुल शांताराम यांनी हितकारक मनोरंजन देणारे चित्रपट तयार करण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे.

# २२ डिसेंबर : वर्षातला सर्वांत लहान दिवस




**यवतमाळ, १८ डिसेंबर**

दिवस व रात्रीचा कालावधी कमी-जास्त होणे आपण नेहमीच अनुभवतो. पृथ्वीचा अक्ष २३.५ अंशाने कलला असल्याने हे घडते. याचाच परिणाम म्हणून सूर्याचे उत्तरायण व दक्षिणायन अनुभवता येते. यामुळेच दरवर्षी २२ डिसेंबर हा वर्षातला सर्वांत लहान दिवस ठरतो.

आकाशात वैषुविक आणि आयनिक वृत्तांचे दोन काल्पनिक छेदन बिंदू आहेत. त्यापैकी एका बिंदूत २१ मार्चला सूर्य प्रवेश करतो. याला वसंत संपात बिंदू म्हणतात. याच्याविरुद्ध बिंदूत २२ सप्टेंबरला सूर्य प्रवेश करतो. याला शरद संपात बिंदू म्हणतात. या दोन्ही दिवशी रात्र व दिवसाचा कालावधी सारखाच असतो. २१ मार्चनंतर सूर्याचा प्रवास उत्तरेकडे सुरू होतो. याला उत्तरायण असे म्हणतात. यावेळी जसजसा सूर्य उत्तरेकडे सरकतो, तसतसा दिवसाचा कालावधी वाढत जातो व रात्र कमी होऊ लागते.

सूर्याचा हा उत्तरेकडचा प्रवास २१ जूनपर्यंत चालतो. या दिवशी सूर्य विषुववृत्ताच्या जास्तीत जास्त उत्तरेकडे असतो. म्हणूनच या दिवसाचा कालावधी अधिकाधिक व रात्र सर्वाधिक कमी कालावधीची असते. सूर्याच्या या अतिउत्तरेकडील बिंदूला ‘विष्टंभ’ म्हणजेच ‘समर सोल्स्टाईस’ असे म्हणतात. या बिंदूपाशी सूर्य थोडासा थबकल्यासारखा भासतो. नंतर त्याचा परतीचा प्रवास सुरू होतो. येथून दिनमान कमी कमी होऊन रात्रमान वाढत जाते.

२२ सप्टेंबरला सूर्य शरद संपात बिंदूपाशी पोहोचतो. या दिवशी दिनमान व रात्रमान सारखेच असते. २२ सप्टेंबरनंतर सूर्य विषुववृत्त ओलांडून दक्षिणेकडे सरकू लागतो व दक्षिणायनास प्रारंभ होतो. आता मात्र दिनमान कमी होऊन रात्रमान वाढत जाते. २२ डिसेंबरला सूर्य जास्तीत जास्त दक्षिणेकडे असतो. या बिंदूला ‘विंटर सोल्स्टाईस’ असे म्हणतात. या बिंदूत सूर्य असतानाचा दिवस हा वर्षातील सर्वात लहान दिवस व रात्र सर्वात मोठी असते. ◀(तभा वृत्तसेवा)

### रात्र १३ तास ४० मि. ४३ सेकंदाची

यंदा २२ डिसेंबरचा दिवस फक्त १० तास १९ मिनिटे १७ सेकंदाचा असेल, तर रात्र १३ तास ४० मिनिटे ४३ सेकंदाची असेल. मकर संक्रांतीनंतर दिवस वाढत जातो, अशी संकल्पना समाजात रूढ आहे. मात्र, प्रत्यक्षात २३ डिसेंबरपासूनच दिवस वाढायला लागतो.

# शिवदारे महाविद्यालयात सेवानिवृत्त प्राचार्य, प्राध्यापकांचे राज्यस्तरीय अधिवेशन

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १८ डिसेंबर-**

महाविद्यालय व विद्यापीठातून सेवानिवृत्त झालेल्या प्राचार्य व प्राध्यापकांचे राज्यस्तरीय अधिवेशन शिवदारे म हाविद्यालयात रविवारी आयोजित करण्यात आले आहे अशी माहिती प्राचार्य एम ए शेख व डॉ रवींद्र बीडकर यांनी दिली

असोसिएशन ऑफ कॉलेज अँड युनिव्हर्सिटी सुपर अँन्यूटेड टीचर्स या संघटनेच्या वतीने रविवार दिनांक २२ डिसेंबर रोजी सकाळी १0 ते दुपारी ५ या वेळेत हे खास अधिवेशन होणार आहे सेवानिवृत्त प्राचार्य व प्राध्यापकांच्या अडीअडचणी सोडविणे तसेच संघटनेची न्यायालयात असणारे प्रकरणे व भविष्य निर्वाह निधीच्या संदर्भात माहिती देणे हे अधिवेशना पुढील विषय आहेत अधिवेशनामध्ये उपस्थितांना म ाजी शिक्षण सहसंचलक प्राचार्य डॉ एम ए वाहूल प्राचार्य डॉ जे एम मंत्री मार्गदर्शन करणार आहे त्यानंतर केंद्रीय पदाधिकाऱ्याच्या निवडणूक होणार आहेत.

अधिवेशन यशस्वी करण्यासाठी प्राचार्य के एम जमादार प्राचार्य डॉ अजित माणिकशेटे प्रा नरेश बदनोरे डॉ नभा काकडे प्राचार्य डॉ सुरेश पवार डॉ श्रीकांत येळेगावकर प्रा उत्तम चौगुले डॉ रामप्रकाश पंजाबी डॉ भीमाशंकर बिराजदार डॉ आदिल मुनसी प्राचार्य डॉ अहिरे प्रा विद्यासागर आगासे डॉ विश्वनाथ शिरसाड प्रयत्न करत आहे.

तरी शिवदारे महाविद्यालयामध्ये होणाऱ्या या राज्यस्तरीय अधिवेशनास सेवानिवृत्त प्राचार्य व प्राध्यापकांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन विभागीय अध्यक्ष प्राचार्य एस के मोरे व सचिव डॉक्टर रवींद्र बीडकर यांनी केले आहे.

# पगार विचारल्याने तरूणास मारहाण

**सोलापूर, दि. १८ डिसेंबर -**

पगार विचारल्याने तरूणास मारहाण करण्यात आली. गणेश विठ्ठलसिंग धनेवाले (वय ३४, रा. बापूजी नगर, सोलापूर) असे जखमीचे नाव आहे. १७ डिसेंबर रोजी रात्री साडेनऊच्या सुमारास राहत्या घरासमोर गणेश धनेवाले यास पगार विचारण्याच्या कारणावरून विठ्ठल भिमसिंग बेबेवाले याने लाथाबुक्क्याने व हातातील लोखंडी कडाने मारहाण केली. यामध्ये गणेश याच्या तोंडास व सर्वांगास मुका मार लागल्याने त्यास उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

# लोकसभेत गोंधळ, कामकाज स्थगित

◆ **नवी दिल्ली, १८ डिसेंबर**

केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा अपमान केला, या काँग्रेस आणि अन्य विरोधी पक्षांनी केलेल्या आरोपामुळे लोकसभेत आज गदारोळ झाला. त्यामुळे सभागृहाचे कामकाज आधी एकदा आणि नंतर दिवसभरासाठी स्थगित करावे लागले.



आज सकाळी ११ वाजता सभागृहाचे कामकाज सुरू होताच सभापती ओम बिर्ला यांनी प्रश्नोत्तराचा तास पुकारला, तोच विरोधी सदस्यांनी अमित शाह यांच्या कथित विधानावरून गदारोळ सुरू केला. सदस्यांनी शांत राहावे, प्रश्नोत्तराचा तास होऊ द्यावा, असे आवाहन बिर्ला करीत होते, पण विरोधकांची घोषणाबाजी सुरूच होती. सदस्य अमित शाह यांच्या माफीची मागणी करीत होते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा अपमान काँग्रेसनेच नेहमीच केला, एवढेच नाही तर, ते जिवंत असताना त्यांचा द्वेषही केला. आपल्या कार्यालयात काँग्रेसने कधीच त्यांचे छायाचित्र लावले नाही, असा आरोप विधि आणि न्याय मंत्री अर्जुनराम मेघवाल यांनी केला. बाबासाहेबांचा अपमान करणारे आता त्यांच्या सन्मानाच्या गोष्टी करीत आहेत, आमच्या सरकारमध्ये डॉ. आंबेडकरांचे नाव सुवर्णाक्षरात लिहिले जात आहे, त्यामुळे नाईलाजाने काँग्रेसला त्यांचे नाव घ्यावे लागत आहे, असे मेघवाल म्हणाले.

मेघवाल बोलत असताना काँग्रेस आणि विरोधी सदस्यांचा गोंधळ सुरूच होता. सभागृहातील गोंधळ थांबत नसल्यामुळे बिर्ला यांनी कामकाज दुपारी २ वाजेपर्यंत स्थगित केले. पुन्हा कामकाज सुरॅ होताच गोंधळ सुरू झाला. विरोधी सदस्य सभागृहाच्या मध्यभागी येत घोषणा देऊ लागले. या गोंधळातच पिठासीन अध्यक्ष पी. सी. मोहन यांनी आवश्यक कागदपत्र सभागृहात सदार करून घेतली. गोंधळ थांबत नसल्यामुळे शेवटी त्यांनी कामकाज दिवसभरासाठी स्थगित केले.

**राज्यसभेत गदारोळ**

याच विधानावरून राज्यसभेत गदारोळ झाला, यामुळे सभागृहाचे कामकाज आधी एकदा आणि नंतर दिवसभरासाठी स्थगित करण्यात आले. या मुद्यावरून सत्ताधारी तसेच विरोधी सदस्यांत आरोप-प्रत्यारोपही झाले. या गोंधळामुळे आज राज्यसभेत शून्य तसेच प्रश्नोत्तराच्या तासाचे कामकाज होऊ शकले नाही.

पहिल्यांदा स्थगित झाल्यानंतर दुपारी २ वाजता कामकाज सुरु होताच संसदीय कामकाज मंत्र्यांनी बँकिंग विधेयकावर चर्चा करण्याची सूचना केली तसेच याला विरोधी पक्षांचीही सहमती असल्याचे अध्यक्ष जगदीप धनकड यांनी म्हटले. तोच काँग्रेसचे प्रमोद तिवारी यांनी डॉ. आंबेडकर यांच्या अपमानाचा मुद्दा उपस्थित करण्याचा प्रयत्न केला. मात्र, धनकड यांनी त्यांना बोलण्याची परवानगी दिली नाही. डॉ. बाबासाहेब संपूर्ण देशासाठी पूजनीय आहे, देशातील सर्व लोक त्यांच्या आदर्श आणि सिद्धांताचे पालन करतात, असे धनकड म्हणाले. (तभा वृत्तसेवा)



ही आहे जम्मू-काश्मीरच्या डोडा जिल्ह्यातील भदरवाह व्हॅली. लवकरच हे ठिकाण आंतरराष्ट्रीय पर्यटन स्थळ म्हणून विकसित करण्यात येणार आहे. यासाठी जागतिक बँकेने महत्त्वाचा पुढाकार घेतला आहे

## पाकिस्तानने जारी केला ८४ भारतीय यात्रेकरूंना व्हिसा

◆ **नवी दिल्ली, १८ डिसेंबर**

पाकिस्तान उच्चायुक्तालयाने पंजाब प्रांताच्या चकवाल जिल्ह्यातील श्री कटास राज मंदिरांना भेट देण्यासाठी ८४ भारतीय यात्रेकरूंना व्हिसा जारी केला आहे.

या गटाला १९ ते २५ डिसेंबर दरम्यान कटासराज मंदिरांना भेट देण्यासाठी व्हिसा देण्यात आला आहे. या मंदिरांना किला कटस असेही म्हणतात. हे अनेक हिंदू मंदिरांचे एक संकुल आहे, जे एकमेकांना पायवाटांनी जोडलेले आहे.

तीर्थयात्रा व्हिसा जारी करणे हे धार्मिक मंदिरांना भेटी देण्यासाठी आणि आंतरधर्मीय सौदार्हाला प्रोत्साहन देण्यासाठी पाकिस्तान सरकारच्या धोरणानुसार आहे, असे एका निवेदनात म्हटले आहे. (वृत्तसंस्था)

## मणिपुरातून पाच आयईडी जप्त

**इम्फाळ :** मणिपूरच्या पूर्व इम्फाळ जिल्ह्यात एकूण २१.५ किलो वजनाचे पाच आयईडी जप्त करण्यात आले, अशी माहिती पोलिसांनी बुधवारी दिली.

लष्कराचे स्पीअर कॉर्प आणि राज्य पोलिसांच्या संयुक्त पथकाने मोंघलमजवळील माफिटल रिज येथे संयुक्त कारवाईत ही जप्ती केली, असे अधिकाऱ्यांनी सांगितले. स्फोटके जप्त करण्यात श्वानाने महत्त्वाची भूमिका पार पाडली. या कारवाई ५.५ किलोचे दोन, ४ किलोचा एक, ३.५ किलोचे दोन आयईडी आणि २५ मीडर कॉर्डेक्स वायर जप्त करण्यात आली. दरम्यान, कांगपोक्पी जिल्ह्यात सुरक्षा दलाने सबमशिनगन, मॅग्झिन, इम्प्रोव्हाईज्ड मोर्टार फायलेंग येथून जप्त केली.

# बॉम्बची खोटी माहिती दिल्यास १ कोटीचा दंड

### विमान कंपन्यांना मिळणाऱ्या धमक्यांनंतर केंद्राचा निर्णय

◆ **नवी दिल्ली, १८ डिसेंबर**

गेल्या काही दिवसांत विमान कंपन्यांना बॉम्बच्या धमक्या मिळाल्याच्या घटना घडल्या आहेत. अशा खोट्या बातम्या पसरवणाऱ्यांना आळा घालण्यासाठी केंद्र सरकार तयारी करीत आहे. त्यानुसार, कोणत्याही विमान कंपनीत बॉम्बची खोटी माहिती देणाऱ्याला १ कोटी रुपयांपर्यंतचा दंड होऊ शकतो.

२०२४ या एका वर्षात एका हजाराहून अधिक वेळा खोट्या धमक्या दिल्याच्या बातम्या समोर आल्या होत्या. या धमक्यांमुळे विमान कंपन्यांचे आर्थिक नुकसान तर झालेच, प्रवाशांनाही मोठ्या गैरसोयीला सामोरे जावे लागले. या सर्व बाबी लक्षात घेऊन सरकारने मोठा दंड आकारण्याची तयारी केली आहे.

बॉम्बच्या खोट्या धमक्या दिल्याप्रकरणी दोषी आढळल्यास अनेक गंभीर गुन्हेगारी आरोपांसह मोठा आर्थिक दंड ठोठावला जाऊ शकतो. तसेच, अशा कारवायांमध्ये सहभागी असलेल्या संघटनांवर शिक्षेची तरतूदही करण्यात आली आहे. छोट्या संघटनांना ५० लाख रुपये, मध्यम संघटनांना ७५ लाख रुपये, तर मोठ्या संघटनांना १ कोटी रुपयांचा दंड ठोठावला जाऊ शकतो.

केंद्र सरकारने सिव्हिल एव्हिएशन सिक्युरिटी ब्युरोला अधिकार दिले आहेत की, सुरक्षेस धोका असलेल्या कोणत्याही प्रवाशाला ते विमानात प्रवेश करण्यापासून रोखू शकतात. सोबतच, एखादा प्रवासी चुकीची माहिती देऊन विमानात बसलेल्या लोकांना समस्या निर्माण करीत असेल, लोकांमध्ये दहशत निर्माण करणाऱ्या किंवा वैमानिकाला त्रास देत असल्यास त्याच्यावर कारवाई होऊ शकते.

सरकारकडून मिळालेल्या आकडेवारीनुसार, यावर्षी जानेवारी ते नोव्हेंबर या कालावधीत बॉम्बच्या धमक्यांची ९९४ इतकी नोंद झाली आहे. ऑगस्ट २०२२ पासून आतापर्यंत धमक्यांचे एकूण १,१४३ गुन्हे दाखल झाले आहेत. आकडेवारी पाहिली तर त्यात वाढ झाल्याचे दिसून येते. ही आकडेवारी वाढण्यामागचे कारण म्हणजे सोशल मीडियावरून मिळणाऱ्या धमक्या, ज्या नंतर डीलिट केल्या जातात. (वृत्तसंस्था)

# अमेरिकेत एच-१बी व्हिसा नियम शिथिल

### बायडेन प्रशासनाचा निर्णय

### भारतीय व्यावसायिकांना मिळणार लाभ

◆ **वॉशिंग्टन, १८ डिसेंबर**

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष ज्यो बायडेन यांच्या प्रशासनाने एच -१ बी व्हिसाचे नियम शिथिल करण्याचा निर्णय घेतला आहे. सरकारच्या या निर्णयामुळे अमेरिकन कंपन्यांना विशेष कौशल्य असलेल्या परदेशी कामगारांना कामावर ठेवणे सोपे होणार आहे. बायडेन प्रशासनाच्या या निर्णयानंतर एफ-१ स्टुडंट व्हिसावरून एच-१बी व्हिसामध्ये बदल करणे सोपे होणार आहे. बायडेन सरकारच्या या निर्णयाचा हजारो भारतीय तांत्रिक व्यावसायिकांना फायदा होण्याची शक्यता आहे. सध्या अमेरिकेत सत्ता हस्तांतरणाची प्रक्रिया सुरू आहे. नवनिर्वाचित डोनाल्ड ट्रम्प २० जानेवारीला पुन्हा राष्ट्राध्यक्षपदाची सूत्रे स्वीकारणार आहेत.

एच-१ बी व्हिसा हा सर्वात जास्त मागणी असलेला नॉन-इमिग्रंट व्हिसा आहे, जो यूएस कंपन्यांना सैद्धांतिक किंवा तांत्रिक कौशल्याची आवश्यकता असलेल्या विशेष व्यवसायांमध्ये परदेशी कामगारांना नियुक्त करण्याची परवानगी देतो. तंत्रज्ञान कंपन्या भारत आणि चीनसारख्या देशांमधून दरवर्षी हजारो कर्मचारी नियुक्त करण्यासाठी या व्हिसावर अवलंबून असतात. अशा परिस्थितीत बायडेन प्रशासनाच्या या निर्णयाचा फायदा भारतीय आयटी व्यावसायिकांना होऊ शकतो.

डिपार्टमेंट ऑफ होमलँड सिक्युरिटी (डीएचएस) वे मंगळवारी जाहीर केलेला नियम, विशिष्ट पदांसाठी आणि ना-नफा आणि सरकारी संशोधन संस्थांसाठी नियमांचे आधुनिकीकरण करून नियोक्ते आणि कामगारांना अधिक लवचीकता प्रदान करण्याचा हेतू आहे. या संस्थांसाठी एच-१बी व्हिसाची मर्यादा शिथिल करण्यात आली आहे. (वृत्तसंस्था)

# चीन बांधणार समुद्राच्या मध्यभागी कृत्रिम बेट

### २०३५ मध्ये होणार प्रकल्प पूर्ण

◆ **नवी दिल्ली, १८ डिसेंबर**

चीन जगातील सर्वांत मोठे कृत्रिम बेट आंतरराष्ट्रीय विमानतळ बांधत आहे. दालियन शहराजवळील समुद्रात हे विमानतळ बांधले जात आहे. साऊथ चायना मॉर्निंग पोस्टच्या मते, डॅलियन जिंझोवान आंतरराष्ट्रीय विमानतळ सध्याच्या डॅलियन झौशुईजी आंतरराष्ट्रीय विमानतळाची जागा घेणार आहे, जे जागेच्या कमतरतेमुळे वाढत्या प्रवासी वाहतुकीला तोंड देण्यासाठी संघर्ष करीत आहे.

अंदाजे २०.९ चौरस किलोमीटर क्षेत्र व्यापणारे कृत्रिम बेट जागतिक स्तरावर इतर समान प्रकल्पांना मागे टाकेल. हे विमानतळ हाँगकाँग आंतरराष्ट्रीय विमानतळ आणि कसाई विमानतळापेक्षा मोठे असेल, हे दोन्हीही कृत्रिम बेटांवर आहेत. जपान आणि दक्षिण कोरियाजवळ धोरणात्मकदृष्ट्या स्थित डॅलियन हे गजबजलेले बंदर शहर आंतरराष्ट्रीय व्यापारावर आधारित आहे. ६ दशलक्षहून अधिक लोकसंख्या असलेले हे शहर तेल शुद्धीकरण,शिपिंग, लॉजिस्टिक आणि किनारपट्टी पर्यटनासाठी प्रमुख केंद्र म्हणून उदयास आले. (वृत्तसंस्था)



आपल्या विविध मागण्यांसंदर्भात केंद्र सरकारवर दबाव आणण्याकरिता शेतकऱ्यांनी बुधवारी अमृतसरच्या बाह्य भागात तीन तासांचे रेल रोको आंदोलन केले. यामुळे अनेक गाड्यांचे मार्ग बदलविण्यात आले होते

## चित्रपट वार्ता

### राज कपूरच्या अन्त्यसंस्काराला एकमेव अभिनेत्रीची हजेरी

**मुंबई :** हिंदी चित्रपटसृष्टीतील 'द ग्रेट शो मॅन' राज कपूर यांची १०० वी जयंती नुकतीच पार पडली. या निमित्ताने हिंदी सिनेसृष्टीने त्यांना आदरांजली वाहिली. या निमित्ताने अनेक कलाकारांनी राज कपूर यांच्याविषयीच्या स्वत:च्या आठवणी शेअर केल्या. त्यात दीप्ती नवल यांचाही समावेश होता. त्या सांगतात, राज कपूर खूप चांगले व्यक्ती होते. त्यांच्याशी गप्पा मारणे खूप सोपे होते. त्यांना स्वत:च्या आयुष्याविषयी आणि कामाविषयी बोलायला खूप आवडायचे. मुंबईत माझी भेट त्यांच्याशी झाली, तेव्हा माझ्या एका वाढदिवसाला ते आले होते. त्यांच्या अन्त्यसंस्काराला मी पोहोचले. चिता जळत असताना मी तिथेच उभी होते. नंतर अचानक लक्षात आले की, तिथे मी एकटीच स्त्री आहे, बाकी सर्व पुरुष होते. त्यावेळी महिला अन्त्यसंस्काराला जात नसत. माझ्या नकळत मी एक मर्यादा तोडली होती.



### माधुरी दीक्षितने भाड्याने दिले अंधेरीतील कार्यालय



**मुंबई :** माधुरी दीक्षित गेल्या काही 'भुल भुलैया ३' चित्रपटामुळे चर्चेत होती. या चित्रपटाला बॉक्स ऑफिसवर सुद्धा चांगले यश मिळाले. याशिवाय माधुरी आणि विद्याच्या नृत्याच्या जुगलबंदीचे सर्वत्र कौतुक करण्यात आले. पण, सध्या बॉलिवूडची ही धकधक गर्ल एका वेगळ्याच कारणाने चर्चेत आली आहे. ती गोष्ट म्हणजे, तिचे मुंबईच्या अंधेरी परिसरातील कार्यालय. माधुरीने हे कार्यालय नुकतेच एका खाजगी कंपनीला भाड्याने दिले. माधुरीला या कार्यालयापोटी दरमहा तीन लाख रुपये भाडे मिळणार आहे. यासाठी भाडेकरू कंपनीने नऊ लाखांचे डिपॉझिट जमा केले आहे.

# भारताने आमच्यावर कर लादल्यास आम्हीही लादणार

◆ **वॉशिंग्टन, १८ डिसेंबर**

अमेरिकेचे नवनिर्वाचित राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी भारतावर कर लादण्याच्या त्यांच्या इशाऱ्याचा पुनरुच्चार केला. ट्रम्प यांनी भारतावर जास्त कर आकारत असल्याचा दावाही केला. भारत अमेरिकेकडून जितके कर आकरतो, तेवढेच कर भारतावरही लादण्यात येतील, असेही ट्रम्प म्हणाले.



माध्यमांशी बोलताना ट्रम्प यांनी भारताकडून काही अमेरिकन उत्पादनांवर लावण्यात येणाऱ्या १०० टक्के शुल्कावर टीका केली. ट्रम्प म्हणाले की, रेसिप्रोकल कर महत्त्वाचा आहे. कारण, आमच्यावर मोठ्या प्रमाणात कर लावला जात असेल, तर आम्ही देखील ते केले पाहिजे. भारत, चीन, ब्राझील यासारखे अनेक देश खूप जास्त शुल्क लादत आहेत. त्यांना अमेरिकेवर शुल्क लादायचे असेल तर ठीक आहे, पण आम्ही देखील त्यांच्याकडून तेच शुल्क घेऊ.

डोनाल्ड ट्रम्प यांनी काही दिवसांपूर्वी भारतासह कॅनडाला देखील इशारा दिला होता की, जर त्यांनी अमेरिकेत येणारे ड्रग्ज आणि अवैध स्थलांतरितांना रोखले नाही, तर त्यांच्यावर ४५ टक्के शुल्क लादले जाईल. ट्रम्प म्हणाले की, रेसिप्रोकल हा शब्द महत्त्वाचा आहे, कारण भारत आमच्याकडून १०० टक्के शुल्क आकारत असेल, तर आपण त्यांच्याकडून काहीच शुल्क घेणार नाही का? (वृत्तसंस्था)

## सुरेंद्र गडलिंगच्या जामिनावरील सुनावणी स्थगित

◆ **नवी दिल्ली, १८ डिसेंबर**

२०१६ मध्ये सूरजागढ लोह खाणीतील जाळपोळ प्रकरणातील आरोपी सुरेंद्र गडलिंग याच्या जामिनावरील सुनावणी सर्वोच्च न्यायालयाने जानेवारीच्या दुसऱ्या आठवड्यापर्यंत स्थगित केली आहे.

महाराष्ट्र सरकारने दाखल केलेल्या उत्तरावर विचार करण्यासाठी वेळ हवा असल्याचे गडलिंग याच्या वकिलाने न्या. एम. एम. सुंदरेश आणि न्या. अरविंद कुमार यांच्या न्यायासनाला सांगितल्यावर सुनावणी पुढे ढकलण्यात आली.

या प्रकरणी न्यायालयाने १० ऑक्टोबर २०२३ रोजी राज्य सरकारला नोटीस बजावून चार आठवड्यांत उत्तर सादर करण्याचा आदेश दिला होता.

मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने ३१ जानेवारी २०२३ रोजी गडलिंगची याचिका फेटाळताना आरोपीविरोधातील पुरावे प्रथमदर्शनी खरे असल्याचे म्हटले होते. २५ डिसेंबर २०१६ रोजी माओवाद्यांनी सूरजागढ खाणीतून वाहतूक करणारी ७६ वाहने पेटवून दिली होती. (वृत्तसंस्था)

## लखबीर लांडाच्या दोन साथीदारांवर एनआयएचे आरोपपत्र

◆ **नवी दिल्ली, १८ डिसेंबर**

दहशतवादाचा कट रचल्याच्या आरोपात प्रतिबंधित बब्बर खालसा दहशतवादी संघटनेचा अतिरेकी लखबीरसिंग लांडाच्या दोन साथीदारांच्या विरोधात राष्ट्रीय तपास संस्था अर्थात् एनआयएने आरोपपत्र दाखल केले.

मोहालीच्या विशेष न्यायालयात फिरोझपूरमधील जसप्रीतसिंग आणि मध्यप्रदेशच्या बडवानी जिल्ह्यातील बलजीतसिंगच्या विरोधात मंगळवारी आरोपपत्र दाखल करण्यात आले. विदेशातील खलिस्तानी अतिरेकी लांडाने तयार केलेल्या अतिरेक्यांच्या टोळीतील ते सदस्य असल्याची ओळख एनआयएने पटवली.

जसप्रीतसिंग हा लांडा आणि त्याचा साथीदार पट्टू खैराचा भूमिगत कार्यकर्ता आहे, तर बलजितसिंग हा लांडाच्या टोळीला आणि इतर टोळ्यांना शस्त्रास्त्रांचा पुरवठा करण्यात सहभागी असल्याचे एनआयएच्या तपासात निष्पन्न झाले. बब्बर खालसा इंटरनॅशनल संघटनेसाठी निधी उभारण्यासाठी जसप्रीतसिंग लांडाचा मादकपदार्थांची तस्करी आणि खंडणी वसुलीत सहभागी होता, असा दावाही एनआयएने केला आहे.

बलजितसिंग स्थानिक पातळीवर शस्त्रास्त्रे तयार करायचा आणि समाज माध्यमांचा वापर करून ते लांडाच्या टोळीला पुरवायचा. (वृत्तसंस्था)

# कुवैतमध्ये मिळाली ७००० वर्षे जुनी मातीची मूर्ती



◆ **नवी दिल्ली, १८ डिसेंबर**

कुवैतमध्ये सात हजार वर्षे जुनी मातीची मूर्ती सापडली आहे, ज्याचे रूप एलियनसारखे आहे. ही अलौकिक दिसणारी मूर्ती असली, तरी मेसोपोटामियामध्येही अशा मूर्ती आढळून आल्या. कुवेत आणि अरेबियन गल्फ परिसरात पहिल्यांदाच या आकाराची मूर्ती सापडली आहे. २००९ पासून या भागात उत्खनन सुरू आहे.

बहरा-१ हे अरबी द्वीपकल्पातील सर्वांत जुने वस्तीचे क्षेत्र आहे. येथे सुमारे इ.स. ५५०० ते ४९०० पासून लोक राहत होते. त्यावेळी उबेद नावाच्या समाजाचे लोक येथे राहत होते, जे मेसोपोटामियामधून आले होते. हे लोक त्यांच्या हस्तकला आणि मातीची भांडी बनवण्याकरिता प्रसिद्ध होते. बहरा-१ येथे खाणकाम करणारे पुरातत्त्वशास्त्रज्ञ ॲग्निएस्का शिमजैक म्हणतात की, उबेद पुन्हा अरबी क्षेत्राच्या नव्या सोसायटीसोबत म्हणजेच नियोलिथिक सोबत मिसळू लागले, ही गोष्ट सुमारे ७००० वर्षे जुनी आहे. या समुदायांमधील परस्पर संवादामुळे त्यांची संस्कृतीही मिसळली त्यानंतर सांस्कृतिक बदल झाला. (वृत्तसंस्था)

### मृण्मयीसोबत प्रथमच झळकणार प्रसाद ओक



**मुंबई :** 'अर्धा वाटा' या शीर्षकावर लेखक दिग्दर्शक राजू मेश्राम मराठी चित्रपट तयार करीत आहेत. या चित्रपटात मराठी सुपरस्टार प्रसाद ओक आणि मृण्मयी देशपांडे पहिल्यांदाच एकत्र दिसणार आहेत. मुंबई आणि आसपासच्या परिसरात या चित्रपटाचे चित्रीकरण सुरू आहे.



सिनेमाचा विषय लेखकांनी गुलदस्त्यात ठेवला आहे. मात्र, नेहमीपेक्षा वेगळ्या धाटणीचा हा चित्रपट असल्याचे राजू मेश्राम सांगतात. प्रसादनेही वेगळा विषय असल्याने हा चित्रपट स्वीकारल्याचे सांगितले. मृण्मयी म्हणाली, एवढ्या वर्षांत एकाच क्षेत्रात असूनही मी आणि प्रसाद एकत्र पडद्यावर काम केले नाही, त्यामुळे मी खुश आहे. आम्ही प्रथमच एकत्र काम करीत आहो. सुरुवातीला हे थोडे आव्हानात्मक वाटत होते, पण चित्रपटाची संपूर्ण कथा ऐकल्यावर माझा आत्मविश्वास वाढला.

सोलापूर तरुण भारत
https://dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com

## अग्रलेख...

# संविधानाचे खरे मारेकरी कोण?

संसदेच्या दोन्ही सभागृहांमध्ये भारतीय संविधानाच्या ७५ वर्षांच्या गौरवशाली वाटचालीवर प्रकाश टाकणारी चर्चा झाली. भारतात संविधान लागू झाल्याने या देशातील जनतेच्या दैनंदिन जीवनात टप्प्याटप्प्याने कसा बदल होत गेला, सामान्य माणसाचे जीवनमान कसे सुधारत गेले, संविधानाची गरज का पडली, ते लागू झाले नसते तर देश कुठल्या दिशेला गेला असता, संविधान नसताना या देशाचे राज्यशकट कसे चालत होते, ते चालवण्याची कोणती पद्धती अस्तित्वात होती, न्याय मिळविण्यासाठी कोणकोणती साधने त्यावेळी जनतेसाठी उपलब्ध होती, अशा एक ना अनेक प्रश्नांची उत्तरे यानिमित्ताने जनतेपुढे मांडता आली असती. पण विरोधकांनी त्यांना मिळालेली सोन्याची संधी गमावली. संविधानावरील चर्चेत केवळ सत्ताधाऱ्यांवर आरोप करून विरोधकांनी आपली उंची तेवढी खुजी करून ठेवली. संविधानाच्या मजबुतीसाठी तुम्ही काय केले, हा राज्यसभेतील विरोधी पक्ष नेत्याने उपस्थित केलेला प्रश्न केवळ मारून नेणाराच म्हणायला हवा. ही चर्चा मुळी लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्या मागणीमुळे सुरू झाली. या चर्चेत संविधानाचा मूलभूत गाभा, त्याच्यातील अधिकारांची अंमलबजावणी, धोरणात्मक तत्त्वे, त्या तत्त्वांचा देशातील व्यवस्थेवर झालेला परिणाम, यावर प्रकाश टाकणे अपेक्षित होते. पण ती चर्चा राहिली बाजूला आणि विरोधकांनी त्यात राजकारण आणल्याने सत्ताधाऱ्यांनाही आपल्या भाषणांचा सूर बदलवावा लागला. ज्यात विरोधक तोंडाच्या भारावर आपटले, असे म्हंटले तर वावगे वाटू नये. संविधानाच्या निर्मितीनंतर काँग्रेसचे योगदान काय आणि सध्याच्या सत्ताधारी पक्षाने त्यात काय भर घातली हे बोलण्याची चांगली संधी राहुल गांधी, प्रियांका वढेरा, मल्लिकार्जुन खडगे यांना चालून आली होती, पण त्यांनी ती घालवली. इतिहासाला उजाळा देऊन संविधान निर्मितीत काँग्रेसच्या सदस्यांनी बजावलेली कामगिरी उद्धृत करता आली असती. भारतीय जनता पक्षाकडून सातत्याने घटनाबदलाचे लावण्यात आलेले आरोप सबळ पुराव्यांद्वारे खोडून काढता आले असते. नेहरू-गांधी परिवारावर संविधानाची हत्या केल्याच्या आरोपाला उत्तरे देता आली असती. पण त्यापैकी काही एक न करता विरोधकांनी केवळ सत्ताधाऱ्यांवर गेल्या ११ वर्षांत केलेली कामगिरी दाखवा, असे तुणतुणे लावून दिले. त्या तुलनेत पंतप्रधान नरेंद्र मोदी, गृहमंत्री अमित शाह, अर्थमंत्री निर्मला सीतारामन, भाजपाध्यक्ष जे. पी. नड्डा आणि रालोआच्या इतर प्रादेशिक घटक पक्षांनी मिळालेल्या संधीचा उत्तम उपयोग करून, काँग्रेस आणि विरोधी पक्षांवर सारा मुद्दा उलटवला.

आपल्या राज्यघटनेचा ७५ वर्षांचा प्रवास रचनाकारांची दूरदृष्टी आणि द्रष्टेपणामुळे यशस्वी झाला. संविधान निर्माण करण्याच्या प्रक्रियेत महान स्वातंत्र्यसैनिक, लेखक, विचारवंत, सामाजिक कार्यकर्ते, शिक्षणतज्ज्ञ आणि इतर विविध क्षेत्रांतील व्यावसायिकांचा समावेश होता याचे स्मरण करत पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले की, हे सर्व जण भारताच्या एकतेच्या वस्तुस्थितीबाबत अत्यंत संवेदनशील होते. संविधान निर्मात्यांच्या मनात आणि हृदयात एकता होती, मात्र, स्वातंत्र्यानंतर, विकृत मानसिकतेमुळे किंवा स्वार्थामुळे, देशाच्या ऐक्याच्या मूळ भावनेला सर्वात मोठा धक्का बसला. विविधतेत एकता हे भारताचे वैशिष्ट्य राहिले आहे, यावर त्यांनी जोर दिला. आपण देशाची विविधता साजरी करतो आणि देशाची प्रगती ही विविधता साजरी करण्यात आहे. मात्र, वसाहतवादी मानसिकतेचे लोक, ज्यांना भारतात काही चांगले दिसत नव्हते आणि ज्यांना भारताचा जन्म १९४७ मध्ये झाला असे वाटत होते, त्यांनी या विविधतेत केवळ विरोधाभास शोधला. विविधतेच्या या अमूल्य खजिन्याचा उत्सव साजरा करण्याऐवजी, ज्यामुळे देशाची एकता बिघडेल या उद्देशाने त्यात विषारी बीजे पेरण्याचे प्रयत्न केले. विविधतेचा उत्सव आपल्या जीवनाचा अविभाज्य भाग बनवण्याचे आवाहन पंतप्रधानांनी सर्वांना केले आणि हीच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना खरी श्रद्धांजली असेल, असे ते म्हणाले. तसे बघितले तर लोकशाही मजबूत करण्यासाठी नव्हे तर घराण्यासाठी राज्यघटनेत दुरुस्त्या केल्या गेल्या, ही वस्तुस्थिती असून, काँग्रेसच्याच ५५ वर्षांच्या कार्यकाळात एकूण ७७ वेळा घटनादुरुस्त्या झालेल्या आहेत. भारतीय जनता पार्टीने १६ वर्षे देशावर सत्ता गाजविली आणि २२ वेळा घटनेत संशोधन केले. काँग्रेसच्या घटनादुरुस्तीमागे केवळ सत्ता वाचवणे आणि व्होट बँक शाबूत ठेवणे, हे उद्देश होते तर भारतीय जनता पक्षाच्या सरकारांनी एकता प्रस्थापित करणे तसेच मागास समाजाला पुढे आणण्याकरिता घटनादुरुस्त्या केलेल्या आहेत. आज काँग्रेसचे नेते संविधानाचा आपलाच अधिकार असल्यासारखे वागत असून, संविधानाची प्रत फडकवण्यात धन्यता मानत आहेत. नेहरू-गांधी परिवाराने तर विरोधी पक्षांच्या नेत्यांना तुरुंगात डांबून लोकशाही आणि संविधानाची लक्तरे वेशीवर टांगण्याचा पराक्रम केलेला आहे. १९४९ मध्ये गिरणी मजुरांसाठी आयोजित करण्यात आलेल्या सभेत मजरुह सुलतानपुरी या कवीने एक कविता सादर केली होती. पण ती कविता पंडित नेहरू यांच्या विरोधात होती. या प्रकरणात माफी मागण्यास नकार दिल्याने मजरुह सुलतानपुरी आणि बलराज साहनी यांना तुरुंगात डांबले गेले. काँग्रेसचा इतिहास संविधानविरोधी राहिलेला आहे. महाराष्ट्रातच गतकाळात याचा अनुभव लोकांनी घेतला. राज्यातील महाविकास आघाडीवर टीका करणाऱ्या समाजमाध्यमातील पत्रकारांना आणि पक्षाच्या धोरणाविरुद्ध व्यक्त होणाऱ्या सामान्य लोकांना काँग्रेसने दिलेली वागणूक अंगावर शहारे आणणारी होती. मायकेल एडवर्ड्स लिखित नेहरूंवरील चरित्रात काही आक्षेपार्ह भाग आढळून आल्याने काँग्रेसने या लेखकाचे तोंड बंद करून या पुस्तकावरच बंदी आणली होती. शहाबानो प्रकरणात १९८६ मध्ये सर्वोच्च न्यायालयाचा निकाल आल्यानंतर काँग्रेसने घटनादुरुस्तीद्वारे हा निकालच बदलून टाकून मुस्लिम महिलांच्या अधिकारांवर गदा आणली.

भाजपाच्या कार्यकाळात जिथे वस्तू आणि सेवा करासाठी घटनादुरुस्ती केली गेली तिथे पंतप्रधानांनी न्यायिक कक्षेबाहेर ठेवण्याची घटनादुरुस्ती काँग्रेसच्या राज्यात झाली. भाजपाने मागासवर्गीय आयोगाला संवैधानिक दर्जा दिला तर काँग्रेसने अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर घाला घातला. ओबीसींबाबतचे अधिकार भाजपाने राज्य सरकारांकडे हस्तांतरित केले तर काँग्रेसने राष्ट्रपती शासनाचा कार्यकाळ वाढवण्याची घटनादुरुस्ती केली. भाजपाच्या कार्यकाळात महिलांना आरक्षण देण्याचे काम झाले मात्र काँग्रेसचे माजी पंतप्रधान राजीव गांधी यांच्याकडे राक्षसी बहुमत असतानाही महिलांच्या आरक्षणाचा मुद्दा निकाली काढला नाही. काँग्रेसच्याच कार्यकाळात कलम ३५६ चा दुरुपयोग झालेला आहे. एकट्या काँग्रेसने गैरकाँग्रेसी सरकारे आपल्या पक्षाची सत्ता कायम राहावी म्हणून ९० वेळा बरखास्त केली, हा संविधानाचा दुरुपयोग असल्याचे मोदी म्हणत असतील तर त्यात काहीच चूक नाही. इंदिरा गांधींनीच तब्बल ५० वेळा गैरकाँग्रेसी सरकारे बरखास्त करण्यासाठी कलम ३५६ चा दुरुपयोग केलेला आहे. ज्या भाजपा सरकारवर ते संविधान बदलतील असा आरोप केला जातो, त्या मोदींच्या कार्यकाळात एकदाही या कलमाचा दुरुपयोग करण्यात आलेला नाही. काँग्रेसने तर भौगोलिक रूपरेषेशी संबंधित कलम १ मध्ये कुठलेही संशोधन न करता एका समझोत्याअंतर्गत कच्चातिवू द्वीप श्रीलंकेला देऊन टाकले, ही बाब या संदर्भातील चर्चेत अमित शाह यांनी उपस्थित केली. संसदेच्या दोन्ही सदनांमध्ये कुठलीही चर्चा न करता घटनेमध्ये ३५ (ए) हे कलम जोडण्याचा आगाऊपणा काँग्रेसनेच केला. काँग्रेस आज आरक्षणाची ५० टक्के असलेली मर्यादा उठविण्यासाठी प्रयत्नशील आहे. पण त्यांना मागासवर्गीयांबद्दल कळवळा आहे, असा समज कुणीही करून घेऊ नये. या माध्यमातून मुस्लिमांना धार्मिक आरक्षण मिळावे, यासाठी त्यांचा आटापिटा सुरू असल्याची बाब जनतेने ध्यानात घ्यावी. घटनेतील ३७० कलमाला दस्तुरखुद्द डॉ. आंबेडकरांचा विरोध होता, तरीदेखील त्यांच्या विचारांची पायमल्ली करून काँग्रेसने हे कलम त्यात घुसविले. संविधानावरील चर्चेच्या निमित्ताने अशा कितीतरी घटनाविरोधी तसेच काँग्रेस आणि नेहरू गांधी परिवाराच्या विरोधात जाणाऱ्या कृती सत्ताधारी पक्षाने उजागर करून, विरोधकांना धोबीपछाड दिला आहे. आता संविधानाचे खरे मारेकरी कोण? हा कौल जनतेलाच करायचा आहे.

## इतस्ततः

**डॉ. विवेक राजे**

# शतकोत्तर वाटचालीतील आव्हान

निवडणूक निकाल आले आणि अनेकांना वाटलं की, हा महाराष्ट्रातील देवेंद्र युगाचा हिंदुत्ववादी आरंभ आहे. काहींना वाटतंय की, हा महाराष्ट्रातील हिंदूंना जातिपातीत विभागणाऱ्या काँग्रेसी राजकारणाच्या धाटणीचा अंत आहे. कोणाला वाटतंय हा शरद पवारांच्या मतलबी आणि कोलांटउड्यांच्या राजकारणाचा अंत आहे. कोणाच्या मते हा देशातील आणि महाराष्ट्रातील तत्त्वहीन, अराजकतावादी अर्बन नक्षली राजकारणाचा अंत आहे. कुणाच्या मते विकाऊ आणि वेश्यावृत्तीच्या पत्रकारितेला बसलेली चपराक आहे. कुणाच्या मते तथाकथित पुरोगामी व भयवादी समाजवादी विचारवंतांना जनतेने मारलेली धोबीपछाड आहे. हे सगळं जर थोडे बाजूला सारले तर लक्षात येते की, आपल्या मतांशी एकनिष्ठ राहण्याच्या अट्टहासाने ध्येयवाद जोपासता येतो, हे दाखवणाऱ्या युगाची ही सुरुवात आहे. त्या ध्येयासाठी शांतपणे कठोर परिश्रम करीत, आपल्या ध्येयाच्या दिशेने चाललेल्या प्रवासात सर्व समविचारी वा कुठेतरी सांधे जुळू शकतील अशा सर्वांना बरोबर घेणाऱ्या, राष्ट्रीय चारित्र्य निर्माणाचे कार्य करणाऱ्या राष्ट्र सबल करण्याचा ध्यास घेत, शंभर वर्षे वाटचाल सुरू ठेवणाऱ्या संघ विचारांचा सखोल ठसा उमटवणाऱ्या युगाचा हा आरंभ आहे. हळूहळू पण निश्चितपणे संघ विचारांचा ठसा सगळ्याच सामाजिक क्षेत्रात उमटताना दिसतो आहे. राजकारणात तर भाजपाला संघाकडून जे मनुष्यबळ, बौद्धिक बळ, प्रशासनिक व नियोजनात्मक अनुभवाचे बळ मिळते आहे, त्यामुळे तो पक्ष आजच्या राजकारणात इतर पक्षांना त्यांच्याच भाषेत उत्तर देऊनही आपले वेगळे स्थान राखून आहे. संघ विचारांना आज जगभरातून मिळणाऱ्या मान्यतेचा हा प्रारंभ आहे. जी गोष्ट जगभरात नावाजली जाते ती गोष्ट महाराष्ट्रातदेखील नावाजली जाणे साहजिकच आहे.

१९२५ मध्ये पाच स्वयंसेवकांपासून परमपूजनीय डॉ. हेडगेवारांनी रुजवलेल्या 'राष्ट्र आणि राष्ट्रासाठी संघटन' या विचारांचे आज बहुआयामी अशा विशाल संघटनेमध्ये रूपांतर झालेले दिसते. राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, राष्ट्र सेविका समिती, विश्व हिंदू परिषद, भारतीय मजदूर संघ, भारतीय जनता पक्ष, अखिल भारतीय विद्यार्थी परिषद, भारताबाहेर काम करणारे संघटन हिंदू स्वयंसेवक संघ, राष्ट्रीय शीख संगत, जनजाती कल्याण आश्रम, मुस्लिम राष्ट्रीय मंच अशा अनेक क्षेत्रांत काम करणाऱ्या संघटनांच्या द्वारे संघ राष्ट्र आणि या राष्ट्रासाठी हिंदूंचे संघटन करण्याचे कार्य अव्याहतपणे मागील १०० वर्षे सुरू आहे. हे करताना संघाची भाजपाव्यतिरिक्त कोणतीही संघटना राजकीय क्षेत्रात काम करीत नाही, ही विशेष बाब म्हणावी लागते. भारतरत्न नानाजी देशमुख एकदा म्हणाले होते की, 'राजकीय पक्ष म्हणजे सत्तापिपासू लोकांच्या टोळ्या बनलेल्या आहेत.' आजही या वक्तव्याला भारतीय जनता पार्टी हा मोठा अपवाद आहे. या सगळ्या संघटना समाजाच्या वेगवेगळ्या क्षेत्रात काम करीत असल्या, त्यांची उद्दिष्टे जरी त्यामुळेच वेगवेगळी असली, तरी त्यांच्यामध्ये कोणताही विसंवाद असल्याचे दिसत नाही. अपवादात्मक परिस्थितीत एखाद्या वेळी अंतर्विरोध निर्माण झाला तरी तो समन्वयाच्या माध्यमातून लगेचच मिटवला जाईल, याचीही काळजी संघ नेहमीच घेत असतो. लाखो नि:स्वार्थ आणि सेवाभावी कार्यकर्ते पिढ्यान्‌पिढ्या तयार करणेदेखील संघाचे मुख्य उद्दिष्ट नाही. या देशातील हिंदूंचे संघटन करणे आणि राष्ट्र कार्यासाठी चारित्र्यवान व्यक्तींचे निर्माण करण्यासाठी चाललेल्या कार्याच्या ओघात आपोआपच नि:स्वार्थ कार्यकर्ते तयार होतात; जे संघ कार्यासाठी समर्पित जीवन जगतात. संघ कार्य करताना त्यांची समाजाकडून वा संघाकडून कोणतीही अपेक्षा नसते. त्यामुळेच संघाने सांगितलेले काम समर्पित वृत्तीने आजही पिढ्यान्‌पिढ्या चाललेले आहे. या कार्यात एखादी व्यक्ती संघाच्या चारित्र्याच्या संकल्पनेत बसू शकत नसेल तर अशी व्यक्ती फार काळ संघाच्या परिघात टिकत नाही. अधिकार पदांवरील व्यक्तींना अभिनिवेश नाही. त्यामुळे वरिष्ठ पातळीवर विचारांचे आदानप्रदान होऊन त्यातून भविष्यातील दिशा निश्चित केली जाते आणि सामान्य स्वयंसेवकापासून ते सरसंघचालकांपर्यंत आपल्या सर्व क्षेत्रातील संघटनांना बरोबर घेऊन संघ कार्यपथावर वाटचाल करताना दिसतो. अर्थात त्यामुळे चारित्र्यवान, विचारी आणि अभ्यासू माणसांची संघात कमी नाही. याच लोकांच्या कार्यामुळे आज भारतात राष्ट्रवाद भक्कम पायावर उभा आहे. 'लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स' आणि तत्सम ठिकाणी शिकून आलेली माणसे महत्त्वाच्या स्थानी बसवून मागील १०० वर्षे 'डीप स्टेट' भारताला दिशाहीन करून आर्थिक वसाहत म्हणून वापरत आले. त्या आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक वसाहतवादाला मागील १० वर्षांत पायबंद घातला गेल्यामुळे या देशातील सोरोस आणि फोर्ड फाऊंडेशन प्रणीत विरोधी पक्ष व तथाकथित विचारवंत आज अस्वस्थ झालेले दिसतात. लोकसभा निवडणुकीत दिसलेल्या थोड्या पीछेहाटीनंतर हरयाणा आणि महाराष्ट्रातील निवडणुकांनी संघ विचारांची खोलवर रुजवलेली मुळे नव्याने जाणवली आहेत. त्यामुळे या निवडणूक निकालांच्या पृष्ठभूमीवर हिंदुत्ववादी विचारवंतांनी एक नवे आव्हान स्वीकारायला हवे. हे आव्हान म्हणजे युरोप-अमेरिकेच्या दृष्टिकोनातून तयार करण्यात आलेल्या विविध प्रमाणकांना उत्तर देणे हे होय. काही वर्षांपूर्वीपर्यंत हा देश कोणत्या ना कोणत्या गोष्टींसाठी या पाश्चात्त्य देशांच्या मदतीवर अवलंबून होता. आज या परिस्थितीत मोठा बदल झालेला दिसतो. सगळ्यात महत्त्वाचा बदल म्हणजे आज हा देश युरोप-अमेरिकेच्या डोळ्याला डोळा देताना दिसतो आहे. त्यामुळे या स्थितीत विविध क्षेत्रातील जागतिक प्रमाणकांना आव्हान दिले पाहिजे.

ही प्रमाणके म्हणजे मानव संसाधन विकास निर्देशांक (एचआरडी इंडेक्स), जागतिक भूक निर्देशांक (वर्ल्ड हंगर इंडेक्स), जागतिक आनंद निर्देशांक (हॅपीनेस इंडेक्स) इत्यादी. कारण ही सगळी प्रमाणके फक्त अमेरिका आणि युरोपीय देश नजरेसमोर ठेवून तयार केली जातात. ती तयार करताना तिसऱ्या जगातील देशांतील व्यवस्था अयोग्य आहे हे सिद्ध करण्याचाच उद्देश असतो. हे निर्देशांक खरोखर एखाद्या देशाची एखाद्या क्षेत्रातील वस्तुस्थिती विशद करू शकतात का हा प्रश्नच आहे. हेच काही निर्देशांक दोन वर्षांपूर्वीपर्यंत आमचे शेजारी असलेले श्रीलंका, बांगलादेश भारताच्या तुलनेत नेहमीच सुस्थितीत दाखवत होते. असेच उदाहरण जागतिक भूक निर्देशांकाच्या बाबतीत देता येईल. ही तालिका तयार करताना युरोप-अमेरिकेत आवश्यक असलेले उष्मांक (कॅलरीज) गृहीत धरले जातात. भारतीय उपखंडात सुदृढ आणि निरोगी राहण्यासाठी तितक्या उष्मांकाची आवश्यकताच नाही. म्हणजे युरोप-अमेरिकेत घेतल्या जाणाऱ्या उष्मांकांपेक्षा कमी उष्मांक घेऊन येथील हवामानात निरोगी जीवन जगता येते; नव्हे कमी उष्मांक घेऊनच निरोगी राहता येते. तेव्हा आपल्या आहारात कमी उष्मांक घेणाऱ्या लोकांची संख्या भारतात जास्त आहे. त्यामुळे त्या निर्देशांक तालिकेच्या आधारे केलेल्या परीक्षणात कमी उष्मांक घेणे म्हणजे कुपोषित असणे होय. या विषयात डॉ. सुरेश तेंडुलकर यांचे संशोधन आणि अहवाल वेगळी तथ्ये विशद करतात. हेच शिक्षण क्षेत्रातील विविध संस्थांची क्रमवारिता लावताना घडत असते. युरोप-अमेरिकेत जिथे मुळात लोकसंख्या कमी आहे, तेथे १५-२० विद्यार्थ्यांमागे एक शिक्षक हे प्रमाण मान्य होणारे आहे. आमच्या इथे अतिरिक्त लोकसंख्या असताना आणि सर्वांना शिक्षणाची संधी मिळणे हे ध्येय असताना १५ विद्यार्थ्यांना एक शिक्षक हा रेशो ठेवताच येणारा नाही. त्यामुळे अशा प्रकारची प्रमाणके भारतीय उपखंडात चुकीचीच ठरतात. त्यामुळे आजच्या जागृत हिंदू भारतात या प्रमाणकांना प्रथम नाकारले पाहिजे. आज तरी हे सर्व करण्याची बौद्धिक कुवत असलेल्या माणसांची संघाकडे कमतरता नाही. मग आपण अपेक्षा करायला काय हरकत आहे...

९८८१२४२२२४

## वेध

**नंदकिशोर काथवटे**

# माओवादाला अखेरची घरघर

राज्याच्या पटलावर नैसर्गिकदृष्ट्या सर्वांत श्रीमंत जिल्हा म्हणून ओळखल्या जाणाऱ्या गडचिरोली जिल्ह्याच्या ४ दशकांतील भूतकाळावर नजर टाकल्यास केवळ माओवादामुळे गडचिरोली जिल्हा देशातील २५ मागास जिल्ह्यांत अव्वल स्थानावर पोहोचला होता. मात्र या जिल्ह्याने आता प्रगतीचा एकेक दगड सर करत विकासाच्या दिशेने वाटचाल सुरू केली आहे. नक्षलवादाच्या विळख्यात अडकलेल्या या जिल्ह्याला बाहेर काढण्यासाठी जर कोणी शर्थीचे प्रयत्न केले असतील तर ते म्हणजे गृहविभागाने. केंद्र आणि राज्य शासनाच्या समन्वयाने गडचिरोली जिल्ह्यातील नक्षलवाद संपविण्यासाठी गृहविभागाची भूमिका अतिशय महत्त्वपूर्ण ठरली आहे. केंद्राने गडचिरोलीसाठी पाठविलेले सुरक्षा दल व विकासकामांसाठी लागणारा निधी आणि राज्य सरकारने उचललेली कठोर पावले या बळावर गडचिरोलीच्या नक्षलवादाला आता अखेरची घरघर लागली आहे. परवा भामरागड तालुक्यातील अतिदुर्गम व नक्षलप्रभावित पेनगुंडा येथे पोलिस विभागाने नव्याने पोलिस मदत केंद्र स्थापन केले असून, छत्तीसगड राज्यामधून छुप्या पद्धतीने गडचिरोलीच्या सीमावर्ती भागात येणाऱ्या नक्षल चळवळीला रोखण्याचे काम केले आहे. या पोलिस मदत केंद्राच्या पाहणीसाठी व जवानांच्या अडचणी जाणून घेण्यासाठी खुद्द राज्याच्या पोलिस महासंचालक रश्मी शुक्ला पेनगुंडाच्या जंगलात दाखल झाल्या. यामुळे निश्चितच नक्षलवाद्यांशी दोन हात करणाऱ्या जवानांचे मनोबल उंचावले आहे. पोलिस प्रशासनाचे कौतुक करावे तेवढे कमीच आहे. अतिशय अडचणींचा सामना करून, प्रतिकूल परिस्थितीत गडचिरोलीच्या पोलिस दलाने नक्षलवादाची पाळेमुळे खणून काढली आहेत. त्यामुळे पोलिस विभागाचे वरिष्ठ अधिकारीसुद्धा जवानांच्या पाठीशी असल्याचा विश्वास त्यांच्या कृतीतून आता देऊ लागले आहे. रश्मी शुक्ला पेनगुंडा येथे दाखल झाल्यानंतर त्यांनी भामरागडचे उपविभागीय पोलिस अधिकारी अमर मोहिते व प्राणहिता सी-६० पोलिस अंमलदार श्रीराम सोरी यांचा वाढदिवस केक कापून साजरा केला आणि जवानांशी मनमोकळेपणे संवाद साधत त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या. निश्चितच ही बाब नक्षलवादाविरोधात लढणाऱ्या जवानांचे मनोबल उंचाविणारी आहे. पोलिसांनी केवळ बंदुकीने गडचिरोली जिल्ह्यातील माओवादाला हद्दपार केले नाही तर गडचिरोली पोलिसांचे 'सोशल पोलिसिंग' हे शस्त्र प्रभावी ठरले असल्याचे आता स्पष्ट होत आहे. राज्याच्या कायदा व सुव्यवस्थेची जबाबदारी सांभाळणाऱ्या पोलिस महासंचालक रश्मी शुक्ला ११ डिसेंबरला गडचिरोलीत दाखल झाल्या आणि थेट अतिदुर्गम पेनगुंडा गाठत जवानांना धीर देत प्रशासन जवानांच्या पाठीशी असल्याचा विश्वासही दिला. दादालोरा खिडकीच्या माध्यमातून लोकांच्या जवळ जात पोलिस विभागाने आदिवासींच्या समस्या सोडविल्या, त्यांचा विश्वास जिंकला आणि प्रेमाने त्यांच्याशी वागून नक्षलवादावर विजय मिळविला. शासनानेसुद्धा स्थापन केलेल्या आत्मसमर्पण योजनेला जे बळ मिळाले ते केवळ गडचिरोली पोलिसांच्या सोशल पोलिसिंगमुळेच आहे. पूर्वी पोलिस विभागाचे वरिष्ठ अधिकारी गडचिरोली जिल्ह्यात वर्षानुवर्षे येत नव्हते. त्यामुळे येथील पोलिसांच्या अडचणी, त्यांच्या समस्या प्रशासन व शासनापर्यंत पोहोचत नव्हत्या. मात्र आता वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांचे दौरे गडचिरोली जिल्ह्यात सातत्याने होत असल्याने येथील नक्षलवादाच्या समस्या शासनापर्यंत पोहोचू लागल्या असून त्या दिशेने पावलेसुद्धा उचलली जात आहेत. पोलिस महासंचालक रश्मी शुक्ला यांनी माओवाद संपवून गडचिरोली जिल्ह्याचा विकास करू आणि शासकीय योजनांचा लाभ जास्तीत जास्त लोकांना मिळवून देण्याचा प्रयत्न करू असे आश्वासन गडचिरोली जिल्ह्याच्या जनतेला दिले आहे. त्यामुळे नक्षलवादाची आता अखेरची घरघर सुरू आहे. पोलिसांच्या आक्रमतेमुळे नक्षलवादी बॅकफूटवर असून गडचिरोलीच्या सीमावर्ती भागातून त्यांना हाकलून लावण्यास पोलिसांना यश आले आहे. यासाठी पोलिसांनी राबविलेली आपली गुप्तचर यंत्रणासुद्धा तितकीच प्रभावी ठरली आहे. सोशल पोलिसिंगमुळे पोलिसांची गुप्तचर यंत्रणा अधिक बळकट झाली असून पोलिसांच्या अडचणी शासनाने सोडविण्याठी प्राथमिकता दर्शविल्याने गडचिरोलीच्या पोलिस दलाची संपूर्ण राज्यात चर्चा आहे. नक्षलप्रभावित म्हणून ओळखल्या जाणाऱ्या गडचिरोली जिल्ह्यातील लोकसभा व विधानसभेच्या निवडणुकीत पोलिसांनी राबविलेल्या नियोजनबद्ध सुरक्षा व्यवस्थेमुळे या जिल्ह्यात दोन्ही निवडणुकांमध्ये विक्रमी मतदान झाले आणि मतदानाच्या टक्केवारीकडे अख्ख्या राज्याचे लक्ष गडचिरोलीने वेधून घेतले. यासाठी गडचिरोलीचे पोलिस अधीक्षक नीलोत्पल हे सुद्धा तितकेच अभिनंदनास पात्र ठरतात. अशीच सक्षम सुरक्षा व्यवस्था गडचिरोली जिल्ह्यात कायम राहिल्यास हा जिल्हा नक्षलवादमुक्त होईल, यात तिळमात्रही शंका नाही.

९९२२९९९५८८

## दिल्ली वार्तापत्र

**श्यामकांत जहागीरदार**

# 'एक देश एक निवडणूक' विधेयक काळाची गरज

बहुचर्चित असे 'एक देश एक निवडणूक' विधेयक सरकारने लोकसभेत सादर केले. या विधेयकाला काँग्रेस आणि अन्य विरोधी पक्षांचा विरोध असल्यामुळे त्यांनी विधेयक सादर होत असताना नेहमीप्रमाणे गोंधळ घातला. मात्र विरोधकांच्या गोंधळाला न जुमानता सरकारने हे विधेयक लोकसभेत सादर केले. या विधेयकावर व्यापक सहमती करण्यासाठी ते संयुक्त ससदीय समितीकडे पाठवण्याची घोषणाही कायदा मंत्री अर्जुनराम मेघवाल यांनी केली. हे विधेयक संसदेत पारित झाल्यानंतर देशात लोकसभा आणि विधानसभेच्या निवडणुका एकाचवेळी होतील. लोकसभेच्या तसेच विधानसभेच्या निवडणुका सध्या वेगवेगळ्या होतात, त्यामुळे पैशाचा तर चुराडा होतो, पण आचारसंहिता आणि अन्य कारणांमुळे देशातील विकासकामेही महिनोमहिने ठप्प होतात.

सध्या हे विधेयक संयुक्त संसदीय समितीकडे पाठवले जाणार आहे, या समितीचा अहवाल आल्यानंतर ते अंतिम मंजुरीसाठी लोकसभेत सादर केले जाईल. काँग्रेस आणि अन्य विरोधी पक्षांची भूमिका पाहता संयुक्त संसदीय समितीतही या विधेयकावर सहमती होण्याची शक्यता नाही. संसदेच्या दोन्ही सभागृहांत हे घटनादुरुस्ती विधेयक दोन तृतीयांश बहुमताने पारित झाले पाहिजे. लोकसभेत सत्ताधारी पक्षाला म्हणजे रालोआला स्पष्ट बहुमत नसले तरी रालोआतील तसेच रालोआबाहेरील काही पक्षांच्या मदतीने भाजपा हे विधेयक पारित करून घेईल. या विधेयकावर भाजपाची खरी अडचण राज्यसभेत होण्याची शक्यता आहे. कारण राज्यसभेत सध्या भाजपाचे साधे बहुमत आहे. राज्यसभेतही हे विधेयक पारित होण्यासाठी दोन तृतीयांश बहुमताची गरज आहे. त्यामुळे राज्यसभेत विधेयक पारित करून घेणे, ही भाजपाची सत्त्वपरीक्षा ठरणार आहे.

एक देश एक निवडणूक विधेयक संसदेच्या दोन्ही सभागृहांत पारित झाले तरी त्यानुसार २०२९ मध्ये निवडणूक होणे सध्या तरी कठीण वाटते. मोदी सरकारने एक देश एक निवडणूकबाबत माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांच्या नेतृत्वात २ सप्टेंबर २०२३ ला एक उच्चाधिकार समिती नियुक्ती केली होती. या समितीने १४ मार्च २०२४ ला आपला अहवाल राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांना सादर केला. २०३४ मध्ये यानुसार एकत्र निवडणुका घेण्याची अहवालात शिफारस आहे. मोदी सरकारने देशाच्या व्यापक हितासाठी घेतलेल्या कोणत्याही निर्णयाला विरोध करणे ही काँग्रेसची नेहमीची सवय झाली आहे. मुळात आपण विरोध का करतो, हे काँग्रेसनेत्यांनाही समजत नाही. काँग्रेसचा विरोध हा विरोधासाठीचा विरोध आहे. त्यामागे कोणतेही तर्कसंगत कारण नाही.

देशात लोकसभेच्या तसेच विधानसभेच्या निवडणुका एकाचवेळी घेण्याचा मोदी सरकारचा आग्रह ही काही नवीन बाब नाही, तसेच यासंदर्भातील विधेयक पारित झाल्यानंतर देशात पहिल्यांच या पद्धतीने निवडणुका होतील, असेही नाही. देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर १९६७ पर्यंत देशात लोकसभेच्या तसेच विधानसभेच्या निवडणुका एकत्रच होत होत्या. विशेष म्हणजे तेव्हा देशात काँग्रेसचेच सरकार होते. म्हणजे देशात एक देश एक निवडणुकीची सुरुवात काँग्रेसच्याच शासनकाळात झाली होती. देशाचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांनीच याची सुरुवात केली होती, याचे स्मरण आज या विधेयकाला विरोध करणाऱ्या काँग्रेस नेत्यांनी ठेवले पाहिजे. म्हणजे जुन्या काँग्रेस सरकारांनी सुरू केलेल्या एक देश एक निवडणूक पद्धतीलाच काँग्रेसचे आजचे तरुण तुर्क आणि म्हातारे अर्क नेतृत्व विरोध करत आहे. मुळात काँग्रेसमध्ये काही वर्षांपूर्वीच पन्नाशी ओलांडलेले नेतृत्व स्वत:ला तरुण समजत असल्यामुळे खरी समस्या आहे.

१९६७ पासून लोकसभेच्या तसेच विधानसभेच्या निवडणुका एकत्र घेण्याच्या पद्धतीला तडा गेला वा काँग्रेसच्या तेव्हाच्या पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी त्याला जाणीवपूर्वक तडा दिला. कारण १९६७ मध्ये देशातील काही राज्यांत पहिल्यांदाच विरोधी पक्षांची सरकारे आली होती. लोकसभेची निवडणूक वर्षभर आधी घेतल्यामुळे तसेच विरोधी पक्षशासित राज्यातील सरकार राजकीय कारणास्तव बरखास्त करण्यात आल्यामुळे एक देश एक निवडणूक पद्धतीला तेव्हा तडा गेला. त्यानंतर देशात लोकसभेच्या निवडणुका वेगळ्या आणि विधानसभेच्या निवडणुका वेगळ्या होऊ लागल्या.

मात्र आताही देशात लोकसभा निवडणुकीसोबत सिक्कीम, ओडिशा, आंध्रप्रदेश, आणि अरुणाचलप्रदेशात विधानसभेच्या निवडणुका होत आहे, याचे भान या विधेयकाला विरोध करताना काँग्रेस आणि अन्य विरोधी पक्षांनी ठेवले पाहिजे. विशेष म्हणजे एक देश एक निवडणूक लागू झाल्यानंतर केंद्रात ज्या पक्षाचे सरकार बनेल, त्याच पक्षाचे राज्यातही सरकार येईल, अशी भीती विरोधकांना वाटते, ती निराधार असल्याचे या राज्यांच्या विधानसभा निवडणूक निकालांवरून आपल्या लक्षात येईल. लोकसभेसोबत ओडिशा आणि आंध्रप्रदेशात विधानसभेच्या निवडणुका होत असतानाही यावेळच्या निवडणुकीचा एकमेव अपवाद वगळता आतापर्यंत ओडिशात बिजू जनता दलाचेच सरकार येत होते. आंध्रप्रदेशातही कधीच भाजपाचे सरकार आले नाही.

लोकसभा आपला कार्यकाळ पूर्ण करू शकली नाही वा काही राज्यांतील सरकारे मुदतीपूर्वीच पडली तर काय, असा प्रश्न विरोधक या विधेयकाला विरोध करण्यासाठी उपस्थित करत आहे. पण त्याचेही उत्तर रामनाथ कोविंद समितीने आपल्या अहवालातून दिले आहे. समजा केंद्र सरकार आपला कार्यकाळ पूर्ण करू शकले नाही, तर हा मुद्दा २००४ नंतर देशात उद्‌भवलाच नाही. २००४ ते २०१४ पर्यंत संपुआच्या सरकारने पाच वर्षांचे आपले दोन कार्यकाळ यशस्वीपणे पूर्ण केले, तर २०१४ पासून २०२४ पर्यंत मोदी सरकारनेही पाच वर्षांचे आपले दोन कार्यकाळ पूर्ण केले, आता मोदी सरकारची वाटचाल पाच वर्षांचा तिसरा कार्यकाळ पूर्ण करण्याच्या दिशेने सुरू आहे.

१९७७, १९८०, १९९८ आणि १९९९ मध्ये देशात मुदतपूर्व निवडणुकांची स्थिती उद्‌भवली होती. एक देश एक निवडणूक विधेयक पारित झाल्यानंतर लोकसभेबाबत अशी परिस्थिती उद्‌भवण्याची दूरदूरपर्यंत कोणतीच शक्यता नाही. एखाद्या राज्यातील सरकार कोणत्याही कारणाने मुदतपूर्व कोसळले वा आपला कार्यकाळ पूर्ण करू शकले नाही, तर उर्वरित कालावधीसाठी निवडणूक घेण्याची तरतूद या विधेयकात आहे. लोकसभेबाबतही अशीच तरतूद आहे. म्हणजे काहीही झाले तरी देशात लोकसभेसोबत विधानसभेच्या निवडणुका घेण्याने वेळापत्रक कधीच प्रभावित होणार नाही. त्यामुळे काँग्रेस आणि अन्य विरोधी पक्षांनी एक देश एक निवडणूक विधेयकाला असलेला आपला विरोध सोडून द्यावा. सत्ताधारी पक्षानेही विरोधी पक्षांचे या विधेयकावर जे आक्षेप आहे, त्याचे मुद्देसूद निराकरण केले पाहिजे आणि सहमतीने देशाच्या व्यापक हिताचे असे हे विधेयक पारित करून घेतले पाहिजे.

९८८१७१७८१७

## शेकोटी हद्दपार झाली, माणसे गायब झाली

शिशिर महिन्यात हवेचा गारवा चांगलाच वाढला होता. थंडी बोचरी होती. बचावासाठी स्वेटर, मफलर, शॉलचा वापर वाढला तरी शेकोटी पेटवून अशी थंडी घालविण्याची मजा काही औरच आहे. पूर्वीच्या काळी प्रचंड घनदाट जंगले असल्यामुळे सूर्यास्तानंतर या थंडीचा प्रादुर्भाव जाणवायचा. लहान गावात सायंकाळी ७ नंतर सर्वत्र शुकशुकाट असायचा.



त्या काळी इंधन म्हणून लाकडे वापरली जात. वेगवेगळ्या आकाराच्या टोपल्यांना माती आणि शेणाने सारवून घरोघरी शेकोटी भोवती गोळा होऊन गप्पांचा फड रंगत असे. शाळेचा गृहपाठ शेकोटी शेजारी बसूनच होत असे. मनोरंजनाचे साधन मुख्य रेडिओ. विविध भारती, बुधवारचा बिनाका गीतमाला आणि शेकोटी यांचे एक वेगळेच नाते असे.

घरटी एकतरी दमेकरी किंवा वात विकाराचा रुग्ण असे. त्यांना या शेकोटीचा मोठा आसरा असायचा. दमेकरीचा घट्ट कफ शेकोटीच्या उष्णतेने पातळ तर वातवाल्याचा वायू उष्ण होऊन चलनवलन व्यवस्थित ठेवत असे. त्यांचा त्रास आटोक्यात राही. चित्रपटगृहातील रात्रीच्या शोला तुरळक प्रेक्षक राहत. बाहेर रस्त्यावर पिवळ्या दिव्यांचा अंधुक प्रकाश, सर्वत्र सामसूम आणि चौकात वाटसरूंसाठी डांबर ड्रममध्ये मोठी शेकोटी असायची. रात्री घरी जाणारे हमखास थांबून हात शेकत. थोडी ऊर्जा घेऊन मार्गस्थ व्हावयाचे. आठवण येते खरी, मात्र आता जंगलतोड थांबली, कौलारू घरांची जागा सिमेंट स्लॅबने घेतली. शेकोटी आणली तरी तिच्याभोवती गप्पांचा फड रंगवणारे माणसे आणायचे कुठून?

**संजय पाठक**/९४२२१४७६७७

## वाचक पत्रे

### सुरक्षित अंतर गरजेचे

बर्डी उड्डाण पुलावर कार एकावर एक आदळल्याने अपघात झाल्याचे वृत्त वाचले. लक्षात येते की त्या क्षणी प्रत्येक कार ही निर्धारित वेगापेक्षा अधिक वेगाने जात असाव्यात. अधिक वेग आणि सुरक्षित अंतर न ठेवल्यामुळे असे अपघात होतात. नियमांच्या पालनाचा विसर होणे ही जणू फॅशन झाली आहे. नको त्या ठिकाणी अशी जीवघेणी स्पर्धा विनाकारण सुरळीत मार्ग अवरुद्ध करत असते, ज्याचा त्रास नियमांचे पालन करणाऱ्या वाहनचालकांना भोगावा लागतो. मार्ग सुरळीत करण्यासाठी म्हणून वाहतूक थांबवावी लागते, ज्यामुळे इतर मार्गावर ताण वाढतो.

वाहनचालकांनीच भान ठेवून सुरक्षित अंतर ठेवले तर अशा अपघातांना आळा बसेल, लोकांचा वेळ, श्रम, पैसा वाचेल. कृपया वाहनचालकांनी नियमांचे पालन करत, निर्धारित वेगमर्यादा पाळत, सुरक्षित अंतर राखून वाहन चालवावे, असे आवाहन यानिमित्ताने करावेसे वाटते.

**अतुल ठाकरे**/नागपूर

### केंद्र सरकारची पर्यटन विकासाबाबत मोठी योजना

सध्या पर्यटन क्षेत्र हे वेगाने विकसित होणारे एक महत्त्वाचे क्षेत्र आहे. देशातील महत्त्वाची अशी जागतिक दर्जाची सुमारे १०० स्थळे जागतिक दर्जा प्रमाणे विकसित केली जातील, ही बातमी नुकतीच वाचली. भारत देश हा नैसर्गिक साधनसामुग्रीने नटलेला आहे. अनेक अभयारण्ये विकसित झाली आहेत, अनेक जागतिक दर्जाची पर्यटन स्थळे आहेत. दरवर्षी यावर उलाढाल वाढतच आहे. पर्यटकांची वाढती संख्या स्थानिक रोजगाराना प्राधान्य देते. शिवाय उलाढाल मोठ्या प्रमाणात होत असल्याने विकासाला प्राधान्य मिळते. सरकारने पर्यटनासाठी एक विकास आराखडा तयार करण्याचे काम सुरू केले आहे. त्यानुसार आगामी सुमारे पाच वर्षांत देशातील एकूण १०० पर्यटन स्थळे विकसित करण्याचे धोरण आहे. या आराखड्यापासून देशात परदेशी पर्यटनाकडे विशेष लक्ष दिले जाईल. ही योजना कार्यान्वित करण्यासाठी चर्चा सुरू असून त्यांची कार्यवाही काही दिवसांतच केली जाईल. आगामी सुमारे २५ वर्षांच्या काळात म्हणजेच २०४७ च्या दरम्यान भारतात १०० दशलक्ष विदेशी पर्यटक भेटीचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे. २०२३ मध्ये देशात विदेशी पर्यटक सुमारे ९.२३ दशलक्ष एवढ्या मोठ्या संख्येने आले होते. सध्या आपण अर्थव्यवस्थेच्या बाबतीत सहाव्या क्रमांकावर आहोत. अमेरिका प्रथम, त्यानंतर चीन, जर्मनी, जपान व इटलीचे क्रमांक आहेत. जगात तिसरे स्थान मिळविण्याचे जोरदार प्रयत्न सुरू आहेत. भारतात वैद्यकीय उपचार स्वस्त असल्यामुळे अनेक परदेशी रुग्ण भारतात येतात. अशी काही स्थळे सुद्धा विकसित करण्यावर भर देण्यात येणार आहे. पर्यटन विकासाचे सरकारचे हे पाऊल म्हणजे योग्य दिशेने टाकलेले पाऊल आहे, असे वाटते.

**शांताराम वाघ**/पुणे

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## संक्षिप्त वृत्त

### महिलेचा गोळ्या खाऊन आत्महत्येचा प्रयत्न

**सोलापूर, दि. १८ डिसेंबर -**
जुना विडी घरकुलमधील योगेश्वर नगरात राहणाऱ्या महिलेने गोळ्या खाऊन आत्महत्येचा प्रयत्न केला. विद्या तुकाराम कसा (वय ३०, रा. योगेश्वर नगर) असे आत्महत्येचा प्रयत्न करणाऱ्या महिलेचे नाव आहे. १७ डिसेंबर रोजी सकाळी विद्या कसा यांचे भांडण झाले होते. प्रकाश म्हंता व पनालाल बुगडे यांनी विद्या यांना शिवागाळ करून उलट त्यांनीच विद्या यांच्यावर केस केल्याने त्याच्या टेन्शनमध्ये विद्या यांनी अंगणात सडा मारण्याचे पिवळा कलर व गोळ्या खाऊन आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे विद्या यांना त्रास होऊ लागल्याने त्यांना आत्या सुनंदा कसा यांनी उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल केले. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

### बायको भांडण करून माहेरी गेल्याने पतीची आत्महत्या


**सोलापूर, दि. १८ डिसेंबर -**
बायको भांडण करून माहेरी गेल्याने पतीने गळफास घेऊन आत्महत्या केली. ही घटना बुधवारी दुपारी उघडकीस आली. अल्ताफ चाँद शेख (वय २७, रा. फॉरेस्ट, चांदणी चौक) असे आत्महत्या केलेल्याचे नाव आहे. १८ डिसेंबर रोजी दुपारी दोनच्या सुमारास अल्ताफ शेख याने राहत्या घरातील बेडरूममधील दरवाजाच्या चौकटीला बायको भांडण करून माहेरी गेल्याने त्या रागाच्या भरात कापडाच्या सहाय्याने गळफास घेतला. ही बाब नातेवाईकांच्या निदर्शनास आल्याने त्यांनी अल्ताफ शेख यास खाली उतरवून बेशुध्दावस्थेत शासकीय रुग्णालयात दाखल केले. त्यावेळी डॉ. राजदिपसिंग यांनी अल्ताफ यास मृत घोषित केले. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

### रिक्षाचालकास मारहाण; तिघांवर गुन्हा दाखल

**सोलापूर, दि. १८ डिसेंबर -**
रिक्षाचालकास लाथाबुक्क्यांनी तसेच लोखंडी पाईपने मारहाण करणाऱ्या तिघांविरुध्द फौजदार चावडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत रिक्षाचालक शुकुमर आझीम जमादार (वय ५५, रा. शास्त्री नगर, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन नय्युम चाँदसाब नदाफ (रा. पठाण मोहल्ला, पंजाब तालीम, सोलापूर) आणि त्याच्या दोन साथीदारांविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. १३ डिसेंबर रोजी शुकुमर जमादार हे रिक्षा चालविण्याच्या कामावर जात असताना नय्युम नदाफ व त्याचे दोन साथीदार हे आले व जमादार यांच्या रिक्षात बसले. जमादार यांना तिघांनी तेरे को काम दिलाता और दारू भी पिलाता असे म्हणून रिक्षातून बाळीवेस येथील वाईन शॉपजवळ नेले. तिथे दारू घेऊन पिऊन परत रिक्षातून कामावर सोडण्यासाठी जात असताना जुना पूना नाका येथील घाण पाण्याच्या नाल्याजवळ रिक्षा थांबविली. तिथे नय्युम नदाफ याने जमादार यास तुझे जादा मस्ती है क्या असे म्हणून रिक्षातून लोखंडभ पाईप काढून मारहाण केली. यावेळी नदाफ याच्या दोन साथीदारांनीही लाथाबुक्क्याने मारहाण केली. यामध्ये जमादार हे जखमी झाले. सहायक पोलिस निरीक्षक पाटील पुढील तपास करीत आहेत.

## निधन वृत्त...

### विठ्ठलराव शिंदे



**अकलूज, दि. १८ डिसेंबर-**
अकलूज-माळेवाडी येथील भारतीय जनता पक्षाचे ज्येष्ठ कार्यकर्ते विठ्ठलराव कृष्णाजी शिंदे (वय ८०) यांचे बुधवारी पुणे येथे उपचारादरम्यान निधन झाले. त्यांच्या पश्चात एक मुलगा, दोन मुली, सून, नातवंडे असा परिवार आहे. विठ्ठलराव शिंदे यांनी जनसंघ ते भारतीय जनता पक्ष यामध्ये विविध पदावर काम केले होते.

### ॲड. संपतराव भोसले



बार्शी, दि. १८ डिसेंबर-
रऊळगांव येथील रहिवासी ॲड. संपतराव आनंदराव भोसले यांचे सोलापूर येथील हॉस्पिटलमध्ये निधन झाले. मृत्यूसमयी ते ५५ वर्षांचे होते. त्यांच्या पश्चात पत्नी व एक मुलगी असा परिवार आहे. बार्शी वकील संघातर्फे त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

### सुनीलाबाई माने-पाटील



**सोलापूर, दि. १८ डिसेंबर-**
धाराशिव जिल्ह्यातील तुगाव येथील सुनीलाबाई गणपतराव माने-पाटील (वय ७७) यांचे अल्पशा आजाराने बुधवारी सायंकाळी ६ वाजता सोलापुरातील खाजगी रुग्णालयात उपचारादरम्यान निधन झाले.अणदूर येथील प्रा. विश्वास माने यांच्या त्या मातोश्री होत. त्यांच्या पश्चात एक मुलगा, विवाहित मुलगी, सून, नातवंडे असा परिवार आहे.

### रुक्मिणी वागज



**सोलापूर, १८ डिसेंबर -**
शेटफळ, तालुका मोहोळ येथील रहिवासी रुक्मिणी हरिदास वागज (वय ९२) यांचे बुधवार, दि. १८ डिसेंबर रोजी आजारपणामुळे निधन झाले. गुरुवार, दि. १९ डिसेंबर रोजी रोजी सकाळी ७.३० चे दरम्यान त्यांच्या पार्थिवावर अंत्यविधी करण्यात येणार आहे, त्यांच्या पश्चात मुलगा, सुना, नातवंडे, परंतुडे आहेत. ॲड रामदास वागज यांच्या त्या मातोश्री होत.


## कृषि उत्पन्न बाजार समिती, बार्शी. ४१३४०१

Email-ID-am_barshi@msamb.com
फोन-०२१८४-२२२९७६ दि. / /२०२४

**जाहिर प्रसिध्दीकरण**

यान्वये कृषि उत्पन्न बाजार समितीच्या सर्व अनुज्ञप्ती धारकांना कळविणेत येते की, कृषि उत्पन्न बाजार समिती बार्शी व सबयार्ड वैराग येथील अडत गाळे / खुले प्लॉट, फळे व भाजीपाला विभागातील गाळे, शॉपिंग सेंटर मधील गाळे जाहिर लिलावाने बोली डिपॉझीट लिलाव पध्दतीने लिलाव मुख्य कार्यालय बार्शी मधील दि. २६/१२/२०२४ सकाळी ११.३० वा मुख्य कार्यालय येथे व उपबाजार वैराग मधील दि. २६/१२/२०२४ दुपारी ०३.०० वा उपबाजार कार्यालय वैराग येथे करण्यात येणार आहेत. तरी बाजार समितीचे अनुज्ञप्तीधारक आडत्ये, व्यापारी तसेच शॉपिंग सेंटरसाठी व्यवसायिक यांनी ज्यांना लिलावात भाग घ्यावयाचा आहे. त्यांनी बाजार समितीकडून रु.५००/- फॉर्म फी भरुन अटी व नियम असलेले फॉर्म खरेदी करुन घ्यावयाचे आहेत.

बाजार समितीकडे लिलावात भाग घेणेसाठी फॉर्म भरुन देतांना रु.५०००/- (अक्षरी रुपये पाच हजार) बोली डिपॉझीट रक्कम अनामत म्हणून बाजार समितीच्या कार्यालयात दि.२६/१२/२०२४ रोजी पर्यंत सकाळी ११.०० वाजेपर्यंत भरावयाची आहे. ज्यांनी रक्कम भरली आहे त्यांनाच लिलाव बोली मध्ये भाग घेता येईल याची नोंद घ्यावी. मागणी अर्ज तसेच अडत गाळे, प्लॉट, फळे भाजीपाला मार्केट गाळे, शॉपिंग सेंटर गाळे, नियम व अटी असलेला फॉर्म बाजार समितीचे कार्यालयात दि.२६/१२/२०२४ रोजी सकाळी ११.०० पर्यंत कार्यालयात वेळेत मिळतील.

सही/- सचिव | सही/- मुख्य प्रशासक
कृषी उत्पन्न बाजार समिती, बार्शी


# बुधवार बाजारात गोंधळ घालणाऱ्या मुकरी सालारसह १२ जणांवर गुन्हा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ डिसेंबर -**





शहरातील बुधवार बाजारात मध्यरात्रीच्या सुमारास साथीदारांसह गोंधळ घालणाऱ्या मुकरी सालारसह १२ जणांविरुध्द जेलरोड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत पोलिस शिपाई पद्मसिंह चव्हाण यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन मुकरी सालार, रफिक बागवान यांच्यासह १२ जणांविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. १७ डिसेंबर रोजी मध्यरात्रीच्या सुमारास पोलिस शिपाई पद्मसिंह चव्हाण हे डायल ११२ चा कॉल आल्याने बुधवार बाजार येथे गेले होते. बुधवार बाजार मधील रंगा चौकातील मच्छी हॉटेलच्या पाठीमागे पोलिस शिपाई चव्हाण हे गेल्यानंतर मुकरी सालार व रफिक बागवान हे मतीन बागवान यास शिवीगाळ व दमदाटी करीत मैं इधर मिटाने को आया हूं और तू मसला बढा रहा है क्या असे म्हणून शिवीगाळ करीत होते. मी मुकरी सालार आहे, आता तुला दाखवितो असे म्हणून त्याच्याकडील मोबाईलवरून फोन करून त्याच्या १० ते १२ साथीदारांना बोलावून घेतले. त्यावेळी पोलिस शिपाई चव्हाण यांनी सर्वांना जाण्यास सांगितले असता मुकरी सालार व त्याच्या साथीदारांनी बेकायदेशीरपणे जमाव जमवून गोंधळ घातला. म्हणून जेलरोड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सहायक पोलिस निरीक्षक सोनवणे पुढील तपास करीत आहेत.

## विवाहितेच्या छळप्रकरणी पतीसह तिघांवर गुन्हा दाखल

**सोलापूर :** विवाहितेच्या छळप्रकरणी पतीसह तिघांवर एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत शोभा शिवशरण यमाजी (वय ३३, रा. बाबूराव परळकर नगर, आकाशवाणी रोड, एमआयडीसी, सोलापूर) या विवाहितेच्या फिर्यादीवरून पती शिवशरण यमाजी, सासरे सिध्दप्पा यमाजी, सासू लक्ष्मीबाई यमाजी (रा. वागदरी, ता. अक्कलकोट) यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. शोभा यांचे शिवशरण याच्याशी १७ फेब्रुवारी २०१२ रोजी लग्न झाले आहे. लग्नानंतर सहा महिने शोभा यांना व्यवस्थित नांदविल्यानंतर पती शिवशरण व त्याच्या घरातील लोकांनी त्यांचा शारीरीक व मानसिक छळ केला. दरम्यान शोभा यांना चार अपत्य झाली. त्यांच्या भविष्याचा विचार करून शोभा या पती व इतरांचा त्रास सहन करीत होत्या. त्यामुळे याबाबत एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस हवालदार शिंदे पुढील तपास करीत आहेत.





## समर्थ रामदास स्वामींच्या पादुकांचे सरसंघचालक डॉ. भागवत यांच्या हस्ते पूजन

**पुणे, दि. १८ डिसेंबर-**
राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे पू. सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत यांच्या हस्ते सज्जनगड येथील श्री समर्थ रामदास स्वामी यांच्या पादुकांचे पूजन करण्यात आले.

यावेळी पश्चिम महाराष्ट्र प्रांताचे संघचालक प्रा. सुरेश तथा नाना जाधव उपस्थित होते. श्री समर्थ रामदास स्वामी पादुका प्रचार दौरा व भिक्षा फेरी पुण्यात आली असून, त्यानिमित्त हा पूजाविधी आयोजित केला होता. कार्यक्रमाला श्री रामदास स्वामी संस्थान सज्जनगडचेश्री रामदास स्वामी संस्थानचे अध्यक्ष भूषण स्वामी तसेच वेदमूर्ती उपस्थित होते. समर्थ पादुका प्रचार दौरा व भिक्षा फेरी २६ डिसेंबर पर्यंत पुण्यात असणार आहे. कर्म, उपासना ज्ञान आणि मोक्ष या चतुःसुत्रीवर आधारित कर्मनिष्ठ जीवनप्रणाली या श्रीसमर्थ विचारांचा प्रचार व प्रसारासाठी रामदास स्वामी संस्थानतर्फे दरवर्षी भिक्षा दौरा आयोजित केला जातो.

# दारू पाजून वृध्दास बेशुद्ध पडेपर्यंत मारहाण

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १८ डिसेंबर-**
दारू पिण्यासाठी नेऊन दारू पिल्यानंतर लोखंडी पाईपने वृद्धास मारहाण करण्यात आली. हा प्रकार १३ डिसेंबर रोजी सकाळी दहा वाजता जुना पुना नाका येथे घडला. या मारहाणीत वृद्ध व्यक्ती बेशुद्ध पडला. याबाबत सुकुमर अजीम जमादार (वय ५५, रा. शास्त्रीनगर) असे मरण झालेल्या वृद्धाचे नाव आहे.



त्यांनी दिलेल्या तक्रारीवरून नयुब चांदसाब नदाफ (रा. पठाण मोहल्ला पंजाब तालीम जवळ सोलापूर) व दोन अनोळखी व्यक्तींविरुद्ध फौजदार चावडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. घटनेच्या दिवशी सकाळी यातील फिर्यादी कामावर जाण्यासाठी घरातून निघाले होते. त्यावेळी रिक्षातून आलेल्या आरोपींनी त्यांना काम ही देतो आणि दारूही पाजतो असे म्हणून रिक्षातून नेले. दारूच्या दुकानातून दारू घेतल्यानंतर त्या सर्वांनी दारू प्राशन केली. त्यानंतर कामावर सोडतो असे सांगून जात असताना रिक्षा जुना पुना नाका येथे थांबवून लोखंडी पाईपने पायावर व हातावर आरोपींनी फिर्यादीस मारहाण केली. या मारहाणीत फिर्यादी यांची शुद्ध हरपली. या गुन्ह्याचा तपास सहायक पोलिस निरीक्षक पाटील करत आहेत.

### महिलेच्या मारहाणीत महिला जखमी

**सोलापूर-** अज्ञात कारणाने महिलेने केलेल्या मारहाणीत महिला जखमी झाली. निर्मला मारूती मलवे (वय ४१, रा. दुर्गामाता मंदीर, अक्कलकोट) असे जखमी महिलेचे नाव आहे. १५ डिसेंबर रोजी सायंकाळी राहत्या घराजवळ दुर्गामाता मंदीरजवळ अज्ञात कारणाने पार्वती राम मलवे यांनी लाकडाने व लाथाबुक्क्याने मारहाण केली. त्यामध्ये निर्मला यांच्या डोक्यास, सर्वांगास मुका मार लागल्याने त्यांना बहिण महादेवी मलवे यांनी सोलापूरच्या शासकीय रुग्णालयात दाखल केले. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

### बांधकामावरून महिलेस मारहाण

**सोलापूर -** नांदणी (ता. दक्षिण सोलापूर) येथे घराच्या बांधकामाच्या कारणावरून महिलेस मारहाण करण्यात आली. शारदा हणमंत शिवनगे (वय ४०, रा. नांदणी) असे जखमी महिलेचे नाव आहे. १८ डिसेंबर रोजी सकाळी पावणे आकराच्या सुमारास घराजवळ घराच्या बांधकामावरून संजय निंगप्पा शिमरे व इतर ३ जणांनी मिळून शारदा शिवनगे यांना लोखंडी रॉड व लाथाबुक्क्याने मारहाण केली. त्यामध्ये शारदा यांच्या सर्वांगास मुका मार लागल्याने त्यांना पती हणमंत यांनी उपचारासाठी सोलापूरच्या शासकीय रुग्णालयात दाखल केले. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

# बांगलादेशातील हिंदूंवरील अत्याचाराविरुद्ध पुण्यात निदर्शने

**तभा वृत्तसेवा,**
**पुणे, दि. १८ डिसेंबर-**
बांगलादेशमधील हिंदू समाजावर होणाऱ्या वाढत्या अत्याचारांच्या निषेधार्थ मंगळवारी पुण्याच्या कोथरूड येथील हुतात्मा राजगुरू चौकात निदर्शने करण्यात आली. या निदर्शनांमध्ये विविध हिंदू संघटनांसह मोठ्या प्रमाणात हिंदू नागरीक सहभागी झाले होते.

आंदोलकांनी बांगलादेशमधील हिंदू आणि इतर अल्पसंख्यकांवरील होणाऱ्या मानवाधिकार उल्लंघनाचा तीव्र निषेध केला. हातात फलक घेऊन आणि घोषणांच्या माध्यमातून त्यांनी हिंदूंवर होणारे हल्ले तातडीने थांबवून आरोपींवर कडक कारवाई करण्याची मागणी केली. तसेच बांगलादेश सरकारने हिंदू आणि इतर अल्पसंख्यकांच्या सुरक्षेची हमी देणे, अशीही मागणी केली. प्रसिद्ध लेखक आणि सामाजिक कार्यकर्ते भरत अमदापुरे यांनी आपल्या भाषणात बांगलादेशी सरकार आणि अधिकारी हिंदूंवर होणाऱ्या हल्ल्यांकडे दुर्लक्ष करत आहेत, असा आरोप केला. बांग्लादेशात १९७१ मध्ये २२ टक्के हिंदू होते. त्यांचा विविधप्रकारे छळ करून आता तिथे केवळ आठ टक्के हिंदू राहिलेत, आणि त्यांच्यावरही सतत अमानुष हल्ले होतात, असे ते म्हणाले. बांगलादेशच्या स्वातंत्र्यानंतर ५३ वर्षे उलटली असून, आजतागायत हिंदू समाजावर केलेल्या अत्याचारांच्या विरोधात कोणत्याही सरकारने कारवाई केली नाही. यामुळे अशा गुन्ह्यांना पूर्णपणे अभय



मिळाल्याचा वातावरण निर्माण झालं आहे, ज्यामुळे गुन्हेगारांना पुढे जाऊन त्यांचे कृत्य करत राहण्यास प्रोत्साहन मिळाले आहे, असे श्री अमदापुरे म्हणाले. यावेळी, पवित्रम फाउंडेशनचे तुषार कुलकर्णी, राजे शिवराय प्रतिष्ठानचे महेश पवळे, हिंदू एकता चे सुहास परळीकर, राष्ट्र सेविका समितीच्या सौ शलाका गोटखिंडीकर, विश्व हिंदू परिषदेचे शुभम मुळीक आणि रामराज्य प्रतिष्ठानचे आशिष कांटे यांची भाषणे झाली. इस्कॉन संस्थे तर्फे श्री रसाश्रय प्रभू आणि केदार घाटे यांचे सुश्राव्य कीर्तन झाले. कार्यक्रमेचे प्रास्ताविक अमोल जोशी यांनी केले तर सूत्र संचालन चैतन्य बोडके यांनी केला. या कार्यक्रमाला विविध न्याती संघटनांचे प्रमुख, माजी नगरसेवक, नागरिक या सम साधारणतः बाराशे जण उपस्थित होते.

# निकाल विरोधात लागल्याने मारहाण

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १८ डिसेंबर -**
न्यायालयात सुरू असलेल्या खटल्याचा निकाल विरोधात लागल्याने चिडून दोघांना स्टम्पने मारहाण करून जखमी केले. हा प्रकार सिद्धेश्वर पेठेतील काडादी चाळ येथे ३१ ऑक्टोबर रोजी रात्री साडेनऊच्या सुमारास घडला.

याबाबत इम्रान अल्लाबक्ष शेख ( वय ३६, रा. काडादी चाळ) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून जेलरोड पोलीस ठाण्यात अब्दुल मतीन काटगावकर व मुज्जमिल म. मतीन काटगावकर (दोघे रा. काडादी चाळ) विरुद्ध जेलरोड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. यातील आरोपी आणि फिर्यादी यांच्यात काडादी चाळ येथील जागे संदर्भात न्यायालयात दावा सुरू होता. दरम्यान घटनेच्या दिवशी तो निकाल फिर्यादीच्या बाजूने लागला अशी माहिती आरोपींना समजली. आरोपी मुज्जमिल याने स्टंम्पने फिर्यादी व त्यांच्या भावास मारहाण केली. सहाय्यक फौजदार काझी तपास करत आहेत. या प्रकरणी परस्पर विरोधी तक्रार पोलिसात दाखल झाली आहे. यात मुज्जमिल अब्दुल मतीन काटगावकर (वय २८, रा. सिद्धेश्वर पेठ) यांनी दिलेल्या तक्रारीवरून इरफान अल्लाबक्ष शेख, इमरान अल्लाबक्ष शेख व अली असलम शेख ( सर्व रा. सोलापूर) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मुलाला शिवीगाळ केल्याच्या कारणातून यातील आरोपी फिर्यादीच्या वडिलांशी वाद घालत होते. दरम्यान फिर्यादी त्यांच्यातील वाद मिटविण्याकरिता गेला असता आरोपींनी त्यांच्या वडिलांना बेसबॉलने मारहाण केली. तपास पोलिस उपनिरीक्षकांच्या जाधव करत आहेत.

# केंद्रीय गृहमंत्र्यांच्या व्यक्तव्याचा काँग्रेसकडून निषेध

**अपमानकारक वक्तव्य केल्याचे उमटले पडसाद**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१८ डिसेंबर-**
भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या बद्दल केंद्रीय गृहमंत्री यांनी केलेल्या आक्षेपार्ह वक्तव्याबद्दल काँग्रेस कमिटीने काँग्रेस भवन समोर जोडेमार आंदोलन केले. त्यांच्या प्रतिकात्मक पुतळ्याला जोडे मारून त्या वक्तव्याचा निषेध नोंदवण्यात आला.

गृहमंत्र्यांनी संसदेत भारतरत्न डॉ.आंबेडकर यांच्या बद्दल अपमानकारक वक्तव्य केले होते. त्या वक्तव्याचा पडसाद सोलापूर शहरात आहेत. काँग्रेस कमिटीच्या वतीने काँग्रेस भवन समोर जोरदार निदर्शने करत निषेध नोंदवण्यात आला. यावेळी विविध घोषणा देऊन त्यांचा प्रतीकात्मक पुतळा आणून त्याला जोडे मारण्याचा प्रयत्न केला गेला. यावेळी पोलीस आणि काँग्रेस पदाधिकाऱ्यांमध्ये झटापट झाली.

परंतु पोलिसांच्या सतर्कतेमुळे प्रत्येकात्मक पुतळा तात्काळ हिसकावून घेण्यात आला. यावेळी कोणतीही अनुचित घटना घडू नये यासाठी काँग्रेस भवन परिसरात चोख पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. यावेळी काँग्रेस कमिटी शहराध्यक्ष चेतन नरोटे, माजी महापौर संजय हेमगड्डी, सेवादलचे भीमाशंकर टेकाळे, माजी नगरसेवक विनोद भोसले, काँग्रेस युवक अध्यक्ष गणेश डोंगरे, परशुराम सत्तारवाले, आदींसह काँग्रेसचे पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.



## डेमोक्रॅटिक पार्टी ऑफ इंडियाचे तिरडी आंदोलन

विश्वरत्न, महामानव डॉ. आंबेडकर यांच्या बद्दल चुकीचे व्यकत्व्य केल्यामुळे गृहमंत्री यांच्या विरोधात डेमोक्रॅटिक पार्टी ऑफ इंडियाच्या वतीने जिल्हाप्रमुख रोहित खिलारे सोलापूर शहर युवक अध्यक्ष मिथुन लोखंडे व सोलापूर यांच्या नेतृत्वात गृहमंत्र्यांच्या विरोधात तिरडी आंदोलन करण्यात आले.ीं यावेळी शहर सरचिटणीस संकेत शिंदे वैभव शिंदे दत्ता डोलारे अभिजीत गायकवाड व इतर कार्यकर्ते व पदाधिकारी उपस्थित होते.


## जाहीर प्रसिध्दीकरण / नोटीस

दि.कि. अर्ज नं. १०१/२०२४
नि. ५

**बार्शी येथील मे. सि.ज.ज्यु.डि.सो.यांचे कोर्टात**

**१) कविता जनक तंबोरे वगैरे**
**२) राहूल जनक तंबोरे**
**३) विशाल जनक तंबोरे**
**४) ममता ज्ञानदेव तंबोरे**
सर्व रा. संगमनेर, ता. बार्शी, जि. सोलापूर — **- अर्जदार**

विरूध्द

**कोणी नाही** **- सामनेवाला**

**अर्ज - बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ प्रमाणे**

ज्या अर्थी सदर कामातील अर्जदार नं.१ हिचे पती व अर्जदार नं. २, ३ व अर्जदार नं. ४ चा मुलगा यांचे वडिल जनक ज्ञानदेव तंबोरे हे ज्ञानदिप माध्यमिक आश्रमशाळा तांबेवाडी, ता. बार्शी येथे शिपाई म्हणून नोकरीस होते. जनक ज्ञानदेव तंबोरे हे ता.१२/११/२०२३ रोजी मयत झालेले आहेत. मयत जनक ज्ञानेदव तंबोरे यांचे पश्चात ज्ञानदिप माध्यमिक आश्रमशाळा तांबेवाडी ता. बार्शी येथे अनुकंपा तत्वावर नोकरी मिळणेकरीता अर्जदार नं. २ चे नावे प्रस्ताव दिला असता ता. १९/११/२०२४ रोजी ज्ञानदिप माध्यमिक आश्रम शाळा तांबेवाडी येथील मुख्याध्यापक यांनी अर्जदार नं. २ यास अनुकंपा तत्वावर नोकरी करीता पाठविलेल्या प्रस्तावामध्ये मयत जनक ज्ञानदेव तंबोरे यांचे न्यायालयीन वारस प्रमाणपत्र ३ महिन्याचे आत सादर करण्याचे लेखी कळविले असल्याने सदरचा वारस दाखला मिळणेकरीता अर्जदार नं. १ ते ४ यांनी सदरचा अर्ज मे. कोर्टात दाखल केलेला आहे.

त्या अर्थी मयत जनक ज्ञानदेव तंबोरे चे कायदेशीर वारस म्हणून अर्जदार नं. १ ते ४ यांना वारस प्रमाणपत्र मिळणेकामी वारस प्रमाणपत्र देण्यास कोणाचीही काही कायदेशीर हरकत तक्रार असल्यास त्याबाबत या केसची पुढील ता. २०/०१/२०२५ किंवा सदरची नोटीस प्रसिध्द झालेपासून ३० दिवसाचे आत स्वतः किंवा आपले प्रतिनिधी मार्फत रितसर कागदोपत्री पुराव्यासह हरकत नोंदवावी वरिल मुदतीत कोणाचीही तक्रार न आल्यास या मे. कोर्टाकडून अर्जदारांचे मागणीबाबत पुढील योग्य ते आदेश पारित केले जातील त्यानंतर कोणाचीही कसलीही तक्रार चालणार नाही कळावे ही जाहीर नोटीस दिली. ता १७/१२/२०२४

सही/- कनिष्ठ लिपिक — कोर्टाचा शिक्का — सही/- सहाय्यक अधिक्षक, दिवाणी न्यायालय, कनिष्ठ स्तर



## खरेदीपुर्व जाहीर नोटीस

तमाम लोकांना विशेषतः डि सोलापूर सब डि व ता. बार्शी पैकी शहर बार्शी सोलापूर रोड, मुळे प्लॉट, बार्शी व आपासचे परिसरातील लोकांना या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, नगर भुमापन क्र. ३८८९/४अ/८ याचे क्षेत्रफळ हे आर चौ.मी. ०.१.०१ म्हणजेच ५०.५ चौ.मी. बाबासाहेब सुखदेव लोकरे व राणी बाबासाहेब लोकरे यांचे मालकी वहिवाटीची असून उत्तरेकडील १/२ निम्मी जागा तिचे क्षेत्रफळ ५०.५ चौ.मी. आहे. याची लांबी रुंदी पुर्व बाजू फुट २१ आहे. दक्षिण बाजू फुट २७, पश्चिम बाजू फुट १९.२४ व उत्तर बाजू फुट २७ आहे. या तीन खोल्या त्यावर स्लॅब टाकलेला आहे. याच्या भिंती स्वतंत्र मालकीच्या आहेत. बांधकाम पक्के स्वरूपाचे असून २७ वर्षापूर्वीचे आहे. बांधाकम १९.५१ चौ.मी. आहे. बाकी खुली जागा याचे पाणी व वागणुक पश्चिमेस जाते व आहे. यांसी चतुःसिमा पुर्वस- सदर गट नं. पैकी कंपाउंडची जागा, दक्षिणेस- सि.स.नं. ३८८९/४अ-८ पैकी जागा, पश्चिमेस- रस्ता, उत्तरेस सि.स.नं. ३८८९/४अ-१० ची जागा. आतील दगड, विटा, भिंती, दारे, खिडक्या, चौकट, लाईट मीटर कनेक्शन व पिण्याचे पाण्याचे नळ कनेक्शन सह जागा आहे.

वर नमुद वर्णन केलेली जागा हि श्री. बाबासाहेब सुखदेव लोकरे व सौ. राणी बाबासाहेब लोकरे यांचे मालकी वहिवाटीची असून त्यांनी त्यांचे कौटुंबिक गरजेकरीता विक्रीस काढले असता त्यांनी आमचे अशिलास सदर मिळकत निर्वेध निजोखमी असा तोंडी भरवसा दिवून आमचे अशिलाकडुन इसारा दाखल रक्कम साक्षीदारासमक्ष स्विकारली आहे.

तरी तमाम लोकांस या जाहिर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, वर वर्णन केलेल्या जागेबाबत कोणाचाही काही हक्क, हितसंबंध, मालकी, भावकी, वाद, कोर्ट दावा वारसा हक्क, लीज, लीन, अतिक्रमण, गहाण, बक्षिस दावा, वहिवाट, कर्ज बोजे, बँक बोजा अथवा करार मदार, साठेखत, खरेदीखत, करारपत्र वगैरे असल्यास त्यांनी त्यांचे हरकती खालील पत्यावर लेखी कागदपत्रासह ७ दिवसाचे आत कळवावेत. सदर मुदतीत कोणाची काही हरकत न आलेस आमचे अशिल सदर मिळकत निर्वेध, निजोखमी आहे असे समजुन मिळकतीचा व्यवहार पुर्ण करतील, मागावून कोणाची कसलीही तक्रार चालणार नाही. हि जाहीर नोटीस दिली ता. १८ /१२/२०२४

सही/-
ॲड. एस.के. गुंड
बी.ए., एलएल.बी.
दिवाणी व अतिरिक्त
जिल्हा सत्र न्यायालय, बार्शी
अशिलातर्फे ॲडव्होकेट



## खरेदीपूर्व जाहीर नोटीस

तमाम लोकांस विशेषतः शहर सोलापूर येथील लोकास या खरेदीपूर्व जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मिळकतीचे वर्णन :- डि व सब डी । सोलापूर पैकी तालुका उत्तर सोलापूर पैकी सोलापूर महानगरपालिका हद्दीतील पेठ बेगम पेठ येथील म्युनिसिपल घर नंबर १८५/अ, यांसी नगर भूमापन क्रमांक ५७६७/२ असा असुन याचे क्षेत्र १००.३४ चौरस मीटर अथवा १०७९ चौरस फुट इतकी घरजागा असुन धारणधिकार अ असा आहे. यात तळमजला ३ रुम व पहिला मजला ३ रुम आर सी सी बांधकाम केलेले असुन यात संडास बाथरुम, नळ व लाईट कनेक्शनची सोय आहे. तसेच वर पत्र्याचे शेड मारलेले आहे. व उर्वरीत जागा खुली आहे. यांसी मनपा मिळकत क्रमांक २२०२१३ असा असुन यांसी MSEB ग्राहक क्रमांक ३३०२४३०८१४९१ असा आहे. यासी चतुःसिमा येणेप्रमाणे :- पूर्वेस गट नंबर ५७६७/१, पश्चिमेसः गट नंबर ५७६८/अ, ५७६८/ब, दक्षिणेस : गट नंबर ५७६९, ५७६६ १/अ/१, उत्तरेस रस्ता, येणेप्रमाणे वर्णनाची प्लॉटजागा ही १. अब्दुलरशीद उस्मानसाब मुंडेवाडी २. सईद अहमद मोहम्मदउस्मान मुंडेवाडी, ३. मोहम्मदफारुख मोहम्मदउस्मान मुंडेवाडी, रा. १८५/अ बेगमपेठ, सोलापूर यांचे मालकी व कब्जे वहिवाटीची असुन त्यांनी सदरहु प्लॉट जागा आमचे अशिल १. उमरफारुक मोहम्मद शफी कुरेशी, २. मुजाहिद मोहम्मद शफी कुरेशी ३. मुजीब मोहम्मद शफी कुरेशी ४. मुज्जमिल मोहम्मद शफी कुरेशी रा. १७८ बेगम पेठ, सोलापूर यांना विक्री करण्याचे ठरवुन आमचे अशिलाकडुन कांही रक्कम स्वीकारुन सदरहु प्लॉट जागेचे इसारा पावती व करारपत्र लिहून दिलेली आहे. तसेच सदरहू प्लॉटजागा ही निर्वेध व निजोखमी असल्याची ग्वाही त्यांनी आमचे अशिलांस दिलेली आहे.

तथापी ज्या कोणाचाही या मिळकत जागेवर करार, साठेखत, दान, गहाण, लिज, पोटगी, बक्षीसपत्र, बोजा, वाटणी पत्र, मृत्युपत्र, कोर्ट केसेस, बँक केसेस, लिज पेन्डन्सी या अथवा अन्य कोणत्याही मार्गाने हक्क अथवा हितसंबंध असतील त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन ०८ (आठ) दिवसांचे आत कागदोपत्री पुरावा देवून लेखी हरकत खालील नमुद पत्त्यावर द्यावी. मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास आमचे अशिल सदरची मिळकत जागा ही निर्वेध व निजोखमी असल्याचे समजुन पुढील खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. तदनंतर मात्र कोणाचीही कसलीही तक्रार व हरकत चालणार नाही. कोणाचीही फसगत होऊ नये म्हणून ही जाहीर नोटीस देण्यात येत आहे.

ही जाहीर नोटीस दिली ता. १८/१२/२०२४

सही/-
ॲड. गड्डम डी.एम.
बी. कॉम. एलएल. बी. नोटरी भारत सरकार
शॉप नंबर ४२, कोर्ट कम्पाऊंड लगत,
हॉटेल फाईव्ह स्टार समोर, सिध्देश्वर पेठ, सोलापूर
मो. नं. ९४२०३५६६१५ अशिलातर्फे ॲडव्होकेट

# पावसामुळे तिसरा कसोटी सामना अनिर्णीत

## ट्रॅव्हिस हेड सामनावीर

**ब्रिस्बेन, १८ डिसेंबर**

बॉर्डर-गावस्कर चषक पाच सामन्यांच्या कसोटी मालिकेत भारत व ऑस्ट्रेलियादरम्यानचा तिसरा कसोटी क्रिकेट सामना पावसामुळे अनिर्णीत राहिला. त्यामुळे या मालिकेत दोन्ही संघ १-१ ने बरोबरीवर आहे. सामन्याच्या पाचव्या व अंतिम दिवशी केवळ २२ षटकांचा खेळ शक्य झाला. या सामन्यात १५२ धावांची खेळी करणारा व एक बळी टिपणारा ऑस्ट्रेलियाचा ट्रॅव्हिस हेड सामनावीर पुरस्काराचा मानकरी ठरला.

आता मालिकेतील चौथा कसोटी क्रिकेट सामना २६ ते ३० डिसेंबरदरम्यान मेलबर्न येथे खेळला जाईल. पावसाच्या अडथळ्यात झालेल्या या कसोटी सामन्यात ऑस्ट्रेलियाच्या ४४५ धावांच्या प्रत्युत्तरात भारताने २६० धावा काढल्या. पहिल्या डावात १८५ धावांची आघाडी मिळवणाऱ्या ऑस्ट्रेलियाने ७ बाद ८९ धावा काढून आपला दुसरा डाव घोषित केला





आणि भारतासमोर विजयासाठी ५४ षटकांत २७५ धावांचे लक्ष्य ठेवले, परंतु भारतीय सलामीवीर धावांचा पाठलाग करत असताना केवळ २.१ षटकांचा खेळ शक्य झाला, कारण पाऊस परत येण्यापूर्वी वाईट प्रकाशामुळे खेळाडूंना मैदानाच्या बाहेर व्हावे लागले. परिणामी, हा तिसरा कसोटी सामना अनिर्णीत राहिला.

भारताने पाचव्या दिवशी ९ बाद २५२ धावावरून पुढे आपल्या पहिल्या डावास सुरुवात केली व त्यांचा पहिला डाव ७८.५ षटकांत २६० धावांत आटोपला. त्यानंतर ऑस्ट्रेलियाने झटपटपणे फलंदाजी करत १८ षटकांत ७ बाद ८९ धावा काढून आपला दुसरा डाव घोषित केला. कर्णधार पॅट कमिन्सने २२, तर ॲलेक्स कॅरीने नाबाद २० धावांची खेळी केली. भारताकडून जसप्रीत बुमराहने ३ बळी, मोहम्मद सिराज व आकाश दीपने प्रत्येकी २ बळी टिपलेत.

विजयासाठी २७५ धावांचे आव्हान स्वीकारून भारताची सलामी जोडी यशस्वी जयस्वाल व केएल राहुल मैदानावर आहे, परंतु वाईट प्रकाश व पावसाचे संकेत मिळाल्यामुळे खेळ थांबवण्यात आला, तोपर्यंत भारताने २.१ षटकांत बिनबाद ८ धावा काढल्या होत्या. जयस्वाल व राहुल प्रत्येकी ४ धावांवर नाबाद राहिले.

## संक्षिप्त वृत्त



### श्री मल्लिकार्जुन हायस्कूलमध्ये क्रीडा सप्ताह उत्साहात साजरा

**सोलापूर, दि. १८ डिसेंबर-**

श्री मल्लिकार्जुन हायस्कूल व रखमाबाई हत्तुरे कनिष्ठ महाविद्यालयामध्ये क्रीडा सप्ताहाचे उद्घाटन उत्साहात करण्यात आले. याचे उद्घाटन शहर वाहतूक शाखेचे पोलीस निरीक्षक रवींद्रनाथ भंडारे, पोलीस उपनिरीक्षक प्रविण पारडे, प्राचार्य वैजिनाथ हत्तुरे व धरेप्पा हत्तुरे या मान्यवरांच्या हस्ते सरस्वती मातेच्या प्रतिमेचे व क्रीडांगणाचे पूजन करून करण्यात आले. या क्रीडा सप्ताहात खो-खो, कबड्डी, सॉफ्टबॉल, बेसबॉल, क्रिकेट, संगीत खुर्ची, लंगडी, लिंबू चमचा आदी खेळ घेतले जाणार आहेत. या सप्ताहास पर्यवेक्षक रमेश दिंडोरे, क्रीडाशिक्षक गंगाराम घोडके, बसवराज कोरे, अण्णाराया तुप्पद, भारत राऊत, गुरुसिध्दप्पा पाटील, अनिलकुमार गावडे, प्रा.लक्ष्मीकांत पनशेट्टी, वीरेश हचडे, श्रीनिवास कोलप्याक, संतोष स्वामी आदी उपस्थित होते. प्रास्ताविक परमेश्वर चांदोडे यांनी केले. सूत्रसंचालन मारुती माने यांनी केले. रमेश आगवणे यांनी आभार मानले.



### महापालिका शाळा क्रमांक एक कॅम्पमध्ये क्रीडा सप्ताहास सुरुवात

**सोलापूर, दि. १८ डिसेंबर-**


सो.म.पा. प्रशाला क्र. १ कॅम्प येथे संकाळी क्रीडा सप्ताहास सुरवात झाली. याचे उद्घाटन पालिका उपायुक्त तैमूर मुलाणी, निवडणूक अधिकारी समीर मुलाणी यांच्या हस्ते झाले. यावेळी वेगवेगळ्या कार्यक्रमांमध्ये सहभाग घेतलेल्या विद्यार्थी व विद्यार्थिनीचा पारितोषिक वितरण समारंभ पार पडला, प्रास्ताविकेमध्ये प्रशालेचे मुख्याध्यापक जे. आर. सज्जन यांनी शाळेत राबविण्यात येणाऱ्या कार्यक्रमाची माहिती सांगितली. सूत्रसंचालन पी. ए. खरबस यांनी केले. एन. बी. पाटील यांनी आभार मानले. कांबळे जी.एस, शहाणे एन. एस., आरकेरी एस. एस., बिराजदार आर. पी., हंचाटे पी डी, भूताळे ए.डी., खांडेकर एस. एस., शेळके के. एस., पठाण ए. आर., भंडारी एस. एन, बनसोडे एन. एस. यांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेतले.



### सहस्त्रार्जुन प्रशालेत क्रीडा महोत्सवास उत्साहात सुरुवात

**सोलापूर, दि. १८ डिसेंबर-**

सहस्त्रार्जुन प्रशालेत क्रीडा महोत्सवास सुरवात झाली. या स्पर्धेचे उद्घाटन भारतीय खेळाडू आंतरराष्ट्रीय खेळाडू श्रावणी प्रताप सूर्यवंशी यांच्या हस्ते झाले. यावेळी क्रीडा भारतीचे सचिव राजेश कळमणकर, संस्थेचे अध्यक्ष राजूसा भूमकर, सो.स. क्षत्रिय समाज विठ्ठल मंदिर ट्रस्टचे अध्यक्ष संजीव महादेवसा बिद्री, संस्थेचे सचिव जयकुमार कोल्हापुरे व सदस्य भरतकुमार शालगर व शैक्षणिक संस्थेचे सचिव गजाननसा गोयल, प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका मंजुषा काशीद, इंग्लिश मीडियमचे विभागाचे मुख्याध्यापक डॉ. विष्णू रंगरेज उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापक भगवंत उमदीकर यांनी केले. क्रीडा शपथ शिवांजली रुपेश होदडे हिने केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मनीषा काळे यांनी केले. क्रीडा शिक्षक डॉ. उज्वल मलजी यांनी आभार मानले.




### बारामती पॉवर रनमध्ये अतुल बांधीवडीकर व प्रकाश राठोड प्रथम

**सोलापूर, दि. १८ डिसेंबर-**

बारामती येथे झालेल्या बारामती पॉवर मॅरेथॉनमध्ये सोलापूरचे ज्येष्ठ धावपटू अतुल बांधीवडीकर व सोलापूर शहर पोलीस कॉन्स्टेबल प्रकाश केसू राठोड यांनी प्रथम क्रमांक पटकाविला. अतुल यांनी ५५ ते ५९ या वयोगटात ४२.१९५ किलोमीटर अंतर ३ तास ३३ मिनिटे ४२ सेकंदात तर प्रकाश यांनी ३५ ते ३९ या वयोगटात ४२.१९५ किलोमीटर अंतर ३ तास १० मिनिटे ३७ सेकंदात पूर्ण करून प्रथम क्रमांक मिळविला आहे. या यशाबद्दल दोघांना ट्रॉफी, मेडल, रोख रक्कम व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.

# विदर्भला नमवून पश्चिम महाराष्ट्राच्या मुली विजेता

**दिव्यांग मुलींच्या राज्य क्रिकेट स्पर्धा : गंगा कदम मालिकावीर; दमाणी अंध शाळा मुले विजेते**





**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १८ डिसेंबर-**

दिव्यांगाच्या (अंध) राज्यस्तरीय मुलींच्या क्रिकेट स्पर्धेत पश्चिम महाराष्ट्राने विजेतेपद पटकाविले.

येथील रेल्वे मैदानावर झालेल्या या स्पर्धेतील अंतिम सामन्यात पश्चिम महाराष्ट्र संघाने विदर्भ संघाचा ५८ धावांनी पराभव केला. प्रथम फलंदाजी करताना पश्चिम महाराष्ट्र संघाने निर्धारीत १० षटकांमध्ये बिन बाद ९४ धावा केल्या. यात गंगा कदम हिने ४६ चेडुत ८ चौकारांच्या सहाय्याने ७८ धावा केल्या. गंगा ही मालिकावीरची मानकरी ठरली.

शालेय मुलांच्या जिल्हा स्पर्धेमध्ये येथील भैरुरतन दमाणी अंध शाळेने राजीव मेमोरिअल अंध शाळेचा १० गडी राखून पराभव करीत विजेतेपद पटकाविले. राजीव गांधी शाळेने दिलेले ८१ धावांचे लक्ष ५.१ षटकांत १० गडी राखून पूर्ण केले. रोहित कुंभार याने २० चेंडूत ५ चौकार ठोकीत नाबाद ४३ धावा केल्या. मुलांच्या स्पर्धेत दमाणी अंध शाळेचा रोहित कुंभार हा मालिकावीर उरला.

पारितोषकाचे प्रायोजकत्व है श्री जगन्नाथजी शिंदे यांच्या वाढदिवसानिमित्त बलदवा परिवाराकडून करणेत आले होते. गर्नेद गुटाळ यांचेकडुन मालिकावीर खेळाडूंना रोख रक्कम देण्यात आली. या स्पर्धे दरम्यान राजू शेळके यांच्या वाढदिवसा निमित्त संस्थेच्या वतीने रक्तदान शिबीराचे आयोजन कले होते. यात २९ रक्तदात्यांनो रक्तदान केले. महसुल उपजिल्हाधिकारी अमृत नाटेकर यांनीही या शिबीरात रक्तदान केले. स्पर्धे चे पारितोषक वितरण केतनभाई शहा, गिरीष बलदवा, आंबादास बत्तीन, संतोष भंडातो, संजय शहा यांच्या उपस्थितीत पार पडला.

स्पर्धा पार पाहण्यासाठो अध्यक्ष सुरज सोनटक्के, महासचिव संतोष देशमुख, कोषाध्यक्ष महेश बिराजदार, बसवराज तोडकरी, श्रीमती आशा पाटील, शिवशंकर पाटील यांनी परिश्रम घेतले.



# कै.वि.मो.मेहता प्राथमिक शाळेत क्रीडा स्पर्धेचे थाटात उद्घाटन

**सोलापूर, दि. १८ डिसेंबर-**

जुळे सोलापूर येथील कै. वि.मो.मेहता प्राथमिक शाळेच्या भव्य मैदानावर क्रीडा सप्ताहाच्या उद्घाटनाचा समारंभ मोठ्या थाटामाटात संपन्न झाला. क्रीडा ज्योतीचे जल्लोषात आगमन झाले. हेड कॉन्स्टेबल अजिंक्य माने यांच्या शुभहस्ते ध्वजारोहण करण्यात आले. याप्रसंगी ह. दे प्रशालेचे पर्यवेक्षक मोतीबने, शिशु शाळेच्या मुख्याध्यापिका रजनी कुलकर्णी व शाळेच्या मुख्याध्यापिका सीमा कोरवलीकर यांची प्रमुख उपस्थिती होती. शाळा समिती अध्यक्ष राजेश पटवर्धन यांनी सर्व विद्यार्थ्यांना क्रीडा स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या. इ.३री व ४थी च्या विद्यार्थ्यांनी शिस्तबद्धरीत्या संचलन करुन प्रमुख अतिथींना मानवंदना दिली. सर्व विद्यार्थ्यांना क्रीडाप्रमुख रोहिणी माशाळकर, गणेश माने यांनी मार्गदर्शन केले. प्रमुख अतिथींचा परिचय योगेश सरवदे यांनी करुन दिला.

इयत्ता ३रीच्या विद्यार्थ्यांनी बहारदार असे नृत्य सादर केले.या नृत्याचे दिग्दर्शन सुभाषिणी पिल्ले यांनी केले .इ.१ली ते ४थी च्या सर्व विद्यार्थ्यांनी साहित्य कवायत सादर केली. चि.अवनिश याने सर्व विद्यार्थ्यांसह क्रीडा शपथ घेतली. त्यानंतर क्रीडामैदानाचे पूजन करुन हवेत फुगे सोडण्यात आले व टॉस उडवून इ.२री च्या रस्सीखेच सांघिक सामन्याचे उद्घाटन करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रोहिणी माशाळकर यांनी केले तर गणेश माने यांनी आभार मानले.

# भारती विद्यापीठात क्रीडा महोत्सव

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ डिसेंबर-**

भारती विद्यापीठ माध्यमिक विद्यालय व ज्युनिअर कॉलेज सोलापूर शाखेत वार्षिक शालेय क्रीडा महोत्सवाचे उद्घाटन पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचेय व्यवस्थापन परिषद सदस्य प्रा. सचिन गायकवाड यांच्या हस्ते झाले.



सुरुवातीस डॉ. पतंगरावजी कदम यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यानंतर सहशिक्षिका आर.बी. केंगार व विद्यार्थिनींनी स्वागत गीत व भारती विद्यापीठ गीत सादर केले. परीक्षा विभाग प्रमुख एस.एच.राऊत यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. त्यानंतर जेष्ठ शिक्षक एन. एम. पवार यांनी प्रमुख पाहुण्यांचा परिचय करून दिला. राष्ट्रीय,राज्य व जिल्हा स्तरामध्ये नैपुण्य मिळवलेल्या विद्यार्थ्यांनी क्रीडा ज्योत आणली व कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे प्रा. गायकवाड यांनी क्रीडा ज्योतीचे प्रज्वलन केले व सर्व विद्यार्थ्यांनी क्रीडा शपथ घेतली. यानंतर विद्यालयातील विद्यार्थिनींनी सामूहिक नृत्य सादर केले. याप्रसंगी विद्यालयाचे प्राचार्य एस.के.मंडके, जेष्ठ शिक्षक एन. एम. पवार, ग.सा.पवार प्राथमिक शाळा मुख्याध्यापिका व्ही.डी.गोळे. बालविकासच्या मुख्याध्यापिका व्ही.एस.मोहोळे, ज्युनिअर विभाग प्रमुख आय. एम. बिज्जरगी क्रीडा शिक्षक नेताजी एस. पवार व ए.पी.साळुंखे आदी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ए.बी. शिंगाडे यांनी केले व एन.बी.बगाडे यांनी आभार मानले.



# आंतर विद्यापीठ जलतरण व डायव्हिंग स्पर्धेसाठी सोलापूर विद्यापीठाचा संघ रवाना

**सोलापूर,दि.१८ डिसेंबर-**

एस.आर.एम इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स अँड टेक्नॉलॉजी विद्यापीठ कटाणगुलतुर (तामिळनाडू) येथे २१ ते २३ डिसेंबर दरम्यान होणाऱ्या दक्षिण-पश्चिम विभागीय आंतर विद्यापीठ डायव्हिंग स्पर्धेसाठी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचा १० जणाचा संघ रवाना झाला. यात ६ पुरुष व ४ महिलांचा समावेश आहे.

हा संघ रेल्वे स्टेशन येथून रवाना झाला. संघाचे प्रशिक्षक म्हणून प्रा. बाळासाहेब वाघचवरे तर संघव्यवस्थापक म्हणून प्रा. डॉ. रामहरी नागटिळक व प्रा दिपक भोसले हे आहेत. संघास कुलगुरू प्रा. डॉ. प्रकाश महानवर यांनी शुभेच्छा दिल्या. यावेळी प्रकुलगुरू प्रा. डॉ. लक्ष्मीकांत दामा, कुलसचिव योगिनी घारे, क्रीडा संचालक प्रा.डॉ अतुल लकडे, निवड समितीचे अध्यक्ष प्रा बाळासाहेब वाघचवरे, सदस्य प्रा डॉ आनंद ढवण, संघ व्यवस्थापक प्रा. डॉ. नागटिळक व प्रा. भोसले उपस्थित होते .

**संघ : पुरुष :** श्रीकांत कोंढारे व श्रीकांत दोरनाल (हायबोर्ड, वालचंद अभियांत्रिकी), ईश्वर गड्डम (वालचंद) व शुभम अंगडी (एक मीटर स्प्रिंग बोर्ड, शिवदारे कॉलेज ऑफ फार्मसी), महादेव गड्डम व गुरुराज कुरापाटी (तीन मीटर स्प्रिंगबोर्ड, दयानंद). **महिला :** शुभांगी माचर्ला (हिराचंद नेमचंद), रिया मुस्तारे, प्रणिता खंडाळ (वालचंद कला व शास्त्र), जलतरण : क्रांती मोरे (सुलाखे कॉलेज बार्शी).

# ऑर्किड अभियांत्रिकी महाविद्यालयाची दीक्षा कुलकर्णी, जळगावचा दर्शन जाधव विजेता

**डी बाटू विद्यापीठाच्या आंतरविभागीय बुद्धिबळ स्पर्धा**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ डिसेंबर-**

डी बाटू विद्यापीठाच्या आंतरविभागीय बुद्धिबळ स्पर्धेत महिला गटात ऑर्किड महाविद्यालयाच्या दीक्षा कुलकर्णी तर पुरुष गटात जळगावच्या दर्शन जाधव याने प्रथम क्रमांक पटकाविला. एन.के. ऑर्किड महाविद्यालयाने ही स्पर्धा सोलापूर जिल्हा बुद्धिबळ संघटनेच्या सहकार्याने आयोजित केली होती. या स्पर्धेतून सहा विभागातून विजयी खेळाडू सहभागी झाले होते. पारितोषिक वितरण क्रीडा समन्वयक डॉ बालाजी फुलचवड यांच्या हस्ते झाले. यावेळी सोलापूर विद्यापीठ व्यवस्थापन परिषद सदस्य प्रा सचिन गायकवाड, प्रा शिवशरण कोरे, प्रा सावंत आदी उपस्थित होते. स्पर्धा पार पाडण्यासाठी आंतरराष्ट्रीय पंच सुमुख गायकवाड, उदय वगरे यांनी काम पाहिले. या स्पर्धेसाठी प्रा सावंत, प्रा गणेश बागल, प्रा सोनार, प्रा आवटे, प्रा ऋचा श्रीराम, स्पोर्ट्स सेक्रेटरी प्रतीक राय, श्री पासकंटी, श्री. पुकाळे, दादा पांगळे, प्रमोद लिगाडे यांचे सहकार्य लाभले.



**गुणानुक्रमे अंतिम निकाल (गुण, प्रगत गुण, झोन) : पुरुष :** दर्शन जाधव - ४.५, (जळगाव, रोहित बुडाके - ४, १३.५, (कोल्हापूर), अथर्व उघाडे - ४, १२.५, (पुणे), तेजसगिरी गोसावी - ४, १२, (जळगाव), आदित्य गणवीर - ३.५, (नागपूर), शशिकांत बनसोडे -३, १३.५ (कोल्हापूर)
**महिला :** दीक्षा कुलकर्णी - ४ (सोलापूर), धनश्री नेरकरव- ३, ९ (जळगाव), संस्कृती शिंदे - ३,८, (सोलापूर), साक्षी कोळेकर - ३, ६.५ (कोल्हापूर), जानकी शर्मा - २.५, ९.५ (जळगाव), प्रज्ञा कुटवडे - २.५, ७.५ (कोल्हापूर).

# सोलापूरच्या डॉ. हिरेमठ यांची १६० कि.मी. धावण्याची शर्यत पूर्ण

**सोलापूर, दि. १८ डिसेंबर-**

येथील प्लास्टिक सर्जन डॉ. शरणबसव हिरेमठ यांनी राजस्थान येथे आयोजित केलेली जैसेलमेर ते लोंगेवाला ही १६० कि. मी धावण्याची सर्वात खडतर अशी बॉर्डर रन शर्यत २४.३५ तासात यशस्वीरित्या पूर्ण केली.



ही शर्यत १९७१च्या भारत पाकिस्तान युदधाची स्मरण म्हणून बीएसएफच्या परवानगीने होते. ४०० जवान आणि ४० टँक घेउन पाकिस्तानी सैनिकांनी लोंगेवाला चौकी बॉर्डरवर हल्ला केला. याचे प्रतीउत्तर देताना १२० जवान घेऊन मेजर कुलदीप सिंघ चानपूरी यांनी ही बॉर्डर राखली आणि विजय मिळविला. हे ठिकाण जैसेलमेर पासून १६० किमी असल्यामुळे या स्पर्धेमध्ये १२० धावपटू धावतात. ही स्पर्धा अतिशय कठीण असून २४ तास धावताना तेथील तापमान हे रात्री ३ व दुपारी ३० अंश सेल्सियस असते. डॉ शरणबसव हिरेमठ यांनी यापूर्वी दक्षिण आफ्रिका येथील ८० किमी धावण्याची स्पर्धा व जगातील सर्वात उंचीवर होणारी लदाख येथील ७२ किमी धावण्याची स्पर्धा यशस्वीरीत्या पूर्ण केली आहे. ही बाब आपल्या सोलापूरकरांसाठी अभिमानाची आहे.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## संक्षिप्त वृत्त



### पोनि राजेंद्र टाकणे यांचा सत्कार

**अक्कलकोट, दि. १८ डिसेंबर-**
नुकताच श्रीक्षेत्र अक्कलकोट नगरीतील प्रमुख धार्मीक उत्सवापैकी असलेला श्री गुरुदेव दत्तजयंती उत्सव मोठ्या उत्साहात लाखो भाविकांच्या उपस्थितीमध्ये पार पडला. मंदिर परिसरात चारचाकी, तीनचाकी वाहने प्रवेश बंद केल्याने दर्शन बारीचे सुयोग्य नियोजन योग्य हाताळणी चोख बंदोबस्त पोलिस निरिक्षक राजेंद्र टाकणे यांनी केल्याने माजी मंत्री भारती पवार व आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. याप्रसंगी वटवृक्ष स्वामी समर्थ देवस्थानचे अध्यक्ष महेश इंगळे, नगरसेवक नागराज कुंभार, भाजपा अल्पसंख्याक सेल अध्यक्ष नन्नू कोरबू, उपाध्ये उपस्थित होते.



### विश्वप्रकाश मलगोंड यास सर्वोत्कृष्ट अभिनेता पुरस्कार

**विजयपूर, दि. १८ डिसेंबर-**
सिंदगी येथील अभिनेता-दिग्दर्शक विश्वप्रकाश टी. मलगोंड यांना न्यू कर्नाटक फिल्म फेस्टिव्हल अकादमी आणि युनिव्हर्सल फिल्म कौन्सिलतर्फे आयोजित चौथ्या कर्नाटक आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव २०२४ मध्ये सर्वोत्कृष्ट अभिनेत्याचा पुरस्कार देण्यात आला. दिग्दर्शक एम. ए. मुम्मीगट्टी, ज्येष्ठ कलाकार सुंदर राज, आंध्र प्रदेश फिल्म चेंबरचे अध्यक्ष अंबाटी मधु मोहन कृष्णा, कलमेश हावरीपेट यांनी रविवारी इसाटो री-क्रिएशन हब, व्हाईट फील्ड, बंगळुरू येथे आयोजित कर्नाटक आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात विश्वप्रकाश मालगोंड यांना सर्वोत्कृष्ट अभिनेता म्हणून सन्मानित केले. विश्वप्रकाश मलगोंड दिग्दर्शित 'तुषार' चित्रपट महोत्सवाच्या स्पर्धेतही सहभागी झाला होता. चित्रपट महोत्सवात दीडशेहून अधिक चित्रपटांनी सहभाग घेतला. याप्रसंगी केजीएफ सिनेमाचे गीतकार आणि दिग्दर्शक किन्नळ राजा, दिलीप कुमार, जम्मू काश्मीर जयेश गुप्ता, प्रभुराम रेड्डी, सुपरस्टार संपादक अस्लम, आनंद गुप्ता, दिग्दर्शक, निर्माते सुनील कुमार उपस्थित होते. विश्वनाथ पल्लेद यांनी सूत्रसंचालन केले.



### अक्कलकोट शिवारात उसाला लागली आग; शेतकऱ्याचे नुकसान

**अक्कलकोट, दि. १८ डिसेंबर-**
अक्कलकोट शिवारातील चंद्रकांत मल्लेशअप्पा पडणुरे यांच्या शेतातील ऊसाला बुधवार दुपारी दीडच्या दरम्यान अचानक आग लागून शेतकऱ्यांचे नुकसान झाला आहे. घटनास्थळी श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाच्या फायर ब्रिगेड वाहन वेळेवर आल्यामुळे पुढील अनर्थ टळला. घटनास्थळी संजय पडणुरे, बसवराज माशाळे, अविनाश मंगरुळे, नितीन बंडगर, विजयानंद कोल्हे, हबीब नदाफ, आदर्श पडणुरे, चंद्रकांत पडणुरे, श्रीकांत झिपरे आदीजणं आग विझविण्यासाठी मोलाची सहकार्य केले.

### पोलिसांना दमदाटीप्रकरणी देशमाने बंधूंची निर्दोष मुक्तता

**बार्शी, दि. १८ डिसेंबर-**
येथील भवानी पेठेतील रहिवासी असलेले उमेश दत्तात्रय देशमाने आणि रमेश दत्तात्रय देशमाने यांची पोलिसांना दमदाटी केल्याप्रकरणी निर्दोष मुक्ता करण्याचे आदेश बार्शी येथील अतिरिक्त सत्र न्यायालयाचे न्यायाधीश एल. एस. चव्हाण यांनी दि. १७ डिसेंबर रोजी दिलेला आहे. आरोपींच्यावतीने ॲड. प्रशांत शेटे यांनी काम पाहिले. १८ ऑगस्ट २०१२ रोजी बार्शी पोलीस स्टेशनचे तत्कालीन पोलीस नाईक धर्मा शंकर शेंळकंदे यांनी अशी फिर्याद दिली होती की, ते तीन वर्षांपासून नेमणुकीस असून वाहतूक शाखेत कार्यरत आहेत. ते आणि जी.टी मारकड यांना सकाळी ८ वाजलेपासून एस. टी. स्टॅण्ड चौक येथे डयुटी असुन मोटारसायकल चालकांचे परवाने तपासून पहात असताना सकाळी ११.३० वाजणेचे सुमारास भगवंत पंपाकडून एक मोटारसायकल भरधाव वेगात आल्याने त्यांनी मोटरसायकल (क्र. १३/ एल. २९९७) थांबवून त्याचे नांव गाव विचारले असता त्याने मला तुम्ही कोण अडवणार, यापूर्वी मला कोणी अडविले नाही, मी तुम्हाला लायसन्स वगैरे काही दाखवणार नाही, म्हणून दमदाटी करु लागला, त्याला मोटारसायकलसह पोलीस स्टेशनच्या आवारात घेवून येत असताना त्यावेळी आणखी एक इसम पळत आला व तुला बाशीत काम करायचं नाही काय? तु मला ओळखल नाही काय? म्हणून तो मोटार सायकलची चावी घेण्यासाठी त्याच्या हाताला धरुन ओढू लागला. सदर इसमाने सर्वांना उद्देशून मी काय चीज आहे, ते दाखवितो, अशी धमकी देऊन दंडाची पावती करण्यास मज्जाव केला. दरम्यान चालक हा रमेश देशमाने व दुसरा इसम उमेश देशमाने असल्याचे चालकाने सांगितले. त्यावरुन दोघांनी जाणूनबुजून सरकारी काम करण्यास अडथळा निर्माण केला, म्हणून सरकारतर्फे रितसर फिर्याद दिली. याप्रकरणी आरोपींची पुर्वी जामिनावर मुक्ता होऊन त्यांचेवर न्यायालयात दोषारोप निश्चित करण्यात आले. सरकार पक्षातर्फे फिर्यादी धर्मा शेळकंदे तथा सागर दिलीप गुळवे यांच्या साक्षी झाल्या. परंतु सरकार पक्ष आरोपींवरील गुन्हा सिध्द करण्यांत अपयशी ठरल्याने सबळ पुराव्याअभावी आरोपी देशमाने बंधू यांची सदर गुन्हयातुन निर्दोष मुक्तता करण्याचे आदेश व निकाल सत्र न्यायालयाने दिला आहे. आरोपींच्यावतीने ॲड. प्रशांत शेटे, ॲड. संकेत लकशेट्टी, ॲड. रोहन स्वामी, ॲड. विशाल चिपडे यांनी काम पाहिले.

# रेल्वे वॅगन रुळावरुन घसरली

## कुर्डूवाडी वर्कशॉपमधील घटना; धोका टळला

**तभा वृत्तसेवा,**
**कुर्डूवाडी, दि. १८ डिसेंबर-**
रेल्वे वर्कशॉपमधून दुरुस्ती वॅगन बाहेर घेऊन येत असताना शंटर (रेल कम रोड व्हिकल) हे वॅगनसह ओपन पॉइंटवर गेल्याने शंटर रुळाच्या एका बाजूला लुडकले तर वॅगन रुळावरुन घसरली.

ही घटना बुधवारी १८ रोजी दुपारी १ वा. सुमारास कुर्डूवाडी रेल्वे वर्कशॉप बाहेरील वर्कशॉप लाइनवर घडली. येथील रेल्वे वर्कशॉपमध्ये रेल्वेच्या वॅगन दुरूस्तीचे काम केले जाते. त्यासाठी वर्कशॉप मध्ये काम करत असताना वॅगन आतल्या आत एका रुळावरुन दुसऱ्या रूळावर घेण्यासाठी इंजिन पॉवर ऐवजी नव्याने मानवविरहित रिमोटवर चालणारे शंटर गेल्या एक दीड वर्षापासून वर्कशॉप मध्ये आहे. या रिमोट शंटरने तीन वॅगन वर्कशॉप बाहेर बार्शीरोडवर असलेल्या वर्कशॉप लाईनवर घेत असताना सदर रिमोट शंटर पुढे व मागे तीन वॅगन होत्या. वर्कशॉप मधून बाहेर पडल्यानंतर समोर बार्शीरोड ओलांडताच उतार असल्याने मागील वॅगन त्या रिमोट शंटरला दाबत गेल्या त्याच्या ताकदीपुढे रीमोट शंटर उतारावर काहीच करु शकले नाही आणि सदर शंटर आणि तीन वॅगन रोलडाऊन होत पुढे पळू गेल्या सदर लाइनवरील पॉइंट सेट नव्हते. त्यामुळे सदर शंटर पुढे न जाता रुळातून बाहेर पडले तर मागील वॅगन रुळावरुन खाली उतरली. घटना घडताच सदर शंटर वॅगन क्रेनने उचलून वर्कशॉप मध्ये नेण्यात आले.तसेच मागील दोन वॅगनही मागच्या मागे ओढून वर्कशॉप मध्ये नेल्या.



### अन् अनर्थ टळला

मुळात हे रिमोट शंटर (रेल कम रोड व्हिकल) वर्कशॉपमध्ये आतल्या आत काम करण्यासाठी असून ते बाहेर ओपलाईनवर आणले जात नाही. मात्र नेमके ते आज बाहेर आणले गेले. सुदैवाने पॉइंट क्लिअर नव्हता अन्यथा सदर शंटर तीन वॅगनसह मेन लाईनवर धावले असते आणि मोठा अनर्थ घडू शकला असता असे सूत्रांनी सांगितले.

### कुर्डूवाडीतील घटना

कुर्डुवाडी येथे रेल्वे रूळावर दोनवेळा स्लीपर ठेवल्याची घटना, त्यानंतर चार दिवसापूर्वी महाव्यवस्थापकांच्या दौऱ्यावेळी महाव्यवस्थापकांच्या स्पेशल गाडीच्या पायऱ्या टिआरडी बाँडमुळे तुटल्या, सोमवारी दि.१६ रोजी इलेक्ट्रिक पॉवरचा पेन्टो तुटून खाली पडला आणि बुधवारी शंटर (रेल कम रोड व्हिकल) रुळावरुन बाजूला पडले आणि वॅगन रुळावरुन खाली घसरली.

मात्र एक वॅगन पॉइंट वरुन रुळावरुन खाली उतरले होते. त्याला लाकडी ठोकळ्याचा आधार देत तीन क्रेनच्या सहाय्याने वॅगनच्या पुढील चार चाकाची ट्रॉली बाहेर ओढून काढण्यात आली. नंतर त्याला रूळावर घेत सदर वॅगन ही वर्कशॉपमध्ये नेली. यावेळी रेल्वे वर्कशॉपचे अधिकारी जितेंद्र हरळ व रेल्वेच्या विविध विभागाचे अधिकारी व कर्मचारी वॅगन रूळावर आणण्यासाठी प्रयत्न करत होते.



# शिक्षण काळाची तर संस्कार जीवनाची गरज

## हभप डॉ. जयवंत महाराज बोधले: प्रणव घोंगडे स्मृतीप्रित्यर्थ सायकल, गणवेश वाटप

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि. १८ डिसेंबर-**
ॲड. उदयबापू घोंगडे व त्यांच्या परिवाराने स्वदु:ख विसरत दातृत्व भावनेतून सामाजिक बांधिलकी जपली असून शिक्षणाचे माहेरघर असणाऱ्या शाळारुपी मंदिरात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना सढळ मदतीचा हात देत खऱ्या गरजवंताला सहकार्याचे धोरण अविरतपणे सुरू ठेवले व मुलाच्या स्मृती जपल्या ही खरी भारतीय संस्कृती आहे असे उद्गार हभप डॉ. श्रीगुरु जयवंत महाराज बोधले यांनी केले.

कै. प्रणव उदय घोंगडे यांच्या स्मृतीप्रित्यर्थ आयोजित मोफत गणवेश वाटप व सांगोला विद्यामंदिर प्रशालेच्या सायकल बँकेस सायकल प्रदान समारंभावेळी ते बोलत होते. यावेळी संस्थाध्यक्ष प्रा. प्रबुद्धचंद्र झपके, ॲड. गजानन भाकरे, प्रतिष्ठित व्यापारी आनंद घोंगडे यांच्यासह प्राचार्य अमोल गायकवाड, उपमुख्याध्यापिका शाहिदा सय्यद, उपप्राचार्य प्रकाश म्हमाणे पर्यवेक्षक मच्छिंद्र इंगोले, प्रदीप धुकटे उपस्थित होते.

बोधले महाराजांनी नव्या पिढीच्या विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणासोबत संस्कारांची जोपासणूक महत्वाची असून हे संस्कार रुजवण्याची महत्त्वाची भूमिका विद्यार्थीरुपी ओल्या पाटीवर या शाळेतील अध्यापकवृंद प्रा.प्रबुद्धचंद्र झपके यांच्या अनमोल मार्गदर्शनाखाली उत्तम प्रकारे बजावत असल्याबद्दल आनंद वाटल्याची भावना व्यक्त केली.यावेळी गतवर्षी घोंगडे परिवाराच्या माध्यमातून शुभारंभ केलेल्या सायकल बँकेमध्ये आणखी पाच नवीन सायकलींची वाढ करत गरजू विद्यार्थ्यांना सायकल्स व मोफत गणवेश मान्यवरांच्या शुभहस्ते प्रदान करण्यात आले. प्रास्तविकातून अमोल गायकवाड यांनी घोंगडे परिवाराने स्तुत्य हेतूने आयोजिलेल्या कार्यक्रमाची पार्श्वभूमी विशद करत विद्यार्थी मदतीबद्दल ऋण व्यक्त करुन मान्यवरांचे स्वागत केले. सूत्रसंचालन वैभव कोठावळे यांनी तर आभार शाहिदा सय्यद यांनी मानले. कार्यक्रम यशस्वीपणे पार पाडण्यासाठी गणवेश वाटप विभागाचे राजेंद्र ढोले, नरेंद्र होनराव कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# टेंभुर्णी भूषण पुरस्कार वितरण, आशा सेविकांचा सन्मान



**तभा वृत्तसेवा,**
**टेंभुर्णी, दि. १८ डिसेंबर-**
स्व. लोकनेते ॲड. कृष्णात बोबडे यांचा स्मृतिदिन 'टेंभुर्णी भुषण पुरस्कार' वितरण, १६ आशा स्वयंसेविकांना भेट वस्तू, १५५ बांधकाम कामगारांना साहित्य किट व १५० होतकरू महिलांना शिलाई मशीन वाटप, भव्य क्रिकेट स्पर्धा असे विविध सामाजिक उपक्रम राबवून साजरा करण्यात आला.

यावेळी बोबडे यांच्या स्मृतिप्रित्यर्थ आदर्श माता म्हणून जयश्री किशोर गांधी,आदर्श कुटुंब विठ्ठल कोंडीबा सपाटे,आदर्श उद्योजक भारत शिंदे,आदर्श कृषी उद्योजक म्हणून दत्तात्रय माळी तसेच आदर्श कलाकार म्हणून रिलस्टार पवन जाधव अशा पाच जणांचा सहकुटुंब मान्यवरांच्या हस्ते सन्मानपत्र, स्मृतिचिन्ह, शाल देऊन गौरव करण्यात आला.

यावेळी स्व.कृष्णात बोबडे यांच्या आठवणीस उजाळा देताना जिल्हा दूध संघाचे अध्यक्ष रणजितसिंह शिंदे म्हणाले की,स्व.बोबडेदादा यांची तत्व पाळणारे नेते म्हणून ख्याती होती.त्यांनी आपले संपूर्ण आयुष्य जनसेवेसाठी खर्ची घातले.यावेळी शिवाजी कांबळे,संजय पाटील-भिमानगरकर,जिल्हा नियोजन समितीचे सदस्य योगेश बोबडे यांनी आपल्या मनोगतातून स्व.बोबडे यांच्या कार्यास उजाळा दिला.

प्रास्ताविक ॲड. रुपेश बोबडे यांनी केले. सूत्रसंचालन राजू पाटील, युवराज वजाळे यांनी केले. कार्यक्रमास विजयकुमार कोठारी, जि. के.देशमुख, दशरथ देशमुख, अनुराधा बोबडे, सरपंच सुरजा बोबडे, उपसरपंच राजश्री नेवसे, संभाजी पाटील, परमेश्वर खरात, रामभाऊ शिंदे, अमोल धोत्रे, उपसरपंच सतिस नेवसे, नागनाथ वाघे, बाळासाहेब ढगे, गौतम कांबळे, दत्तात्रय देवकर, सुधीर पाटील, नागेश बोबडे, स्वराली बोबडे, सोमनाथ ताबे, सचिन होदाडे, तुकाराम डोके, सोमनाथ महाडिक, गणेश पाटील, बंकट देशमुख आदी मान्यवर उपस्थित होते.

### भीमानगर संघ विजेता

कृष्णात (दादा) बोबडे चषकाचे आयोजन केले होते. या क्रिकेट स्पर्धेतील प्रथम विजेत्या भिमानगर संघास एक लाख,११ हजार ३३३ रु,द्वितीय ६१ हजार ३३३ रु, तृतीय ३१ हजार ३३३ रु, चतुर्थ २१ हजार ३३३ रु. रोख स्वरूपात बक्षीस, ट्रॉफी देण्यात आली.

# टेंभुर्णीत उत्तर विभागीय आश्रमशाळा कबड्डी स्पर्धा

## तीन तालुक्यांतील आश्रमशाळांमधील खेळाडूंचा सहभाग

**तभा वृत्तसेवा,**
**टेंभुर्णी, दि. १८ डिसेंबर-**
इतर मागास व बहुजन कल्याण विभाग कार्यालय, सोलापूर अंतर्गत तीन तालुक्यात उत्तर विभागीय आश्रमशाळा कब्बडी क्रिडास्पर्धा टेंभुर्णी येथील संत रोहिदास आश्रम शाळेत संपन्न झाल्या.

या स्पर्धेत १४ वर्ष,१७ वर्षे व १९ वर्ष वयोगटातील माढा,करमाळा व बार्शी तालुक्यातून २७ संघांनी सहभाग नोंदवला होता.या स्पर्धेत एकी व युक्तीच्या जोरावर सुंदर खेळ करून विद्यार्थ्यांनी यश मिळविले.

या स्पर्धा टेंभुर्णी संत रोहिदास आश्रम शाळेचे संस्थापक अध्यक्ष कैलास सातपुते यांच्या अध्यक्षतेखाली पार पडल्या, तर उदघाटक म्हणून सोलापूर येथील इतर मागास व बहुजन कल्याण विभागाच्या सहा.संचालिका मनिषा फुले,शि.प्र.मंडळाचे अध्यक्ष प्रशांत



साळे हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. तसेच टेंभुर्णी पो. स्टेशनचे पोसई अजित मोरे, पोसई सुरवसे, वैद्यकीय अधिकारी डॉ. शुभम सरकाळे, वीज मंडळाचे उपअभियंता महेश पवार, स्टेट बँकेचे शाखाध्यक्ष गावडे,माजी सरपंच प्रमोद कुटे, भाऊ महाडीक,विजय कोकाटे, उच्च माध्यमिकच्या मुख्याध्यापिका जयश्री गवळी, मुख्याध्यापिका संतोषी आगावणे,विलास सातपुते, शिक्षक आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी कैलास सातपुते व पोसई स्वाती सुरवसे यांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. या स्पर्धेसाठी क्रीडा शिक्षक विलास सातपुते, शुभम सातपुते, हनुमंत कांबळे यांनी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन धनाजी तनपुरे, जीवन बागवाले यांनी केले.

### विविध गटांतील विजेते संघ

या स्पर्धेत १४ वर्षे मुले-वयोगटात तांबेवाडी आश्रमशाळा प्रथम, माढा आश्रम शाळा द्वितीय, मुलींमध्ये तांबेवाडी आश्रम शाळा प्रथम, आगळगाव आश्रमशाळा द्वितीय,१७ वर्षे वयोगटात मुले, माढा आश्रमशाळा प्रथम, टेंभुर्णी आश्रमशाळा द्वितीय, मुलींमध्ये तांबेवाडी आश्रमशाळा प्रथम, टेंभुर्णी आश्रमशाळा द्वितीय,१९ वर्षे वयोगटात मुले-माढा आश्रमशाळा प्रथम, तांबेवाडी आश्रम शाळा द्वितीय, मुलीमध्ये तांबेवाडी आश्रमशाळा प्रथम, वैराग आश्रमशाळा द्वितीय आले.

# संविधानाची विटंबना करणाऱ्यांना देशद्रोही जाहीर करा

## रासपचे माजी जिल्हा सरचिटणीस अंगद देवकते यांची निवेदनाद्वारे मुख्यमंत्र्यांकडे मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा, दि. १८ डिसेंबर-**
परभणीत मुख्य चौक या ठिकाणी भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या संविधान प्रतिकृतीची विटंबना व तोडफोड करून संविधानाचा अपमान करणार्या देशद्रोहीवर नराधामास तात्काळ कठोरात कठोर शिक्षा करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली.

परभणीतील संविधान प्रतिकृती तोडफोडीच्या निषेधार्थ शांततेच्या मार्गाने आंदोलन करत असताना. अनेक भीम सैनिक अनुयांकडून जो उद्रेक झाला त्या संदर्भातील अनेक विविध गुन्हे दाखल झाले आहेत. ते गुन्हे रद्द करून दोषमुक्त करण्यात यावेत. तसेच पोलीस मारहाणीत मृत्यू झालेला आंदोलक विधी या शैक्षणिक वर्षात शिक्षण घेणारा भिमसैनिक सोमनाथ व्यंकट सूर्यवंशी यांचा पोलिस स्टेशन मध्येच मृत्यू झाला. या मृत्यू प्रकरणाची सखोल चौकशी करून त्याला न्याय मिळवून द्यावा. आणि त्याच्या कुटुंबातील व्यक्तींस आर्थिक मदत व शासकीय सेवेत घेण्याची मागणी राष्ट्रीय समाज पक्षाचे जिल्हा सरचिटणीस अंगद देवकते यांनी निवेदनाद्वारे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे.

यावेळी राष्ट्रीय समाज पक्षाचे माजी



जिल्हा सरचिटणीस अंगद देवकते, धनगर धर्म पिठ जिल्हा अध्यक्ष बाळासाहेब टकले, आरपीआयचे नेते अर्जुन गाडे, कामगार आघाडीचे अध्यक्ष यशवंत गायकवाड, विकास मेरगळ, राजेंद्र सरतापे,नामदेव पालवे, सुभाष देडगे, लक्ष्मण शिंदे, आण्णासाहेब महानवर उपस्थितीत होते.

# विनापरवाना वाहतूक करताना लाकडासह टेंपो जप्त

## सांगोला वनपरिक्षेत्र अधिकाऱ्यांची कारवाई

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि.१८ डिसेंबर-**
सांगोला वनपरिक्षेत्र अधिकारी, जुनोनी वनपाल, वनरक्षक ह.मंगेवाडी, घेरडी यांनी दि.१६ डिसेंबर रोजी दुपारी साडे चारच्या दरम्यान पाचेगाव खुर्द येथील मालकी क्षेत्रात वाहनाची तपासणी केली असता आयशर क्र.एम.एच १० झेड २६४६ यामध्ये विनापरवाना लाकूड वाहतूक होत असल्याने आयशर लाकुड मालासह जप्त करण्यात आला आहे.

याबाबत लाकुड व्यापारी आदित्य रामचंद्र पाटील रा.अरळीहटी ता.कवठेमहाकाळ, आयशर मालक इलाई रुबाब अतार रा.जुनोनी, चालक दाजी शामराव पांढरे रा. उदनवाडी, शेतकरी पोपट पांडूरंग मिसाळ रा.पाचेगाव खुर्द यांचे विरूद्ध विनापरवाना वृक्षतोड व वाहतूक केल्याबद्दल वनगुन्हा नोंद केला आहे. यामध्ये कडूलिंब जळावु लाकुड अंदाजे ४ टन बाजार भावप्रमाणे १२००० रुपयाचे जप्त करण्यात आले आहे. सदरची कारवाई पुणे मुख्य वनसंरक्षक (प्रा) एन. आर. प्रवीण, सोलापूर उपवनसंरक्षक लेफन्टंट कुशाग्र पाठक, सहा. वनसंरक्षक व्ही.एम. चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली सांगोला वनपरिक्षेत्र अधिकारी तुकाराम जाधवर, जुनोनी वनपाल एस.एल.वाघमोडे, वनरक्षक ह.मंगेवाडी ए. के. करांडे, घेरडी एस. एस. मुंढे यांनी केली.

### झाडे तोडण्यासाठी अर्ज करा

वनविभागाचा परवाना घेतल्यानंतरच वृक्षतोड व वाहतूक करावी. अवैध वृक्षतोड व वाहतूक केल्यास वनविभागाच्या नियमानुसार कारवाई करण्यात येईल. तसेच प्रत्येक व्यक्तीने झाडांचे संरक्षण करावे. ज्या झाडापासुन धोका आहे अशी झाडे तोडण्यासाठी वनविभाग कार्यालयात अर्ज करावा असे आवाहन सांगोला वनपरिक्षेत्र अधिकारी तुकाराम जाधवर यांनी केले आहे.



## संक्षिप्त वृत्त




### तृतीयपंथी आणि देहविक्री करणाऱ्या सर्व महिलांनाही लवकरच दरमहा धान्य वाटप

**सोलापूर, दि. १६ डिसेंबर-**

सोलापूर शहर आणि जिल्ह्यातील सर्व वंचित घटकांसह तृतीयपंथी आणि देहविक्री करणाऱ्या (वेशा व्यवसाय करणाऱ्या) महिलांना सर्व रास्त भाव दुकानातून लवकरच दरमहा धान्य वाटप करण्यात येणार असल्याची माहिती जिल्हा पुरवठा अधिकारी संतोष सरडे यांनी आज (दि. १४) रोजी दिली. मंगळवार, दि. १७ रोजी येथील क्रांती महिला संघ आणि स्वाती महिला संघाच्या वतीने 'डिस्ट्रीक लेवल ॲडव्होक्सी मिटींग' या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. यावेळी जिल्हा पुरवठा अधिकाऱ्यांनी वरील घोषणा केली असून, या लाभार्थ्यांचे आधारकार्ड, पॅनकार्ड वगैरेचा सर्व आवश्यक तो तपशील पाहून आमच्या शहर आणि जिल्ह्यातील स्वस्त धान्य दुकानदारांकडून धान्य पुरवठा करण्यात येणार आहे. यासोबत जिल्हाभरातील ज्यांना आजपर्यंत धान्य मिळाले नाही त्या सर्वच वंचित घटकांनाही लवकरच धान्य वाटप सुरु करणार असल्याचे जिल्हा पुरवठा अधिकारी सरडे यानी सांगितले. त्यासाठी जिल्ह्यातील सर्व दुकानदारांची एक बैठक घेवून सविस्तर मार्गदर्शन करणार असल्याचेही शेवटी सरडे यांनी सांगितले.



### तळे हिप्परगा येथे सिमेंट कॉंक्रीट रस्त्याचे उद्घाटन

**सोलापूर, दि. १८ डिसेंबर-**

मौजे तळे हिप्परगा वीरभद्र नगर येथे माजी खासदार डॉक्टर जय सिद्धेश्वर महास्वामीजी यांच्या शिफारशीने व सामाजिक कार्यकर्ते राजू हौशेट्टी यांच्या प्रयत्नातून जिल्हा नियोजन समितीमार्फत जन सुविधा योजना अंतर्गत शिवप्पा बेळ्ळे घर ते सुरेखा काळे घर सिमेंट कॉंक्रीट रस्त्याचे उद्घाटन माजी खासदार डॉ. जयसिद्धेश्वर महास्वामी, सामाजिक कार्यकर्ते राजू हौशेट्टी यांच्या हस्ते पूजा करून करण्यात आले. यावेळी शिवप्पा बेळ्ळे, सागर काळे, दीपक देशमुख, ज्योतिबा पवार, पांडुरंग शेंडगे, कुलदीप पवार, चेतन चौधरी, चंद्रकांत चौगुले, विनोद शिंदे, गणेश हौशेट्टी, नागराज हौशेट्टी, ग्रामसेवक गणेश नारायणकर आदी उपस्थित होते.




### राष्ट्ररत्न फौंडेशनतर्फे सिव्हिल हॉस्पिटलमधील रुग्णाच्या नातेवाईकांना नाश्ता वाटप

**सोलापूर, दि. १८ डिसेंबर-**

दत्त जयंतीचे औचित्य साधून स्व. श्रीमती भागीरथी बापूराव माळी (अनंतकर) यांच्या प्रथम पुण्यस्मरण दिनानिमित्त राजू अनंतकर यांनी दिलेल्या देणगीतून सिव्हिल हॉस्पिटल न्यू बी ब्लॉक सोलापूर येथे रुग्णांना शासन तर्फे मोफत जेवण नास्ता असतो, परंतु नातेवाईक यांना नसतो ही गोष्ट लक्षात घेऊन दत्त जयंतीचे औचित्य साधून पेशंटच्या नातेवाईकांना सकाळी मोफत गरम उपीटाचा नास्ता वाटप केला. प्रास्ताविक संस्थेचे अध्यक्षा प्रांजली मोहीकर यांनी केले. देणगीदार राजू अनंतकर यांचा बुके देऊन सन्मान केला. यानंतर सर्व सदस्यांच्या हस्ते रुग्ण नातेवाईक यांना नास्ता वाटप केले.सुमारे १०० हून अधिक गरजूंनी याचा लाभ घेतला. या कार्यक्रमासाठी संस्थेचे उपाध्यक्ष प्रा. प्रेमचंद मेने, विश्वस्त ज्योती मेने, वेदांत मोहीकर, राजेश केकडे, राजेश्वर पाटील, दीपक करकी,सुहास भोसले,अपर्णा पाठक, निकम उपस्थित होते.

# कर भरा अन्यथा पाणीपुरवठा खंडित

**पेठनिहाय जनजागृती बरोबरच वसुली मोहीम**

**कर संकलन विभागअंतर्गत ९ पथके तैनात**



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ डिसेंबर-**

मिळकतकर थकबाकी वसुलीसाठी महापालिका मिळकत कर संकलन विभागअंतर्गत शहरातील विविध पेठनिहाय स्पीकर वरून कर भरण्याचे आवाहन करतानाच पाणीपुरवठा खंडित करण्याचा इशाराही देण्यात येत आहे. पालिका प्रशासनाकडून पेठनिहाय जनजागृती बरोबरच वसुली मोहीम राबविण्यात येत आहे.

महापालिका आयुक्त शितल तेली-उगले यांच्या आदेशानुसार उपायुक्त आशिष लोकरे यांच्या मार्गदर्शनाखाली मिळकतकर विभागाचे प्रमुख युवराज गाडेकर यांच्या माध्यमातून कर वसुली मोहीम राबवली जात आहे. महापालिकेच्या मिळकत कर विभागाने थकबाकी वसुलीसाठी ९ पथकांच्या माध्यमातून मिळकत सील करणे, नळ कनेक्शन तोडणे अशा कारवाईची मोहीम राबविण्याचे नियोजन केले आहे. दरम्यान, गेल्या काही दिवसांपासून प्रत्येक पेठनिहाय वस्त्यांमध्ये जाऊन महापालिका कर्मचाऱ्यांकडून मिळकत कर भरण्याचे आवाहन केले जात आहे. देगाव, केगावसह विविध गावठाण भागातही जाऊन मिळकतकर भरण्याच्या सूचना स्पीकरवरून दिल्या जात आहेत. ज्या भागामध्ये मिळकत कर भरण्याचे प्रमाण कमी आहे अशा ठिकाणी अधिक लक्ष केंद्रित केले जात आहे. शहरात ५० पेठा आहेत. यासाठी ९ पथके तैनात करण्यात आली आहेत. संबंधित पेठेचे कर निरीक्षक, वसुली लिपिक यांचा यामध्ये समावेश आहे, अशी माहिती मिळकतकर संकलन विभाग अधीक्षक युवराज गाडेकर यांनी दिली. थकबाकीदारांनी कारवाई टाळण्यासाठी आपली मिळकत कराची थकबाकी भरून महापालिका प्रशासनास सहकार्य करावे, असे आवाहन श्री. गाडेकर यांनी केले आहे. दरम्यान, शहर आणि हद्दवाढ भागात २ लाख ६० हजार मिळकतदार आहेत. या मिळकतदारांपैकी लाखभर मिळकतदारांनी महापालिकेच्या तिजोरीत चालू आर्थिक वर्षात जवळपास ११४ कोटी ७ लाख रुपयांचा भरणा केला आहे. मात्र अद्यापही उर्वरित दीड लाख मिळकतदारांकडे मागील आणि चालू आर्थिक वर्षातील सुमारे ७०० कोटी रुपये थकीत आहे. शहरात विशेषतः हद्दवाढ भागामध्ये तब्बल ८२ हजार ४६२ विना बांधकाम खुले प्लॉट मिळकतदार आहेत. यापैकी ६० टक्के मिळकतदारांकडे वर्षानुवर्षे महापालिका मिळकत कराची थकबाकी राहिली आहे. त्यांच्याकडील सुमारे १२५ कोटी रुपयांच्या थकीत वसुलीसाठी देखील पालिका प्रशासन लवकरच कामाला लागणार आहे. मोठ्या थकबाकीदारांनी दिलेल्या मुदतीत कर न भरल्यास त्यांचा प्लॉट महापालिका ताब्यात घेणार आहे.

## तलाठ्याची नोकरी लावण्याचे आमिष दाखवून महिलेची चार लाखांची फसवणूक

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १८ डिसेंबर -**

तलाठ्याची नोकरी लावण्याचे आमिष दाखवून महिलेची चार लाख १५ हजार रुपयांची फसवणुक करणाऱ्याविरुध्द फौजदार चावडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत मयुरी सागर भोसले (रा. जुनी पोलिस लाईन, मुरारजी पेठ) या महिलेच्या फिर्यादीवरुन अनिल छोटेलाल व्यास (रा. अंबिका हाईटस, मॅक्स हॉस्पीटलजवळ, वडोदरा, सुरत सध्या रा. सोलापूर) याच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मयुरी भोसले व अनिल व्यास हे दोघे एकमेकांच्या ओळखीचे आहेत. अनिल व्यास याने मयुरी भोसले व इरशाद युसूफ शेख यांना तु सोलापूरातच राहुन सरकारी नोकरी का करीत नाही, तुझे शिक्षण चांगले आहे, तुझ्या सर्व अडचणी दूर होतील, माझ्या मोठमोठ्या ओळखी आहेत आणि मी तुला चांगल्या सरकारी उच्च पदावर नोकरी मिळवून देतो, मी भरपूर लोकांना सरकारी नोकरी मिळवून दिली आहे असे सांगून तलाठी पदाची नोकरी लावतो असे आमिष दाखवून मयुरी भोसले यांच्याकडून १ मे २०२३ ते ३० जून २०२४ या कालावधीत ऑनलाईन तसेच सोने गहाणवट ठेऊन २ लाख ८० हजार रुपये तसेच इरशाद शेख यांच्याकडून २ लाख ७० हजार रुपये घेतले. पैसे दिल्यानंतरही नोकरीबाबत काहीही हालचाली झाल्या नाहीत, म्हणून दोघींनी व्यास याच्याकडे पैशाची मागणी केली असता त्याने दोघींनाही दमदाटी केली. म्हणून फौजदार चावडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सहायक पोलिस निरीक्षक जाधव पुढील तपास करीत आहेत.

## बसवर दगडफेक करणाऱ्यास दोन दिवस पोलिस कोठडी

**अद्याप एकजण फरार**

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १८ डिसेंबर -**

प्रभाकर महाराज चौक व डी मार्ट समोरील हायवे वर एस टी बसवर दगडफेक करून वाहनांचे नुकसान करणाऱ्यास फौजदार चावडी पोलिसांनी अटक केली असून त्यास न्यायालयाने दोन दिवस पोलिस कोठडीत ठेवण्याचा आदेश दिला आहे.

जितेश शरणबसप्पा महिंद्रकर (वय ३२, रा. रमाबाई आंबेडकर नगर, न्यु बुधवार पेठ, सोलापूर) असे पोलिस कोठडी मिळालेल्याचे नाव असून त्याचा साथीदार मोहसीन हा अजुनही फरार असून त्याचा पोलिसांकडून शोध घेतला जात आहे.

१६ डिसेंबर रोजी सायंकाळी कैलास आनंदराव हेंडगे (वय ३८, रा. गौळ, ता. कंदार, जि. नांदेड) हे एस टी बस क्र. एमएच १४ बीटी ४९५२ ही चालवित सोलापूरकडे येत असताना प्रभाकर महाराज चौक अज्ञात व्यक्तींने दगडफेक करून बसचे नुकसान केले. तसेच डी मार्ट समोरील हायवेवर बालाजी दत्तात्रय गणगे हे एमएच ०५ ईएम १३८२ क्रमांकाची एस टी बस चालवित येत असताना त्या बसवरही दगडफेक करून नुकसान करण्यात आले. याबाबत फौजदार चावडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

गुन्हा दाखल झाल्यानंतर पोलिसांनी यातील आरोपींचा शोध घेऊन जितेश महिंद्रकर यास अटक केली. त्यास न्यायालयात हजर केले असता त्याला दोन दिवस पोलिस कोठडी सुनावण्यात आली. सहायक पोलिस निरीक्षक खंडागळे पुढील तपास करीत आहेत.

## कामगार संघटना महासंघाची कामगार आयुक्त कार्यालयासमोर निदर्शने

**आयुक्तांना दहा मागण्यांचे निवेदन सादर**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि.१८ डिसेंबर-**

जिल्ह्यातील बांधकाम कामगारांच्या विविध मागण्याबाबत सोलापूर कामगार संघटना महासंघाचे निमंत्रक विष्णू कारमपुरी यांच्या नेतृत्वाखाली व बालाजी चराटे, सोहेल शेख, अंगद जाधव, गणेश बोड्डू, वैशाली बनसोडे यांच्या प्रमुख उपस्थितीत सहाय्यक कामगार आयुक्त कार्यालयासमोर भव्य निदर्शने करण्यात आली. यानंतर सहाय्यक कामगार आयुक्त यांना १० मागण्यांच्या निवेदन सादर करण्यात आले.

बांधकाम कामगारांच्या मोठ्या समस्या असून, या समस्या सोडविण्याचा प्रयत्न शासन किंवा प्रशासन करीत नाही. केवळ बांधकाम कामगारांच्या नावाने लूटमार, फसवणूक, भ्रष्टाचार सुरू आहे. याबाबत झोपीचे सोंग घेतलेल्या महाराष्ट्र शासनाला जाग आणण्यासाठी बांधकाम कामगार महासंघाने यापूर्वी कामगार मंत्री कामगार आयुक्त सहाय्यक कामगार आयुक्त जिल्हाधिकारी या सर्वांना निवेदने दिली परंतु, यांच्याकडून कुठलीही कार्यवाही झालेली नाही म्हणून महासंघाने दि. १८ डिसेंबर रोजी भव्य निदर्शने करण्याचा इशारा दिला. त्यानुसार बुधवारी महासंघाचे सर्व नेते गणांच्या नेतृत्वाखाली निदर्शने करण्यात आली. यावेळी बांधकाम कामगारांनी कामगार एकजुटीचा विजय असो, कामगार संघटना महासंघाचा विजय असो, बांधकाम कामगारांना बोनस मिळालेच पाहिजे, डब्ल्यू एफ सी काम काज बंद झालेच पाहिजे, आमच्या मागण्या मान्य करा नाहीतर खुर्च्या खाली करा, कोण म्हणतंय करणार नाही; केल्याशिवाय सोडणार नाही अशा जोरदार घोषणा दिल्या.



या निदर्शनात बालाजी चराटे,अंगद जाधव, सोहेल शेख, गणेश बुड्डू, वैशाली बनसोडे, जोहेदा शेख,सोहेल जागीरदार, विठ्ठल कुराडकर,रेखा आडकी, गुरुनाथ कोळी,राधिका मीठा, सविता दासरी,अनिता सुंचु,ओम चराटे,रेणुका भिसे, रंजना भिसे वैशाली भोसले,आदित्य भोसले, भैया आवळे,गणेश राक्षे, अजिंक्य भोसले व बांधकाम कामगार सामील झाले होते.

## घरगुती गॅस वाहनांमध्ये भरणाऱ्यास रंगेहात पकडले

**अन्नधान्य वितरण अधिकाऱ्यांनी दाखल केला गुन्हा**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ डिसेंबर-**

अनधिकृत गॅस वापराबाबत जिल्हाधिकाऱ्यांनी दिलेल्या निर्देशानुसार दि. १८ डिसेंबर रोजी दुपारी १२.५५ वाजता शहर अन्नधान्य वितरण अधिकारी ओंकार पडोळे यांच्या नेतृत्वाखाली अवैधरित्या घरगुती गॅस सिलेंडर वाहनांमध्ये प्रत्यक्ष भरत असताना रेल्वे कॉलनी, सोलापूर येथे १३ घरगुती गॅस टाक्या, ३ पंप, ३ वजन काटे जप्त करुन सदर बाजार पोलीस स्टेशन मध्ये जीवनावश्यक वस्तु अधिनियम १९५५ चे




कलम ३ व ७ नुसार गुन्हा नोंदविणेचे काम रात्री उशिरापर्यंत चालू होते. अशी माहिती एका पत्रकान्वये दिली आहे.

सदर पथकात परिमंडळ अधिकारी प्रफुल नाईक, नितीन वाघ, अनिल गवळी, नंदकिशोर ढोके तसेच पुरवठा निरीक्षक राजेश यमपुरे, सज्जन भोसले, ज्ञानेश्वर काशीद हे कार्यरत होते. वरीष्ठ पोलीस निरीक्षक अजित लकडे, पोलीस उपनिरीक्षक नितीन शिंदे, पोलीस हवालदार शहाजान मुलानी, पोलीस हवालदार लक्ष्मीकांत फटाणे यांच्या मार्फत गुन्हा नोंदविण्याची प्रक्रिया चालू होती.

**घरगुती गॅसचा अनधिकृत वापर केल्यास कारवाई**

शहरातील कोणीही घरगुती गॅसचा अनधिकृत वापर करू नये. या घरगुती गॅसचा अनधिकृत वापर केल्यास जीवनावश्यक वस्तु अधिनियम १९५५ चे कलम ३ व ७ अन्वये कार्यवाही करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

**- ओंकार पडोळे,**
**अन्नधान्य वितरण अधिकारी**

## पैशासाठी विवाहितेचा छळ करणाऱ्या पतीसह चौघांविरुध्द गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १८ डिसेंबर -**

पैशासाठी विवाहितेचा छळ करणाऱ्या पतीसह चौघांविरुध्द फौजदार चावडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत सरताफ सैफ शेख (वय २७, रा. क्रांती नगर, जाधव यांच्या घरजागेत भाड्याने, दमाणी नगर, सोलापूर) या विवाहितेच्या फिर्यादीवरुन पती सैफ शेख, सासू ताहेरा शेख, सासरे रफिक शेख, दीर सोहेल शेख (सर्व रा. हजरत खान चाळ, कल्पना टॉकीजच्या मागे, सोलापूर) यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ३ एप्रिल २०२४ ते २० सप्टेंबर २०२४ या कालावधीत सरताफ



या सासरी नांदण्यास होत्या. त्यावेळी पती सैफ व त्याच्या घरातील लोकांनी सरताफ हिस तु एका मुलाची आई आहेस, तुझी आमच्याकडे नांदण्याची लायकी नाही, तु आम्हांला तुझ्या आई-वडीलांकडून २ लाख रुपये घेऊन ये तरच आम्ही तुला नांदवितो असे म्हणून तिचा शारीरीक व मानसिक छळ करून जाचहाट केला. पोलिस नाईक मुलाणी पुढील तपास करीत आहेत.

# जिल्ह्यात आजपर्यंत ३२ लाख मे. टन ऊस गाळप

**साडेतीन महिने चालणार हंगाम**

**यंदा गाळप कमीच होणार**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ डिसेंबर-**

ऊस गाळप हंगामाला सुरुवात होऊन महिना पूर्ण होत आला असून, आतापर्यंत सोलापूर जिल्ह्यातील साखर कारखान्यांनी एका महिन्यांत ३२ लाख मेट्रिक टन उसाचे गाळप केले आहे. तर यंदा साडेतीन महिनेच हंगाम चालण्याची शक्यता असून, १२५ लाख मे. टन उसाचे गाळप होण्याचे संकेत पुणे येथील साखर आयुक्तालयाचे प्रादेशिक सहसंचालक पांडुरंग साठे यांनी दिले.

गाळप हंगामाला १५ नोव्हेंबरपासून सुरुवात झाली आहे. सोलापूर विभागातील ४० साखर कारखान्यांनी आपला यंदाचा गाळप हंगाम सुरू केला आहे. यामध्ये १५ सहकारी, २५ खासगी साखर कारखान्यांचा समावेश आहे. आजतागायत या कारखान्यांनी ३० ते ३२ लाख मे. टन ऊस गाळप केले आहे. तर राज्यात आतापर्यंत २०६ लाख मेट्रिक



टन उसाचे गाळप झाले आहे. त्यात सर्वाधिक गाळप पुणे विभागात झाले.

कोल्हापूर विभागात ४६ लाख ९३ हजार मेट्रिक टन, पुणे विभागात ५३ लाख मेट्रीक टन, सोलापूर व धाराशिव जिल्ह्यात ३८ लाख मेट्रिक टन तर फक्त सोलापूर जिल्ह्यात ३२ लाख मे. टन, नगर येथे २६ लाख मेट्रिक टन, छत्रपती संभाजी नगर येथे १८ लाख मेट्रिक टन, नांदेड येथे २३ लाख मेट्रिक टन, अमरावती विभागात दोन लाख २५ हजार मेट्रिक टन तर नागपूर येथे सर्वात कमी चारशे मेट्रिक टन उसाचे गाळप झाले आहे. यंदाच्या हंगामात ऊस कमी असल्याने १२५ ते १३० लाख मे. टनापर्यंत ऊस



गाळप होईल. गतवर्षीपेक्षा तब्बल ४० ते ४५ लाख मे. टन कमी ऊस गाळप होण्याचा अंदाज आहे. दरम्यान, यंदा मुबलक पाणीसाठा झाल्याने ऊस लागवड मोठ्या प्रमाणात झाली असल्याने आगामी वर्षात ऊस गाळप मोठ्या प्रमाणात होणार आहे.

**उसाला ठिबकद्वारेच पाणी द्यावे**

यंदा चांगला पावसाळा झाला आणि मुलबक पाणी असल्याने बहुतांश शेतकरीवर्ग मोठ्या प्रमाणात दंडाद्वारे (वाप्यातून) मोकळे पाणी ऊस पिकास देतात. यामुळे पाण्याचा मोठ्या प्रमाणात अपव्यय होतो. यासाठी सर्वच शेतकऱ्यांनी ऊस पिकांना ठिबक सिंचनाद्वारे पाणी देण्याची गरज आहे. मुबलक पाणी असताना त्याचा वापर काटकसरीने शेतकऱ्यांनी केला तर शिल्लक पाणी उन्हाळी हंगामात वापरता येते. यासाठी आता जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी कमी पाण्यात मुबलक उत्पन्न देणाऱ्या डाळिंब आणि रेशीम उत्पादनाकडेही वळावे. या उत्पादित मालालाही जगभरात चांगली बाजारपेठ मिळू लागली आहे. असे आवाहन सोलापूर कृषी विभागाकडून करण्यात येत आहे.

**ऊसदर जाहीर करण्यास टाळाटाळ**

साखर आयुक्तांना आदेशानुसार जिल्ह्यातील सर्व साखर कारखान्यांनी १५ डिसेंबरपर्यंत ऊस दर जाहीर करणे अपेक्षित होते. मात्र जिल्ह्यातील चार ते पाच साखर कारखाने वगळता इतर २९ ते ३० साखर कारखान्यांनी अद्यापही उसाचे दर जाहीर केले नाही. त्यामुळे कारखानदार ऊस दर जाहीर करण्यास टाळाटाळ करत असल्याचे चित्र जिल्ह्यात दिसत आहे.




हे पत्र मुद्रक व प्रकाशक दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : विवेक कृष्णाजी घळसासी. ● समूह मुख्य संपादक : दिलीप यशवंत पेठे.● मुख्य संपादक :प्रशांत वसंतराव माने दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. E-mail starunbharatgmail.com. ● Website:http://dainiktarunbharat/ या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi** - Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

CMYK

सोलापूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## जायंट्स ग्रुपचे आडम, कोंडले यांना विशेष कार्यगौरव पारितोषिक

**सोलापूर, दि. १८ डिसेंबर-**

छत्रपती संभाजी नगर येथे झालेल्या जायंट्स इंटरनॅशनल फेडरेशन २ बीच्या अधिवेशनात सोलापूरचे किसन आडम व श्रीनिवास कोंडले यांना विशेष कार्यगौरव पारितोषिक देण्यात आले. हे अधिवेशन हॉटेल बग्गा इंटरनॅशनल येथे नुकतेच झाले. तिथे जायंट्स ग्रुप ऑफ सोलापूरचे किसन आडम व फेडरेशन ऑफिसर श्रीनिवास कोंडले या दोघांना त्यांनी केलेल्या सामाजिक व शैक्षणिक कार्याची नोंद घेऊन विशेष कार्य गौरव




पुरस्कार देण्यात आला. यावेळी जायंट्स स्पेशल कमिटी मेम्बर विनोद शेवतेकर, सूर्यमाला मालानी, संजय गुगले व प्रेसिडेंट अमित मालानी, सोलापूरचे गोवर्धन मलपेद्दी, भास्कर पिट्टा उपस्थित होते.




## क्राईम वृत्त...

### गॅस टाकी अन् एलईडी टीव्ही चोरला

**सोलापूर, दि. १८ डिसेंबर-**

हैदराबाद रस्त्यावरील जुना विडी घरकुल परिसरातील महेश नगर येथील घरात चोरी करून चोरट्याने गॅस टाकी, एलईडी टीव्ही व रोकड चोरून नेली.



हा प्रकार ३० ऑक्टोबर ते एक नोव्हेंबर दरम्यान घडला. याबाबत लक्ष्मी अंबादास बद्दल (वय ७४) यांनी दिलेले फिर्यादीवरून एम आयडीसी पोलीस ठाण्यात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यातील फिर्यादी यांनी त्यांचे राहते घर ३० ऑक्टोबर रोजी दुपारी कुलूप लावून बंद करून ते कामानिमित्त बाहेर गेले होते. ते एक नोव्हेंबर रोजी परतले, त्यावेळी त्यांना घराच्या दरवाजाचे कुलूप तुटलेल्या अवस्थेत दिसून आले. त्यांनी घरात जाऊन पाहणी केली असता, घरात ठेवलेली ३४ हजाराची रोकड, गॅस टाकी, एलईडी टीव्ही असा मुद्देमाल चोरीस गेल्याची त्यांच्या लक्षात आले. या गुन्ह्याचा तपास हवालदार उबाळे करत आहेत.

### बुलेटसाठी पित्यासह तिघांना कोंडून दमदाटी

**सोलापूर, दि. १८ डिसेंबर-**

बुलेट व शेती जमीन घेण्यासाठी वडिलांना तसेच इतर दोघांना दमदाटी करून कोंडून ठेवल्याची घटना समोर आली. याप्रकरणी वडिलांनी दिलेल्या तक्रारीवरून मुलाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत भागवत पंढरी दळवी (वय ७७, रा. देना हौसा. सोसायटी, बिडी घरकुल सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून मुलगा अमोल भागवत दळवी विरुद्ध एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यातील आरोपीने स्वतः करिता बुलेट व शेतजमीन घेण्यासाठी वडील भागवत यांच्यासह त्यांची सून व नातू अशा तिघांना राहत्या घरात कोंडले. हा प्रकार २८ ऑक्टोबर रोजी सकाळी आठ वाजता घडला. यातील आरोपीने फिर्यादीसह तिघांना दुपारी दीड पर्यंत कोंडून ठेवले त्यानंतर त्यांना शिवीगाळ व दमदाटी करून त्यांच्याकडे तीन लाखांची मागणी केली. यानंतर आरोपीने तिघांना बघून घेण्याची धमकी दिली. या गुन्ह्याचा तपास हवालदार खटके करत आहेत.

### जुळे सोलापुरातील सिंधू विहारमध्ये घरफोडी

**सोलापूर, दि. १८ डिसेंबर-**

शहरातील जुळे सोलापुरातील सिंधू विहारमध्ये चोरट्यांनी ३० हजार रुपये किंमतीचे साहित्य चोरून नेले. याबाबत छगन उध्दवसिंग कुलबर्गे (वय ६५, रा. कुर्बान हुसेन नगर, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन विजापूर नाका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. २९ ऑक्टोबर ते १ नोव्हेंबर या कालावधीत छगन कुलबर्गे यांच्या घराच्या वॉल कंम्पौडवरून अज्ञात चोरट्याने उडी मारून मागील उघड्या दरवाजातून घरात प्रवेश करून बाथरूममधील वॉलमिक्शन, शॉवर, किचन व बाथरूममधील नळाच्या तोट्या, लोखंडी कटींग ग्रॅन्डर असा २९ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल चोरून नेला. याबाबत विजापूर नाका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिस हवालदार भिसे पुढील तपास करीत आहेत.



### मार्केट यार्ड येथून १४ हजारांच्या मोबाईलची चोरी

**सोलापूर, दि. १८ डिसेंबर-**

मार्केट यार्ड येथे झोपलेल्या तरूणाचा १४ हजार रुपयांचा मोबाईल चोरट्याने चोरून नेला. याबाबत धुळोबा गणपत सोलनकर (वय ३६, रा. गोंधळवाडी, ता. तुळजापूर, जि. धाराशिव) यांने दिलेल्या फिर्यादीवरुन जेलरोड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. २३ नोव्हेंबर २०२४ रोजी पहाटे अडीचच्या सुमारास धुळोबा सोलनकर हे मार्केट यार्ड येथील एस एन जावळे यांच्या दुकानाजवळ झोपले होते. त्यावेळी अज्ञात चोरट्याने त्यांच्या खिशातून १४ हजार रुपये किंमतीचा मोबाईल चोरून नेला. याबाबत जेलरोड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस हवालदार मस्के पुढील तपास करीत आहेत.



# एक लाखाची लाच स्विकारताना डॉ. माधव जोशी रंगेहात सापडले

**तक्रारदाराच्या बाजूने अहवाल देण्यासाठी मागितली २ लाखांची लाच**

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १८ डिसेंबर -**

तक्रारदाराच्या लॅबच्या बाजूने रिपोर्ट पाठविण्यासाठी व बिल काढण्यासाठी २ लाख रुपये लाचेची मागणी करून १ लाख रुपयांचा पहिला हप्ता स्विकारताना महात्मा ज्योतीबा फुले जन आरोग्य योजनेचे जिल्हा समन्वयक डॉ. माधव जोशी यांना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने रंगेहाथ अटक केली. ही कारवाई १८ डिसेंबर रोजी करण्यात आली. डॉ. माधव विष्णुपंत जोशी (वय ४८, रा. जिल्हा शल्य चिकित्सक कार्यालय, गुरुनानक चौक, सोलापूर) असे अटक करण्यात आलेल्या जिल्हा समन्वयकाचे नाव आहे. याबाबत सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



यातील तक्रारदार याची पॅथॉलॉजी लॅब आहे. त्याच्या लॅबला श्री छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालयत येथे कार्यान्वित असलेल्या महात्मा ज्योतीबा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत दाखल होणाऱ्या रुग्णांचे रक्त व लघवीचे नमुने तपासून रिपोर्ट सादर करण्याचे काम निविदेद्वारे मिळालेले होते. तक्रारदार याच्या लॅबच्या विरोधात तक्रारी अर्ज आला होता हा तक्रारी अर्ज पुढील चौकशीकामी जिल्हा समन्वयक डॉ. माधव जोशी यांच्याकडे होता. या तक्रारी अर्जाच्या अनुषंगाने डॉ. माधव जोशी यांनी तक्रारदार यांना संपर्क साधून लॅबविरुध्द रिपोर्ट पाठविल्यास महात्मा ज्योतीबा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत केलेल्या कामाचे उर्वरीत बिल निघणार नाही अशी भिती डॉ. जोशी यांनी तक्रारदाराला दाखविली होती. तक्रारदाराच्या लॅबच्या कामाबाबत तक्रार प्राप्त झाली असून तुमच्या बाजूने अहवाल वरिष्ठांना पाठवितो असे सांगून डॉ. जोशी यांनी २ लाख रुपये लाचेची मागणी केली होती. त्यानंतर डॉ. जोशी यांनी पहिला हप्ता म्हणून तडजोडीअंती १ लाख रुपये लाचेची मागणी केली.

दरम्यान, तक्रारदाराने लाचलुचपत प्रतिबंधक विभागाशी संपर्क साधून तक्रार दाखल केली. या तक्रारीची पडताळणी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्यावतीने करण्यात येऊन १८ डिसेंबर रोजी जिल्हा शल्य चिकित्सक कार्यालयाच्या आवारात सापळा लावून डॉ. जोशी यांना लाचेची १ लाख रुपयांची रक्कम स्विकारल्यानंतर रंगेहात पकडले. याबाबत सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याचे काम रात्री उशिरापर्यंत सुरु होते.

ही कारवाई अधिक्षक शिरीष सरदेशपांडे, अप्पर अधिक्षक शीतल जानवे यांच्या मार्गदर्शनाखाली उपअधिक्षक गणेश कुंभार, हवालदार श्रीराम घुगे, राजू पवार, सचिन राठोड, शाम सुरवसे यांनी केली.

# गहू, हरभऱ्याला थंडीचा फायदा

**सोलापूर गारठले; ज्वारीला धोका**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ डिसेंबर-**

गेल्या २ दिवसांपासून सोलापुरात तापमानाचा पारा चांगलाच खाली येताना दिसत आहे. त्यामुळे थंडी वाढली आहे. उत्तरेकडे थंड वाऱ्याचा जोर वाढल्याने अंदमानातील समुद्रात कमी दाबाचे क्षेत्र निर्माण झाले आहे. त्यामुळे राज्यात सर्वत्र कडाक्याची थंडी पडली आहे. यामुळे सायंकाळी ६ नंतर हुडहुडी भरण्यास सुरूवात होते. तर या थंडीचा फायदा गहू, हरभरा पिकाला होणार असून, ज्वारी पिकावर मात्र करपा व इतर रोग पडण्याची भीती जाणकार शेतकरी बांधव वर्तवित आहेत.

सध्या मुंबई, पुणे, कोकण, विदर्भ, मराठवाडा यांसह ठिकठिकाणी तापमानात घट झाल्याचे पाहायला मिळत आहे. सोलापुरातही सध्या थंडीची तीव्रता वाढली आहे. पहाटेच्या वेळी अंगाला झोंबणारी थंडी



जाणवत आहे. सोलापुरातील पारा ३० ते ३२ अंश सेल्सिअस पर्यंत घसरला. त्यामुळे सोलापूरकरांना चांगलीच हुडहुडी जाणवायला सुरुवात झाली आहे. राज्यातही सर्वत्र थंडीची लाट पाहायला मिळत आहे. सकाळी काही भागात धुक्याची चादर घेतल्यासारखे वातावरण निर्माण होते आणि पिकांवर विविध प्रकारचे रोग पडत असल्याची भीती जाणकार शेतकरी वर्तवित आहेत. मागील चार दिवसांपासून हवामानातील बदल आणि निरभ्र आकाश यामुळे किमान तापमानात झपाट्याने घट झाली आहे. त्यामुळे सोमवारपासूनचा तापमानाचा पारा ३१ ते ३२ अंशापर्यंत खाली आला.

गेल्या २४ तासांत पारा दोन ते तीन अंशांनी घट असून, पुढील दोन दिवस थंडीचा जोर कायम राहणार आहे, असा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे. यामुळे ऊबदार कपडे खरेदी करण्यासाठी सोलापूर शहरात रोज रात्री उशिरापर्यंत नागरिकांची मोठ्या प्रमाणात गर्दी होत आहे.

# माजी आमदाराची फसवणूक

**सख्खा भाऊ, पुतण्याविरुध्द गुन्हा**

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १८ डिसेंबर -**

शेत जमीनीवर परस्पर नाव नोंदवून मोठ्या भावानेच तहसिलदाराच्या मदतीने सोलापुरातील माजी आमदाराची फसवणुक केल्याप्रकरणी तिघांविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत माजी आ. विश्वनाथ बाबुराव चाकोते (वय ६५, रा. जोडभावी पेठ, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन त्यांचा भाऊ महादेव बाबुराव चाकोते, पुतण्या जयशंकर महादेव चाकोते आणि तत्कालीन तहसिलदार उत्तर सोलापूर यांच्याविरुध्द सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. शहर उत्तरचे माजी आमदार विश्वनाथ बाबुराव चाकोते यांची शेतजमीन उत्तर सोलापूर तालुक्यातील कारंबा येथे गट नं.११२/१ अशी असून त्यावर विश्वानाथ यांच्यासह मोठा भाऊ महादेव चाकोते यांच्यासह चारजणांची नावे होते. ती जमीन विश्वनाथ चाकोते यांच्या कब्जे वहिवाईटीत असताना त्यांचा मोठा भाऊ महादेव चाकोते याने विश्वनाथ यांना कसलीच माहिती न देता त्यांचे नाव कमी करून




परस्पर शेतजमीनीवर तत्कालीन तहसिलदार उत्तर सोलापूर यांच्या मदतीने स्वतःचे आणि त्यांचा मुलगा जयशंकर महादेव चाकोते यांचे नाव लावून घेतले. तसेच नवसमता ट्रान्सपोर्ट या विश्वनाथ चाकोते यांच्या वडिलोपार्जित व्यवसायाच्या नावाने हैदराबाद येथील ऑटो नगर मध्ये असलेली जमीन परस्पररित्या त्यांची नाव वगळून त्यांना कोणतीही माहिती न देता मूळ कागदपत्रे गहाळ करून नव्याने बनावट कागदपत्रे तयार करून बाबुराव चाकोते यांचा मीच एकटा वारसदार आहे असे भासवून महादेव चाकोते याने अधिकाऱ्यांशी संगनमत करून विश्वनाथ चाकोते यांची फसवणुक केली तसेच तुम्ही कसे जमीन घेता ते बघतो अशी धमकी दिली. म्हणून सदर बझार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. महिला पोलिस उपनिरीक्षक संजीवनी व्हट्टे पुढील तपास करीत आहेत. तसेच हैदराबाद येथील हयात नगर पोलीसांकडे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# शहरात थंडीची हुडहुडी कायम, बुधवारी @१२.४

**शुक्रवारपर्यंत राहणार गारठा हवामान खात्याचा अंदाज**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१८ डिसेंबर**

सोलापूर शहरात गेल्या सहा दिवसांपासून कडाक्याची थंडी वाढल्याचे जाणवत आहे. बुधवारी तापमान १२.४ अंश सेल्सियस होते. ही परिस्थिती, शुक्रवारपर्यंत कायम राहण्याचा अंदाज हवामान खात्याचा आहे. त्यानंतर हवामान काहीसे उबदार होण्याची शक्यता आहे. दरम्यान, सोमवारच्या तुलनेत मंगळवारी किमान तापमानात १.४ अंशाने वाढ होऊन १२.९ अंश सेल्सियस नोंदवले गेले. कमाल तापमान मात्र, ३२.३ अंश होते. १० डिसेंबरपासून मात्र किमान तापमानात सतत घट झाली आहे. त्यातच हिमालयात होणारी बर्फवृष्टी आणि उत्तरेतून येणाऱ्या थंड हवेमुळे सोलापूरचे किमान तापमान ११.५ अंशांपर्यंत खाली आहे. मागील पाच वर्षानंतर पहिल्यांदाच सर्वाधिक गारठा सोलापूरकरांना अनुभवता आला.

**१२ अंशांवर रेंगाळतोय पारा**

उत्तरेकडून येणाऱ्या थंड हवेमुळे शहरात सोलापूरकरांना हुडहुडी भरली आहे. दि.११ डिसेंबरला किमान तापमान १९.४ अंश होते. ते ३ अंशांनी कमी होऊन दि.१२ डिसेंबरला १६.४ अंश झाले. ते दि.१४ डिसेंबरपर्यंत १६ अंशाच्या आसपास रेंगाळत राहिले. दी.१५ डिसेंबरला मात्र, दोन अंशांनी घटून १४ अंश सेल्सियस नोंद झाली. त्यानंतर दि.१६ डिसेंबरला ते ११.५ वर आले. तेव्हापासून गेले तीन दिवस किमान तापमान ११ आणि १२ अंशावर रेंगाळत असल्याने उबदार कपड्याचा आधार घेण्याचे आवाहन वैद्यकीय तज्ज्ञांकडून करण्यात येत आहे.




**थंडीपासून संरक्षण होण्यासाठी व्यायाम आवश्यक**

सोलापूर शहर जिल्ह्यात गेल्या अनेक दिवसांपासून गारठा मोठ्या प्रमाणात वाढत आहे. गारव्याच्या परिस्थितीत शरीराला व्यायामाची आवश्यकता असते. आपले शरीर गरम राहणे गरजेचे आहे. त्यामुळे व्यायाम करावा, सकस आहार घ्यावा आणि आजार टाळावा.

**-संतोष नवले, आरोग्य अधिकारी जिल्हा परिषद सोलापूर.**

**शहरात थंडीचा कडाका वाढल्याने शरीराचे संरक्षण करावे**

सोलापूर शहरात गेल्या सहा दिवसांपासून कडाक्याची थंडी जाणवत आहे. थंडीमध्ये विविध आजार बळावण्याची शक्यता आहे. विशेषतः रक्त गोठून हार्ट अटॅक आणि ब्रेन स्ट्रोक येण्याची शक्यता जास्त असते. अशाच पद्धतीने सर्दी,खोकला, ताप, वायरल इन्फेक्शन होऊ शकते यासाठी नागरिकांनी तात्काळ वैद्यकीय सेवा घ्याव्यात.

**-राखी माने, आरोग्य अधिकारी सोलापूर महापालिका**

# उद्योजकांनी आंतरराष्ट्रीय गारमेंट बाजारपेठांमध्ये उतरावे

**राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांचे प्रतिपादन**

**आठव्या आंतरराष्ट्रीय गारमेंट फेअरचा बेंगळूरु येथे शुभारंभ**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ डिसेंबर-**

सोलापूरच्या गारमेंट उद्योजकांमध्ये एकी आहे. याच एकीच्या बळावर देशातील बाजारपेठांसोबत आंतरराष्ट्रीय गारमेंट बाजारपेठांमध्येही सोलापूरच्या उद्योजकांनी उतरावेत. त्यांची ती क्षमता आहे. गुणवत्ता, विश्वासार्हता आणि प्रामाणिकपणा या त्रिसूत्रीच्या आधारावर निश्चितच आंतरराष्ट्रीय गारमेंट बाजारपेठांमध्ये सोलापूरकर छाप पाडतील असा विश्वास महाराष्ट्र राज्याचे राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांनी व्यक्त केला आहे.

सोलापूर गारमेंट मॅन्युफॅक्चरर असोसिएशनच्या वतीने आयोजित आठव्या आंतरराष्ट्रीय गारमेंट फेअरचे बेंगलुरु येथे बुधवारी थाटात उद्घाटन झाले. बेंगळुरू येथील शृंगार पॅलेस ग्राउंडवर राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांच्या हस्ते तीन दिवसीय फेअरचे उद्घाटन झाले. यावेळी आमदार सुभाष देशमुख, रिलायन्स कंपनीच्या कंज्यूमर विभागाचे सहाय्यक उपाध्यक्ष शरद कुमार, सोलापूर गारमेंट मॅन्युफॅक्चरर असोसिएशनचे अध्यक्ष निलेश शहा, फेअर कमिटीचे अध्यक्ष सुनील मेंगजी, सचिव व्यंकटेश मेंगजी आदी उपस्थित होते. असोसिएशनचे संचालक अमित जैन यांनी सूत्रसंचालन तर प्रकाश पवार यांनी आभार मानले. या फेअर मध्ये १०४ गारमेंट कंपन्यांचे स्टॉल असून यात १२० युनिफॉर्म ब्रँड तसेच बारा हजाराहून अधिक डिझाइन्सचा समावेश आहे.



राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन म्हणाले, त्रिपुरा येथील गारमेंट उद्योजकांनी मार्केटिंग कौशल्याच्या आधारे डोमेस्टिक मार्केटसोबत आंतरराष्ट्रीय मार्केटमध्ये आपली एक वेगळी छाप पाडली. त्रिपुराच्या पार्श्वभूमीवर सोलापुरातील गारमेंट उद्योजकही तशी प्रगती करू शकतात. पंतप्रधान नरेंद्र मोदी हे आपल्या भाषणात सोलापूरच्या गारमेंट उत्पादनाबद्दल आवर्जून उल्लेख करतात. हे येथील उद्योजकांचे यश आहे. सोलापुरात तयार होणारे युनिफॉर्म हे युनिव्हर्सल आहे. त्यामुळे युनिफॉर्म क्षेत्रातील त्यांची क्षमता त्यांनी देशाच्या संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांच्यासमोर सादर करणे गरजेचे आहे. यामुळे भविष्यात त्यांना संरक्षण विभागातील विविध युनिफॉर्मचे ऑर्डर्स मिळू शकतात. गारमेंट उद्योगात सक्रिय उद्योजकांनी उलाढालीची चिंता न करता त्यांनी मार्केटिंग कौशल्य शिकून निर्यात करण्याचे धाडस केले पाहिजे. सुभाष देशमुख म्हणाले, २०१६ साली गारमेंट उद्योजकांनी माझी भेट घेतली होती. उद्योग अडचणीत असल्याची माहिती दिली. गारमेंट उद्योगातील कामगारही स्थलांतरित होत आहेत. कामगारांचे होणारे स्थलांतर रोखण्यासाठी प्रयत्न करण्याची विनंती त्यांच्याकडून झाली. यातूनच गारमेंट फेअरची संकल्पना पुढे आली. मागील आठ वर्षांपासून आंतरराष्ट्रीय गारमेंट फेअर उत्साहात आयोजिला जात आहे. यास देशासह विदेशातूनही चांगला प्रतिसाद मिळत आहे.

सोलापूरच्या विडी उद्योगात पूर्वी ९० हजाराहून अधिक महिला काम करायच्या. धूम्रपान विरोधी कायद्यामुळे विडी उद्योगावर गंडांतर आले. त्यामुळे विडी महिला कामगारांची संख्या कमी झाली. अनेक महिला बेरोजगार झाल्या. सोलापुरातील गारमेंट उद्योगाने विडी महिला कामगारांना आधार दिला. आज गारमेंट उद्योगात असंख्य महिला काम करत आहेत.

# तपोरत्नं योगीराजेंद्र महास्वामीजी यांच्या पादुकांची उद्या मिरवणूक

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि. १८ डिसेंबर-**

नेताजी सुभाषचंद्र बोस कन्नड भाषा व कन्नड संस्कृती संवर्धक कुंभार समाज शिक्षण प्रसारक मंडळाच्यावतीने श्री बृहन्मठ होटगी मठाचे परमपूज्य गुरुवर्य तपोरत्नं योगिराजेंद्र शिवाचार्य महास्वामीजी यांच्या सातव्या पुण्यस्मरणानिमित्त शुक्रवार २० डिसेंबर रोजी तपोरत्नं पादुकांची मिरवणूक काढण्यात येणार आहे.

सकाळी ७ वाजता नेताजी संस्थेच्या अशोक चौकातील कार्यालयात श्रीच्या पादुकांचे विधिवत सहस्रबिल्वार्चन व महाभिषेक पूजा केल्यानंतर आकाशवाणी रोडवरील नेताजी सुभाषचंद्र बोस शिक्षण संकुलापर्यंत श्रीच्या पादुकांचे पालखी व महास्वामीजींच्या प्रतिमेचे सवाद्य मिरवणुक निघणार आहे. मिरवणूक अशोक चौक,७० फुट, जुना कुंभारी नाका, आकाशवाणी केंद्र, निलम नगर मार्गे नेताजी सुभाषचंद्र बोस हायस्कूल पर्यंत जाऊन ११ वाजता सांगता होणार आहे.



या मिरवणुकीत नेताजी सुभाषचंद्र बोस बालक मंदिर प्राथमिक शाळा, इंग्लिश मीडियम, माध्यमिक शाळा, महाविद्यालय तसेच राजराजेश्वरी बालक मंदिर प्राथमिक व माध्यमिक शाळेतील सुमारे २५०० विद्यार्थ्यांनी अश्वारूढ व बग्गीतील सजीव देखाव्यासह विविध कलागुणांचा लेझीम, झांज, टिपरी, ढोल, झेंडा नृत्य सादर करणार आहेत. सदभक्तांच्या दर्शनासाठी पादुका दिवसभर ठेवण्यात येणार आहे तरी सदभक्तांनी गुरुपादुकांचे दर्शन घेऊन आशीर्वाद घ्यावा. भावीक भक्तांसाठी महाप्रसादाची व्यवस्था करण्यात आली आहे.

सांयकाळी ६ बक्षीस वितरण व भावभक्तीगीतांचा कार्यक्रम होणार आहे. रात्री १०.०५ वाजता आत्मज्योतीचे दिपप्रज्वलन व श्रद्धांजली समर्पण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. तरी सदभक्तांनी श्रीगुरुच्या कार्यक्रमास उपस्थित रहावे असे आवाहन संस्था अध्यक्ष अण्णाराव कुंभार यांनी केले आहे.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.
सोलापूर तरुण भारत

## ज्ञानामृत आनंदलहरी -९७९

**येवढा त्याचा छंद देवा । काय सेवा भक्ती ते ।।**

जगात शोधूनही असा माणूस सापडणार नाही की, ज्याला कोणाच्या प्रेमाची गरज नाही. अर्थात, प्रत्येकाला कोणाच्या का होईना पण प्रेमाची गरज असतेच. कारण प्रेम हा मानवी जीवनाचा आधारस्तंभ आहे. मुके प्राणीसुध्दा एकमेकांवर प्रेम करतात. मुलांचे आई-वडीलांवर, आई-वडीलांचे मुलांवर, विद्यार्थ्यांचे-गुरुजनांवर, गुरुजनांचे-विद्यार्थ्यांवर, नागरीकांचे देशावर असे अनेकांचे अनेकांवर प्रेम असते. ज्याच्या जीवनात प्रेमाला स्थानच नाही, त्याच्या जीवनाला अर्थच नाही, असे म्हटले तर चुकीचे होईल असे वाटत नाही. प्रेमाविना असलेला देह म्हणजे चालते-बोलते प्रेत होय. माणूस माणसांवर जसे प्रेम करतो तसे तो देवावरही करतो. भगवंतावर प्रेम करणाऱ्यांची संख्या कमी नाही. सर्व मानवजातींवर, प्राणीमात्रांवर प्रेम करणारा भगवंतावर आपोआप प्रेम करु लागतो. ज्याला जीवमात्रावर प्रेम नाही, त्याला भगवंतावर प्रेम असूच शकत नाही. माणूस जसा भगवंतावर प्रेम करतो तसा भगवंतही माणसांवर प्रेम करतो. माणसांप्रमाणे भगवंतही प्रेमाचा भुकेला आहे. प्रेमापोटी त्याला कसल्याही कार्याची, सेवेची लाज वाटत नाही. याची अनेक उदाहरणे आहेत. गोकुळातील ताक पिणारी गवळयांची पोरे भगवंतांनी खूप जवळ केली होती. त्यांच्यासाठी भगवंतांने वाट्टेल ते केले.



या गवळयांच्या पोराएवढी भगवंतांनी कोणाचीही सेवा केली नाही. त्याने हे सर्व केवळ नि:स्वार्थ प्रेमापोटी केले. हे स्पष्ट करतांना तुकाराम महाराज म्हणतात,

**येवढा त्याचा छंद देवा । काय सेवा भक्ती ते ।।**

भगवंताला कांही दुष्काळ पडला होता की उपास घडला होता ? त्याने विदुराच्या कन्या का भक्षिल्या? कुब्जादासी अनेक ठिकाणी वाकडी होती, ती दिसायलाही विद्रुप होती. तरीपण भगवंताने तीची सेवा का केली. शबरीच्या उष्टया बोराची किंवा सुदामाच्या कोरडया पोह्याची त्याला प्रचंड किंमत वाटण्याचे कारण काय होते? महाराज म्हणतात की, या सर्व प्रश्नांची उत्तरे ही फक्त प्रेम हे होय. प्रेमासाठी भगवंत भक्तांची कांहीही सेवा करतो. स्वत:चे सर्वस्व, मोठेपण तो विसरुन जातो. त्याला धन-संपत्तीची कमी नाही. त्याला कमी आहे ती फक्त प्रेमाची. मानवी जीवनातही प्रेमाला असेच महत्व आहे. प्रेम मिळाले नाही तर मानवाला जगावे वाटत नाही. प्रेमासाठी अनेक लोक देह त्यागतात. देह त्यागणे चुकीचे आहे. आपणाला प्रेम मिळाले नाही म्हणून देह त्यागणे म्हणजेच स्वत:वर व आपल्या प्रेमावर जगणाऱ्यांवर, आपल्यावर प्रेम करणा-यांवर अन्याय करणे होय. आपणालाही माहिती नसते की, आपल्यावर कोण-कोण प्रेम करीत आहे. कोणी आपल्या स्वभावावर, कोणी वर्तनावर तर कोणी आणखी कशावर प्रेम करीत असते. प्रत्येकाजवळ इतरांना देण्यासारखे कांही तरी असतेच. इतरांना देण्याचा हा गुण प्रेमाची निर्मिती करतो. चांगले वागणाऱ्यांवर प्रेम करणारे कमी नाहीत. कांहींना तर इतरांकडून प्रेम स्विकारण्यास वेळही मिळत नाही. तरीपण लोक एकतर्फी प्रेम करीतच असतात. भगवंतांच्या बाबतीत मात्र असे घडत नाही. लाखों भक्तांनी प्रेम केले तरी तो सर्वांच्या प्रेमाचा स्विकार करतो, आणि तोही सर्वांवर प्रेम करतो. तो कोणाचेही प्रेम स्वत:कडे ठेवून घेत नाही. जेवढे दिले त्यापेक्षा जास्त परत करण्याचा त्याचा स्वभाव आहे. भगवंतावर प्रेम करायचे म्हणजे मानवतेची जोपासणूक करायची असते. प्राणीमात्रांवर नि:स्वार्थ प्रेम करायचे असते. अडी-अडचणीत सापडलेल्यांना मदत करायची असते. सर्वांवरचे प्रेम म्हणजेच भगवंतावरचे प्रेम होय. अशा प्रेमाने जीवनातील आनंदलहरी वाढत जातात. जीवन जगण्याला छानसा अर्थ मिळतो.

**जय जय रामकृष्ण हरी।**

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

| | |
|---|---|
| वार : गुरुवार | दिनविशेष - |
| दि. १९ डिसेंबर २०२४ | चांगला दिवस |
| विक्रम संवत् २०८०-८१ | गोवा मुक्तिदिन |
| शके - १९४६ | ....राहू काल.... |
| संवत्सर - क्रोधी नाम | रविवार : दु.४.३० ते ६.०० |
| मास - मार्गशिर्ष | सोमवार : स. ७.३० ते ९.०० |
| कृ. चतुर्थी - (१०.०२) | मंगळवार : दु. ३.०० ते ४.३० |
| ऋतु - वसंत | बुधवार : दु. १२ ते १.३० |
| नक्षत्र - आश्लेषा (२५.५९) | गुरुवार : दु. १.३० ते ३.०० |
| योग - वैधृति (१८.३३) | शुक्रवार : स.१०.३० ते १२ |
| करण - कौलव (२२.१९) | शनिवार : स. ९ ते १०.३० |

### राशीभविष्य

**मेष** : आपण फार कार्यरत व व्यस्त रहाल. व्यापार नौकरीमध्ये हितचिंतकांची मदत मिळेल. कोणतेही काम विचारपूर्वक करा. कुटुंबातील वातावरण आनंदी

**वृषभ** : आध्यात्मिक अंगीकरल्यामुळे मन शांत राहील. आर्थिक स्थिती सुधारेल, मनोधैर्य वाढेल. नवीन योजना अमलात आणण्याचा प्रयत्न.

**मिथुन** : नवीन कामाच्या संधी मिळतील. बुद्धी किंवा तर्काने आपल्या कामात यश मिळेल. घरातील व्यक्तिंचे आपणास सहकार्य मिळेल. कायद्याच्या प्रकरणात बेजबाबदारपणा दाखवू

**कर्क** : व्यापारासाठी केलेला प्रवास फायदेशीर राहील. आर्थिक समस्या दूर होईल. शत्रू आपली प्रतिमा खराब करण्याचा प्रयत्न करतील.

**सिंह** : व्यापारात यश मिळेल. गृहपयोगी वस्तुंची खरेदी कराल. कुटुंबात, समाजात आपली प्रतिष्ठा वाढणार आहे. नवीन योजनेमुळे फायदा होईल.

**कन्या** : पराक्रमात वाढ होईल. शुभ कार्यासाठी पैसा खर्च होईल. नवीन संबंध फायदेशीर ठरतील. कौटुंबिक समस्येकडे विशेष लक्ष द्या.

**तुळ** : मनोबल वाढल्याने तणाव कमी होईल. मुलांकडून शुभ बातमी मिळेल. मोठ्या व प्रतिष्ठीत व्यक्तिंचा संप येईल. व्यापारीक निर्णय घेण्यास उशीर करू नका.

**वृश्चिक** : प्रेम संबंधाात यश मिळेल. राजकीय व्यक्तींपासून फायदा होईल. बऱ्याच दिवसापासून अडकलेले काम पूर्ण होईल.

**धनु** : कर्ज काढावे लागेल. मितभाषी बना. कुटुंबात किंवा कामाच्या ठिकाणी निष्कारण वाद होण्याची शक्यता आहे.

**मकर** : आज आपल्याला रागावर नियंत्रण ठेवावे लागेल. आज अचानक पैसा आल्यामुळे खर्चात वाढ होईल. व्यापार विस्तारासाठी प्रयत्न यशस्वी होतील.

**कुंभ** : आपल्या योजना असफल होतील. मान प्रतिष्ठेला देखील धक्का पोहचू शकतो. निष्कारण कोणत्याही गोष्टीवर वाद करू नका.

**मीन** : आत्मविश्वासामुळे कठीण काम देखील पार पडणार आहे. घरगुती समस्या आज दूर होतील. व्यवसायात विशेष फायदा होईल. बोलण्यावर नियंत्रण ठेवा. नवीन योजना अमलात आणा.

# 'त्या' १४९ गुरुजींना मिळणार जुनी पेन्शन

### शिक्षणाधिकारी कादर शेख यांनी गटशिक्षण अधिकाऱ्यांमार्फत त्या शिक्षकांना दिले शासन आदेश

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ डिसेंबर-**

सोलापूर जिल्ह्यातील १ नोव्हेंबर २००५ पूर्वी पदभरतीची जाहिरात निघाली. नियुक्ती मात्र नंतर देण्यात आली. अशा सोलापूर जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षण विभागात कार्यरत असणाऱ्या १४९ प्राथमिक शिक्षकांना शासनाच्या १ ऑक्टोबर २०२४ च्या निर्णयानुसार जुनी पेन्शन योजना लागू करण्यात आली आहे. त्यास प्रभारी मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहिनकर यांनी मान्यता दिली आहे. तसे आदेश प्राथमिक शिक्षणाधिकारी कादर शेख यांनी गटशिक्षण अधिकाऱ्यां मार्फत त्या १४९ शिक्षकांना दिले आहेत.



दरम्यान, १ नोव्हेंबर २००५ पूर्वी पदभरती जाहिरात, अधिसूचना निर्गमित झालेल्या प्रकरणात शासन सेवेत १ नोव्हेंबर २००५ रोजी किंवा त्यानंतर रुजू झालेल्या शासकीय अधिकारी कर्मचाऱ्यांना केंद्र शासनाच्या धर्तीवर जुनी निवृत्ती वेतन योजना लागू करण्याबाबत ग्राम विकास विभागाने जिल्हा परिषद सामान्य प्रशासन विभागाला सूचना केल्या होत्या. तसा शासन निर्णय १ ऑक्टोबर २०२४ रोजी काढण्यात आला होता. सदर शासन निर्णयाच्या अनुषंगाने जिल्हा परिषद अंतर्गत १४९ शिक्षकांना एक वेळ पर्याय हा शिक्षण विभागास दिला असल्याने संबंधित शिक्षकांना केंद्र शासनाच्या धर्तीवर जुनी निवृत्ती वेतन योजना लागू करण्यात आली आहे.

**जुनी पेन्शन लागू झालेल्या शिक्षकांची तालुका निहाय संख्या**

मंगळवेढा - ८, बार्शी - ८, करमाळा - २६, सांगोला - २०, पंढरपूर - २६, मोहोळ - २९, उत्तर सोलापूर-१६, माढा- ५, माळशिरस - ६, अक्कलकोट - ५ एकूण - १४९.



# हरिभाई देवकरण प्रशालेतील १९६६ सालचे विद्यार्थी आले एकत्र

### पानशेत रोड, खडकवासला, पुणे येथे भरला माजी विद्यार्थ्यांचा मेळावा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापर, दि.१७ डिसेंबर-**

शाळेतील मस्ती, एकत्रितपणे केलेला अभ्यास, शिक्षकांचा विद्यार्थ्यांवरील वचक, शाळेतील क्रीडा स्पर्धा, शिक्षकांनी दिलेली शिक्षा, स्नेहसंमेलन अशा विविध विषयांवर माजी विद्यार्थ्यांनी गप्पा करून जुन्या आठवणींना उजाळा दिला निमित्त होते सोलापुरातील हरीभाई देवकरण प्रशालेच्या माजी विद्यार्थ्यांच्या मेळाव्याचे.

येथील हरीभाई देवकरण प्रशालेचे सन १९६६ चे माजी विद्यार्थी तुम्ही म्हणाल, मग हे आत्ताच सांगायचं कारण काय? अगदी कारणही तसंच घडलं ना. मागील महिन्यात २०२४ आम्ही ५२ जण वर्ग बंधू-भगिनींचा अमृत महोत्सव म्हणजेच ७५ वा वाढदिवस साजरा करण्यासाठी एकत्र जमलो होतो. ठिकाण होतं. ऋतुगंध लेकसाईड लिजर रिसॉर्ट, पानशेत रोड, खडकवासला पुणे. तसं तर हे सर्वजण सन १९९२ पासून दर एक वर्षाआड स्नेहसंमेलन साजरे करत असतात. हे १४ वे संमेलन होते. या संमेलनाचं वैशिष्ट्ये म्हणजे आम्हां सर्व मित्रांचे मैत्रीचे रेशीम बंध जुळले ते इयत्ता पाचवीत प्रवेश घेतला, तेव्हा म्हणजेच सन १९५९ साली या मैत्रीला आता कुठे ६६ वं वर्ष लागलं आहे.

१९६६ साली मॅट्रिक पास होऊन बेगमी दुनियेत प्रवेश केला ह्या गोष्टीला ५९ वे वर्ष लागलं आहेत ९३ वर्ष पूर्ण झालेले आमचे त्यावेळचे मुख्याध्यापक श्रीधर अनंत पाटणकर यावेळी उपस्थित होते. १३ नोव्हेंबरची संध्याकाळ खरंच अविस्मरणीय, सांज समयी ६.३० वाजता दीप प्रज्वलन, प्रास्ताविक इ औपचारिकता झाल्यानंतर ५२ मुला-मुलींचा सत्कार केला. आमच्यापैकी काहींचे जोडीदार संमेलनास उपस्थित होते. त्यांचा सत्कार आशा पाटणकर यांचे हस्ते करण्यात आले. दुसऱ्या दिवशीची संध्याकाळ मुंबई आकाशवाणीच्या वृत्त निवेदिका श्रद्धा वझे यांनी थोर साहित्यिका अमृता प्रितम यांच्या साहित्यावर आधारित सांस्कृतिक कार्यक्रमाने संपन्न झाली. आमच्या १९६६ मित्र परिवाराच्या या घट्ट, अतूट, निस्वार्थ दोस्तीचं इंगित जाणून घ्यायचे असेल तर थोडं मागे वळून पहावं लागेल ना. सन १९६६ साली शाळा सोडल्यानंतर प्रत्येकजण व्यवसाय-नोकरीसाठी दूर गेलो तरी मनाने जवळच होते ग्रुपनी राहायचे पण दोघं-चौघंच भेटत असायचे आणि सर्वांनी एकत्र येण्याविषयी बोलत असत. त्याला मूर्त स्वरुप आलं ते १९९२ साली रौप्य महोत्सव साजरा करण्यासाठी येथील आमचे मित्र दत्ता आण्णा सुरवसे यांच्या पोल फॅक्टरीवर एक दिवसाच्या संमेलनासाठी जमलो. त्यावेळी दुसरे एक दिवसीय संमेलन सन १९९८ ला नाकोडा रिसॉर्ट, सोलापूर, २००१ सालापासूनची संमेलने तीन दिवस दोन रात्री अशी सुरु झाली. २००१ महाबळेश्वर, २००३ हैद्राबाद, २००५ अलिबाग, २००८ अंबाघाट, २०१० अलमट्टी, कुडलसंगम आणि या दोस्तीचा आमचा हीरक महोत्सव सन २०१२ पन्हाळगड, २०१४ औरंगाबाद, २०१६ ह. दे. प्रशाला सोलापूर सन १९६६-२०१६ सुवर्ण महोत्सव, २०१७ गोवा, २०१९ वाई, २०२२ खोपोली आणि २०२४ साली तर काय सांगावे आमच्या या प्रत्येक संमेलनात आम्ही जोडीदार धरुन ७०-७५ जण असतोच. तसेच आमचे मुख्याध्यापक पाटणकर, टी. डी. कुलकर्णी, चंद्रशेखर जेऊरकर, पुष्पा आगरकर, पानसरे-टिकेकरांपैकी कोणी ना कोणी बरोबर असतेच.

आतापर्यंतच्या संमेलनात २०१६ चा सुवर्ण महोत्सव साजरा झाला. त्यावेळी १२० ते १२५ वर्ग बंधू-भगिनी, तर काहींचे जोडीदार आमचे त्यावेळेचे शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी असे १७५ ते १८० जण उपस्थित होते.

# शहराच्या मुख्य प्रवेशद्वार स्वच्छता कामकाजाची अधिकाऱ्यांनी केली पाहणी



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ डिसेंबर-**

विशेष स्वच्छता मोहीमे अंतर्गत शहराच्या मुख्य प्रवेशव्दार स्वच्छता कामकाजाची महापालिका अधिकारी व राष्ट्रीय महामार्गाच्या अधिकाऱ्यांनी पाहणी केली.

अधिकाऱ्यांनी या कामकाजाबाबत समाधान व्यक्त करून आवश्यक त्या मार्गदर्शक सूचना दिल्या. सोलापूर महापलिकेच्या वतीने दि. २ ते १९ डिसेंबर या कालावधीमध्ये आयुक्त शीतल तेली-उगले यांच्या आदेशानुसार सर्व मुख्य रस्ते आणि परिसराची विशेष स्वच्छता मोहीम राबविण्यात येत आहे. यासोबतच शहरातील मुख्य प्रवेशव्दारांची व परिसराची स्वच्छता करण्याबद्दल महापालिका अधिकारी व राष्ट्रीय महामार्गाचे अधिकारी यांनी संयुक्तपणे नियोजन केलेले आहे. यामध्ये रोड डिव्हाडरलगत व फुटपाथलगत साचलेली माती काढणे, डिव्हाडरमधील कचरा काढणे, डिव्हाडरमधील वाढलेली झाडे छाटणी करणे इत्यादी कामे हाती घेण्यात आली आहेत. यामुळे हा परिसर स्वच्छ व धूळमुक्त होण्यास मदत होणार आहे. या अंतर्गत दि.१७ डिसेंबर रोजी सकाळी महापालिका अतिरिक्त आयुक्त रवि पवार, राष्ट्रीय महामार्गाचे प्रोजेक्ट डायरेक्टर राकेश जवादे, व्यंकट रेड्डी यांनी केलेल्या कामाची प्रत्यक्ष पाहणी केली. त्यांच्या समवेत महापालिका सहाय्यक आयुक्त शशिकांत भोसले, मुख्य सफाई अधिक्षक नागनाथ बिराजदार, मुख्य आरोग्य निरीक्षक मेंडगुळे, मुख्य आरोग्य निरीक्षक लोखंडे आदी उपस्थित होते.



# सिंहगड इन्स्टिट्यूटमध्ये आरोग्य तपासणी शिबिर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ डिसेंबर-**

केगाव येथील एनबीएन सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालयात भारत सरकारच्या आयुष्य मंत्रालयाच्या देश की प्रकृती अंतर्गत सोमवारी (ता. १६) विद्यार्थ्यांसह शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची आरोग्य तपासणी झाली.

हे शिबिर सिंहगड इन्स्टिट्यूटच्या राष्ट्रीय सेवा योजना विभाग आणि सेठ गोविंदजी रावजी आयुर्वेद महाविद्यालय यांच्या सहकार्याने राबविण्यात आले. शिबिरास चांगला प्रतिसाद लाभला. अनेकांनी ॲप मोबाइलमध्ये डाउनलोड करुन घेतले. या शिबिरात शेठ गोविंदजी रावजी आयुर्वेद महाविद्यालयाचे ३० डॉक्टर प्रतिनिधींनी विद्यार्थ्यांना या आरोग्य तपासणीविषयी माहिती दिली. सिंहगडच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या विद्यार्थ्यांनीही सहकार्य केले. या शिबिराचे समन्वयक प्रा. एम. टी. शिंदे यांनी विद्यार्थ्यांच्या स्वयंसेवकांसह या उपक्रमाचे व्यवस्थापन केले.

या शिबिरामध्ये ३०० हून अधिक विद्यार्थी व कर्मचा-यांची प्रकृती तपासणी केली. प्राचार्य डॉ. शंकर नवले यांच्या हस्ते आयुर्वेद तज्ज्ञ डॉ. स्मिता गोटीपामूल आणि डॉ. एन. एस. गंगासागर यांचा सत्कार केला. २६ नोव्हेंबर ते २५ डिसेंबर या कालावधीत देशभरात आरोग्य तपासणी मोहीम राबविण्यात येत आहे. त्या अनुषंगानेच सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालयात राबविण्यात आल्याचे सांगितले. सिंहगड महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. डी. नवले, उपप्राचार्य शेखर जगदे यांची प्रमुख उपस्थिती होती.

# जीवनगौरव पुरस्काराने डॉ. येळेगावकर सन्मानित

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ डिसेंबर-**

कुटुंबनियोजन, सुरक्षित गर्भपात, एडस्, कॅन्सर, आपत्ती व्यवस्थापनात प्रजनन आरोग्य सेवा, सर्वकष लैंगिकता शिक्षण, लसीकरण, महिला सक्षमीकरण इत्यादी सेवा देणाऱ्या फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडियाच्या हीरक महोत्सवी समारंभात सोलापूरचे डॉ. श्रीकांत येळेगावकर यांचा जीवनगौरव पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला.



मुंबईमधल्या बॉम्बे हॉस्पीटलच्या प्रांगणातील एस.पी. जैन ऑडिटोरियम, येथे या समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. हा पुरस्कार फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडियाचे राष्ट्रीय उपाध्यक्ष विजय सिम्हा, महासंचालक डॉ. कल्पना आपटे, राष्ट्रीय युवा प्रतिनिधी आकृती परमार यांच्या हस्ते देण्यात आला. यावेळी राष्ट्रीय अध्यक्षा डॉ.रत्नमाला देसाई, माजी अध्यक्ष डॉ. निना पुरी, डॉ.मोहन तावरगिरी, माजी अध्यक्ष उमेश आराध्या आदी मान्यवर उपस्थित होते. मुंबई येथे झालेल्या या समारंभास सोलापूर शाखेच्या कार्यकारिणी सदस्या प्रा. डॉ. विजया महाजन, शाखाधिकारी सुगतरत्न गायकवाड, कार्यक्रम अधिकारी विरेंद्र परदेशी, युवा प्रतिनिधी साक्षी सर्वगोड उपस्थित होते. त्यांना प्राप्त झालेल्या या सन्मानाबद्दल सोलापूर शाखेचे चेअरपर्सन प्रा. डॉ. एन.बी.तेली, व्हाईस चेअरपर्सन प्रा. डॉ. आयेशा रंगरेज, फायनान्स डव्हायझर सपना चिट्टे, सुकाणू समितीचे सदस्य डॉ. राजीव प्रधान, डॉ. गौरी कहाते, माजी अध्यक्षा डॉ. मंजुश्री कुलकर्णी, प्रा. डॉ. नभा काकडे, उल्हास पाटील, प्राचार्य के. एम. जमादार, प्राचार्य डॉ. बी.जी.अहिरे, युवा प्रतिनिधी ऐश्वर्या सावंत, अपेक्षा सावंत, लक्ष्मण रत्नाकर यांनी अभिनंदन केले.

# आनंदी जीवन हीच मानसिक आरोग्याची संजीवनी

### डॉ. पूजा देखणे : शेठ लोणकरणजी चंडक स्मृती व्याख्यानमालेचे उद्घाटन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ डिसेंबर-**

सोलापूर हिराचंद नेमचंद वाचनालय लोकमान्य टिळक सभागृहात मंगळवारी सायंकाळी विभक्त कुटुंब पद्धती आणि समाज माध्यमांमुळे आपण माणसे एकमेकांपासून दुरावत चाललो आहोत. यावर उपाय म्हणून समाजहिताची कृती करत स्वतः अखंड आनंदी जीवन जगणे हीच मानसिक आरोग्याची संजीवनी आहे, असे प्रतिपादन चाईल्ड सायकॉलॉजिस्ट डॉ. पूजा देखणे (पुणे) यांनी केले.




महाराष्ट्र साहित्य परिषद शाखा सोलापूर आणि शेठ लोणकरणजी जगन्नाथजी चंडक ट्रस्ट आयोजित शेठ लोणकरणजी चंडक स्मृती व्याख्यानमालेचे उद्घाटन मंगळवारी डॉ. पूजा देखणे यांच्या हस्ते हिराचंद नेमचंद वाचनालयाच्या ॲम्फी थिएटरमध्ये झाले. याप्रसंगी व्यासपीठावर डॉ. पूजा देखणे, मसाप सोलापूरच्या अध्यक्षा डॉ. श्रुतीश्री वडगबाळकर, शेठ लोणकरणजी जगन्नाथजी चंडक चॅरिटेबल ट्रस्टचे सचिव डॉ. गिरीष चंडक, विश्वस्त किशोर चंडक, समन्वयक ॲड. जे. जे. कुलकर्णी, मसापचे मुख्य कार्यवाह डॉ. नरेंद्र काटीकर, प्रा. डॉ. सुवर्णा गुंड उपस्थित होते. हिराचंद नेमचंद वाचनालयाच्या ॲम्फी थिएटरमध्ये ही व्याख्यानमाला सुरु असून यंदाचे २८ वे वर्ष आहे.

यावेळी व्याख्यानमालेचे पहिले पुष्प डॉ. पूजा देखणे यांनी संजीवनी मानसिक आरोग्याची या विषयावर गुंफले. डॉ. देखणे म्हणाल्या, तीव्र नकारात्मक भावना दीर्घकाळासाठी अनुभवास आल्या तर मानसिक आरोग्य बिघडते. विभक्त कुटुंब पद्धतीमुळे नात्यांमधील दुरावा, भांडणे, घटस्फोट, लहान मुलांमध्ये वाढणारी स्वमग्नता अशा अनेक गंभीर समस्यांना आपण तोंड देत आहोत. सोशल मीडियामुळे आपली जीवन पद्धती अधिक चांगली राहण्यासाठी आपण अतिरिक्त ताण आपल्यावर घेत आहोत. घरामध्ये पालकांचा आणि मुलांचा संवाद होत नसल्यामुळे मुले अधिक आक्रमक होण्याबरोबरच व्यसनाधीनतेकडे आणि गैरमार्गाकडे वळत आहेत.

मसापचे डॉ. अर्जुन व्हटकर यांनी महाराष्ट्र साहित्य परिषदेची माहिती दिली. किशोर चंडक यांनी प्रास्ताविक केले. डॉ. सुवर्णा गुंड यांनी सूत्रसंचालन तर डॉ. देविदास गुरव यांनी आभार प्रदर्शन केले. याप्रसंगी डॉ. माधवी रायते, अरविंद जोशी, प्रा. डॉ. सुहास पुजारी, डॉ. राजशेखर येळीकर, दीपक कलढोणे, पद्माकर कुलकर्णी आदी उपस्थित होते.



# विज्ञान प्रदर्शनात हर्षवर्धन हायस्कूलचे यश

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ डिसेंबर-**

उत्तर तालुका पंचायत समिती यांच्यावतीने ९ व १० डिसेंबर रोजी नीलम नगर, सोलापूर येथे संपन्न झाल्या उत्तर सोलापूर तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनमध्ये हर्षवर्धन हायस्कूल हिप्परगे तळे येथील विद्यार्थीनी समीक्षा कोळी व कुमारी नम्रता माने इयत्ता नववी हिने सादर केलेल्या लेसर द्वारे ऑडिओ निर्मिती या उपकरणाची माध्यमिक गटात प्रथम क्रमांक आला आहे. या उपकरणाचा वापर आपत्तीच्या काळामध्ये तसेच सैनिकांना संदेश देण्यासाठी होतो तसेच प्राथमिक गटात जुनेद शेख व आर्यन जाधव यांनी सादर केलेल्या ऑटोमॅटिक कार्ड विथ स्मार्ट बिलिंग या उपकरणाचा प्रथम क्रमांक आला आहे. या दोन्ही उपकरणाची जिल्हास्तरीय प्रदर्शनासाठी निवड झाली. या विद्यार्थ्यांना जवंजाळ एस.आर. पांढरमिसे बी. एल. व प्रशालेतील सर्व शिक्षकांचे मार्गदर्शन लाभले. या यशाबद्दल संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी व मुख्याध्यापक लक्ष्मण राऊत व सर्व शिक्षकांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे व त्यांना मार्गदर्शन करणाऱ्या शिक्षकांचे अभिनंदन केले.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## संक्षिप्त वृत्त



### मराठा बटालियनच्या माजी सैनिकांकडून बुर्ज डे साजरा

**अक्कलकोट, दि. १८ डिसेंबर-**

मराठा बटालियनच्या माजी सैनिकांच्या वतीने कोकणातील चिपळूण येथे १५ मराठा बुर्ज डे दिन साजरा करण्यात आला. ६ डिसेंबर १९७१ युद्धाच्या स्मृती प्रित्यर्थ सदरच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते अशी माहिती कॅप्टन श्रीकांत मोरे यांनी दिली. मराठा बटालियन ने १९७१ च्या भारत पाकिस्तानच्या युद्धात राजस्थानच्या सीमेवर बुर्ज पोस्ट येथे पाकिस्तानी सैनिकांचा पाडव केला होता. वीर शिपाई पांडुरंग साळुंखे मुक्काम पोस्ट मनेराजुरी यांनी अतुलनीय कामगिरी करत पाकिस्तानी सैनिकांवर हमला करून त्यांचे बरेच हत्यार जप्त केले होते .तसेच दारूगोळा ही नष्ट केला होता .यावेळी मराठा बटालियन मधील सैनिक पांडुरंग साळुंखे यांना वीरमरण आले. वीर सैनिक पांडुरंग साळुंखे यांना मरणोत्तर महावीर चक्र पुरस्काराने सन्मान करण्यात आला. या बुर्ज डे दिनाचे औचित्य साधून चिपळूण येथे विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमास ब्रिगेडियर मंगेश विटेकर कर्नल बलवंत सिंग (पंजाब) कर्नल बबन जाधव (कोल्हापूर) कर्नल कुटे आदींची प्रमुख उपस्थिती होती. या कार्यक्रमास उपस्थित असलेल्या माजी सैनिकांचा सत्कार श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जन्मेजयराजे भोसले कार्यकारी विश्वस्त अमोलराजे भोसले सचिव शामराव मोरे उपाध्यक्ष अभय खोबरे आदींनी दिलेल्या प्रसाद रुपी प्रतिमा भेट देऊन गौरव करण्यात आला. अक्कलकोटच्या वतीने सर्व माजी सैनिकांचा सत्कार अक्कलकोट येथील मेजर श्रीकांत मोरे कॅप्टन रावसाहेब साळुंखे यांच्या हस्ते श्री स्वामी समर्थांची मूर्ती प्रतिमा देऊन गौरव करण्यात आला. या कार्यक्रमास मेजर अशोक कोठावळे दत्तू माकणे दत्तात्रय हुंडे सदाशिव मोरे शंकर भालेराव, सरवदे आदींसह राज्यातील सर्वच भागातील आजी-माजी सैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



### दत्तूसिंग भैस यांना पंधराव्यांदा एमडीआरटी पुरस्कार प्रदान

**पिलीव, दि. १८ डिसेंबर-**

माळशिरस तालुक्यातील पिलीव येथील विमा प्रतिनिधी दत्तूसिंग बाळूसिंग भैस यांना एल आयसीमध्ये उत्तुंग कार्य केल्याबद्दल सलग पंधराव्यांदा अमेरिकेचा मानाचा एमडीआरटी हा पुरस्कार मिळाला आहे. पिलीव सारख्या ग्रामीण भागात ते १९९९ पासून विमा प्रतिनिधी म्हणून जवळपास २५ वर्ष झाले काम करीत आहेत. त्यांनी सलग पाच वर्ष दरवर्षी एक लाख रुपयाचे भारतीय आयुर्विमा महामंडळाचे बक्षीस म्हणून विमा ग्रामनिधी पिलीव गावाला पंढरपूर शाखेकडून मिळवून दिला आहे. सदरचा पुरस्कार त्यांना ब्रँच मॅनेजर अनोकर ,पंढरपूर विभागाचे विमा विकास अधिकारी शशिकांत निकम यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात आला. त्यांना एमडीआरटी हा पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांचे बखरनामाचे संपादक उमेश घोंगडे, राहुल खलीपे, गोविंद भैस, विठ्ठल भिसन,हनुमंत पिसे,समर्थ जामदार, नितीन गबाले, कुमार भैस, यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर यांच्याकडून त्यांचे अभिनंदन व कौतुक होत आहे.



### केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांची आ. डॉ. देशमुख यांनी घेतली भेट

**सांगोला, दि. १८ डिसेंबर-**

नागपूर येथे केंद्रीय रस्ते, वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांची आ. डॉ. बाबासाहेब देशमुख यांनी सदिच्छा भेट घेतली. यावेळी गडकरी यांचे आशीर्वादही आ. डॉ. देशमुख यांनी घेतले. भेटीदरम्यान आ. डॉ. देशमुख यांनी सांगोला तालुक्यातील राष्ट्रीय महामार्गांच्या विकासासंदर्भात सविस्तर चर्चा केली त्यासाठी ना.गडकरी यांचेकडून सकारात्मक प्रतिसाद मिळाला असून यापुढील काळात सांगोला विधानसभा मतदारसंघातील कामासाठी माझी नेहमी मदत राहील अशी ग्वाही ना.नितीन गडकरी यांनी यावेळी दिली असल्याचे आ. डॉ. बाबासाहेब देशमुख यांनी सांगितले. यावेळी नितीन गडकरी यांनी आबासाहेबांच्या आठवणींना उजाळा दिला. महाराष्ट्राच्या दुष्काळाची दाहकता, दुष्काळ दुखणं आम्हाला गणपतराव देशमुखांमुळे समजली. आबासाहेब हे अनेक वर्षे पाण्यासाठी संघर्ष करत होते. भाजप सरकारने सर्व योजनांना निधी उपलब्ध करून दिल्याने आज हे प्रकल्प पूर्णत्वास आले असून हजारो हेक्टर शेती ओलिताखाली आली असल्याचे सांगत केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी जुन्या आठवणींना उजाळा दिल्या.

# गोयेगांव ते आगोतीदरम्यान उजनीत पूल व्हावा

## खा. सुप्रिया सुळेंची केंद्रीय मंत्री नितीन गडकरींकडे मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा, दि. १८ डिसेंबर-**

उजनी जलाशयात भीमा नदीवर इंदापूर तालुक्यातील आगोती ते करमाळा तालुक्यातील गोयेगाव (वाशिंबे) दरम्यान पूल उभारण्यात यावा, अशी मागणी खासदार सुप्रिया सुळे यांनी केंद्र सरकारकडे केली आहे. या संदर्भात त्यांनी केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री मंत्री नितीन गडकरी यांच्याशी पत्रव्यवहार केला आहे.

गडकरी यांना लिहिलेल्या पत्रात खासदार सुळे यांनी म्हटले आहे की, आगोती ते गोयेगाव वाशिंबे हे अंतर अवघे ४ किलोमीटर आहे. उजनी जलशयामुळे या दोन गावांतील



नागरिकांना भिगवण- टेंभुर्णी मार्गे वळसा मारून रस्त्यामार्गे तब्बल ९० ते १०० किलोमीटर इतके अंतर प्रवास करून जावे लागते. पैसे व वेळेच्या बचतीसाठी लोक होडीतून प्रवास करतात. परंतु हा प्रवास धोकादायक आहे. यापूर्वी अनेकांना यामध्ये जीव गमवावा लागला आहे. त्यामुळे उजनी जलाशयात आगोती ते गोयेगावदरम्यान पूल बांधण्यात यावा, अशी मागणी दोन्ही तालुक्यातील ग्रामस्थांकडून गेल्या अनेक वर्षांपासून होत आहे.

**विकासाला चालना**

उजनी धरण होण्यापूर्वी गोयेगाव ते अगोती दरम्यान नदीपात्रातून बैलगाडीद्वारे वाहतूक होत असे. सध्या याठिकाणी बोटीतून वाहतूक सुरू आहे. गोयेगाव ते आगोती दरम्यान भीमा नदीच्या पात्राची रुंदी ही कमी आहे. दोन्ही किनाऱ्यापर्यंत रस्ते उपलब्ध आहेत. त्यामुळे जमीन संपादनाची ही आवश्यकता भासणार नाही. दोन्ही बाजूकडून ३०० ते ४०० मीटरपर्यंतचे भराव भरून मुख्य नदीपात्रात पूल झाल्यास येथील विकासाला निश्चित चालना मिळेल. स्थानिक नागरिकांच्या सोयीचा विचार विचार करता या ठिकाणी पूल बांधण्यासाठी आगामी अर्थसंकल्पात निधीची तरतूद करण्यात यावी, असे त्यांनी गडकरी यांना लिहिलेल्या पत्रात शेवटी नमूद करण्यात आले आहे.

# वंचित लाडक्या बहिणींना लाभ मिळणार का?

**तभा वृत्तसेवा,**
**पिलीव, दि. १८ डिसेंबर-**

महाराष्ट्र शासनाची अत्यंत महत्त्वकांक्षी ठरलेली मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना ज्यामुळे लाडक्या बहिणींनी महायुती सरकारला विधानसभा निवडणुकीत प्रचंड मोठी मतदान रुपी ताकद देत पुन्हा सत्तेत आणले. पण यामध्ये कागदपत्रांअभावी अनेक लाडक्या बहिणी खरेतर या योजनेपासून वंचित आहेत. त्यांना पुन्हा लाभ मिळणार का असा सवाल उपस्थित होत आहे.

यामध्ये आधार कार्ड नसणे, बँकेत खाते नसणे,आधार कार्ड अपडेट नसणे, आधार कार्डला मोबाईल नंबर लिंक नसणे यासह अनेक कारणांमुळे अनेक लाडक्या बहिणी या योजनेपासून वंचित आहेत. तसेच अनेक बहिणींनी फॉर्म भरून दिले. पण त्यांचा फॉर्म मंजूर झाला नाही. शासनाने नुकतेच निवडणुकीत १५०० रुपये ऐवजी २१०० रुपये देण्याचे जाहीर केले आहे. तसेच हिवाळी अधिवेशनात लाडक्या बहिणींसाठी चौदा हजार कोटींची तरतूद ही केली आहे. याचा लाभ अगोदर ज्या बहिणींनी घेतला आहे, त्यांनाच होणार आहे पण ज्या लाडक्या बहिणी या योजनेपासून वंचित आहेत, त्यांना शासन या योजनेत सहभागी करून घेणार की नाही असा सवाल वंचित असणाऱ्या बहिणी शासनाला विचारत आहेत.



# खोटे गुन्हे दाखल करणाऱ्या पोलीस अधिकाऱ्यांवर कारवाई करा

## कुर्डूवाडीत आरपीआयचा मोर्चा

**तभा वृत्तसेवा,**
**कुर्डूवाडी, दि. १८ डिसेंबर-**

परभणी येथे शहीद भीम सैनिक सोमनाथ सूर्यवंशी यांचा पोलीस कोठडीत पोलीस अधिकारी व कर्मचारी यांच्या मारहाणीमुळे मृत्यू झाला. या घटनेला जबार पोलिस अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याच्या मागणीसाठी कुर्डूवाडीत मोर्चा काढण्यात आला.

या घटनेला जबाबदार परभणी पोलीस पीआय शरद मरे, पीएसआय तोरणनर, एलसीबी पीआय घोरबाड यांनी खोटे गुन्हे दाखल केले व ते स्वतः सदर घटनेस जबाबदार असल्यामुळे त्यांच्यावर तसेच ज्या पोलीस कर्मचाऱ्यांनी गाड्या फोडून दंगल घडवली सदोष मनुष्यवधाच्या तसेच फौजदारी खटला भरण्यात येऊन पोलीस सेवेतून निलंबित करण्याबाबत तसेच भीम सैनिक यांच्यावर दाखल केलेले खोटे गुन्हे मागे घेण्याबाबत कुर्डूवाडी प्रांताधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले. यावेळी बापूसाहेब जगताप,आरपीआय उपाध्यक्ष,महाराष्ट्र राज्य, चंद्रकांत वाघमारे, सचिव आरपीआय, आकाश जगताप तालुका अध्यक्ष, आशिष रजपूत, कृष्णा अस्वरे, विजय देवकते, अण्णा नायडू, रवी आठवले, सोन्या झिंगळे, स्वप्निल जानराव, नितीन कांबळे, कपिल शिवशरण, नवगिरे, सौरभ गायकवाड, शिवाजी डांगे, भीम सेन मिसाळ उपस्थित होते.

# कुसमोड येथील रेणुकादेवीची यात्रा उत्साहात

## जत येथून आणली ज्योत; पालखीसह विविध धार्मिक कार्यक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**पिलीव, दि. १५डिसेंबर-**

माळशिरस तालुक्यातील कुसमोड येथील रेणुकादेवीची यात्रा मोठ्या उत्साहात व भक्तिमय वातावरणात संपन्न झाली.

प्रथम १० डिसेंबर रोजी जत येथून कुसमोड येथे ज्योत आणून यात्रेस प्रारंभ झाला. ११ डिसेंबर रोजी पालखीचे व जगाचे मंदिराकडे प्रस्थान, १२ डिसेंबर रोजी देवीचा महानैवेद्य व गंध लिंबाचा कार्यक्रम व संध्याकाळी देवीजवळ गाण्याचा कार्यक्रम संपन्न झाला. १३ डिसेंबर रोजी पहाटे ५.३० वाजता पुजारी चंद्रकांत सरगर यांच्या घरून फुलाचा मान घेऊन मंदिराकडे प्रस्थान, सकाळी देवीचा अभिषेक व पूजा कैलास धायगुडे यांच्या हस्ते सपत्नीक संपन्न झाली. त्यानंतर डॉ. उत्तम सरगर यांच्या हस्ते आरती झाली. यानंतर पालखी माहेर घरासाठी रवाना झाली. माहेरी डॉ. सुरेश सातपुते व पत्नी सारीका सातपुते यांच्या घरी, तद्नंतर जगाचे मानकरी उत्तम



मोरे यांच्या घरी माहेर संपन्न झाले. तलवारीचे मानकरी संतोष व्होनमाने यांच्या हस्ते तलवार पूजन करुन गावातील सर्व घरांचे माहेर घेऊन, आरती होऊन पालखीचे दुपारी चार वाजता कुंडावर आगमन, कुंडाचे मानकरी अशोक सातपुते यांच्या हस्ते पूजा व आरती झाली. यावेळी माजी सरपंच तुषार लवटे यांच्या हस्ते श्रीफळ फोडण्यात आला. यानंतर पालखीचे आगमन वेशीतील मानकरी अशोक राजगे यांच्या घरी झाले. नंतर दशरथ व मधू व्होनमाने यांच्या घरी पालखीचे आगमन झाले. यावेळी नारळाचा मान सिद्धेश्वर व्होनमाने यांना देण्यात आला. पालखीचे मंदिराजवळ आगमन झाल्यानंतर

**यांनी केला अग्नीहोमातून प्रवेश**

अग्नीहोमातून पुजारी तुकाराम व्होनमाने, सदाशिव व्होनमाने, मधुकर व्होनमाने, सिद्धेश्वर व्होनमाने, ज्ञानदेव व्होनमाने, नवनाथ व्होनमाने, प्रकाश मोरे, चंद्रकांत सरगर, डॉ. सुरेश सातपुते, रामचंद्र पालखे, दादासाहेब व्होनमाने, ज्ञानेश्वर सातपुते, गौतम मोरे, प्रमोद मोरे, प्रमोद विलास मोरे यांनी अग्नीहोमातून प्रवेश केला.

अग्नीहोमाचे पूजन रत्नाकर भोसले पुजारी यांच्या हस्ते तर नारळ मानकरी हेमंत बजरंग धायगुडे यांच्या हस्ते फोडण्यात आला. अग्नी होमावरील तोरण मानकरी दादासाहेब व्होनमाने व सागर व्होनमाने यांच्या हस्ते तोडण्यात आले. यावेळी कुसमोडचे सरपंच पुरुषोत्तम धायगुडे, माजी सरपंच तुषार लवटे, माजी उपसरपंच व पत्रकार संजय पाटील यंच्यासह भाविक उपस्थित होते.



# वैराग येथे ६७८ विद्यार्थी, पालकांची आरोग्य तपासणी

## एकता महिला मंच, श्री साई कॉलेज, हॉस्पिटलने घेतले शिबीर

**तभा वृत्तसेवा,**
**वैराग, दि. १८ डिसेंबर-**

एकता महिला मंच, श्री साई होमिओपॅथी कॉलेज व हॉस्पिटल यांच्यावतीने घेण्यात आलेल्या आरोग्य शिबिरात एकूण ६७८ मुले, मुली व महिलांची आरोग्य तपासणी तुळशीदास जाधव प्रशाला वैराग येथे करण्यात आली.

प्रारंभी सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन वैराग पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक निवृत्ती मोरे यांच्या हस्ते व डॉ. अशोक अनपट यांच्या उपस्थितीत करण्यात आले. डॉ. अशोक अनपट यांनी श्री साई होमिओपॅथी कॉलेज अँड हॉस्पिटल वैराग याविषयी सविस्तर माहिती दिली. या आरोग्य शिबिरामध्ये महिलांचे मासिक पाळी, संधिवात, आमवत, रक्तदाब मधुमेह थायरॉड, बीपी, शुगर, हिमोग्लोबिन, थायरॉईड तसेच महिलांचे वेगवेगळे आजार यावर तपासण्या करण्यात आल्या. डॉ. स्वप्नाली गंगावणे यांनी आठवी, नववी, दहावी, अकरावी, बारावी या वर्गातील मुलींना आरोग्याविषयी मार्गदर्शन केले. यावेळी श्री साई होमिओपॅथी कॉलेज अँड हॉस्पिटल वैराग यांनी हे शिबिर घेण्यासाठी विशेष सहकार्य केले. त्यामध्ये डॉ. अशोक अनपट, डॉ. स्वप्नाली गंगावणे, डॉ. स्वादिका देशमुख, डॉ. सपना मलमे, डॉ. कोमल जामदार, डॉ. महेश पवार, डॉ. केदार महाडिक यांनी उपस्थित राहून तपासणी केली.

यावेळी मुख्याध्यापक सतीश चव्हाण, एकता महिला मंचचे प्रभाकर क्षीरसागर, शीतल दीक्षित, दीपाली माने, रत्नप्रभा गायकवाड, स्वाती पवार, विद्या मस्के, मंगल चव्हाण, फतीमा कोतवाल, वृषाली उज्जनकर, विनंता दाणे, वैशाली माईनकर, शैला काशीद उपस्थित होत्या. चंद्रकांत इंगळे, सूर्यकांत कापसे, मुकुंदराज नगरकर, राजकुमार आपुणे यांनी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन चंद्रकांत इंगळे यांनी केले.

# चपळगाव येथे मीयावाकी जंगल उपक्रमाचा शुभारंभ

## महाराष्ट्र बटालियन एनसीसी, रोटरी क्लब अक्कलकोट, ग्रामीण विद्या विकास विद्यालयाचा उपक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. १८ डिसेंबर-**

महाराष्ट्र बटालियन एनसीसी सोलापूर आणि रोटरी क्लब अक्कलकोट तसेच ग्रामीण विद्या विकास विद्यालय चपळगाव यांच्या संयुक्त विद्यमाने मीयावाकी जंगल या उपक्रमाचा शुभारंभ करण्यात आला.

अध्यक्ष डॉ. विपुल शहा असे म्हणाले की मीयावाकी जंगल हे जपानी वनस्पतीशास्त्र अकिरा मिळावा की यांनी प्रवर्तित केलेले तंत्र आहे जे कमी वेळेत दाट मूळ जंगले तयार करण्यात मदत करते. याने शहरी वनीकरणाच्या संकल्पनेत क्रांती घडवून आणली आहे. तसेच झाडे जवळजवळ लावणे हे समाविष्ट आहे जे केवल जागेची बचत करत नाही तर लागवड केलेले रोपे एकमेकांना वाढीसाठी आधार देतात आणि सूर्यप्रकाश



जमिनीवर पोहोचण्यापासून रोखतात. पहिल्या तीन वर्षात रोपटे देखभाल मुक्त होते.

मीयावकीची प्रक्रिया-मातीची पोत आणि जैव वस्तुमान मोजणे मूळ प्रतिजिती निवडणे जमीन तयार करणे आणि वन सुसज्ज करणे व पुढील तीन वर्ष जंगलाची काळजी घेणे. तीन वर्षात स्वावलंबी वनस्पती तयार करण्यास मदत करते तर पारंपरिक प्रक्रिया सुमारे १०० वर्षे लागतात तसेच वनस्पतीची वाढ दहापट वेगाने होते. ग्रामीण विद्या विकास विद्यालय तर्फे ड्रीप इरिगेशन ची सोय करण्यात आली तसेच याचे पालकत्व तीन वर्षासाठी स्वीकारलेले आहे तसेच रोटरी क्लब अक्कलकोट पुढील तीन वर्षे याची काळजी घेण्यासाठी निश्चितच मदत करेल असे सेक्रेटरी रो डॉ प्रशांत वाली यांनी सांगितले. या कार्यक्रमात सीईओ नीलकंठ पाटील, समीर मणियार, खजिनदार डॉ. प्रमोद सुतार, डॉ. बसवराज चिणकेकर, संजीव नंदर्गी, ९ महाराष्ट्र बटालियनचे अधिकारी उपस्थित होते.

जिल्ह्यातील पहिला प्रयोग मीयावकी जंगल हे सोलापूर जिल्ह्यातील पहिले जंगल असून हे यशस्वी करण्यासाठी ९ महाराष्ट्र बटालियन, विद्या विकास विद्यालय, तसेच रोटरी क्लब अक्कलकोट हे प्रयत्नशील असेल. हा प्रकल्प पाहण्यासाठी आजूबाजूच्या लोकांनी माहिती घेण्यासाठी शाळेत सदिच्छा भेट देत आहेत.

# कडबगावमधील विकासकामे ठप्प

## सरपंच, ग्रामसेवकांच्या विरोधात उपसरपंचांची बीडीओंकडे तक्रार

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. १८ डिसेंबर-**

तालुक्यातील कडबगाव ग्रामपंचायतीचे सरपंच व ग्रामसेवकांच्या मनमानी कारभाराबाबत उपसरपंच प्रियांका अनिल चव्हाण व काही ग्रामपंचायत सदस्यांनी गटविकास अधिकारी यांच्याकडे लेखी तक्रार केल्याने गावातील सर्व विकासकामे ठप्प झाली आहेत.

या लेखी अर्जात नमूद केले आहेत की, कडबगाव ग्रामपंचायती मध्ये सर्व सदस्यांचे मासिक मिटिंग न घेता ठराव, नक्कल परस्पर देतात. सर्व सदस्याच्या परस्पर कोणतेही कागद दिल्यास आमचा विरोध राहणार आहे. कार्यालयीन कामकाज करत असताना सर्व सदस्यांना विचारात घेऊन काम करावे.तसेच मौजे कडबगाव ग्रामपंचायतीचे माहे ऑक्टोबर नोव्हेंबर २०२४ मधील मासिक मिटिंग घेतली नाही. त्यामुळे ग्रामपंचायतीतर्फे घेण्यात आलेल्या कोणत्याही निर्णयाबद्दल आम्ही जबाबदार नाही. गावातील सर्व सरकारी कामे ग्रामपंचायतीच्या मासिक मिटिंग मध्ये मांडावे. त्यावर सर्व सभासदाचे मत विचारात घेऊन जे काम ग्रामपंचायत सभासद बहुमताने मंजूर करतात तेच काम करण्यात यावे. तसेच मागील दोन महिन्यात जे काम सभासदाच्या बहुमाताशिवाय चालू केले आहेत ते काम तात्काळ थांबविण्यात यावी.जोपर्यंत सभासदाच्या बहुमताने काम मंजूर होत नाही ते बिल मंजूर करण्यात येऊ नये व बिल काढण्यात येऊ नये. तसेच कडबगाव ग्रापंचायतीचे सर्व सरकारी दस्त, रजिस्टर व इतर सर्व कागदपत्रे हे सरकारी कार्यालयात ठेवण्यात यावे.अशी मागणी गटविकास अधिकारी यांच्याकडे लेखी मागणी केली आहे.

कडबगाव ग्रामपंचायतीचे सर्व कामे शासनाच्या नियमानुसार करण्यात येत आहे. परंतु ग्रामपंचायत सरपंच व उपसरपंच यांच्यातील राजकीय मतभेदामुळे तक्रार अर्ज दिले असावे. सद्या गावातील सर्व विकास कामे तात्पुरते बंद ठेवले आहेत.

**-दयानंद खोबण,**
ग्रामसेवक, कडबगाव

कडबगाव ग्रामपंचायती अंतर्गत मंजूर झालेले कामे भूमिगत गटार, दलित वस्ती स्मशानभूमी वाल कंपाऊंड व इतर कामे ही अत्यंत निकृष्ट दर्जाचे झाली आहेत. याबाबत बांधकाम विभागातील शाखाधिकारी बशेट्टी यांना वारंवार सांगून सुद्धा ते कामावर व्हीजिट करत नाहीत. या कामाची चौकशी झाल्याशिवाय कोणत्याह बिले काढू नये. चौकशी शाखाधिकारी बशेट्टी यांच्यामार्फत करु नये. दुसऱ्या शाखाधिकाऱ्याची नेमणूक करावी.

**-प्रियांका अनिल चव्हाण,**
उपसरपंच, कडबगाव

# आपला जिल्हा

**सोलापूर तरुण भारत,** सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.




## सांगोल्यातील पाटील बंधू यांच्याकडून वृक्षारोपण

**सांगोला, दि.१८ डिसेंबर-**

वृक्ष आपल्याला प्राणवायू सोबतच पाने, फुले, फळे देतात. तसेच औषधी म्हणून मोठ्या प्रमाणात त्यांचा वापर केला जातो. तसेच बहरलेल्या एका झाडावर अनेक पक्षी घरटे बांधून राहू शकतात. वृक्षांचे हेच महत्व लक्षात घेत सांगोला येथील प्रविण पाटील, प्रशांत पाटील या दोन बंधूनी स्वखर्चाने दि.१४ डिसेंबर दत्त जयंती दिवशी लेंडवे चिंचाळे (ता. मंगळवेढा) यागावात दत्त मंदिर परिसरात वड, पिंपळ, उंबर, करंज, चिक्कू, पेरू, आंबा या झाडांचे वृक्षारोपण केले. यावेळी मंदिराचे पुजारी अर्जुन लेंडवे, गणेश गायकवाड, वैभव पाटील यांनी परिश्रम घेतले.



## संक्षिप्त वृत्त...



### माढा आश्रमशाळेस कबड्डी स्पर्धेत दुहेरी मुकुट

**माढा, दि. १८ डिसेंबर-**

इतर मागास बहुजन कल्याण विभाग सोलापूर अंतर्गत घेण्यात येणाऱ्या कबड्डी स्पर्धेत प्राथमिक माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रम शाळा माढा विद्यार्थ्यांचे घवघवीत यश मिळेल आहे. वयोगट १७ व १९ वर्षे गटात उत्तर विभागीय कब्बडी स्पर्धेत या प्रशालेच्या खेळाडूंनी प्रथम क्रमांक मिळविला तर १४ वर्षे गटातील संघाला उपविजेता पद मिळाले आहे. या स्पर्धेत यशस्वी संघास जिल्हास्तरावर प्रतिनिधित्व करता येणार आहे. १८ वर्षे वयोगटातील अंतिम सामन्यात तांबवेवाडी आश्रम शाळा चा पराभव करून विजय संपादन केला तर १७ वयोगटात टेंभुर्णी आश्रमशाळा चा पराभव करीत विजय मिळवला आहे. यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन शाळेचे मुख्याध्यापक पोपट वाघमारे, सचिव महेश हरहरे यांनी केले यशस्वी खेळाडूना क्रिडा शिक्षक प्रविण घाडगे, सिद्धेश्वर मारकड यांनी मार्गदर्शन केले.



### ईलाई मुलाणी यांना कृतिशील शिक्षकेतर कर्मचारी पुरस्कार प्रदान

**वैराग, दि. १८ डिसेंबर-**

बार्शी तालुक्यातील यावली येथील श्री बळवंतराव घाटे प्रशालेचे शिक्षकेतर कर्मचारी इलाई मुलाणी यांना महाराष्ट्र राज्य शाळा कृती समितीच्या वतीने कृतिशील शिक्षकेतर कर्मचारी पुरस्कार देण्यात आला. इलाई मुलाणी हे श्री बळवंतराव घाटे प्रशाला यावली येथे कार्यरत असून सर्व विद्यार्थी शिक्षक यांना प्रिय आहेत. प्रशालेच्या प्रत्येक उपक्रमात नेहमी हिरीरीने सहभागी होऊन ते गावातील सामाजिक उपक्रम पण सहभागी असतात त्यांना यशवंतराव चव्हाण सभागृह बार्शी येथे माजी शिक्षक आमदार दत्तात्रय सावंत, माजी नगरसेवक अरुण बारबोले तसेच इतर मान्यवरांच्या हस्ते पुरस्कार देण्यात आला. त्यांना मिळालेले या पुरस्काराबद्दल संस्थेचे आश्रयदाते गिरीष घाटे, संचालक व स्कुल कमिटी अध्यक्ष श्रीहरी चव्हाण सर्व संचालक मंडळ, मुख्याध्यापक चव्हाण यांनी अभिनंदन केले.

### के. एन. भिसे महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्यपदी ए. पी. पोळ

**कुर्डूवाडी, दि. १८ डिसेंबर-**

के. एन. भिसे आर्ट्स, कॉमर्स अँड विनायकराव पाटील सायन्स कॉलेज विद्यानगर-भोसरेच्या प्रभारी प्राचार्यपदी प्रा. डॉ. ए. पी. पोळ यांची पुनःश्च नियुक्ती विद्यापीठाने दिलेल्या मान्यता पत्रानुसार झालेली आहे. या नियुक्तीच्या वेळी माढा तालुका शिक्षण प्रसारक मंडळ, कुर्डुवाडीच्या अध्यक्षा जयश्री संतोष भिसे, उपाध्यक्ष संतोष काशिनाथ भिसे व सचिव शामसुंदर काशिनाथ भिसे हे उपस्थित होते. प्रा. डॉ.पोळ यांना विद्यापीठाचे मान्यता पत्र देऊन त्यांचा सत्कार केला.



### जातीवाचक शिवीगाळ; दोघाविरुध्द गुन्हा

**मंगळवेढा, दि. १८ डिसेंबर-**

नागणेवाडीतून वेगात मोटरसायकल नेणाऱ्यास मोटरसायकल हळू चालव असे म्हणाल्याच्या कारणावरुन जातीवाचक शिवीगाळ करुन काठीने बेदम मारहाण केल्याप्रकरणी ओंकार सूर्यवंशी, नाना जगताप या दोघाविरुध्द अनुजाती जमाती अत्याचार प्रतिबंधक कायदयानुसार गुन्हा दाखल झाला आहे. यातील फिर्यादी लक्ष्मी दुशासन चंदनशिवे (वय ३४, रा. नागणेवाडी) यांचा भाऊ राहुल, विराज हे दोघे दि.१६ डिसेंबर रोजी सायंकाळी ५.१५ वाजता मोटर सायकलीवरुन आठवडा बाजारासाठी चालले असताना फिर्यादीच्या घरासमोरील रोडवर ओळखीचे वरील आरोपी हे घराजवळ वेगात मोटर सायकल चालवत आले त्यावेळी फिर्यादीचा भाऊ राहुल त्याला मोटर सायकल हळू चालव असे म्हणाल्यावर आरोपीने त्यास शिवीगाळ,दमदाटी करीत डाव्या गालावर चापट मारली व थांब महारा तुला बघून घेतो असे म्हणून मित्र नाना जगताप यास बोलावून घेवून संगणमत करुन लाथा बुक्क्यांनी व काठीने मारहाण करुन फिर्यादीचा भाऊ राहुल,काका राजू यांना मारुन जखमी केले. तसेच सासू रुक्मिणी, मावशी गौरी यांना मुक्का मार दिला. तुमची गाडी वापरण्याची लायकी आहे का? परत नादाला लागाल तर तुम्हाला बघून घेईन अशी धमकी देवून जातीवाचक शिवीगाळ करत निघून गेले असल्याचे लक्ष्मी चंदनशिवे यांनी दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे. याचा अधिक तपास डीवायएसपी विक्रांत गायकवाड हे करीत आहेत.

# जातनिहाय जनगणना करून आरक्षणाचा प्रश्न निकाली काढावा

**आ. अभिजीत पाटील यांनी मांडले लोकहिताचे अनेक प्रश्न; एमआयडीसीचा प्रश्न मार्गी लागणार, माढा शहराच्या पाणी प्रश्नाला पहिल्याच दिवशी घातला हात**

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. १८ डिसेंबर-**

माढा विधानसभा मतदारसंघांमध्ये मागील ३०वर्षांची सत्ता उलटून टाकत मतदार संघात परिवर्तन घडवले आहे. आमदार अभिजीत पाटील यांना आमदार केल्याची कसर न राखण्यासाठीच आ. पाटील यांनीही नागपूर येथील हिवाळी अधिवेशनात आक्रमकपणे विविध प्रश्न मांडत त्याची सोडवणूक होण्याच्या दृष्टीने तयारी ठेवली आहे.

माढा-पंढरपूर विधानसभा मतदार संघातून विकासाचे व्हिजन असणारे लोकप्रतिनिधी पाठविण्याचे काम विधानसभा निवडणुकीत मतदारांनी केले आहे. त्यामुळेच आमदार अभिजीत पाटील यांनी केवळ विकास आणि विकास यासाठीच आपली आमदारकी पणाला लावण्याचा निर्णय घेतला आहे. बुधवारी झालेल्या नागपूर येथील पहिल्याच भाषणात अगदी मुद्देसूरपणे आपल्या मतदार संघातील विकासासह राज्यातील मराठा, धनगर, लिंगायत, महादेव कोळी, मुस्लिम या विविध जातीच्या आरक्षण संदर्भात योग्य मार्ग काढण्यासाठी राज्यात जातनिहाय जनगणना करण्याची मागणी केली आहे.

मराठा आरक्षण प्रश्नाचे मागील अनेक दिवसापासून मनोज जरांगे पाटील यांच्या माध्यमातून आंदोलन केले जात आहे. आगामी २५ डिसेंबर रोजी पुन्हा एकदा आंदोलनाचा इशाराही देण्यात आला आहे. परंतु या आंदोलनाच्या इशाराकडे सरकारने गांभीर्याने पहिले नसून अभिभाषणात त्याबाबतीत कसलीही भूमिका मांडली नसल्याने आ. अभिजीत पाटील यांनी सरकारवर थेट नाराजी व्यक्त केली आहे. यामुळेच आ. अभिजीत पाटील यांच्यामुळे सरकारला आरक्षण प्रश्नातील होणाऱ्या आंदोलन प्रश्नांची आठवण करून देण्याचे काम खुद्द आ. अभिजीत पाटील यांनी केले आहे. यामुळेच मराठा समाजाला दिलेल्या शब्द पाळण्यासाठी आ. अभिजीत पाटील यांचा पहिल्यापासूनच पाठपुरावा सुरु



झाला असल्याचे स्पष्ट दिसले आहे.

माढा मतदारसंघातील माढा शहरमध्ये दहा दिवसातून पाणी मिळते. याबाबत उजनी धरण या माढा तालुक्यात असूनही अशी वाईट अवस्था का? असा प्रश्न मंडत हा पाणी प्रश्न सोंडविण्याबाबत मागणी केली आहे. सरकारने शहरा बरोबरच ग्रामीण भागाचा विकास करण्यासाठी पावले उचलली पाहिजे. याकरिता आपल्या मतदारसंघात असलेल्या मेंढापूर आणि मोडनिंब येथील एमआयडीसीला लवकरात लवकर मान्यता दिल्यास या भागाचा मोठा विकास होईल असेही सांगितले. यासह विविध प्रश्नावर आ. अभिजीत पाटील यांनी आवाज उठवीत आपण माढा मतदार संघाला विकासाच्या दिशेने घेवून जाऊ शकतो हे दाखवून दिले आहे.

पहिल्या दिवशी सदनाच्या पायऱ्यांवर मी डोके टेकवले. कारण पंढरपूरच्या विठ्ठलाच्या दर्शनासाठी जाताना ज्या पवित्र भावना मनात येतात त्याच भावना त्या वेळी आल्या. इथे आपण कशासाठी आलो आहोत ही जाणीव कायम माझ्या मनात आहे.. जी कदाचित आपल्या मनात देखील राहील.. तुकोबांच्या शब्दात सांगायचे झाले तर...

उजळावया आलों वाटा ।
खरा खोटा निवाडा ।।१।।
बोलविले बोलें बोल ।
धनी विठ्ठल सन्निध ।।ध्रु.।।

मी भविष्याकडे जाणारे मार्ग उजळविण्यासाठी येथे आलो आहे. सत्य असत्य सांगून महाराष्ट्राच्या प्रगतीमध्ये माझा वाटा उचलण्यासाठी आलो आहे. येथे बोलणारा प्रत्येक बोल विठ्ठलाच्या आणि मतदारसंघातील मायबाप जनतेच्या मनातील असेल अशी ग्वाही या वेळी मी देतो आणि सरकारनेही ती दिली पाहिजे.

**एमएसपी वाढविण्यासाठी पाठपुरावा व्हावा**

आपल्या महाराष्ट्र राज्यात साखर कारखाने मोठ्या प्रमाणात आहेत. याच उद्योगावर राज्यातील मोठं आर्थिक गणित अवलंबून आहे. यासाठी हा साखर उद्योग चालविणे गरजेचे आहे. ऊस उत्पादक शेतकरी यांना लाभ होण्यासाठी साखरेचे भाव वाढविणे आवश्यक आहेत. तरच उसाला भाव वाढ देणे शक्य असते. यासाठी आपल्या राज्य सरकारकडून केंद्र सरकारला एम एस पी वाढविण्यासाठी प्रयत्न होणे आवश्यक असल्याची मागणी माढाचे नूतन आमदार अभिजीत पाटील यांनी अधिवेशनात केली आहे.

# मोहोळला तीन कोटी नुकसान भरपाई मंजूर

**चक्रीवादळ, अतिवृष्टीचा फटका; लवकरच शेतकऱ्यांच्या बँक खात्यात जमा होणार पैसे**

तभा वृत्तसेवा,
मोहोळ, दि. १८ डिसेंबर-

मे २०२४ मध्ये मोहोळ तालुक्यात झालेल्या चक्रीवादळ व अतिवृष्टीने झालेल्या नुकसानीच्या भरपाईपोटी शासनाकडून ३ कोटी ५ लाख रुपये मंजूर झाले असून, लवकरच ती रक्कम प्रत्येक शेतकऱ्यांच्या खात्यावर वर्ग करण्यात येणार असल्याची माहिती तहसीलदार सचिन मुळीक यांनी दिली. दरम्यान ज्या शेतकऱ्यांनी आधार प्रमाणीकरण करून घेतले आहे. त्यांच्याच खात्यावर ही रक्कम वर्ग होणार आहे.

२०, २१व २२ मे या सलग तीन दिवसात मोहोळ तालुक्यात चक्रीवादळा सह मोठ्या प्रमाणात अवकाळी अतिवृष्टी झाली होती. अनेक घरावरील पत्रे उडाले होते, अंगावर वीज पडून जनावरे, कोंबड्या दगावल्या होत्या. त्यामुळे शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले होते. द्राक्ष डाळिंब या फळबागा सह केळी पिकाला याचा मोठा फटका बसला. अनेक केळीच्या बागा भुई सपाट झाल्या होत्या. ३१ गावात नुकसान झालेल्या शेतकऱ्यांची संख्या- १ हजार २६४ इतकी आहे. नुकसानीचे एकूण क्षेत्र ८५२ हेक्टर इतके आहे. नुकसानीत फळबागांचे खास करून द्राक्ष, डाळिंब व केळी याचे प्रमाण अधिक आहे.

दरम्यान शेतकऱ्यांनी नुकसानीची माहिती तहसील प्रशासनाला देताच, तहसीलदार मुळीक यांनी तलाठी, ग्रामसेवक व कृषी सहाय्यक यांना तातडीने पंचनामे करण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार त्यांनी पंचनामे करून तहसीलदार यांना अहवाल सादर केला. तहसीलदार यांनी तपासणी करून नुकसान भरपाईच्या मागणीचा अहवाल वरिष्ठांना सादर केला होता. त्या मागणी नुसार तालुक्यातील नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना ३ कोटी ५ लाख ९४ हजार रुपये मंजूर झाल्याचे तहसीलदार मुळीक यांनी सांगितले.

**आधार प्रमाणीकरण करा : तहसीलदार**

तालुक्यातील शेतकऱ्यांना वेळोवेळी सूचना देऊनही अनेक शेतकऱ्यांनी आधार प्रमाणीकरण केले नाही, त्यांनी ते त्वरित करावे अशी सूचना तहसीलदार यांनी दिली आहे.




# आईच्या कष्टाची आणि त्यागाची जाणीव रुजली पाहिजे : कुलगुरू डॉ. महानवर

**तभा वृत्तसेवा,**
**माढा, दि. १८ डिसेंबर-**

रयत शिक्षण संस्थेचे कला व वाणिज्य महाविद्यालय माढा येथे इतिहास विभाग व एमएसएफडीए आणि डेक्कन कॉलेज अभिमत विद्यापीठ पुणे आयोजित प्राचीन भारतीय विज्ञान आणि तंत्रज्ञान या विषयावरती फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्रॅम कोर्सचे उद्घाटन कुलगुरुंनी केले.

अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ सोलापूरचे कुलगुरू डॉ. प्रकाश महानवर यांनी असे प्रतिपादन केले की, आधुनिक काळामध्ये आईच्या कष्टाची आणि त्यागाची जाणीव समाजामध्ये खोलपर्यंत रुजली पाहिजे व ते काम सर्वप्रथम शिक्षकापासून झाले पाहिजे तरच वृद्धाश्रम ही व्यवस्था नष्ट होईल व भारतीय संस्कृतीचे जतन होईल. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. सुनील हेळकर हे होते. गणेश भिसे, एमएसएफडीए पुणे, डॉ. सचिन जोशी, डॉ.सुषमा देव या उपस्थित होते. प्रास्ताविक डॉ. प्रेमचंद गायकवाड यांनी केले. आभार डॉ. गोवर्धन दिकोंडा यांनी तर सूत्रसंचालन डॉ. जयवंत पालकर व डॉ. अलका घोडके यांनी केले.

# अक्कलकोटमध्ये खंडोबा मंदिरात भाविकांची गर्दी

**श्रीमंत मालोजीराजे भोसले यांनी केली महापूजा; महाप्रसादाचे वाटप**

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. १८ डिसेंबर-**

अक्कलकोट येथील खंडोबा मंदिर येथे चंपाषष्ठी यात्रेनिमित्त पहाटेची महापूजा अक्कलकोट राजघराण्याचे राजे श्रीमंत मालोजीराजे भोसले यांच्या हस्ते करण्यात आली. दिवसभरात हजारो भक्तांनी दर्शनाबरोबर महाप्रसाद घेतले.

अक्कलकोटमधील खंडोबा मंदिर येथे पहिल्यांदा श्री स्वामी समर्थ महाराज या ठिकाणी आले होते. यामुळे या देवस्थान दिवसभरामध्ये अक्कलकोट मधील हजारो भक्तांनी दर्शन घेतले आहे. याच बरोबर स्वामी समर्थ अन्नक्षेत्र मंडळ ट्रस्टचे कार्यकारी विश्वस्त अमोलराजे भोसले,माजी नगराध्यक्ष अक्कलकोट एज्युकेशन सोसायटीचे चेअरमन बसलिंगप्पा खेडगी, स्वामी समर्थ देवस्थानचे मुख्य पुजारी मोहन पुजारी, अक्कलकोट व्यापारी संघाचे अध्यक्ष प्रसन्न हत्ते,लाइन्स क्लबचे सेक्रेटरी सुधीर मालशेट्टी, प्रसिद्ध विधीतज्ञ अनिल मंगरुळे, उद्योगपती महेश घिवारे, अक्कलकोट गुरव समाज मंडळाचे अध्यक्ष शिवानंद फुलारी, सचिव विद्याधर गुरव, अरविंद पाटील, चेतन जाधव, स्वामी समर्थ हॉस्पिटलचे डॉ.योगेश वेळापूरकर आधी सह हजारो आदींनी श्रीचे दर्शन घेतले.

महाप्रसादा सालाबादप्रमाणे यंदाही उपस्थित सर्व भाविकांना स्वामी समर्थ समाधी मठाचे धनंजय पुजारी महाराज व बालाजी क्लॉथ स्टोअरचे शशिकांत विष्णू रणसुबे यांच्या तर्फे दुपारी आरती नंतर महाप्रसाद वाटप करण्यात आला. सोमवारी दिवे बसण्याचा कार्यक्रम झाल्यापासून संपेपर्यंत विविध धार्मिक कार्यक्रमचे आयोजन करण्यात आले होते. समर्थनगर येथील दिपक पोतदार व मनोज अतणुरे यांच्या मार्गदर्शनाखाली स्वामी समर्थ भजन मंडळ, बुधवार पेठ येथील भंडारे यांचे भजन मंडळ, आदीसह दररोज विविध भजन झाले. रात्री गोंधळाचा कार्यक्रम झाला. गोंधळाचा कार्यक्रम संपल्यानंतर संध्याकाळी श्री ची आरती करून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. अशी माहिती यात्रा कमिटीचे विश्वस्त प्रदीप गुरव दिली. यात्रा यशस्वी करण्यासाठी प्रदीप गुरव,दीपक गुरव, भीमाशंकर गुरव, चंद्रकांत गुरव, प्रशांत गुरव, सिद्धेश्वर आवटे, रामचंद्र गुरव, नागनाथ गुरव, श्रीकांत गुरव, स्वामीनाथ गुरव, विठ्ठल परीट, निलेश कलशेट्टी, केतन फुटाणे आदींनी परिश्रम घेतले.



# पाण्यासाठी वळसंगच्या ग्रामस्थांनी दिला उपोषणाचा इशारा

**जि. प. च्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांच्या आदेशाची अंमलबजावणी होईना**

**तभा वृत्तसेवा,**
**वळसंग, दि. १८ डिसेंबर-**

वळसंग (ता. दक्षिण सोलापूर) येथील बहुचर्चित अकरा कोटींची जलजीवन मिशन योजना पूर्ण करून दसऱ्या दिवशी वळसंगला पाणी मिळावे असे आदेश जिल्हा परिषदचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदिप जंगम यांनी त्यांच्या दालनात झालेल्या आढावा बैठकीत दिले होते. पण दसरा गेला, दिवाळी झाली, निवडणुका झाल्या तरीही याबाबत कोणतीही ठोस उपाययोजना अद्याप करण्यात आलेली नाही. यामुळे ग्रामस्थांनी आंदोलनाचा इशारा दिला आहे.

जवळपास दहा हजार लोकसंख्येच्या या गावाला २०५० मधील लोकसंख्या गृहीत धरून कुरनूर येथील धरणावरून ११ किलोमीटर पाईपलाईनद्वारे पाणीपुरवठा करण्यासाठी व वळसंग येथे जलशुद्धीकरण केंद्र गावातील अंतर्गत पाईपलाईन याकरिता कोटी रुपये मंजूर करण्यात आले होते. महाराष्ट्र जीवन प्राधिकरण सोलापूर उपविभाग क्रमांक २ चे उप अभियंता सुधीर गोरे यांनी दिलेल्या माहितीनुसार या योजनेअंतर्गत डीपीआरनुसार नऊ कोटी रुपये प्रत्यक्ष निधी मंजूर झाला त्यापैकी



सात कोटी एकसष्ठ लाख रुपये आत्तापर्यंत खर्च झालेला आहे.ग्राम पंचायतची महावितरणकडे दोन लाख पासष्ट हजार रुपये थकबाकी असल्याचे पत्र जीवन प्राधिकरणाने सरपंच ग्रामपंचायत वळसंग यांना दिले होते.त्यानुसार वळसंग ग्राम पंचायतीने महावितरणची थकबाकी दीड महिन्यापूर्वीच भरल्याचे सरपंच जगदीश अंटद यांनी सांगितले. मागील दोन वर्षापासून वळसंग परिसरात पाऊस कमी झाल्याने तीव्र पाणीटंचाई जाणवत आहे प्रत्येक घरटी जवळपास दोन हजार ते तीन हजार रुपयाचे पाणी प्रति महिन्याला विकत घ्यावे लागत आहे.त्यामुळे ३१ डिसेंबर अखेर पर्यंत वळसंग येथील तलावात या योजनेचे पाणी न आल्यास उपोषण करण्याचा इशारा हुतात्मा जलसंवर्धन समितीचे पदाधिकारी वीरेश बागलकोटी, दिनकर नारायणकर, श्रीकांत कलशेट्टी, सादिक पटेल, फारुख शेख यांनी दिला आहे.

कुरनूर येथील जॅकवेलजवळ विद्युत कनेक्शन देण्याकरीता महावितरणने सर्वेक्षण केले असून पुढील कारवाईसाठी वरिष्ठ कार्यालयाकडे पाठविले आहे.फक्त बासस्ट मीटर पाईपलाईनचे काम बाकी आहे ते पूर्ण झाल्यानंतर वळसंग येथे पाणी सोडण्यास कोणतीही अडचण नाही.

**- सुनील देशपांडे,**
उपविभागीय अभियंता,
महाराष्ट्र जीवन प्राधिकरण उपविभाग क्रमांक दोन, सोलापूर

वळसंग गावाला कुरकुर धरण, एकरूख उपसा जलसिंचन योजना, स्वामी समर्थ सूत मिलसमोरील दगडी खाण येथून पाणीपुरवठा होऊ शकतो. नागरिकांच्या व पशुधनाच्या सोयीसाठी तातडीने उपाययोजना करून पाणी उपलब्ध करून देण्याची मागणी आहे.

**-दिनकर नारायणकर,**
अध्यक्ष, हुतात्मा जलसंवर्धन समिती, वळसंग

**आमदार घेणार बैठक**

वळसंग दक्षिण सोलापूर तालुक्यातील गाव अक्कलकोट विधानसभा मतदारसंघात येत असून येथील पाणीपुरवठा संदर्भात आमदार सचिन कल्याणशेट्टी संबंधित सर्व विभागाची आढावा बैठक घेणार असून येथील पाणी प्रश्न लवकरात लवकर मार्गी लावणार असल्याचे सूत्रांकडून सांगण्यात येत आहे.

CMYK

धाराशिव • दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## संदीप पालके यांचे शैक्षणिक साहित्य जिल्हास्तरासाठी निवड

**तभा वृत्तसेवा**
**कसबे तडवळे, दि.१८ डिसेंबर -**

धाराशिव येथील शम्स उल उलुम उर्दू हायस्कुल येथे पार पडलेल्या तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनात जयहिंद विद्यालय, कसबे तडवळे येथील उपक्रम शील शिक्षक पालके एस.टी. यांनी बेस्ट फ्रॉम वेस्ट हे शैक्षणिक साहित्य सादर केले होते.

त्यांचा तालुक्यातून प्राथमिक शिक्षक गटात प्रथम क्रमांक आला असून, त्यांची जिल्हास्तरीय विज्ञान प्रदर्शनासाठी निवड झाली आहे.

पालके एस.टी.यांनी विज्ञान प्रदर्शनातील यशाची परंपरा कायम राखत शाळेचे व गावाचे नाव उज्वल केले.

त्याबद्दल त्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.



त्यांच्या या यशाबद्दल श्री.शि.शि. प्रसारक मंडळ, बार्शीचे सर्व पदाधिकारी, शा.व्य. समितीचे अध्यक्ष,

सर्व सदस्य, शिक्षण विस्ताराधिकारी किशोरी जोशी, केंद्रप्रमुख जगदीश जाकते, मुख्याध्यापक आर.डी. गाढवे, सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी, ग्रामस्थ यांनी कौतुक केले.



### संक्षिप्त वृत्त...



#### श्री. तुळजाभवानी अभियांत्रिकीत एक दिवशीय मार्गदर्शन सत्र संपन्न

**तुळजापूर, दि.१७ डिसेंबर -**

श्री. तुळजाभवानी अभियांत्रिकी महाविद्यालयात मधील संगणक विभागातील विद्यार्थ्यांना इंटर्नशिप कशी करावी. तसेच संगणक क्षेत्रातील विविध नोकरीच्या संधी यासाठी विभाग प्रमुख प्रा.डी.जे. वाघमारे यांनी एक दिवसाचे मार्गदर्शन सत्र आयोजित केले होते. या कार्यक्रमाला मार्गदर्शिका म्हणून वैभवी अशोक पोळ (मास्टर कार्ड पुणे) हे उपस्थित होत्या. त्यांनी इंटर्नशिपचे महत्व, तसेच संगणक क्षेत्रामध्ये नोकरीच्या संधी यावर मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांसोबत संवाद साधला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पूजा चव्हाण यांनी केले. हा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी नितीन कुलकर्णी, महेश नवगिरे, प्रा.डी.डी. रणखांब यांनी काम पाहिले.



#### ईव्हीएम विरोधात काँग्रेसची जळकोट येथे स्वाक्षरी मोहीम

**जळकोट, दि.१७ डिसेंबर -**

तुळजापूर तालुक्यातील जळकोट येथे काँग्रेस (आय) पक्षाच्यावतीने ग्राम पंचायतसमोर ईव्हीएम विरोधात स्वाक्षरी मोहीम राबविण्यात आली. या मोहिमेला चांगला प्रतिसाद मिळाला. महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीच्यावतीने राज्यभर राबविण्यात येत असलेल्या इव्हीएम हटवा, देश वाचवा, इव्हीएम हटवा, लोकशाही वाचवा या मागणीसाठी दि.१७ रोजी जळकोट येथे ही मोहीम राबवून यापुढे देशातील सर्व निवडणुका मतपत्रिकेवर शिक्का मारून घेण्यात याव्यात. यासाठी स्वाक्षरी मोहीम सुरू करण्यात आली. यावेळी जिल्हा काँग्रेस कमिटीचे उपाध्यक्ष प्रकाश चव्हाण, कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक अशोकराव पाटील, सरपंच गजेंद्र पाटील, युवक काँग्रेसचे जिल्हा उपाध्यक्ष श्रीनिवास पाटील, शंकर वाडीकर, ग्रामपंचायत सदस्य कल्याणी साखरे, जीवन कुंभार, दत्तात्रय चुंगे, यशवंत सुरवसे, अमोल आलुरे, विश्वनाथ कार्ले, विश्वास भोगे, सागर करंडे, सलीम तांबोळी, विश्वनाथ सुरवसे, पांडुरंग गिरी, यशवंत पाटील, समाधान पाटील, उमाकांत माळी, गिरीश नवगिरे, सोसायटीचे माजी चेअरमन राजकुमार पाटील यांच्यासह नागरिकांनी उपस्थित राहुन स्वाक्षरी मोहिमेत सहभाग नोंदवला.



#### संतोष देशमुख यांच्या हत्येच्या निषेधार्थ बोंबमारो आंदोलन

**तुळजापूर, दि.१७ डिसेंबर -**

बीड जिल्ह्यातील मस्सा जोग येथील सरपंच संतोष देशमुख यांची ९ डिसेंबर रोजी हत्या करण्यात आली. याच्या निषेधार्थ राज्य सरकारला जाग येण्यासाठी तहसील कार्यालय समोर सकल मराठा समाजाच्यावतीने सोमवारी बोंब मारो आंदोलन करण्यात आले. मयत संतोष देशमुख यांच्या मुख्य आरोपीला अद्यापही अटक केली नाही आरोपी सध्या फार आहे शासन याची कुठली दखल घेत नाही याचा निषेध करून मराठा सकाळ समाजाच्या वतीने बोंब मारू आंदोलन करण्यात आले. यावेळी मराठा सकल समाजाचे अड. धीरज पाटील, महेश गवळी, आण्णासाहेब क्षीरसागर, अमोल कुतवळ, आबासाहेब कापसे, अजय साळुंके, अमोल जाधव, राहुल खपले, प्रशांत सोंजी, शरद जगदाळे, सुदर्शन वाघमारे, बाळासाहेब कदम, कुमार टोले, आनंद जगताप, अमर चोपदार इत्यादी जनासह मराठा समाजाचे कार्यकर्ते उपस्थित होते.

#### मराठी पत्रकार संघाच्या तालुकाध्यक्षपदी अरूण लोखंडे

**जळकोट, दि.१७ डिसेंबर -**

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, मुंबई तुळजापूर तालुका अध्यक्षपदी अरुण लोखंडे यांची फेरनिवड करण्यात आली



तर तालुका उपाध्यक्षपदी इरफान काझी यांची निवड करण्यात आली. महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, मुंबई तालुका शाखा तुळजापूरच्या पदाधिकारी व सदस्यांची बैठक संपन्न झाली. या बैठकीत पत्रकार संघाच्या वर्षभरातील कामकाजाचा आढावा घेऊन विविध विषयांवर चर्चा करण्यात आली. बैठकीत पत्रकार कार्यकारिणीची निवड करण्यात आली. तालुकाध्यक्ष म्हणून जळकोट येथील अरुण लोखंडे यांची फेरनिवड करण्यात आली तर तालुका उपाध्यक्षपदी नळदुर्ग येथील इरफान काझी यांची निवड करण्यात आली. निवडण्यात आलेली कार्यकारिणी अशी सचिव एस.के. गायकवाड, सहसचिव संजय पिसे, कार्याध्यक्ष विजय पिसे, सल्लागार मारुती बनसोडे, किशोर धुमाळ, संघटक शामकांत नागीले आदींची निवड करण्यात आली. मंत्रालयीन प्रतिनिधी म्हणून अहमद शेख यांची निवड करण्यात यावी, असा ठराव घेण्यात आला.

# नागपूर एम्सच्या धर्तीवर होणार वैद्यकीय महाविद्यालयाचे आधुनिकीरण

**आमदार पाटील यांनी केली पाहणी... २० डिसेंबरला एम्सच्या संचालकांसोबत अधिष्ठाता व बांधकामचे अधिकारी यांची बैठक...**

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१८ डिसेंबर -**

जिल्ह्यातील रुग्णांना चांगल्याप्रकारे अत्याधुनिक वैद्यकीय सोयी-सुविधा उपलब्ध व्हाव्या याकरिता नागपूर एम्सच्या धर्तीवर धाराशिवच्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे आधुनिकरण केले जाणार आहे. एम्सची कार्यपद्धती, सोयी सुविधा, इमारत आणि अनुषंगिक बाबींची पाहणी करून त्यासंबंधी माहिती जाणून घेतली. आपल्याकडे त्यानुसार अंमलबजावणी करण्यासाठी वैद्यकीय महाविद्यालयाच्या अधिष्ठाता, बांधकाम विभागाचे अधिकारी आणि वास्तुरचनाकार यांची २० डिसेंबर रोजी नागपूर येथे एम्सच्या संचालकांसह बैठक आयोजित केली असल्याची माहिती आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी दिली आहे.

मंगळवारी आ. राणाजगजितसिंह पाटील यांनी नागपूर येथील एम्सच्या कार्यपद्धती आणि एकूण कामकाजाबाबत एम्सचे कार्यकारी संचालक डॉ. रमेश जोशी यांच्याकडून सविस्तर माहिती जाणून घेतली. तसेच धाराशिवमध्ये नागपूर एम्सच्या धर्तीवर शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात अत्याधुनिक सोयीसुविधा उपलब्ध करून देण्याबाबत सविस्तर चर्चा केली. एम्समध्ये दररोज बहारुग्ण विभागात सुमारे तीन हजाराहून अधिक तर अंतररुग्ण विभागात आठशे रुग्णांची अद्ययावत पद्धतीने तपासणी आणि उपचार केले जातात. अगदी त्याच पद्धतीने आपल्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात अत्याधुनिक पायाभूत



सोयीसुविधा निर्माण करण्याचा प्रयत्न आपण करीत असल्याचे आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी सांगितले आहे. त्यासाठी २० डिसेंबरला नागपूर येथील एम्स रुग्णालयात कार्यकारी संचालक डॉ.डॉ. रमेश जोशी यांच्यासोबत बैठकीचे आयोजन करण्यात आले असल्याचेही आमदार पाटील यांनी सांगितले आहे.

नागपूर एम्सच्या धर्तीवर शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे आधुनिकरण करून संपूर्ण महाविद्यालय आणि वैद्यकीय संकुल अद्यावत करण्याचा प्रयत्न सुरू आहे.

त्यासाठी महाविद्यालयाचे अधिष्ठाता, बांधकाम विभागाचे अधिकारी, वास्तुविशारद तसेच आयडिया कॉम्पिटिशन स्पर्धेतील सहभागी विजेते या सर्वांची एकत्रित बैठक बोलाविण्यात आली आहे. या बैठकीत वैद्यकीय संकुलाची इमारत, अत्याधुनिक सोयी सुविधा, अंतर्गत व्यवस्था, विद्यार्थी आणि प्राध्यापक वर्ग यांच्यासाठी अत्यावश्यक असलेल्या बाबी आणि सर्वात महत्वाचे म्हणजे रुग्णांवरील दर्जेदार उपचार यासाठी एम्सचे कार्यकारी संचालक डॉ. जोशी महत्वपूर्ण मार्गदर्शन आणि माहिती उपलब्ध करून देणार आहेत. नागपूर एम्सच्या धर्तीवर आपल्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे आधुनिकरण करण्यासाठी या बैठकीची मौलिक मदत होईल.

महायुती सरकारच्या माध्यमातून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या सहकार्याने लवकरच त्याअनुषंगाने प्रत्यक्ष काम सुरू केले जाईल, असा विश्वासही आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी व्यक्त केला आहे.

## महाराष्ट्र ग्रामीण बँकेच्या अधिकाऱ्यांची अनाथ विद्यार्थ्यांचे खाते काढण्यास चालढकल?

**अनाथासाठी मिळणाऱ्या मदतीपासून वंचित राहणार...**

**तभा वृत्तसेवा**
**मंगरुळ, दि.१८ डिसेंबर -**

राज्य शासनाकडून अनाथ मुलांना मदत म्हणून दरमहा आर्थिक मदत देण्यात येते. मात्र ही मदत जमा होण्यासाठी लागणारे बँक उघडण्यासाठी मंगरुळ येथील महाराष्ट्र ग्रामीण बँकेकडून चालढकल होत असल्याचा दुर्दैवी प्रकार घडला आहे. या मदतीपासून हे अनाथ बालक वंचित राहण्याची शक्यता असून याप्रकरणी संबंधित विभागाने लक्ष देवून अनाथास मदत करण्याची मागणी मंगरुळ ग्रामस्थांतून होत आहे.

तुळजापूर तालुक्यातील मंगरूळ येथील कृष्णाथ गजेंद्र मगर व त्यांच्या पत्नीचे गेल्या चार ते पाच वर्षांपूर्वी कॅन्सर सारख्या दुर्धर आजाराने निधन झाले असून त्यांच्या पाल्यास अभिषेक कृष्णाथ मगर यास जिल्हा परिषद व बालकल्याण विकास समिती यांच्याकडून मानधन मंजूर झाले आहे.

मंगरूळ हे गाव महाराष्ट्र ग्रामीण बँकेस दत्तक असल्याने त्यांचे संबंधित नातेवाईक बँकेत खाते काढण्यास गेले असता त्यांना विविध कारणे सांगून (आधार शिडिंग नाही, विद्यार्थ्यांचे खाते आम्ही चालू करत नाही, नातेवाईक किंवा आजी आजोबा यांचे आधार द्या, बँकेच्या नियमानुसार काम करू वरून अँप्रोल आल्यानंतर खाते चालू करू)अशी उडवाउडवीची उत्तरे देऊन चालढकल करण्यात येत असल्याचा आरोप बँकेशी संपर्क साधलेल्या पालक व नातेवाईक यांनी केला आहे.

याबाबत जिल्हा बालविकास अधिकारी, तहसीलदार, जिल्हाधिकारी यांनी अनाथास न्याय द्यावा, अशी मागणी मंगरूळ येथील ग्रामस्थांतुन जोर धरू लागली आहे

## तुळजापूरात गुणरत्न सदावर्ते यांच्यावर बुक्का उधळून सकल मराठा समाजाचा निषेध

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.१८ डिसेंबर -**

विधिज्ञ गुणरत्न सदावर्ते हे दि.१८ डिसेंबर रोजी तुळजाभवानी देवीच्या दर्शनासाठी तुळजापूर येथे आले असता सकल मराठा समाजाच्यावतीने घोषणाबाजी आणि बुक्का उधळत मराठा आरक्षणाचा विरोधकाचा जाहीर निषेध एक मराठा लाख मराठाच्या घोषणा दिल्या.

भवानी रोडवरील असलेल्या गेट पासून कुठल्याही व्हीआयपीच्या गाड्यांना मंदिराकडे एन्ट्री नसल्याने अँड. गुणरत्न सदावर्ते हे त्यांच्या पत्नीसोबत सुरक्षारक्षकांसह आणि कार्यकर्त्यांसोबत तुळजाभवानी मंदिराकडे दर्शनास जात असताना सुवर्णेश्वर मंदिराच्या पुढे सकल मराठा समाजाच्या पदाधिकारी सदस्यांनी बुक्क्याची उधळण करत घोषणाबाजी करून निषेध नोंदवला. मराठ्यांना दिलेले आरक्षण हे असंवैधानिक



असल्याची याचिका सर्वोच्च न्यायालयात लढवून मराठ्यांना आरक्षणापासून वंचित ठेवण्याचे काम सदावर्ते यांनी केले असून आरक्षणासाठी ३५० विद्यार्थी, शेतकरी आणि युवकांच्या आत्महत्येसाठी जबाबदार हा गुणरत्न सदावर्तेच आहे. त्यामुळे निषेध करण्यासाठी सकल मराठा समाजानी सदावर्तेला बुक्का लावण्याचे काम केले आहे.

यावेळी सकल मराठा समाज मोठ्या संख्येने उपस्थित होता. पोलिसांच्या समयसूचकतेमुळे कुठलाही अनुचित प्रकार घडला नाही.

## शिक्षकांना वाढीव महागाई भत्ता लागू करण्याची शिक्षक परिषदेची मागणी

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१८ डिसेंबर -**

केंद्र शासनाने केंद्रीय कर्मचाऱ्यांना जुलै-२०२४ पासून वाढीव महागाई भत्ता लागू केला आहे. त्या धर्तीवर राज्यातील शिक्षक - शिक्षकेत्तर कर्मचारी यांना जुलै-२०२४ पासून वाढीव महागाई भत्ता त्वरीत लागू करण्यात यावा, अशी मागणी महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद जिल्हा शाखा धाराशिव यांच्या वतीने शिक्षण सचिवांकडे करण्यात आली आहे.

यासंदर्भात बुधवारी (ता.१८) संघटनेच्या वतीने दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, केंद्र सरकारने त्यांच्या केंद्रीय कर्मचाऱ्यांना दि.१ जुलै पासून ३ टक्के वाढीव महागाई भत्ता लागू केला आहे.

महाराष्ट्र राज्य विधिमंडळाने एकमताने घेतलेल्या धोरणात्मक निर्णयानुसार राज्य शासकीय कर्मचारी आणि शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांना दि. १ जुलै २०२४ पासून ३ टक्के वाढीव महागाई भत्ता लागू करण्याबाबत राज्य सरकारने त्वरित शासन निर्णय निर्गमित करणे आवश्यक आहे.

तरी यासंदर्भातील शासन निर्णय निर्गमित करुन शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचारी यांना त्यांचा हक्काचा आर्थिक लाभ मिळवून देण्यात यावा, अशी मागणी महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेच्या धाराशिव जिल्हा शाखेच्या वतीने करण्यात आल्याची माहिती परिषदेचे राज्य कार्याध्यक्ष उमाकांत कुलकर्णी यांनी दिली.

याबाबत जिल्हा बालविकास अधिकारी, तहसीलदार, जिल्हाधिकारी यांनी अनाथास न्याय द्यावा, अशी मागणी मंगरूळ येथील ग्रामस्थांतुन जोर धरू लागली आहे.

## प्रबोधन युवाशक्ती फाउंडेशन पुणे यांच्या वतीने कृषी क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरीसाठी अनिल जगताप यांचा गौरव

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१८ डिसेंबर -**

प्रबोधन युवाशक्ती फाउंडेशन पुणे यांच्या वतीने राज्यातील क्रीडा, संस्कृती, कला, साहित्य, कृषी, आरोग्य, शिक्षण या क्षेत्रात उल्लेखनीय काम करणाऱ्या राज्यातील नामांकित व्यक्तींना दरवर्षी राज्यस्तरीय पुरस्कार देऊन गौरव करण्यात येतो. यावर्षी हा कार्यक्रम १५ डिसेंबर रोजी एसपी महाविद्यालय पुणे येथे आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमात सामाजिक कार्यकर्ते अनिल जगताप यांनी केलेल्या शेतकऱ्यांसाठीच्या पिक विमा आणि दुष्काळ अनुदान इत्यादी बाबींचा विचार करून त्यांचा गौरव करण्यात आला.

यावर्षी हा पुरस्कार राज्यातील २१ नामांकित व्यक्तींना देण्यात आलेला आहे. कामगार पुरस्कार नेते डॉ. रघुनाथराव कुचिक व इतर मान्यवरांच्या हस्ते त्यांचा सत्कार करून पुरस्कार देण्यात आला. पुरस्कार प्राप्त व्यक्तीमध्ये स्त्रीभ्रूणहत्येविषयी काम करणाऱ्या पुण्यातील प्रसिद्ध डॉ. तृप्ती राख, आंतरराष्ट्रीय स्तरावर भारताचे व्हॉलीबॉल मध्ये प्रति प्रतिनिधित्व करणारे तुषार पाटील, सलग १२४ तास कथक नृत्य करून वर्ल्ड बुक मध्ये रेकॉर्ड करणारी सृष्टी जगताप, महिला बचत गट व वंचित घटकासाठी काम करणाऱ्या मुंबई येथील डॉ. ज्योती साठे कृषी क्षेत्रात शेतकऱ्यांसाठी उल्लेखनीय काम केलेले अनिल जगताप इत्यादींचा समावेश आहे.





प्रबोधन फाउंडेशन पुणे यांच्या वतीने पुणे येथे माझा सत्कार केला त्याबद्दल त्यांचा मी ऋणी आहे. हा पुरस्कार मला आणखी काम करण्याचा बळ व ऊर्जा देणारा आहे. यापुढील कालखंडात देखील बळीराजासाठी ताकतीने सेवा करू. मिळालेला पुरस्कार राज्यातील बळीराजाला समर्पित करतो.
**- अनिल जगताप. सामाजिक कार्यकर्ते**

## पवनचक्की कंपनीकडुन बळाचा वापर करुन शेतकऱ्यांची आर्थिक फसवणुक

**✻ पवनचक्की कंपनीवर कारवाई करुन त्यांचा परवाना रद्द करा करण्याची स्वराज्य पक्षाची जिल्हाधिकाऱ्यांनी मागणी...**

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.१८ डिसेंबर -**

पवनचक्की कंपनीकडून बडाचा वापर करून तसेच भाडोत्री गुंडाकडून शेतकऱ्यांना दमदाटी करून त्यांच्या जमिनी बळकावण्याचे काम चालू असून अशा पवनचक्की कंपनीवर कारवाई करून त्यांचे परवाने रद्द करण्याची मागणी करत स्वराज्य पक्षाने जिल्हाधिकारी यांना निवेदन दिले आहे.

सदरील निवेदनात असे म्हटले आहे की, धाराशिव जिल्हयामध्ये अनेक कंपन्यांचे पवनचक्की बसविण्याचे काम चालु आहे.

सदर पवनचक्की कंपनीकडुन त्यांनी कामावर ठेवलेल्या भाडोत्री



गुंडाकडुन शेतकऱ्यांना दमदाटी, मारहाण व मानसिक त्रास देवुन त्यांच्या जमीनी त्यांना विश्वासात न घेता त्यांची फसवणुक करुन व योग्य मोबदला न देता, कोऱ्या स्टॅम्पवर सह्या घेवुन जबरदस्तीने जमीनी बळकावुन शेतकऱ्यांची फसवणुक होत आहे.

त्यामुळे शेतकऱ्यांना या कंपन्याचा त्रास होत असताना सुध्दा गावातील प्रमुख लोकांकडुन दबाव तंत्राचा वापरुन शेतकऱ्यांमध्ये भितीचे वातावरण निर्माण करण्याचे काम या कंपन्या करत असुन साम, दाम, दंड, भेद याचा वापर करुन या कंपन्या शेतकऱ्यांच्या जमिनी अल्प मोबदला देवुन गिळंकृत करीत आहेत.

पवनचक्की कंपनीवर कारवाई करुन त्यांचा परवाना रद्द करण्यात यावा.

अन्यथा स्वराज्य पक्ष रस्त्यावर उतरुन या कंपनीच्या विरोधात अंदोलन करुन शेतकऱ्यांना न्याय देण्याचे काम करेल हे करत असताना कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाल्यास त्यांची सर्वस्वी जबाबदारी प्रशासनाची राहील, असा इशारा सदरील निवेदनात दिला आहे.

निवेदनावर स्वराज्य पक्षाचे जिल्हाध्यक्ष महेश गवळी, जीवन इंगळे, कुमार टोले, सत्यजित साठे, पांडुरंग ढेरे, प्रमोद शिंदे, बाळासाहेब खांडेकर, कल्याण बंडगर, बाबासाहेब बंडगर, लिंबराज पाटील, बाळासाहेब कदम आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## मराठवाडा शिक्षक संघाचे आज लक्षवेधी धरणे आंदोलन

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१८ डिसेंबर -**

मराठवाडा शिक्षक संघाच्या वतीने मराठवाड्यातील सर्व शिक्षणाधिकारी (माध्य) कार्यालयासमोर शैक्षणिक क्षेत्राच्या विविध मागण्यासाठी दि.१९ गुरुवार रोजी दुपारी ४ ते ६ या वेळेत लक्षवेधी धरणे आंदोलन आयोजित करण्यात आलेले आहे.

त्याप्रमाणे शिक्षणाधिकारी (माध्य.) धाराशिव कार्यालयासमोर मराठवाडा शिक्षक संघ धाराशिवच्यावतीने निदर्शने, लक्षवेधी आंदोलन आयोजित केले आहे. सध्या हिवाळी अधिवेशन सुरु असल्यामुळे आपल्या सर्वांना जुनी पेन्शन मिळाली पाहिजे, २००५ पूर्वी नियुक्त परंतु नंतर शंभर टक्के अनुदानित शाळा कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना लागू करणे, १०-२०-३० आश्वासित प्रगती योजना लागू करणे, आशा एकूण २६ मागण्या मान्य करण्यासाठी सदर आंदोलन, लक्षवेधी निदर्शने धाराशिव येथे करण्यात येणार आहे.

शिक्षकांनी आंदोलनामध्ये मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन मराठवाडा शिक्षक संघाचे जिल्हाध्यक्ष जयपाल शेरखाने, केंद्र कोषाध्यक्ष अवताडे. ए.बी, सुशीलकुमार तीर्थकर व जमादार एफ.जी, विक्रम मायाचारी, डी. के भोसले, रमण जाधव व संतोष सोलंकर, गीते जे.पी व बलसुरे यांच्यासह आदिंनी केले आहे.

# शेतकऱ्यांवर पवनचक्की कंपन्याकडून पोलीस, बाऊन्सरमार्फत होणारी गुंडागर्दी थांबवा

## आमदार कैलास पाटील यांनी विधानसभेत केली मागणी....

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१८ डिसेंबर -**

तुळजापूर तालुक्यातील जवळगा मेसाई गावामध्ये काही दिवसापूर्वी बाऊन्सरच्या माध्यमातून दहशत पसरविण्याचा प्रकार घडला होता. आमदार कैलास पाटील यांनी विधानसभेत औचिताच्या मुद्द्यामध्ये हा विषय सभागृहात मांडला. यावेळी त्यांनी पवनचक्की कंपन्यांची दहशत मोडून काढत संबधित लोकांवर योग्य कारवाई करण्याची मागणी आमदार पाटील यांनी केली.

यावेळी पाटील म्हणाले की, धाराशिव जिल्ह्यामध्ये मागील काही वर्षांपासून पवनचक्की उभारण्याचे काम मोठ्या प्रमाणात सुरु झाले आहे. त्यासाठी आवश्यक जमिनी घेताना कंपनीच्या लोकांकडून दहशत निर्माण करून शेतकऱ्यांना दमदाटी करण्याचे प्रकार वाढले आहेत. मागच्याच आठवड्यात तुळजापूर तालुक्यातील जवळगा मेसाई गावात काळ्या रंगाच्या दहा ते बारा गाड्या आल्या. त्यातून मोठ्या संख्येनं बाऊन्सर उतरले व त्यांनी शेतकऱ्यांना दम दाटी केल्याचं समोर आलं आहे. याप्रकरणी पोलीस बघ्याची भूमिका घेत राहिले. अश्यावेळी पोलीस तक्रारीची वाट पाहतात अनेक प्रकरणात पोलीस स्वतः हुन कारवाई करतात. त्याप्रमाणे अश्या प्रकरणी देखील अशीच कारवाई अपेक्षित आहे. काही ठिकाणी तर पोलीसच या कंपनीच्या लोकांना सहकार्य करताना दिसतात मग अश्यावेळी शेतकऱ्यांनी न्याय तर कोणाकडे मागायचा असाही मुद्दा उपस्थित केला.



यासाठी ही दहशत मोडून काढणे आवश्यक आहे म्हणून पोलीस व गुंडागर्दी करणाऱ्या बाऊन्सर वर कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी आमदार कैलास पाटील यांनी केली आहे.

# जिल्हाधिकारी कार्यालय येथे अल्पसंख्याक हक्क दिवस साजरा

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१८ डिसेंबर -**

संयुक्त राष्ट्राने १८ डिसेंबर १९९२ रोजी राष्ट्रीय, वांशिक, धार्मिक आणि भाषिक अल्पसंख्याकांच्या हक्कांचा जाहीरनामा स्विकृत करुन प्रस्तूत केला आहे. त्यानुसार दरवर्षी १८ डिसेंबर हा अल्पसंख्याक हक्क दिवस म्हणून साजरा करण्यात येतो. अल्पसंख्याक विकास विभाग, मंत्रालय ,मुंबई यांनी देखील राज्यात १८ डिसेंबर हा दिवस अल्पसंख्याक हक्क दिवस म्हणून साजरा करण्याबाबत सूचना दिल्या आहे.

त्याचाच एक भाग म्हणून आज १८ डिसेंबर रोजी जिल्हाधिकारी कार्यालयातील सभागृहात अल्पसंख्याक हक्क दिवस साजरा करण्यात आला. अल्पसंख्याक हक्क दिवसाच्या निमित्ताने अल्पसंख्याकांना त्यांच्या घटनात्मक आणि कायदेशीर हक्कांबाबत जाणिव करुन देण्याचे काम आयोजित कार्यक्रमातून करण्यात आले.




जिल्हयामधील सर्व शासकीय/ निमशासकीय कार्यालयांनी देखील अल्पसंख्याक हक्क दिवसाच्या निमित्ताने विविध कार्यक्रम आयोजित केले.

आज जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित कार्यक्रमात उपजिल्हाधिकारी संतोष भोर, जिल्हा नियोजन अधिकारी अर्जून झाडे, धाराशिव तहसीलदार मृणाल जाधव व तहसीलदार (महसूल) अभिजीत जगताप आदीसह जिल्हाधिकारी कार्यालयातील अन्य अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# डॉ. धर्म यांच्याकडून एकलव्य विद्या संकुलात विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१८ डिसेंबर -**

धाराशिव येथील प्रसिद्ध बालरोग तज्ञ डॉ. प्रसाद धर्म एकलव्य विद्या संकुल मंगरूळ यमगरवाडी (ता. तुळजापूर) येथे दर बुधवारी भेट देतात. वसतिगृहातील मुला मुलींची आरोग्य तपासणी करतात. आजारी मुलांची काळजी घेतात. आजारी मुला मुलींना मोफत औषधे देतात.

दर बुधवारी डॉ. धर्म यांची भेट होत असलेने वसतिगृहातील मुलांचे आजाराचे प्रमाण कमी होत आहे. समाजाचे आपण काहीतरी देणे लागतो या उद्देशाने भटके विमुक्त मुलांची एक प्रकारे सेवा करत आहेत. डॉ.अभय शहापूरकर यांच्या प्रयत्नातून प्रसाद धर्म दर आठवड्यास एकलव्य विद्या संकुलास भेट देत आहेत.

या सेवेबद्दल संस्थेचे अध्यक्ष सुखदेव काळे, उपाध्यक्ष डा. अभय शहापूरकर, कार्यवाह विवेक अयाचीत, मुख्याध्यापक विठ्ठल म्हेत्रे, अण्णासाहेब कोल्हटकर, फुलाजी ताटीकुंडल वार, संगीता पाचंगे तसेच सर्व कर्मचारी यांनी आभार मानले.

# मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षणार्थी यांना २५ हजार मानधन द्यावे

## प्रशिक्षणार्थींचे परंड्यात तहसीलदारांना निवेदन

**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.१८ डिसेंबर -**

मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षणार्थी यांचा कार्यकाल वाढविण्यात यावे २५ हजार मानधन देण्यात यासह विविध मागण्या परंडा येथील प्रशिक्षणार्थी यांनी तहसिलदार मार्फत मुख्यमंत्र्या यांच्याकडे केले आहे.

सोमवार दि १६ डिसेंबर रोजी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, सर्व आस्थापनावर ६ महिन्याच्या कार्यकाळाचे प्रशिक्षण घेत आहोत.

तसेच आमचे प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर आम्हाला आमचा कार्यकाळ वाढवून द्यावा, आम्ही विविध विभागामध्ये जॉब करत आहोत तेथेच आम्हाला कायम सेवेची संधी देण्यात यावी. देवेंद्र फडणवीस यांनी



मुख्यमंत्री म्हणून शपथ घेण्याच्या आदल्या दिवशी केलेल्या भाषणात लाडके भाऊ आणि लाडक्या बहिणींच्या योजना व त्यांना दिलेल्या आश्वासन पूर्ण करणार आहोत, असा शब्द दिला होता.

त्यानुसार महाराष्ट्रातील युवक आणि युवतीं साठी कायम स्वरुपी नोकरी किंवा रोजगार उपलब्ध करून द्यावा, खालील मागण्या आपणाकडून पूर्ण करून आम्हा सर्वांना कायम सेवेची संधी द्यावी, युवा कार्य प्रशिक्षण योजनेतील प्रशिक्षणार्थींना किमान २५ हजार रुपये वेतन/ मानधन देण्यात यावे.

प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर सेवेत कायम स्वरूपी सेवेची संधी द्यावी, शासकीय आणि निमशासकीय कर्मचाऱ्यांना देय असलेल्या सर्व सवलती देण्यात याव्यात, सर्व शासकीय व निमशासकीय कार्यालयामध्ये भरती प्रक्रीयेमध्ये प्रशिक्षणार्थीसाठी १० टक्के राखीव जागा ठेवाव्यात, सर्व प्रशिक्षणार्थींना अंशकालीन कर्मचाऱ्यांचे आरक्षण लागू करण्यात यावे इत्यादी मागण्या या निवेदनाद्वारे करण्यात आल्या आहेत.

# जळकोट प्रशालेत अल्पसंख्यांक अधिकार हक्क दिवस साजरा

**तभा वृत्तसेवा**
**जळकोट, दि.१८ डिसेंबर -**



जळकोट येथील जिल्हा परिषद प्रशालेत १८ डिसेंबर हा शासनाने जाहीर केलेला अल्पसंख्यांक अधिकार हक्क दिवस साजरा करण्यात आला.

अल्पसंख्यांक दिनानिमित पालक रफिक मुल्ला यांचा पुष्पगुच्छ देऊन शाळेचे मुख्याध्यापक पी.एल. तरमोडे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. पालक जास्मिन बागवान यांचा सत्कार शालेय व्यवस्थापन समितीच्या सदस्या पुनम दूधभाते यांच्या हस्ते पुष्पगुच्छ देऊन करण्यात आला. इयत्ता पाचवी ते दहावी मधील अल्पसंख्यांक विद्यार्थी व विद्यार्थिनींचा सत्कार शाळेतील विद्यार्थ्यांच्या हस्ते करण्यात आला.

यावेळी या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शिक्षण समितीचे उपाध्यक्ष विजय पिसे हे होते. यावेळी अल्पसंख्यांक अधिकार हक्क दिवसाची माहिती शाळेचे मुख्याध्यापक तरमोडे व शाळेच्या शिक्षिका पी. एस कांबळे यांनी आपल्या मनोगतामधून अल्पसंख्यांक समाजाच्या उन्नतीसाठी करण्यात आलेले कायदे, विविध शिष्यवृत्ती, संविधानातील कलम, अल्पसंख्यांक समाजासाठीच्या विद्यार्थी लाभाच्या शिष्यवृत्ती अल्पसंख्याक समाजाचे सण, उत्सव, हक्क, संविधानातील तरतुदी याबाबत सविस्तर माहिती दिली.

या कार्यक्रमास शाळेचे शिक्षक पी.एल. तरमोडे, एस.ए.सारणे, जे.बी. शिंदे, एस.एस. पवार, जी.एस. बनपट्टे, पी.एस. कांबळे, व्ही.ए. कदम, ए.आर. सुरवसे, परिचारक स्वामी, शिक्षण समिती सदस्य तुकाराम कुंभार, पुनम दुधभाते, अर्चना कांबळे तसेच शाळेतील शिक्षक-शिक्षिका व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# दिव्यांगांच्या क्रीडा स्पर्धा उत्साहात संपन्न

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१८ डिसेंबर -**

शासकीय/अनुदानित/ विनाअनुदानित व कायम स्वरूपी विनाअनुदानित दिव्यांगाच्या विशेष शाळा कर्मशाळामधील दिव्यांग मुला-मुलींच्या कलागुणांना वाव मिळावा, त्यांना खेळामध्ये संधी मिळावी त्याच्यातील सुप्त क्रीडाविषयक कौशल्यांना संधी मिळावी व दिव्यांग व्यक्तीमधील न्यूनगंड दूर होऊन त्यांचा जीवनाकडे सकारात्मक पाहण्याचा दृष्टिकोन विकसित व्हावा तसेच दिव्यांग व्यक्तीसुद्धा समाजाचा एक उपयुक्त घटक म्हणून पुढे यावा यासाठी दरवर्षी ३ डिसेंबर हा आंतरराष्ट्रीय दिव्यांग दिन साजरा करण्यात येतो.यानिमित्ताने १७ व १८ डिसेंबर दरम्यान दोन दिवशीय दिव्यांगांच्या विशेष शाळेतील विद्यार्थ्यांच्या जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धा उत्साहात संपन्न झाल्या.

या जिल्हास्तरीय दिव्यांग मुला-मुलींच्या क्रीडा स्पर्धेचे आयोजन समाज कल्याण विभाग जिल्हा परिषद धाराशिव यांच्या वतीने करण्यात आले. स्पर्धेचे उद्घाटन तुळजाभवानी स्टेडियम धाराशिव येथे जिल्हाधिकारी डॉ.मैनक घोष यांच्या हस्ते १७ डिसेंबर रोजी दीप प्रज्वलन करून व क्रीडाज्योत प्रज्वलीत व महापुरुषांच्या फोटोचे पुष्पहार अर्पण करून करण्यात आले. अध्यक्षस्थानी जिल्हा समाज कल्याण अधिकारी सुनील खमितकर होते.

यावेळी स्काऊट गाईडचे विक्रांत देशपांडे समाज कल्याण विभाग लातूरचे प्रादेशिक उपायुक्त अविनाश देवसाठवार,प्रहार दिव्यांग क्रांती संघटनेचे जिल्हाध्यक्ष मयूर काकडे,अखिल भारतीय भ्रष्टाचार निर्मूलन संघटनेचे प्रदेशाध्यक्ष काशिनाथ शिंदे,दिव्यांग संघटनेचे उपाध्यक्ष शौकत अली,मोहम्मद अत्तार सहसंघटक प्रहार दिव्यांग क्रांती आंदोलन,संगमेश्वर दत्तात्रय बिराजदार राष्ट्रीय पॅरा ओलंपिक खेळाडू प्रयागताई पवळे,राष्ट्रीय पॅरालिक खेळाडू शहाजी चव्हाण,रशीद कोतवाल,ङ बी.आर. कलवले, बालाजी शिंदे,चंद्रकांत जाधव, सचिन सरवदे, सच्चिदानंद बांगर, जगताप उपस्थित होते.

# संविधान प्रतिमेची विटंबना करणाऱ्या दोषींवर कडक कारवाईची मागणी

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१८ डिसेंबर -**

परभणी येथील भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यासमोरील संविधानाच्या प्रतिकृतीची तोडफोड करून विटंबना केल्याप्रकरणी जातीवादी समाजकंटकावर तात्काळ देशद्रोहाचा गुन्हा दाखल करून अटक करावी, अशी मागणी संविधान संरक्षण समिती धाराशिवच्या वतीने निवासी उपजिल्हाधिकारी यांच्यामार्फत राज्याचे राज्यपाल यांना निवेदन देण्यात आले आहे.

सदरील निवेदनात गुन्हेगारावर तात्काळ कडक कारवाई करण्यात यावी, अशी मागणी संविधान संरक्षण समितीच्या वतीने करण्यात निवेदनाद्वारे आली आहे.

सदरील निवेदनावर रिपाइं (खरात) पक्षाचे धाराशिव जिल्हाध्यक्ष राजाभाऊ राऊत, हरिभाऊ बनसोडे, प्रा.डॉ. दीनकर झेंडे, गौतम सोनवणे, चंद्रकांत गायकवाड, राहुल राऊत, अजय गायकवाड, बी.व्ही. भालेराव यांच्यासह अनेक भीमसैनिकाच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# डॉ. होमी भाभा बालवैज्ञानिक स्पर्धेत तडवळे येथील जि.प. शाळांचे यश

## दोन मुलींची प्रात्यक्षिक स्पर्धेसाठी निवड

**तभा वृत्तसेवा**
**कसबे तडवळे, दि.१८ डिसेंबर -**

मुंबई विज्ञान अध्यापक मंडळ यांच्या वतीने घेण्यात येणाऱ्या डॉ. होमी भाभा बालवैज्ञानिक राज्यस्तरीय स्पर्धेची लेखी परीक्षा ३० नोव्हेंबर २०२४ रोजी झाली होती. सहावी वर्गातील विज्ञान विषयासाठी होणाऱ्या या लेखी परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला. यामध्ये जिल्हा परिषद आदर्श केंद्रीय प्राथमिक शाळा कसबे तडवळे शाळेतील १७ विद्यार्थी तर जिल्हा परिषद आदर्श कन्या शाळा शाळेतील १९ विद्यार्थीनी उत्तीर्ण झाल्या आहेत. यामध्ये कन्या शाळेतील नंदिनी मते व संस्कृती शेंडगे यांची राज्यस्तरीय प्रात्यक्षिक परीक्षेसाठी निवड झाली आहे.

उत्तीर्ण मुलींमध्ये स्वराली सुतार, जेबामहेक शेख, वैष्णवी जमाले, आर्या धायगुडे, संस्कृती होगले, ज्ञानेश्वरी करंजकर, आराध्या करंजकर, आस्मिता ढमे, स्नेहा कोरडे, स्वरांजली गजाकोष,सुफिया कोतवाल, अपूर्वा सपाटे, कार्तिकी राहींज, स्वामीनी जगदाळे, मोनाली लंगडे, शिवानी कोरे



व वेदिका चव्हाण या विद्यार्थीनी उत्तीर्ण झाल्या आहेत.

तसेच जिल्हा परिषद आदर्श केंद्रीय प्राथमिक शाळेतील गणेश सोमनाथ कसबे, सुशांत रणजीत चव्हाण, भैरवनाथ जगदीश सपाटे, रुद्र सोमनाथ वाकडे, शिवराज अशोक करंजकर, समर्थ गोविंद जमाले, आयुष शरद शिनगारे, समर्थ संताजी जमाले, योगेश गणेश लांडगे, अथर्व भालचंद्र थोरवे, यश बारिस्टर कपाळे, अमित उमेश शिनगारे, धनराज बापू सवासे, रुद्र ज्ञानेश्वर भोरे, अथर्व हरिश्चंद्र होगले, श्रेयश शिवाजी करंजकर व असिफ मेहबूब आतार हे विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत.

यशस्वी कन्या शाळेतील मुलींना विज्ञान पदवीधर गणपती यावलकर तर केंद्रीय शाळेतील मुलांना विज्ञान पदवीधर शिक्षिका हेमलता चांडगे, अंजली डुमणे व बाळासाहेब जमाले यांचे मार्गदर्शन लाभले.

राज्यस्तरीय विज्ञान परीक्षेतील या यशाबद्दल विस्ताराधिकारी किशोरी जोशी, केन्द्रप्रमुख जगदीश जाकते, शाळा व्यवस्थान समिती अध्यक्ष पवार, अध्यक्ष सोमनाथ भोसले, केंद्रीय मुख्याध्यापक केशव पवार, कन्या शाळा मुख्याध्यापक रहिमान सय्यद, आदर्श शिक्षक जगन्नाथ धायगुडे, दत्तात्रय मगर, संजय देशटवाड, मोहम्मद नदाफ, अजय जानराव, प्रवीण गाडे, शहाजी पुरी, रामकृष्ण ढवळे, देवेंद्र घायतिडक यांनी यशस्वी विद्यार्थी व मार्गदर्शक शिक्षक यांचे अभिनंदन केले आहे.

# देशसेवेसाठी तरुणांनी तत्पर रहावे : डॉ संजय अस्वले



**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.१८ डिसेंबर -**

श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयातील उमरगा येथील कॅडेट रावण ममाळे (सीआयएसएफ) माजी विद्यार्थी संदिप कुंभार (आयटीबीपी), नवनाथ पाश्मे (सीआरपीएफ) यांचे स्पर्धा परीक्षा पोलीस सैन्यदल कडमी, करिअर कट्टा, NCC विभागा तर्फे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ संजय अस्वले यांनी त्यांचा सत्कार व अभिनंदन केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षिय भाषणात कॅडेटसना, विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सरांनी आपल्या भाषणात सांगितले की केवळ सैन्यदल, पोलीस, निमलष्करी पदावर भरती झाल्या नंतर न थांबता एमपीएससी, युपीएससी या स्पर्धा परीक्षेच्या माध्यमातुन वर्ग एक (क्लासवन), वर्ग दोन (क्लासटु 'ची तयारी करावी असे, सांगितले. यासाठी महाविद्यालयात स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र, करिअर कट्टा, सैन्य-पोलिस भरती पूर्व प्रशिक्षण जे की लेखी परीक्षेची तयारी करूण घेते व एनसीसीच्या माध्यमातून मैदानाची तयारी करूण घेते.

यासाठी विद्यार्थ्यानी याचा लाभ घेऊन देशाची सेवा करावी असे आवाहन केले. या कार्यक्रमासाठी उप्राचार्य डॉ. विलास इंगळे, डॉ. पदमाकर पिटले, कॅप्टन ज्ञानेश्वर चिट्टमपल्ले, उपस्थित होते. सूत्रसंचलन डॉ. चंद्रसेन करे आणि आभार डॉ. समाधान पसरकले यांनी केले.

या कार्यक्रमास महाविद्यालयातील प्राध्यापक, कॅडेटस, विद्यार्थी, कर्मचारी बहुसंखेने उपस्थित होते.

## जाहीर समन्स

रे.मु.नं. १३२/१९९६
निशाण नं. २३०
नेमलेली तारीख - १०/०१/२०२५

**बार्शी येथील में. श्रीमती पी.व्ही. राऊत साहेब सि.ज.ज्यु.डि. यांचे कोर्टात**

विश्वास महप्पा खुणे वगैरे ....वादी
विरूध्द
बळवंतराव यादवराव घोगरे वगैरे ....प्रतिवादी

**यात प्रतिवादी क्र. १ ई) अनुराधा बाळासाहेब पाटील, रा. सारोळा बु, ता.जि. धाराशिव**

ज्याअर्थी यातील वादी यांनी आपणाविरूध्द या न्यायालयात नियमित दिवाणी दावा क्रमांक १३२/१९९६ या में. न्यायालयात दाखल केलेला आहे. त्यानुसार में. न्यायालयाकडुन आपणास वर नमुद पत्तयावर समन्स पाठविले असता त्याची बजावणी होत नाही. आपण वरील पत्त्यावर रहात आहात परंतू समन्स बजावणी होत नाही म्हणून तुम्हास या जाहीर समन्सने कळविण्यात येते की, हे जाहिर समन्स प्रसिध्द झालेपासून ३० दिवसांत अथवा नेमलेली तारीख १०/०१/२०२५ आपण आपल्या प्रतिनिधीमार्फत अथवा स्वतः जातीने आपला लेखी बचाव सदर दाव्यात दाखल करावा व आपला कायमचा पत्ता या न्यायालयात नेमलेल्या तारखेस दयावा. या प्रमाणे आपल मुदतीत हजर राहून आपला लेखी जबाब बचाव दाखल न केल्यास व हजर न राहिल्यास वादीच्या मागणीप्रमाणे दावा मंजूर करण्यात येईल. याची नोंद घ्यावी.

**कळावे,**
**हे जाहिर समन्स आज दि. ०३/१२/२०२४ कोर्टाचे सही व शिक्यांशी प्रसिध्द केले.**

हुकूमावरून,

स्वाक्षरित/- कनिष्ठ लिपीक
स्वाक्षरित/- सहा.अधिक्षक

**सहा. अधिक्षक सह दिवाणी न्यायालय, क. स्तर. बार्शी**

## जाहीर समन्स

रे.मु.नं. १३२/१९९६
निशाण नं. २२९
नेमलेली तारीख - १०/०१/२०२५

**बार्शी येथील में. श्रीमती पी.व्ही. राऊत साहेब सि.ज.ज्यु.डि. यांचे कोर्टात**

विश्वास महप्पा खुणे वगैरे ....वादी
विरूध्द
बळवंतराव यादवराव घोगरे वगैरे ....प्रतिवादी

**यात प्रतिवादी क्र. १ इ) अलका अर्जुनराव पंडीत रा. दहिटण, ता. गेवराई, जि. बीड**

ज्याअर्थी यातील वादी यांनी आपणाविरूध्द या न्यायालयात नियमित दिवाणी दावा क्रमांक १३२/१९९६ या में. न्यायालयात दाखल केलेला आहे. त्यानुसार में. न्यायालयाकडुन आपणास वर नमुद पत्तयावर समन्स पाठविले असता त्याची बजावणी होत नाही. आपण वरील पत्त्यावर रहात आहात परंतू समन्स बजावणी होत नाही म्हणून तुम्हास या जाहीर समन्सने कळविण्यात येते की, हे जाहिर समन्स प्रसिध्द झालेपासून ३० दिवसांत अथवा नेमलेली तारीख १०/०१/२०२५ आपण आपल्या प्रतिनिधीमार्फत अथवा स्वतः जातीने आपला लेखी बचाव सदर दाव्यात दाखल करावा व आपला कायमचा पत्ता या न्यायालयात नेमलेल्या तारखेस दयावा. या प्रमाणे आपल मुदतीत हजर राहून आपला लेखी जबाब बचाव दाखल न केल्यास व हजर न राहिल्यास वादीच्या मागणीप्रमाणे दावा मंजूर करण्यात येईल. याची नोंद घ्यावी.

**कळावे,**
**हे जाहिर समन्स आज दि. ०३/१२/२०२४ कोर्टाचे सही व शिक्यांशी प्रसिध्द केले.**

हुकूमावरून,

स्वाक्षरित/- कनिष्ठ लिपीक
स्वाक्षरित/- सहा.अधिक्षक

**सहा. अधिक्षक सह दिवाणी न्यायालय, क. स्तर. बार्शी**

## क्राईम वृत्त...

### निळकंठेश्वरच्या विकासासाठी कोटींचा निधी मंजूर

**औसा, दि.१८ डिसेंबर -**

औसा तालुक्यातील किल्लारी येथील ग्रामदैवत श्री निळकंठेश्वर देवस्थानच्या विकासासाठी ३ कोटीं रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. आ. अभिमन्यू पवार यांच्या प्रयत्नातून निधीची तरतूद करण्यात आली असून ग्रामीण तीर्थक्षेत्र विकास योजनेंतर्गत निळकंठेश्वर ब वर्ग ग्रामीण तीर्थक्षेत्राच्या ठिकाणी विविध विकास कामांसाठी निधी मंजूर करण्यात आला आहे. श्री निळकंठेश्वर देवस्थान येथे भक्तनिवास बांधकाम, पुरुष शौचालय बांधकाम, स्त्री शौचालय बांधकाम आणि रस्ता व नाली बांधकाम करण्यासाठी ३ कोटी रुपये निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे. आ. अभिमन्यू पवार यांच्या दुसऱ्या टर्ममधील औसा मतदारसंघातील विकासयात्रेची सुरुवात श्री निळकंठेश्वराच्या आशीर्वादाने होत आहे.





### बाबासाहेब पाटील यांना कॅबीनेट मंत्रीपद मिळाल्याने देवणी जल्लोष

**देवणी, दि.१८ डिसेंबर -**

देवणी येथील बोरोळ चौकात महायुतीचे पदाधिकारी व कार्यकर्त्यांन फटाके फोडत एकमेकांना पेढे भरवुन जल्लोष साजरा केला. यावेळी राष्ट्रवादीचे तालुकाध्यक्ष महेश जाधव विळेगावकर, जिल्हा उपाध्यक्ष अनिल कांबळे, अल्पसंख्याकचे तालुकाध्यक्ष रियाज मोमिन, उद्धव मोरे, मलिकार्जुन सुरशेट्टे, माधव बालुरे, गफ्फुर खुरेशी, निळकंठ बिरादार, संजय बिरादार, दत्ता चाळकापुरे, नरसींग सुर्यवंशी, बालाजी सुर्यवंशी, सोमनाथ लद्दे, माजिद मुंजेवार, सचिन घाळे, लक्ष्मण रणदिवे, संजय बिरादार, सलिम मणियार, आकाश पाटील, स्वप्निल बावगे, सागर मसगले, राहुल टिळे यांच्यासह कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थीत होते.



### मुख्यमंत्री युवा प्रशिक्षण संघटनेच्या तालुकाध्यक्षपदी शुभंम पांचाळ

**उदगीर, दि.१८ डिसेंबर -**

उदगीर येथे मुख्यमंत्री युवा प्रशिक्षण योजनेअंतर्गत सर्व प्रशिक्षणार्थी उदगीर येथील बैठक घेऊन येथे उपस्थित होते.पुढील वाटचालीसाठी एक संघटना तयार करण्यात आली. या संघटनेच्या उदगीर तालुकाध्यक्षपदी शुभंम पांचाळ तर सचिवपदी मन्मथ भुसागरे यांची निवड करण्यात आली आहे. तर आवरीत कार्यकरणीत उपाध्यक्ष म्हणून तौफीक सत्तार पठाण, बुद्धरत्न संजीव भुताळे, सहसचिव शुभंम मुसने, प्रदीप सोनकांबळे, कोषध्यक्ष नरेंद्र पिचारे, भैययासाहेब मसुरे, सल्लागार पठाण आसिफ, रोहित कांबळे, संघटक, अविनाश बिरादार, संदीप हल्लाळे, मार्गदर्शक सचिन झुमकुलवाड, विशाल रोडेवाड, सदस्य म्हणून नंदकुमार मुसने, साक्षी एकलिंगे, अनिता लोहारे, संग्राम बुडगे, शरद कांबळे, सुवर्णा देवनाळे, आशा कुंडगीर ई निवड करण्यात आली आहे.



### 'त्या' घटनेच्या निषेधार्थ शिरुर अनंतपाळ कडकडीत बंद

**शिरूर अनंतपाळ, दि.१८ डिसेंबर -**

शिरूर अनंतपाळ येथील या सर्व कार्यकर्त्याकडून परभणी येथे झालेल्या संविधान प्रतीकृतीची विटंबना झाल्याने त्या घटनेच्या निषेधार्थ शिरुर अनंतपाळ तालुका कडकडीत बंद ठेवण्यात आला. शिरूर अनंतपाळची बाजारपेठ म्हणजे हे सर्व तालुक्याचे बाजारपेठ आहे. पण आज पुकारलेल्या बंदमुळे या बाजारपेठेत दिवसभर शुकशुकाट दिसून आला. या बंदसाठी खालील कार्यकर्त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली गर्जन गायकवाड, सत्यजित सूर्यवंशी, सिद्धांत गायकवाड, गणेश कांबळे, तुषार मादळे, विशाल गिलचे, गौतम कांबळे, चेतन मदाळे, अविनाश जाधव, राकेश बानाटे, रोहित गायकवाड, राहुल मादळे, राम कांबळे, सिद्धार्थ बानाटे, रोहित हारणे, गजानन कांबळे, अजय बानाटे, परमेश्वर गायकवाड, वेदांत बानाटे, साईनाथ कांबळे, हुसेन मादळे, शावलीन मादळे. आदी मान्यवर उपस्थित होते.

### श्याम भुरे यांचे निधन

**शिरूर अनंतपाळ, दि.१८ डिसेंबर -**



श्याम रामा भुरे यांचे अपघाती वयाच्या ८३ वर्षाचे असताना निधन झाले. त्यांच्या पश्चात एक मुलगा, तीन मुली, सुना, नातवंडे असा कौटुंबिक दृष्ट्या सधन परिवार आहे. यांच्यावरती अंत्यसंस्कार दि.१६ डिसेंबर रोजी दैठणा येथील सार्वजनिक शांतीधाम समशानभूमी या ठिकाणी यांच्यावरती दु. ४ करण्यात आलेले आहे.

### शकुंतला कुलकर्णी सुगावकर यांचे निधन

**लातूर, दि.१८ डिसेंबर -**



ज्येष्ठ नागरिक शकुंतलाबाई यशवंतराव कुलकर्णी सुगावकर यांचे वृद्धापकाळाने मंगळवारी दुपारी निधन झाले. मृत्युसमयी त्यांचे ८५ वर्षे वय होते. त्यांच्यावर बुधवारी, दि.१८ डिसेंबर रोजी सकाळी ११ वाजता खाडगाव रोड स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात चार मुले, दोन मुली, नातवंडे असा परिवार आहे. शिक्षक एस. वाय. कुलकर्णी यांच्या त्या मातोश्री होत्या.

## राष्ट्रीय लोकअदालतीमध्ये ३२ प्रकरणे निकाली...

# १ कोटी ४३ लाख ७० हजार रुपये वसूल

**तभा वृत्तसेवा**
**निलंगा, दि.१८ डिसेंबर -**

तालुका विधी सेवा समिती, निलंगा यांच्या संयुक्त विद्यमाने आणि महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण यांच्या आदेशानुसार निलंगा येथील न्याालयात अतिरिक्त जिल्हा सत्र न्यायाधीश एस.टी. भालेराव यांच्या अध्यक्षतेखाली शनिवारी दि.१४ डिसेंबर रोजी राष्ट्रीय लोक अदालतीचे आयोजन करण्यात आले होते. या लोक अदालतीत एकूण ३२ प्रकरणे निकाली काढण्यात आले. तर १ कोटी ४३ लाख ७० हजार रुपये वसूल करण्यात आले आहेत.

राष्ट्रीय लोक अदालतीमध्ये मोटार अपघात नुकसान भरपाई प्रकरणे, कलम १३८ एन.आय. ॲक्टची प्रकरणे, कोर्टात प्रलंबित असलेली तडजोडपात्र दिवाणी व फौजदारी प्रकरणे असे एकूण ५८२ प्रकरणे ठेवण्यात आली होती. त्यापैकी २२प्रकरणे निकाली काढून ८२ लाख ८५ हजार रुपये तडजोडी अंती नुकसान भरपाई वसूल करण्यात आली. तसेच दाखलपूर्व प्रकरणांमध्ये बँकांचे वसुली दावे असे एकूण २१६० प्रकरणांपैकी १० प्रकरणे निकाली काढून ६० लाख ८५ हजार रुपये वसूल करण्यात आले, दोन्ही प्रकरणामध्ये एकूण १ कोटी ४३ लाख ७० हजार रुपये वसूल करण्यात आले आहेत.

या लोक अदालतीमध्ये ॲड. एस.व्ही. सोळंके, ॲड.ए.व्ही. सबनीस, ॲड.आर.बी. सुर्यवंशी, ॲड.टी.जी. सुर्यवंशी, ॲड.व्ही.बी. कांबळे यांनी पंच म्हणून काम पाहीले. तसेच पॅनल प्रमुख म्हणून निलंगा न्यायालयातील अतिरिक्त जिल्हा न्यायाधिश एस.टी. भलेराव, दिवाणी न्यायाधीश व स्तर निलंगा ए.बी. मरलेचा, सह दिवाणी न्यायाधीश व स्तर निलंगा व्ही.डी. भोसले, सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर निलंगा आर.डी. खराटे, दुसरे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर निलंगा ए.एस. गुंजवटे यांनी यांनी काम पाहिले. तर लोक अदालत यशस्वी करण्यासाठी न्यायालयीन कर्मचारी व तालुका विधी सेवा समितीचे एस.बी. चांदोरीकर यांनी परिश्रम घेतले.




### सुमित कोकरे याचा सत्कार

**तभा वृत्तसेवा**
**उदगीर, दि.१८ डिसेंबर -**

येथील महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालयाचा विद्यार्थी सुमित सुरेश कोकरे याची राज्यस्तरीय क्रिकेट संघात निवड होऊन तो राष्ट्रीय स्पर्धेत जाणार आहे.

याबद्दल या खेळाडूचा त्याच्या वडीलासह महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीचे सहसचिव ॲड.एस.टी. पाटील चिघळीकर आणि कार्यकारिणीचे सदस्य बसवराज पाटील नागराळकर यांच्या हस्ते शाल, पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. त्यास क्रीडासंचालक एस.बी.मुंढे आणि प्रा.रोहन येनाडले यांचे मार्गदर्शन लाभले होते.

## कॅबिनेट मंत्रिपदाची शपथ; अहमदपूर, चाकूर तालुक्यात आनंदोत्सव

**आ. बाबासाहेब पाटील कॅबिनेट मंत्री म्हणून शपथ घेणारे पाहिले मंत्री**

**तभा वृत्तसेवा**
**चाकूर, दि.१८ डिसेंबर -**

आ. बाबासाहेब पाटील यांनी कॅबिनेट मंत्री पदाची शपथ घेताच चाकूर व अहमदपूर तालुक्यात फटाके फोडून, पेढे भरपूर आनंदोत्सव साजरा करण्यात आला. अजित पवार गटाच्या राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे चाकूर अहमदपूर विधानसभा मतदार संघांचे आमदार बाबासाहेब पाटील यांनी रविवार दि.१५ डिसेंबर रोजी नागपूर येथील राजभवनावर कॅबिनेट मंत्री म्हणून मंत्रिपदाची व गोपनीयतेची शपथ घेतली. राज्यपाल सी. राधाकृष्णन यांनी पाटील यांना शपथ दिली.



तब्बल वीस वर्षांनी चाकूर अहमदपूर विधानसभा मतदार संघाला आ. बाबासाहेब पाटील यांच्या रूपाने मंत्रिपद मिळाले आहे.

पाहिले कॅबिनेट मंत्री होण्याचा मानही आ. पाटील यांच्या नावे जात आहे. यापूर्वी किशनराव देशमुख, रामचंद्रराव पाटील व विनायकराव पाटील यांनी राज्यमंत्री म्हणून काम केले आहे. आ. बाबासाहेब पाटील यांची मंत्री म्हणून शपथ घेताच नागपुरात आलेल्या पाटील समर्थक कार्यकर्त्यांनी मोठा जल्लोष केला.

तसेच चाकूर व अहमदपूर तालुक्यात फटाक्याची आतीषबाजी करून आनंदोत्सव साजरा करण्यात आला. शिरूर ताजबंदमध्ये तर दिवाळीच साजरी करण्यात आली. त्याचबरोबर ग्रामीण भागातही फटाकाची आतिषबाजी करण्यात आली.

मंत्री म्हणून शपथ घेण्याअगोदर दुपारच्या सुमारास आ. बाबासाहेब पाटील यांनी नागपूर येथील दीक्षाभूमिवर जाऊन महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन केले.

यावेळी बौध्द अनुयायांनी पंचशील व त्रिशरण ग्रहण केले. तसेच आ. पाटील यांचा याठिकाणी सत्कारही केला.

## जीवनाच्या महत्वपुर्ण कौशल्याचा विकास सांघिक खेळामधुनच होऊ शकतो : जाधव




**तभा वृत्तसेवा**
**रेणापूर, दि.१८ डिसेंबर -**

किशोरवयीन जीवन हे प्रगतिशील जीवन आहे या जीवनामध्येच व्यक्तीच्या सर्वांगीण गुणाच्या विकासाची प्रक्रिया वेगवान चालू असते, अशावेळी त्यांना सांघिक खेळामध्ये सहभागी होऊन स्वतःला व्यक्तिमत्व अधिक विकसित करण्याची संधी मिळते. नेतृत्व कौशल्य, पराजय सहन करण्याची कला, विजय आनंद साजरी करण्याची कला, संघटन कौशल्य इत्यादी महत्त्वपूर्ण कौशल्याचा विकास सांघिक खेळामधूनच निर्माण होऊ शकते, असे प्रतिपादन दि.१४ रोजी रविवारी कलापंढरी संस्थेच्या वतीने बिटरगाव येथे आयोजित करण्यात आलेल्या कलापंढरी किशोरी क्रिडा महोत्सवाच्या उदघाटन प्रसंगी रेणापूर पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक आर.एस. जाधव यांनी केले.

आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शिवाजी विद्यालयाचे मुख्याध्यापक सुर्यकांत चव्हाण होते तर प्रमुख अतिथी म्हणून बाबासाहेब कदम, अंकुश शेळके, वसंत यादव, सविता कुलकर्णी आदींची प्रमुख उपस्थिती होती. ग्रामीण भागातील किशोरी मुली मध्ये खेळाची आवड निर्माण व्हावी, त्यांच्यातील कलागुणांना वाव मिळावा म्हणून कलापंढरी संस्थेचे अध्यक्ष बी.पी. सूर्यवंशी यांच्या मार्गदर्शनाखाली रेणापूर तालूक्यातील बिटरगाव येथे किशोरी क्रिडा महोत्सवाचे दि.१५ नोहेंबर रोजी रविवारी आयोजन करण्यात आले होते.

याप्रसंगी पोलीस उपनिरीक्षक जाधव बोलत होते. ते पुढे बोलताना म्हणाले कि, अनेक ठिकाणी मुलांच्या खेळाच्या स्पर्धेचे आयोजन केलेले असते. परंतू आज या ठिकाणी कलापंढरी सामाजिक संस्थेच्या वतीने ग्रामीण भागातील किशोरी मुलींना खेळात आपले करीअर घडवण्यासाठी एक चांगला प्लॅटफॉर्म तयार करुन दिला आहे. प्रत्येक किशोरी मुलींनी आपले खेळांमध्ये करीअर निर्माण करण्यासाठी प्रयत्नशिल राहिल्यास नक्कीच यश आपलेच असेल, अशी भावना ठेऊन प्रत्येकी खेळ आवडीने खेळला जावा, असेही प्रतिपादन पोलीस उपनिरीक्षक आर एस जाधव यांनी केले.

आयोजीत करण्यात आलेल्या क्रिकेट, खोखो, कब्बडी स्पर्धेमध्ये पानगाव, बिटरगाव, वडवळ आदीसह इतर गावातील किशोरी मुली सहभागी झाल्या होत्या. यशस्वीतेसाठी सविता कुलकर्णी, शिवदर्शन सदाकाळे, जयवंत जंगापल्ले, मधुकर गालफाडे, वैभव क्षीरसागर, शालूताई साके, फराना शेख, आदींनी परीश्रम घेतले.

### शॉर्टसर्किटमुळे अडीच एकर ऊस जळून खाक

**तभा वृत्तसेवा**
**शि. अनंतपाळ, दि.१८ डिसेंबर**

तालुक्यातील साकोळ शिवारातील शेतामधून गेलेल्या विजांच्या तारांमुळे शॉर्टसर्किट होऊन दोन शेतकऱ्यांच्या अडीच एकर उसाला लागली आग लागली.

महावितरणच्या तारांमुळे साकोळ येथील सर्वे नं.२२६ मधील २० गुंठे ज्ञानोबा काशिनाथ कडेकर तर याच सर्वे नंबर मधील महेश मोहन रामशेट्टे यांच्या शेतातील २ एकर मधील महावितरणच्या विद्युत तारांच्या ठिणग्या पडून ऊसाला आग लागून खाक झाला. महावितरणने याकडे विशेष लक्ष देऊन लोम्बकळणाऱ्या तारांचा बंदोबस्त करण्यात यावा, अशी मागणी शेतकरी वर्गातून जोर धरत आहे.

## पाथरवाडीत मोफत नेत्ररोग तपासणी शिबिराचे आयोजन

**तभा वृत्तसेवा**
**रेणापूर, दि.१८ डिसेंबर -**

रेणापूर तालुक्यातील पाथरवाडी येथील श्री महादेव आणि हनुमान मंदिर अध्यात्मिक पीठ आणि लातूरच्या विवेकानंद रुग्णालयाच्या संयुक्त विद्यमाने येत्या दि.२५ डिसेंबर रोजी डोळ्यांच्या आजारासंबंधी मोफत तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.



या शिबिरामध्ये तिरळेपणा, काचबिंदू, मोतीबिंदू, डोळ्यावर पडदा येणे, कमी दिसणे आदी नेत्र विकारांबाबत मोफत तपासणी केली जाणार आहे. या नेत्र तपासणी शिबिराचा गरजू रुग्णांनी लाभ घ्यावा.

रुग्णांनी आपली नाव नोंदणी रमेश तुकाराम मद्दे यांच्याकडे दि.२३ डिसेंबर पर्यंत करावी. हे शिबीर पाथरवाडी येथील श्री महादेव आणि हनुमान मंदिर अध्यात्मिक पीठ या ठिकाणी सकाळी ९ ते १२ या वेळेत होणार आहे.

या शिबिराचा जास्तीत जास्त रुग्णांनी लाभ घ्यावा, असे आवाहन श्री महादेव आणि हनुमान मंदिर अध्यात्मिक पीठ आणि विवेकानंद रुग्णालयाच्या वतीने करण्यात आले आहे.

## अंबुलगा येथील ओंकार साखर कारखान्याकडून शेतकऱ्यांना २७५० रुपयांप्रमाणे ऊस बिलाचा हप्ता

**चेअरमन बाबुराव बोत्रे पाटील यांची माहिती...**

**तभा वृत्तसेवा**
**निलंगा, दि.१८ डिसेंबर -**

निलंगा तालुक्यातील अंबुलगा (बु.) येथील डॉक्टर शिवाजीराव पाटील निलंगेकर सहकारी साखर कारखाना लिज ओंकार साखर कारखाना युनिट नं.२ कारखान्याच्या वतीने गळीत हंगाम सन २०२४-२५ मध्ये गाळपास आलेल्या ऊसास एफआरपीपोटी पहिला हप्ता प्रती मेट्रिक टन २ हजार ७५० रुपया प्रमाणे ऊस बिल हप्ता देण्याचे ठरले असल्याची माहिती कारखान्याच्या वतीने प्रसिध्दी पत्रकाद्वारे कळविण्यात आली आहे.

कारखान्याचे चेअरमन बाबुराव बोत्रे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली अंबुलगा (बु) येथील ओंकार साखर कारखाना युनिट नं.२ या कारखान्याचा सन २०२४-२५ गळीत हंगाम यशस्वीपणे सुरु आहे. दि.१५ डिसेंबर अखेर कारखान्याचे गाळप ६२ हजार ३५४ मेट्रिक टन इतके झाले आहे. दि.१६ ते ३० नोव्हेंबर या कालावधीत गाळपास आलेल्या ऊस बिलाचे पेमेंट एफआरपीपोटी प्रती मे. टन २ हजार ७५० रुपये प्रमाणे ऊस पूरवठादार शेतकरी यांना अदा करण्यात येणार आहे व १ मार्च २०२५ पासून गाळपास येणाऱ्या ऊसास प्रती मे.टन रु.१०० प्रमाणे वाढीव रक्कम देण्याचे निश्चित केले आहे.




तसेच मागील वर्षानुसार याही वर्षी गळीतास आलेल्या ऊसास कारखाना धोरनानुसार दिपावली सनानिमीत्त मोफत साखर वाटप करण्याचे कारखाना व्यवस्थापनाने ठरवले आहे. चेअरमन बाबुराव बोत्रे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली शेतकऱ्यांच्या जीवनात आर्थिक उन्नती व्हावी म्हणून कारखाना व्यवस्थापण प्रयत्नशिल आहे.

## आ. संभाजी पाटलांना मंत्रीपद न मिळाल्याने कार्यकर्त्यांमध्ये नाराजी

**तभा वृत्तसेवा**
**निलंगा, दि.१८ डिसेंबर -**

निलंगा विधानसभा मतदारसंघातून चौथ्यांदा आमदार झालेले माजी मंत्री संभाजी पाटील निलंगेकर यांना मंत्रिमंडळ विस्तारात संधी मिळाली नसल्यामुळे मतदारसंघातील कार्यकर्त्यात प्रचंड नाराजी पसरली आहे. निवडणूक काळात राष्ट्रीय पातळीवरील नेत्यांनी संभाजीराव पाटील निलंगेकर यांना निवडून द्या, त्यांना मंत्री करतो म्हणून मतदारांना दिलेले आश्वासन हवेतच विरले आहे.

निवडणूक प्रचारात केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, रामदास आठवले, भाजपचे राष्ट्रीय महामंत्री विनोद तावडे, प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्या जाहीर सभा झाल्या होत्या. त्यावेळी त्यांनी उपस्थित मतदारांना तुम्ही निवडून द्या संभाजीरावांना मंत्री करतो अशी आश्वासन मतदारसंघातील जनतेला दिले होते. लातूर जिल्ह्यामध्ये भाजप महायुतीला भरघोस यश मिळूनही भाजपला मंत्रीपद न दिल्यामुळे संभाव्य स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीवर मोठा परिणाम होणार असून याबाबतचे नेतृत्व नेमके कोणाकडे द्यायची हे पक्षश्रेष्ठ समोर आव्हान असणार आहे. निलंगा मतदार संघ हा राजकीयदृष्या संवेदनशील मतदार संघ आहे. या मतदार संघाला काँग्रेस पक्षाकडून व भाजपाकडून सतत राज्याच्या सत्तेमध्ये नेतृत्वाची संधी मिळाली आहे. काँग्रेसचे ज्येष्ठ नेते माजी मुख्यमंत्री कै.डॉ. शिवाजीराव पाटील निलंगेकर यांनी अनेक वर्षी या भागाचे नेतृत्व मंत्रिमंडळात केले आहे. शिवाय त्यांनी विविध खात्याचा पदभार सांभाळून या भागाचा मोठ्या प्रमाणात विकास केला आहे. त्यानंतर संभाजीराव पाटील यांनीही नुकत्याच झालेल्या निवडणुकीत चौथ्यांदा विजय प्राप्त केला आहे. राज्यांमध्ये भारतीय जनता पार्टी महायुतीला मोठ्या प्रमाणात यश मिळाले आहे. त्यामुळे नुकत्याच झालेल्या मंत्रिमंडळ विस्तारात संभाजी पाटील निलंगेकर यांचे नाव निश्चित मानले जात होते.



यापूर्वी अडीच वर्षांपूर्वी झालेल्या राजकीय घडामोडी नंतर एकनाथ शिंदे सरकारच्या विस्तारामध्ये सुद्धा त्यांना संधी देण्यात आली नव्हती. नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीत लातूर जिल्ह्यातील सहापैकी लातूर शहर मतदारसंघ वगळता पाच विधानसभा मतदारसंघात महायुतीला यश मिळाले आहे. शिवाय मागील स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीत महानगरपालिका, जिल्हा परिषद, पंचायत समिती यामध्ये भाजपला सत्ता मिळवण्यात संभाजी पाटील यांचा मोठा वाटा होता. देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री असताना त्यांना थेट कॅबिनेट मंत्री पद देण्यात आले होते. परंतु राज्यांमध्ये मिळालेल्या भरघोस यशामुळे व लातूर जिल्ह्यातील भाजपला बळकट करण्यासाठी संभाजी पाटील-निलंगेकर यांना निश्चित कॅबिनेट मंत्री म्हणून संधी मिळेल असे अपेक्षा होती. शिवाय जेष्ठ आमदार असल्यामुळे नव्याने होणाऱ्या विस्तारात संभाजी पाटील यांनी निलंगेकर यांची वर्णी लागणार म्हणून शेकडो कार्यकर्ते नागपूर येथे आपले नाव पक्के आहे म्हणून उपस्थित होते. परंतु मंत्रिमंडळात संधी मिळाली नसल्यामुळे मतदारसंघातील कार्यकर्त्यांमध्ये प्रचंड नाराजी पसरली आहे. लातूर जिल्ह्यात भाजप मोठा पक्ष असताना या पक्षाला संधी न मिळाल्यामुळे जिल्ह्यातील कार्यकर्त्याची भविष्यात मोठी गोची होणार आहे. भाजपा पक्षश्रेष्ठी हा प्रश्न कसा हताळणार याकडे लक्ष लागले.

शिवाय राष्ट्रीय नेते व राज्यपातळीवरील नेत्यांनी निवडणुकी दरम्यान मंत्री करतो म्हणून दिलेले आश्वासन हवेतच विरले असून अशी आश्वासन केवळ निवडणुकीत निवडून येण्यापूरते दिली जातात. त्यानंतर फारसे गांभीर्य घेतले जात नाहीत याची प्रचिती मतदारसंघातील जनतेला मात्र यानिमित्ताने आली आहे.

